(सभापतीस्थानी माननीय सभापती)

म.वि.प.नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावासंबंधी

**सभापती** : आज म.वि.प. नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन महत्वाच्या विषयावर चर्चा घेण्यासंबंधीच्या प्रस्तावाच्या दोन सूचना माझ्याकडे प्राप्त झालेल्या आहेत. काल या अनुषंगाने सविस्तर चर्चा केली होती आणि नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने मी दालनातच निर्णय घेतला आहे. प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्याबाबतची नियम 289 अन्वये पहिली सूचना सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, श्री. दिवाकर रावते व श्री.अरविंद सावंत यांनी दिलेली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, यासंबंधी मला थोडक्यात म्हणणे मांडू द्यावे.

**सभापती** : मी याबाबत निर्णय घेतला आहे, 5 जून रोजी सकाळी या विषयाबाबत दीड तासाची अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, धन्यवाद.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपण घेतलेल्या निर्णयाबद्दल धन्यवाद.

**सभापती** : नियम 289 अन्वये दुसरी सूचना सर्वश्री पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण यांनी दिलेली आहे. या सूचनेमध्ये विधीमंडळाने मंजूर केलेल्या 2004 च्या अधिनियम क्रमांक-8 ला माननीय राज्यपालांनी मंजुरी देऊन तो शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात येणे, त्याद्वारे पदोन्नती रोखून धरणे अशा विषयावर ही सूचना देण्यात आली आहे. मी ही सूचना स्वीकारलेली नाही, परंतु या विषयावर लक्षवेधी सूचना स्वीकारण्याचे ठरविले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्यातील ओबीसी समाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा विषय आहे. 2004 साली सभागृहात कायदा मंजूर होऊन माननीय राज्यपालांनी संमती दिली. त्यानंतर तो कायदा महाराष्ट्रात लागू झाला. परंतु त्या कायद्याच्या माध्यमातून ओबीसी समाजातील लोकांची पदोन्नती रोखून ठेवण्यात आली. इतरांना पदोन्नती देण्यात आली. राज्यातील कोट्यवधी ओबीसी समाजाच्या कर्मचाऱ्यांवर हा अन्याय आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

**सभापती** : काल आपण सभागृहात उपस्थित नव्हता. या ठिकाणी चर्चा करीत असताना सांगितले होते की, म.वि.प.नियम 289 अन्वये अनेकवेळा अशा पध्दतीच्या सूचना देण्यात येतात. त्या अनुषंगाने माननीय सभापती आपल्या दालनात निर्णय घेतात. आज प्राप्त झालेल्या दोन्ही सूचनांबाबत मी निर्णय घेतला आहे. नियम 289 अन्वये आपण दिलेली सूचना महत्वाची आहे. परंतु त्या अनुषंगाने प्रश्नोत्तराचा तास तहकूब करता येणार नाही. विषय महत्वाचा असल्यामुळे मी या संदर्भात तातडीने लक्षवेधी सूचना द्यावी. ती मी स्वीकारीन.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**बीड जिल्हयातील स्थलांतर रोखलेल्या ७६०० विद्यार्थ्यांना देय असलेल्या अनुदानाबाबत**

**(१) * ५०६५९ ॲड. उषाताई दराडे , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील स्थलांतर रोखलेल्या ७६०० विद्यार्थ्यांना देय असलेले अनुदान निधीअभावी न दिल्याने वस्तीगृहातील विद्यार्थ्यांचे हाल होत असल्याचे माहे जानेवारी, २००९ मध्ये शासनाच्या निदर्शनास आले वा आणून देण्यांत आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर वस्तीगृहांना अनुदानाची रक्कम तातडीने देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत हंडोरे :** (१) बीड जिल्हयातील ६९ मागासवर्गीय मुला-मुलींचे अनुदानित वसतिगृहाच्या ३०३३ विद्यार्थ्यांपैकी १३८ विद्यार्थ्यांना निधीअभावी अनुदान देण्यात आलेले नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) सन २००९-१० वर्षाकरिता प्रलंबित अनुदान देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, या प्रश्नाचे छापील उत्तर माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे यांनी दिले असले तरी सर्व शिक्षा अभियानांतर्गत ही योजना राबविली जात असल्यामुळे शालेय शिक्षण विभागाकडून उत्तर अपेक्षित होते. सुधारित उत्तर आलेले नाही.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाच्या पहिल्या उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे.

......बी.१.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 50659...... श्री. राधाकृष्ण विखे-पाटील........

शालेय शिक्षण विभागाअंतर्गत सर्व शिक्षा अभियान योजनेसंबंधीचा हा प्रश्न असून त्यातील प्रश्न क्र. 1 मध्ये मला पुढील दुरुस्ती करावयाची आहे.

"हे खरे नाही, सर्व शिक्षा अभियान अंतर्गत 49399 मुलांसाठी हंगामी वसतिगृहासाठी रु. 12 कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे" असे वाचावे. बाकी छापल्याप्रमाणे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना उत्तरात दुरुस्ती करावयाची असेल तर ती अशी आयत्या वेळी न करता त्याच्या प्रती सर्व सन्माननीय सदस्यांना सर्क्युलेट कराव्यात, अशी माझी सूचना आहे. कारण वेळेवर दुरुस्ती करण्याची अशी प्रथा योग्य नाही.

**सभापती** : आपली सूचना रास्त आहे, कारण तसा वेळ असेल तर सर्व सन्माननीय सदस्यांना अशा दुरुस्तीच्या प्रती सर्क्युलेट केल्या पाहिजेत. परंतु माननीय मंत्री महोदयांना लेखी उत्तरात दिलेल्या वाक्याच्या ऐवजी एखादे वाक्य अथवा एखादे अक्षर जर रिप्लेस करावयाचे असेल तर ते करता येते.

ॲड. उषा दराडे : महोदय, शासनानेच कबूल केले आहे की, 49399 मुलांना बीड जिल्ह्यातून स्थलांतर होण्यापासून रोखलेले आहे. ऊस तोड कामगारांची राज्यात एकूण 57 हजार मुले असून त्यापैकी 49 हजार 399 मुले एकट्या बीड जिल्ह्यातील आहेत. काही वर्षांपासून दरवर्षी या मुलांना संस्थांमार्फत किंवा ग्रामपंचायतीला पैसे देऊन शिक्षण दिले जाते व त्यांचे स्थलांतर रोखण्याचा प्रयत्न करतो. माझा प्रश्न असा आहे की, या 50 हजार विद्यार्थ्यांचे स्थलांतर कायमस्वरुपी रोखण्यासाठी रेसिडेन्शियल स्कुल्स देण्याचा विचार शासन करणार काय ? तसेच ज्यांचे स्थलांतरि रोखलेले आहे त्यात विमुक्त व भटक्या जमातीची 99 टक्के मुले आहेत. ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी नवीन शाळा दिल्या जाणार नाहीत असाही शासनाचा एक जी.आर. आहे. तो रद्द करण्याचा विचार शासन करणार काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, स्थलांतरित मुलांच्या दृष्टीने विशेष करुन ऊस तोड कामगारांसाठी या शाळा चालविल्या जातात. सर्व शिक्षा अभियानातून अशा शाळांवर खर्च केला जातो. तसेच शिक्षणापासून कोणी वंचित राहू नये म्हणून आपण सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत

...2

PFK/ MAP/ SBT/

ता.प्र.क्र. 50659...... श्री. राधाकृष्ण विखे-पाटील........

मिळणारी रक्कम त्या त्या ग्राम शिक्षण समित्यांकडे सुपूर्द करतो व त्यातून हा खर्च केला जातो. तसेच सन्माननीय सदस्या यांनी अशा मुलांसाठी कायमस्वरुपी वसतिगृहे बांधावीत अशी सूचना केली आहे. या सूचनेबाबत विचार करुन त्याचे परिणाम पाहिल्यानंतर तसा धोरणात्मक निर्णय आपल्याला घ्यावा लागणार आहे. तसेच त्यांनी पुढे असेही सांगितले की, शासनाचा जो जी.आर. आहे त्यामध्ये ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी नवीन शाळा देऊ नयेत असे म्हटले आहे. याबाबतीत शासनाची भूमिका सकारात्मक असून याबाबतीत देखील योग्य तो विचार केला जाईल.

प्रा. रामनाथ मोते : महोदय, बीड जिल्ह्यातील ऊस तोड कामगारांच्या 49399 मुलांच्या शिक्षणाचा हा प्रश्न असून त्यांना कायमस्वरुपी रेसिडेन्शियल स्कुल्स काढाव्यात हाच एक पर्याय ठरु शकतो. परंतु शासनाचा जो प्रचलित जी.आर. आहे त्याची अडचण यामध्ये येण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशी परवानगी मिळू शकणार नाही असे मला वाटते. म्हणून खास बाब म्हणून व्ही.जे.एन.टी. च्या मुलांची शिक्षणाची सोय व्हावी म्हणून हा जी.आर. रद्द करावा आणि या मुलांसाठी रेसिडेन्शियल स्कुल्स काढण्यासंबंधीचा निर्णय शासन घेणार आहे काय ? त्याचप्रमाणे मागील वर्षी 12 कोटी रुपये त्यासाठी खर्च केल्याचेही मंत्री महोदयांनी सांगितले. परंतु हा निधी खर्च झाला काय ? तसेच त्यापैकी काही निधी देखील या शाळांना मिळालेला नाही त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना अनुदान मिळाले नाही, हे खरे आहे काय ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 50659....

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, आपण साधारणत: 1800 वसतिगृहे चालवित आहोत. या प्रश्नाच्या संदर्भातील वसतिगृहे कायमस्वरुपी चालविली पाहिजेत अशी सूचना सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी केली आहे. वसतिगृहाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी चांगली सूचना केलेली आहे. त्यामुळे यासंदर्भात पूर्वीचा शासन निर्णय रद्द करुन अशा प्रकारे शाळा सुरु करतांना त्याला जोडून तेथे वसतिगृह सुरु करता येईल का ही बाब तपासून पहावी लागेल. ही बाब फिजिबल आहे की, नाही हे पाहून निर्णय करावा लागेल. या विषयाच्या संदर्भात शासनाची भूमिका अतिशय चांगली आहे. ऊस तोड कामगारांच्या मुलांना स्थैर्य मिळावे असा शासनाचा हेतू आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना चांगली असून ती तपासून घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की,आतापर्यंत 12 कोटी रुपये विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात आलेले आहे. अद्यापही आपल्याकडे निधी उपलब्ध आहे. यासंदर्भातील निधी अखर्चित राहिला अशी परिस्थिती नाही. 12.25 कोटी रुपयांपैकी 11.41 कोटी रुपये वितरीत करण्यात आलेले आहेत. निधी परत गेला अशी स्थिती नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, निधी शिल्लक असतांनाही 7900 विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळालेला नाही ही वस्तुस्थिती आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, बीड जिल्हयातील सगळया 49 हजार विद्यार्थ्यांना निधी वितरीत झालेला असल्यामुळेच उत्तरात दुरुस्ती सुचवण्यात आलेली आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, आताच माननीय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले आहे की, बीड जिल्हयातील 49 हजार विद्यार्थ्यांना 12 कोटी रुपये निधी देण्यात आलेला आहे. या विषयाच्या संदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो की, पंचायत राज समितीच्या माध्यमातून मी जेव्हा बीड जिल्हयाच्या दौ-यावर होतो तेव्हा हे पैसे विद्यार्थ्यांपर्यंत न पोहचता हे पैसे वाटण्यामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे आढळून आलेले आहे. त्यामुळे बीड जिल्हयातील विद्यार्थ्यांसाठी जो निधी देण्यात आला त्याची सखोल चौकशी करण्यात येईल काय तसेच या ठिकाणच्या 49 हजार विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यात येईल काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :50659...

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, ग्रामशिक्षण समितीच्या माध्यमातून ही योजना राबविली जात असते. या समिती मार्फत लाभार्थ्यांपर्यंत पैसे गेले नसतील तर विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी करण्याची माझी तयारी आहे व तशा प्रकारच्या सूचनाही संबंधितांना देण्यात येतील.

-----------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा अपघात विमा योजनेतील अनियमितता व गैरकारभार**

**(२) * ५१८९२ श्री. प्रकाश शेंडगे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. संजय केळकर , श्री. भगवान साळुंखे , श्री.चंद्रकांत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४४९२५ ला दिनांक १६ जूलै,२००८ रोजी दिलेल्या उत्तरांच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सन २००३ मध्ये शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा अपघात विमा योजनेची व्यापक माहिती शिक्षक व पालकांना नसल्याने पालिका व खाजगी शाळांमधील अपघातग्रस्त अनेक विद्यार्थी सदर योजनेच्या लाभापासून वंचित आहेत, असे माहे डिसेंबर,२००८ च्या पहिल्या आडवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना विद्यार्थी व पालकांपर्यंत पोहोचण्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील** : १) हे खरे नाही.

२) या योजनेच्या अधिकाधिक प्रसिध्दीसाठी जिल्हास्तरावर सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच मागील वर्षी चार टक्के सादिल अनुदानातून उपलब्ध असलेल्या तरतूदीतून या योजनेची सविस्तर माहिती असणारे पी.व्ही.सी. बॅनर्स सर्व शाळा महाविद्यालयांना पुरवठा करण्यात आले आहेत. तसेच राज्यभर व्यापक प्रसिध्दीसाठी बॅनर्स खरेदी करुन क्षेत्रिय अधिकाऱ्यांना मोक्याच्या ठिकाणी कार्यालयांमध्ये व शाळांमध्ये व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी पुरवठा करण्यात आलेला होता. तसेच महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन प्रशिक्षण पुणे यांचेमार्फत प्रकाशित करण्यात येत असलेल्या "जीवन शिक्षण" अंकामधून व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणमंडळ पुणे यांच्या "शिक्षण संक्रमण" अंकातूनही याची प्रसिध्दी तसेच दूरदर्शन आकाशवाणी कार्यक्रमातूनही प्रसिध्दी दिली आहे.

३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रश्न विचारण्याचा मूळ मुद्दा असा आहे की, राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा अपघात विमा योजना महाराष्ट्र राज्यात सन 2003 मध्ये सुरु झाली होती.या प्रश्नाच्या संदर्भात उत्तर देतांना माननीय मंत्रीमहोदयांनी असे सांगितले आहे की, पीव्हीसी बॅनर्स सर्व शाळा महाविद्यालयांना पुरवठा करण्यात आले आहेत तसेच राज्यभर व्यापक प्रसिध्दीसाठी बॅनर्स खरेदी करुन क्षेत्रिय अधिका-यांना मोक्क्याच्या ठिकाणी कार्यालयामध्ये व शाळामध्ये व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी पुरवठा करण्यात आलेला होता. तसेच महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन प्रशिक्षण पुणे यांचेमार्फत प्रकाशित करण्यात येत असलेल्या "जीवन शिक्षण" अंकामधून व महाराष्ट्र



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 51892....

श्री. पांडुरंग फुंडकर...

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणमंडळ पुणे यांच्या "शिक्षण संक्रमण" अंकातूनही याची प्रसिध्दी करण्यात आलेली आहे. या योजनेची माहिती महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील पालकांपर्यंत तसेच विद्यार्थ्यांपर्यंत ही योजना जात नाही. या योजनेसाठी प्रत्येक विद्यार्थ्याच्या पाठीमागे 70 रुपये वार्षिक विमा रक्कम युनायटेड इन्श्यूरन्स स्कीमवर खर्च केली जाते. गेल्या 5 वर्षात शासनाने ही योजना युनायटेड इन्श्यूरन्स स्कीमकडे वर्ग केलेली आहे. त्यामुळे आतापर्यंत या योजनेचा लाभ महाराष्ट्रातील किती विद्यार्थ्यांना झाला याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावी. तसेच ही जी योजना आहे या योजनेची माहिती "अ","ब" व "क" नगरपालिकांना सुध्दा नाही. या योजनेच्या संदर्भातील कोणालाच माहिती नसल्यामुळे हजारो विद्यार्थी या योजनेपासून वंचित रहात आहेत. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, ही योजना महाराष्ट्रातील प्रत्येक शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी शासनाने कोणत्या पध्दतीने या योजनेची प्रसिध्दी आणि प्रचार करणार आहे. गेल्या 5 वर्षामध्ये किती विद्यार्थ्यांचा विम्याचा हप्ता भरण्यात आला आहे व किती विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ झालेला आहे ?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.51892...

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, मागच्या पाच वर्षाची आकडेवारी माझ्याकडे उपलब्ध आहे ती आकडेवारी मी सन्माननीय सदस्यांना देऊ इच्छितो. या योजनेला 2003-3004 साली सुरुवात झाली होती. त्या वर्षी 598 दावे दाखल करण्यात आले होते. त्यानतर 2004-2005 साली 1988 दावे , 2005-2006 साली 2899 दावे, 2006-2007 साली 14619 दावे , 2007-2008 साली 4021 दावे दाखल करण्यात आले होते. त्याचबरोबर 2008-2009 साली 3600 दावे दाखल करण्यात आले होते जवळजवळ 1 कोटी 45 लाख विद्यार्थ्याचा समावेश या योजनेमध्ये करण्यात आला आहे. 2003-2004 साली 40 लाख 86 हजार रुपयांची, 2004-2005 साली 2 कोटी 26 लाख रुपयांची, 2005-2006 साली 1 कोटी 98 लाख रुपयांची , 2006-2007 साली 2 कोटी 97 लाख रुपयांची, 2007-2008 साली 1 कोटी 98 लाख रुपयांची आणि 2008-2009 साली 2 कोटी रुपयांची भरपाई देण्यात आली होती. अशा प्रकारे या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो बरोबर आहे या योजनेची जेवढी प्रसिध्दी व्हावयास पाहिजे तेवढी होत नाही. या योजनेच्या प्रसिध्दीसाठी जेवढी व्याप्ती असावयास पाहिजे तेवढी नाही हे मान्य करावयास पाहिजे. या संदर्भात पुढच्या आठवडयात वा अधिवेशन संपण्यापूर्वी मी बैठक घेणार आहे . या योजनेचा प्रसार आणि प्रचार चांगल्या प्रकारे व्हावयास पाहिजे. प्रत्येक ठिकाणी बॅनर्स लावण्यात आले पाहिजेत. आम्ही जी काही माहिती देतो ती कागदपत्रावरुन देत असतो परंतु प्रत्यक्षात ग्रामीण भागातील परिस्थिती थोडी वेगळी आहे अर्बन भागातील परिस्थिती वेगळी आहे. या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जे सांगितले आहे ते बरोबर आहे. या योजनेच्या प्रसिध्दीची व्याप्ती वाढविण्याची गरज आहे. त्याचबरोबर या योजनेचे स्वरुपही थोडेसे बदलावे लागणार आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा या संदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, या योजनेच्या संदर्भात ज्या अटी ठरविण्यात आलेल्या आहेत त्या अत्यंत जाचक आहेत . त्या अटी शिथिल करण्यात आल्या पाहिजेत. या योजनेतील पहिली अट अशी आहे की ,अपघात झाल्यापासून सात दिवसाच्या आत संबंधित शाळेने त्यांसंबंधीचा क्लेम कंपनीकडे करावयास पाहिजे. सात दिवसाच्या आत जर क्लेम केला नाही तर बहुतेक क्लेम कंपनीकडून नाकारण्यात येतात या संदर्भात मला माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती करावयाची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे की, सात दिवसाची अट रद्द करुन कमीत कमी तीस दिवसाच्या आत क्लेम सादर करण्याची अट घालण्यात येणार आहे काय ?

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, अपघात झाल्यानंतर एफ.आर.आय. दाख्र्ल करणे, पंचनामा करणे आणि त्याच्या प्रती सादर करणे इत्यादी कंपनीच्या अटी असतात. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबद्दल मी सांगू इच्छितो की, ही अट शिथिल करता येईल काय या बाबतीत विधि व न्याय विभागाचा सल्ला घेण्यात येईल. त्याचबरोबर इन्शुरन्स कंपनीकडून क्लेम्स सेटलमेन्ट करण्यामध्ये त्यांनी ज्या काही अटी घातलेल्या आहेत त्याबाबतीत त्यांच्याबरोबर चर्चा करावी लागेल. सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, सात दिवसाच्या अटीमुळे काही प्रकरणात कंपनीकडून क्लेम मिळत नाहीत त्यामध्ये काही दुरुस्ती करावी लागेल. 2009-2010 सालाकरिता जेव्हा नवीन योजना सुरु करण्यात येईल त्यावेळी या सर्व बाबी विचारात घेण्यात येतील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, स्व.राजीव गांधी याच्या नावाने विद्यार्थी सुरक्षा अपघात विमा योजना सुरु करण्यात आली आहे. विद्यार्थ्याचा चष्मा फुटला, त्याचे दफतर हरवले किंवा सायकल हरवली तर भरपाई देण्यासंबंधी या योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार चष्मा फुटला तर किती रकमेची नुकसानभरपाई मिळेल, दफतर हरवले तर किती रकमेची नुकसान भरपाई मिळेल आणि सायकल हरवली तर किती रकमेची नुकसान भरपाई मिळेल हे ठरविण्यात आलेले आहे .अशा प्रकारे या प्रत्येक वस्तूंचा विमा कव्हर करण्यात आलेला आहे. या संदर्भात मला माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की , पहिल्या काही वर्षात राज्य सरकारकडून विमा कंपनीकडे वेळेत पैसे भरले गेले नाहीत हे खरे आहे काय ? सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेडगे यांनी सांगितल्याप्रमाणे या विमा योजनेतील अटी जाचक असल्यामुळे त्या सुटसुटीत करण्यात आल्या पाहिजेत. यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, क्लेम सादर करण्यासबंधीचे नियम विद्यार्थ्यांना माहीत नाहीत त्यामुळे अपघात झाल्यानंतर त्या शाळेतील मुख्याध्यापकांनी किंवा वर्ग शिक्षकांनी सु मोटो क्लेम सादर करावेत अशा प्रकारची नियमावली तयार करण्यात येणार आहे काय ?

नंतर श्री.सुंबरे

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ MAP/ श्री. गायकवाड नंतर --- 11:20

ता.प्र.क्र.51892 .....

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, शासनाकडून विमा कंपनीकडे या विद्यार्थ्यांचा विम्याच्या प्रिमियमची रक्कम भरण्याचे राहून गेले आहे असे जे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे तसे घडलेले नाही. विम्याचे प्रिमियम्स वेळेमध्ये भरले गेलेले आहेत. दुसरा जो प्रश्न आहे तो या संबंधात प्रक्रिया क्लिष्ट आहे त्यासंबंधातील आहे. तर त्याबाबत आम्ही तपासून घेतले आहे आणि ती वस्तुस्थिती असल्याचे लक्षात आले आहे. त्यामुळे त्यामुळे विमा कंपन्यांबरोबर याबाबत आपण निगोशिएशन करीत आहोत तसेच मुख्याध्यापकांच्या स्तरावर हे अधिकार देता येतील किंवा कसे यावर देखील विचार करण्यात येईल.

श्रीमती फौजिया खान :सभापति महोदय, मेरा पहला प्रश्न यह है कि, राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा अपघात बीमा योजना की जानकारी विद्यार्थियों को देने के लिए और जन-जागृति हेतु सभी स्कुलों को बॅनर्स दिए गए हैं. लेकिन क्या सरकार की तरफ से स्कूल के हेड मास्टर और प्रिंसीपाल को कोई सर्कुलर भेजा गया है ? केवल विधान सभा और विधान परिषद में घोषणा करने से ही सारे विद्यार्थियों को जानकारी नहीं मिल सकती है और केवल बॅनर्स पर ही खर्च करने की जरुरत नहीं है. मेरा दूसरा प्रश्न यह है कि क्या अनुदानित, बिना अनुदानित और सभी शासकीय महाविद्यालय और विद्यालयों के विद्यार्थियों के लिए यह स्कीम लागू की गई है ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा सांगितला आहे की, आपण जी भित्तीपत्रके वा बॅनर्स लावतो त्याबाबत शासनाचे आदेश आहेत तसेच ही योजना विद्यालयापर्यंतच आहे असे नाही तर महाविद्यालय स्तरावरदेखील ही योजना लागू आहे. त्यामुळे प्राचार्यांपासून सर्वांना मग ते प्राथमिक असेल, माध्यमिक वा उच्च माध्यमिक असेल, सर्व शाळा-महाविद्यालयांना आपण या योजनेबाबत लिखित स्वरूपात कळविले आहे की ही योजना नेमकी काय आणि कशी आहे. तरीही याबाबत काही त्रुटी असतील तर त्याबाबत आपण फेरआदेश जरूर देऊ. त्यात काही अडचण नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता मंत्री महोदयांनी सांगितले की, सर्व शाळांना या योजनेविषयी माहिती कळविली आहे. पण प्रत्यक्षात तसे झालेले नाही. शासनाकडून सर्व शाळा-महाविद्यालयांना या योजनेविषयी अजूनही काहीही कळविलेले नाही अशी माझी माहिती आहे. कारण आज देखील ग्रामीण भागात विद्यार्थ्यांच्या बाबतीत किडनीचे ऑपरेशन असेल वा अन्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोणतेही महत्त्वाचे ऑपरेशन असेल, वैद्यकीय उपचाराच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांच्या निधीतून मदत मिळवून द्यावी यासाठी पालक आमच्याकडे येतात. त्यांना किंवा त्यांच्या शाळांना अशा प्रकारची काही योजना असल्याचे अजूनही माहिती नाही. थोडक्यात या योजनेची म्हणावी तशी प्रसिद्धी वा प्रसार अजूनही झालेला नाही. म्हणून अनुदानित, विनाअनुदानित अशा सर्वच शाळांना, त्यातील प्राध्यापक, प्राचार्य यांच्याकडे या योजनेसंबंधीचे परिपत्रक आपण पाठवावे आणि शाळा-महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांचा विमा तेथील मुख्याध्यापक, प्रचार्य यांनी उतरविलाच पाहिजे अशा प्रकारचे बंधन घालण्याबाबतचे आदेश आपण देणार आहात का ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी म्हटल्याप्रमाणे या योजनेच्या प्रसिद्धीबाबत जो मुद्दा येथे चर्चिला गेला त्याबाबत जरूर योग्य ती दखल घेतली जाईल तसेच या योजनेची व्याप्ती वाढविताना ही योजना अधिक लोकांपर्यंत जाईल या दृष्टीने निश्चितपणे कारवाई केली जाईल. तसेच आताही सुधारित आदेश देताना थेट मुख्याध्यापक, प्राचार्य यांच्यापर्यंत या योजनेबाबतची परिपत्रके देण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. त्यात काही अडचणी असतील तर जरूर त्यात सुधारणा करण्यात येईल. दुसरा मुद्दा येथे त्यांनी उपस्थित केला आहे त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, मान्यताप्राप्त अनुदानित, विनाअनुदानित शाळा, महाविद्यालये आहेत त्यांच्यासाठी देखील ही योजना लागू आहे मात्र कायम स्वरूपी विनाअनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांच्या बाबतीत मात्र शासन लवकरच निर्णय घेईल.

**सभापती** : मी या निमित्ताने मंत्री महोदयांना, माननीय मुख्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, कायम विनाअनुदानित शाळा आहेत त्यातील विद्यार्थी देखील आपलीच मुले आहेत. त्यांना अन्य सुविधा केव्हा द्यायच्या असतील त्या आपण जरूर नंतर द्या पण त्या विद्यार्थ्यांना असे विम्याचे संरक्षण देण्याच्याबाबतीत आपण प्राधान्याने प्रयत्न करावा.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, आपण केलेल्या सूचनेचा शासन निश्चतपणे विचार करील.

श्री. अरूण गुजराथी : सभापती महोदय, सन 2009-10 या वर्षापासून विना अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना ही योजना लागू आपण करणार काय ? याचे नेमके उत्तर मिळावे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, ही योजना त्यांनाही लागू करण्यात येईल.

( यानंतर श्री. सरफरे .... एफ 1 ..

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 51892...

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने माझे दोन उपप्रश्न आहेत. या योजनेचा प्रचार व प्रसार "जीवन शिक्षण" व "शिक्षण संक्रमण" या दोन मासिकांच्या माध्यमातून करण्याबाबत शासनाने उत्तर दिले आहे. ही दोन्ही मासिके शाळांपर्यंत पोहोचणे बंधनकारक केले पाहिजे अशी मी विनंती केली होती. परंतु ही दोन्ही मासिके शाळांनी घेणे शासन बंधनकारक करु शकत नाही असे उत्तर दिले. त्याबाबत शासन फेरविचार करणार आहे काय? दुसरा प्रश्न असा आहे की, या योजनेचा लाभ अपघातग्रस्त विद्यार्थ्यांबरोबर नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या विद्यार्थ्यांना सुध्दा मिळाला पाहिजे. दिनांक 25 व 26 जुलैच्या पूरामध्ये सापडलेल्या पूरग्रस्त हजारो विद्यार्थ्यांनी शासनाच्या जी.आर. नुसार तातडीने क्लेम सादर केले होते. परंतु त्या विद्यार्थ्यांना विमा कंपनीकडून अद्यापही भरपाई मिळालेली नाही. शासनाने प्रयत्न करुनसुध्दा ही भरपाई मिळाली नाही. अशा विद्यार्थ्यांना नुकसान भरपाई हे शासन देणार आहे काय?

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा जरुर विचार करण्यात येईल. आणि जे विद्यार्थी त्यांना मिळणाऱ्या लाभापासून अद्यापही वंचित राहिले असतील त्यांना लाभ मिळण्याबाबत जरुर कारवाई करु.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना उशिराने वेतनश्रेणी लागू करण्याचा भेदभाव संपुष्टात आणणे**

**(३) * ५०१६५ श्री. वसंतराव खोटरे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री.दिलीपराव सोनवणे : तारांकित प्रश्न क्रमांक ४६२६४ ला दिनांक १७ डिसेंबर, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर सर्व प्रवर्गांना नविन वेतनश्रेण्या दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून लागू करण्यात आलेल्या असल्या तरी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना त्या दिनांक १ मार्च, २००० पासून लागू केल्यामुळे झालेला भेदभाव संपुष्टात आणण्याच्या विचाराधिन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(२) मा.पीठासीन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत ठरलेल्या निर्णयावर एक महिन्याच्या आत कारवाई करण्याच्या प्रश्नाची सद्यस्थिती काय आहे,

(३) विदर्भ ज्युनिअर कॉलेज टिचर्स असोसिएशनचे अध्यक्ष व सचिवांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक १५ सप्टेंबर, २००८ रोजी किंवा त्यादरम्यान शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांच्यामार्फत एक निवेदन देऊन ही बाब लक्षात आणून दिली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे ?

**श्री.राधाकृष्ण विखे पाटील** : (१) नाही.

(२) कार्यवाही सुरू आहे.

(३) होय.

(४) इतर विभागांची माहिती प्राप्त होताच वित्त विभागाचे अभिप्राय प्राप्त करून प्रस्ताव मंत्री मंडळाचे विचारार्थ सादर करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक ३ मध्ये "विदर्भ ज्युनिअर कॉलेज टिचर्स असोसिएशन" या वाक्य रचनेच्या बाबतीत माझा हरकतीचा मुद्दा आहे. या राज्याची राज्यभाषा मराठी आहे. असे असतांना या प्रश्नामधील इंग्रजी वाक्ये कपाळाला लावून ही मंडळी फिरत आहेत. तेव्हा भविष्यामध्ये त्यांनी मराठीमध्ये प्रश्न द्यावेत अशी माझी सूचना आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, "विदर्भ ज्युनिअर कॉलेज टिचर्स असोसिएशन" हे या संघटनेचे नाव आहे, त्या संघटनेने निवेदन दिले आहे....

ता.प्र.क्र. ५०१६५...

श्री. दिवाकर रावते : त्या नावाचे मराठीकरण होणार नसेल तर आपण ते निवेदन स्वीकारु नका.

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, आपल्याकडे विविध संघटनांची निवेदने येतात. त्यांनी आपल्या व्यथा मांडण्यासाठी निवेदन दिले होते, त्या निवेदनावर या संघटनेचे नाव छापलेले आहे. त्या संघटनेला आपले नाव दुरुस्त करण्यास सांगू.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, गेल्या वर्षीच्या हिवाळी अधिवेशनामध्ये हा प्रश्न विचारण्यात आला होता व त्यावर चर्चा देखील झाली होती. कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना व इतर कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग १ जानेवारी १९९६ पासून लागू झाला. परंतु याठिकाणी या कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांना १ मार्च २००० पासून पाचवा वेतन आयोग लागू करण्यात आल्याचे त्यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे. तसेच, पाचवा वेतन आयोग १ जानेवारी १९९६ पासून लागू करण्याबाबत त्यांनी निवेदन दिले आहे. हिवाळी अधिवेशनामध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना माननीय राज्यमंत्र्यांनी एक महिन्याच्या आत निर्णय घेऊन हा प्रश्न मार्गी लावू असे म्हटले होते. आणि आता या ठिकाणी नकारात्मक उत्तर दिले आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, या बाबतीत आपण आठ दिवसात निर्णय घेणार काय?

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, मागील हिवाळी अधिवेशनामध्ये या प्रश्नाच्या बाबतीत आश्वासन देण्यात आले होते ही गोष्ट खरी आहे. परंतु हा केवळ शालेय शिक्षण विभागापुरता मर्यादित प्रश्न नाही. त्यामध्ये अन्य विभागाचा देखील संबंध आहे.....

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, हिवाळी अधिवेशनामध्ये माननीय राज्यमंत्र्यांनी एक महिन्याच्या आत निर्णय घेतला जाईल असे उत्तर दिले होते...

**सभापती** : मंत्रिमहोदयांचे उत्तर अपूर्ण असल्यामुळे त्यांचे पूर्ण उत्तर आपण ऐकून घेतले पाहिजे. त्यानंतर आपणास पूरक प्रश्न विचारण्यास मी संधी देतो.

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाच्या बाबतीत थोडा विलंब झाला आहे हे मी मान्य करतो. मध्यंतरीच्या काळात या विषयाच्या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती, त्यांचा अहवाल अजून अप्राप्त आहे. त्याबाबत लवकरात लवकर कारवाई

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ SBT/

ता.प्र.क्र. ५०१६५...

श्री. राधाकृष्ण विखे पाटील.....

करण्यासंबंधी त्या विभागाला सूचना दिल्या जातील. यामध्ये तीन-चार विभागांचा संबंध असल्यामुळे थोडा विलंब झाला आहे. परंतु तरीसुध्दा लवकरात लवकर त्या संदर्भात कारवाई केली जाईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:30

ता.प्र.क्र.50165 . . . .

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी जी उत्तरे दिली जात आहेत, त्याबाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, येथे अधिकाऱ्यांच्या गलथानपणाला संरक्षण देणारी उत्तरे दिली जाऊ नयेत. माननीय मंत्री महोदयांनी ही बाब समजून घ्यावी. या विषयाच्या संदर्भात राज्याच्या विधिमंडळाच्या पीठासीन अधिकाऱ्यांनी बैठक बोलविली होती आणि त्या बैठकीला माननीय वित्त मंत्री, माननीय शिक्षण मंत्री उपस्थित होते आणि त्या बैठकीमध्ये यासंबंधातील सर्व निर्णय झालेले आहेत. माननीय मंत्री महोदय जी गोष्ट सांगत आहेत, त्यासंबंधीचा निर्णय सुध्दा या बैठकीमध्ये झालेला आहे. परंतु दुर्दैवाने माननीय मंत्री महोदयांना त्याची माहिती नाही असे दिसते. आम्ही सदरहू प्रश्नाची नोटीस देताना त्यामध्ये उल्लेख केलेला आहे, पण तरीही माननीय मंत्री महोदयांना माहिती नाही असे दिसते. म्हणून मी ही बाब सदनाच्या रेकॉर्डवर घेऊ इच्छितो की, दि.02 एप्रिल 2008 रोजी माननीय पीठासीन अधिकारी श्री.बाबासाहेब कुपेकर यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवन येथे या विषयाच्या संबंधात एक बैठक झाली होती आणि त्या बैठकीमध्ये सदरहू निर्णय झाला होता काय ? पहिली गोष्ट म्हणजे प्रश्नाच्या नोटीसमध्ये उल्लेख करुन सुध्दा मंत्री महोदयांना याची माहिती नाही. पीठासीन अधिकाऱ्यांकडे झालेल्या बैठकीमध्ये माननीय वित्त मंत्र्यांनी स्वत: असे सांगितले होते की, इतरांना दि.1 जानेवारी 1996 पासून नवीन वेतनश्रेणी लागू करण्यात आली आणि कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना दि.1 मार्च 2000 पासून नवीन वेतनश्रेणी लागू करण्यात आली, ही गोष्ट चुकीची झाली आहे. तसेच पाचव्या वेतन आयोगाच्या बाबतीत यानंतर काही कार्यवाही करावयाची नाही, असा शासनाने निर्णय घेतला असला तरी या शिक्षकांच्या संदर्भातील वेतनश्रेणी संबंधीचा प्रस्ताव एक महिन्याच्या आत तयार करुन माननीय शिक्षण मंत्र्यांच्यासमोर ठेवण्यात यावा असे मी शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख आपण प्रश्न विचारा.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, यामध्ये दोन-तीन विभाग आहेत आणि त्यांची नावे वाचून मी सदनाचा वेळ घेऊ इच्छित नाही. पण त्या बैठकीमध्ये माननीय वित्त मंत्र्यांनी आणि माननीय शिक्षण मंत्र्यांनी असे ठरविले की,अशा प्रकारे वेतनश्रेणी लागू केल्यानंतर विभागावर एकूण आर्थिक बोजा किती पडणार आहे, याची माहिती काढून ती मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात यावी. त्यामुळे मंत्री महोदय आज येथे जी माहिती देत आहेत, ती देण्याची ही वेळ नाही. माननीय

. . . जी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50165 . . . .

प्रा.बी.टी.देशमुख . . . .

पीठासीन अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये निर्णय झाला होता की, याबाबतीत एक महिन्याच्या आत कारवाई करण्यात यावी. असे असतानाही संबंधित विभागाचे अधिकारी माननीय मंत्री महोदयाना अशा प्रकारची माहिती देत आहेत. माझा असा प्रश्न आहे की, दि.02 एप्रिल 2008 रोजी पीठासीन अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये याबाबतीत निर्णय झाला होता की नाही ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, मी ही बाब मान्य करतो की, पीठासीन अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये असा निर्णय झाला होता की, एक महिन्याच्या आत कार्यवाही करण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सर्व विभागांच्या बाबतीत . . .. .

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, यासाठी जो विलंब झाला आहे, याचे कारण असे आहे की, सर्व विभागांकडून माहिती गोळा केल्यानंतर यासंबंधात एकत्रित प्रस्ताव तयार करुन आणि त्या अनुषंगाने राज्य शासनावर आर्थिक भार किती येणार आहे, याचा हिशोब करण्यासाठी थोडा वेळ गेला आहे. निव्वळ शिक्षण विभागाचा स्वतंत्रपणे निर्णय . . . .

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय प्रश्नाला उत्तर देण्याचे टाळत आहेत.

(काही सन्माननीय सदस्य एकदम उभे राहून बोलतात.)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा.बी्.टी.देशमुखसाहेब . . ..

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या बैठकीच्या वेळेस श्री.बट्टलवार यांनी सर्व विभागांच्या संदर्भात माहिती घेऊन . . . .

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना सांगू इच्छितो की, आपल्याला माननीय मंत्री महोदयांकडून अपेक्षित उत्तर मिळवावयाचे आहे. यासाठी त्यांचे उत्तर पूर्ण झाल्या नंतर आपण बोलावे.

. . . .जी-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50165 . . . .

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय प्रश्नाचे उत्तर देत नाहीत.

**सभापती** : मंत्री महोदयांनी उत्तर दिल्यानंतर, ते जर अपूर्ण राहिले तर मी आपल्याला पुन्हा उप प्रश्न विचारण्यासाठी संधी देतो.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, पीठासीन अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये श्री.बट्टलवार यांनी सर्व विभागांच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केला होता की नाही ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, पीठासीन अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये या विषयाच्या संदर्भातील निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनावर किती आर्थिक भार येणार आहे, याबाबतीत शिक्षण विभागाने माहिती . . . .

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, हा हिशोब केलेला आहे . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, पीठासीन अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये श्री.बट्टलवार यांनी सर्व विभागांच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता आणि ते मिनिटस्‌मध्ये आलेले आहे. त्यावेळी पीठासीन अधिकाऱ्यांच्या समक्ष माननीय वित्त मंत्र्यांनी सदरहू निर्णय दिला आणि माननीय शिक्षण मंत्र्यांनी तो मान्य केला. यामध्ये आदिवासी विकास विभाग, ग्रामीण विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग इ. विभाग आहेत. त्यावर . . . .

**सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुखसाहेब . . . .

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय प्रश्नाचे उत्तर देत नाहीत .....

**सभापती** : ज्यावेळी सन्माननीय सदस्य एखादा प्रश्न उपस्थित करतात, तेव्हा माननीय मंत्री महोदय त्या प्रश्नाला अचूक उत्तर देत नसतील तर एकदा, दोनदा किंवा तीन वेळा उप प्रश्नाच्या माध्यमातून त्यांच्याकडून उत्तरे काढून घेण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होण्यापूर्वीच जर काही सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी उभे राहिले, तर कसे होणार ? अगोदर माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. यानंतर मी परत एकदा तुम्हाला उप प्रश्न विचारण्याची संधी देतो.

यानंतर कु.थोरात . . . .

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ SBT/ 11:35

ता.प्र.क्र.50165...

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :सभापती महोदय, या संदर्भात झालेल्या बैठकीमध्ये वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांनी इतर विभागाचाही एकत्रित विचार करावा लागेल असे म्हटलेले आहे ते बरोबर आहे. इतर विभागाची माहिती एकत्र करण्यात यावी आणि त्यानंतर ती वित्त विभागमार्फत मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात यावी, असे सन्माननीय अर्थमंत्र्यांनी सांगितले होते.

(श्री. व्ही.यू. डायगव्हाणे व प्रा.बी.टी.दशमुख एकाच वेळी प्रश्न विचारतात)

**सभापती** :माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : आदिवासी विभागाची माहिती यावयाची राहिली आहे. बाकी सगळया विभागाची माहिती एकत्रित करण्यात आलेली आहे. मला असे वाटते की, आदिवासी विकास विभागाकडून आठवडयाभरात माहिती प्राप्त होईल. कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राध्यापकांना देण्याची रक्कम काढण्यात आलेली आहे. साधारणत: 23 कोटी रुपये त्यासाठी लागणार आहेत. म्हणून सगळया विभागाची माहिती एकत्र आल्यानंतर मला असे वाटते की, साधारणत: 15 दिवसात ही सगळी माहिती मंत्रिमंडळापुढे सादर करण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय, जे उत्तर देत आहेत ते उत्तर आम्ही गेल्या अनेक अधिवेशनामध्ये ऐकत आहोत. त्यामुळे नवीन उत्तर छापण्याची गरज नाही. यापूर्वी देण्यात आलेल्या उत्तराचा कागद चिटकण्याची व्यवस्था केली तरी तेच उत्तर आहे. गेली 13 वर्षे ती माणसे वाट पहात आहेत. मागच्यावेळी माननीय अर्थमंत्र्यांनी एक महिन्याच्या आत सर्व विभागाची माहिती गोळा करुन प्रस्ताव मंत्रिमंडळाला सादर करण्यात येईल असे सांगितले होते. असे असताना प्रस्ताव अद्याप मंत्रिमंडळाला सादर झालेला नाही. म्हणून हे अधिवेशन संपण्याच्या आत सदर प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीपुढे सादर करण्यात येईल काय आणि त्याला मंजुरी मिळणार काय?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, राज्य मंत्रिमंडळापुढे एकत्रित प्रस्ताव आणावा अशी अर्थ मंत्र्यांची सूचना आहे. स्वाभाविकपणे एकत्रित प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे मांडण्यात येईल. साधारणपणे या महिन्यामध्ये तो प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे जाईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, एका महिन्याच्या आत सर्व विभागाची माहिती गोळा करुन एकत्रित प्रस्ताव मंत्रिमंडळाला सादर करण्यात येईल असे गेल्या पाच अधिवेशनात एकच उत्तर मिळत आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ SBT/

ता.प्र.क्र.50165...

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : नागपूरचे एकच अधिवेशन झालले आहे. पाच अधिवेशने झालेली नाहीत.

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, यामध्ये अतिशय स्पष्ट आणि लहानशी गोष्ट आहे. 1996 पासून वेतनश्रेणी देण्याचे वित्त मंत्री आणि शिक्षण मंत्री या दोघांनीही मान्य केलेले आहे. त्यानंतर एक शंका निघाली की, बाकीच्या एक-दोन छोटया छोटया विभागांचाही हा प्रश्न आहे. ते सारे विभाग मिळून 22 ते 23 कोटी रुपयांचा तो प्रस्ताव आहे. त्यामुळे त्याच बैठकीमध्ये एका महिन्याच्या आत हे सारे प्रोसेसिंग करावे असा निर्णय झाला. सभापती महोदय,कशासाठी या गलथान लोकांना संरक्षण देण्यात येत आहे? त्यानंतर माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहात जी उत्तरे दिली आहेत ती किती हास्यास्पद आहेत. हे मी या ठिकाणी सांगत नाही. माझे म्हणणे असे आहे की, दि. 27 डिसेंबर, 2008 ला पुन्हा सभागृहात चर्चा झाली आणि पुन्हा माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, महिन्याभरात निर्णय घेण्यात येईल. आपल्या बोलण्यावर लोक भरोसा ठेवतील असे काही सांगावे. सभापती महोदय, माझे म्हणणे असे आहे की, हे बरोबर नाही. याबाबतीत अमेरिका आणि रशियातून माहिती मागवावयाची नाही. माहिती एक-एक वर्षे येत नाही. सभापती महोदय, यातील वाईट गोष्ट अशी आहे की,पीठासीन अधिकाऱ्यांच्या समक्ष झालेल्या निर्णया विषयी ज्यांना संकोच वाटत नाही अशा अधिकाऱ्यांच्या थप्पीवर तुम्ही नेतृत्व करीत आहात. आठ दिवसाच्या आत ही माहिती मागविण्यात येईल आणि मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव ठेवण्यात येईल असे जरा ताटपणाने सांगावे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावना माझ्या लक्षात आहेत. माहिती उपलब्ध करण्याच्या बाबतीत कुठलीही अडचण राहिलेली नाही. आदिवासी विभागाची माहिती आम्ही स्वत: आठ दिवसात उपलब्ध करुन घेऊ आणि साधारणपणे 15 दिवसात यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे जाईल याची मी याठिकाणी खात्री देतो.

----

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ SBT/

**गोंदिया डोंगरगाव सडक येथील वन विकास महामंडळाच्या आगाराला नक्षलवाद्यांनी आग लावल्याबाबत**

**(4) * 52303 श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. दिवाकर रावते** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिनांक 7 एप्रिल, 2008 रोजी अथवा त्या सुमारास गोंदिया जवळील डोंगरगाव सडक येथील वन विकास महामंडळाच्या आगाराला नक्षलवाद्यांनी आग लावली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर आगीत वन विकास महामंडळाचे लाखो रुपयांचे लाकूड व बांबू जळून खाक झाले हे खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर आगाराच्या गेटजवळ व आसपास नक्षलवाद्यांनी जीवंत बॉम्ब ठेवले होते, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, चंद्रपूर गोंदिया आदि भागात चळवळ मोडून काढण्यासाठी शासनाने खास काही उपाययोजना केली अथवा करण्यात येते आहे काय ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (1) होय, हे खरे आहे.मात्र सदर घटना दिनांक 7/4/2008 रोजी घडली नसून दिनांक 7/4/2009 रोजी घडली आहे.

(2) होय.सदर आगीच्या घटनेमध्ये वन विकास महामंडळाचे रक्कम रु.52.75 लक्ष इतक्या किंमतीचे वनोपज जळाले आहे.

(3) नाही. बॉम्बची दहशत रहावी म्हणून एका टिनाच्या डब्यात राख भरुन त्यामधून एक वायर बाहेर काढून ठेवली होती.

(4) नक्षलवाद्यांची चळवळ मोडून काढण्यासाठी, गोंदिया जिल्ह्यात 8 अे.ओ.पी., सी.60 पथक 70 कमांडो व नक्षल सेल इ.निर्माण केले असून त्याद्वारे नक्षल विरोधी अभियान, जनजागरण मेळावे, नक्षल विरोधी प्रचार अशा उपाययोजना केल्या जात आहेत.

श्री दिवाकर रावते : सभापती महोदय, हा गृह खात्याचा प्रश्न असल्यामुळे तो आज राखून ठेवण्यात यावा आणि तो उद्या घेण्यात यावा. वनाचे नाव आल्याबरोबर तो प्रश्न वन मंत्र्यांकडे कसा काय पाठविण्यात येतो? यासबंधात काय प्रयोजन आहे हेच मला समजत नाही. बॉम्ब फुटला की नाही, पोलीस आले की नाही, यासंबंधीचे उत्तर वन मंत्री देणार आहेत काय? हा गृह खात्याचा प्रश्न असल्यामुळे आम्हाला वन मंत्र्यांकडून उत्तर नको आहे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हा वन विभागाचाच प्रश्न असल्यामुळे तो राखून ठेवण्याची आवश्यकता नाही.

श्री. दिवाकर रावते :हा नक्षलवाद्यांचा प्रश्न आहे. वनाचा प्रश्न नाही. वन जाळले आहे पण ते नक्षलवाद्यांनी जाळले आहे. बॉम्ब त्यांनी ठेवले, आग त्यांनी लावली त्यामुळे हा प्रश्न गृह खात्याचा आहे. वनातील लाकडे जाळली म्हणून तो प्रश्न वन खात्याचा कसा होईल.?

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ SBT/

तारांकित तप्रश्न क्रमांक  52303 ....

श्री. बबनराव पाचपुते : या प्रश्नाच्या बाबतीत गृह खात्याचा संबंध येत नाही.जे नुकसान झालेले आहे त्यासंबंधात प्रश्न विचारण्यात आलेला आहे. सभापती महोदय, जो प्रश्न विचारण्यात आलेला आहे तो एफ.डी.सी.एम.चा आहे.

श्री. दिवाकर रावते : 'नक्षलवादी' हा वन मंत्र्यांचा विषय आहे काय? या प्रश्नाचे उत्तर वन मंत्री कसे काय देणार आहेत? या प्रश्नाला वन मंत्र्यांचे उत्तर आम्हाला मंजूर नाही.

श्री. बबनराव पाचपतु : एफ.डी.सी.एम.चा हा प्रश्न असल्यामुळे गृह खात्याने याबाबतीत उत्तर देण्याची आवश्यकता नाही. सन्माननीय सदस्यांनी उप प्रश्न विचारावेत मी त्याची उत्तरे देण्यास तयार आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 52303 .......

श्री. दिवाकर रावते : परवा यांनीच उत्तर द्यावयास पाहिजे होते.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. बाजोरिया यांचा हा प्रश्न आहे. तो प्रश्न पुकारल्यानंतर माननीय वन मंत्री उभे झाले. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी असा हरकतीचा मुद्दा उपस्थित केला की, हा प्रश्न गृह विभागाशी संबंधित आहे असे दिसते. नक्षलवाद हा शब्द यामध्ये आल्यामुळे त्यांना तसे वाटले. वन विभागात लागलेल्या आगीच्या संदर्भात हा प्रश्न आहे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी उत्तर देण्यास तयार आहे. नक्षलवादाच्या संदर्भात कालच चर्चा झालेली आहे. माझ्या विभागाशी संबंधित प्रश्न असल्यामुळे मी उत्तर देण्यास तयार आहे. त्यामुळे प्रश्न राखून ठेवण्याची आवश्यकता नाही.

**सभापती** : मी प्रश्न राखून ठेवत नाही.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण शेवटच्या उपप्रश्नाचे उत्तर बघावे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री. बाजोरिया यांच्या प्रश्नाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी असे सांगितले की, हा प्रश्न गृह विभागाशी संबंधित आहे. माननीय वन मंत्र्यांनी सांगितले की, हा प्रश्न वन विभागाकडे दिलेला असल्यामुळे या प्रश्नाचे उत्तर मी देऊ शकतो. त्याला अन्य सन्माननीय सदस्यांचा आक्षेप आहे. या अनुषंगाने आपले काय मत आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, यामध्ये पहिला उपप्रश्न असा विचारलेला आहे की, " दिनांक 7 एप्रिल, 2008 रोजी अथवा त्या सुमारास गोंदिया जवळील डोंगरगाव सडक येथील वन विकास महामंडळाच्या आगाराला नक्षलवाद्यांनी आग लावली, हे खरे आहे काय " हा एफडीसीएमशी संबंधित प्रश्न आहे. या प्रश्नाला 'होय' असे उत्तर दिलेले आहे. दुसरा उपप्रश्न असा विचारलेला आहे की, "असल्यास, सदर आगीत वन विकास महामंडळाचे लाखो रुपयांचे लाकूड व बांबू जळून खाक झाले, हे खरे आहे काय" या प्रश्नाचेही उत्तर दिलेले आहे. तिसरा उपप्रश्न असा विचारलेला आहे की, "असल्यास सदर आगाराच्या गेटजवळ आसपास नक्षलवाद्यांनी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 52303..... श्री. बबनराव पाचपुते ....

जिवंत बॉम्ब ठेवले होते, हे खरे आहे काय" या प्रश्नाचेही उत्तर दिलेले आहे. शेवटचा चौथा उपप्रश्न असा विचारलेला आहे की, "असल्यास चंद्रपूर, गोंदिया आदी भागात चळवळ मोडून काढण्यासाठी शासनाने खास काही उपाययोजना केली अथवा करण्यात येत आहे काय?" हा एकत्रित प्रश्न विचारलेला आहे. संबंधित खात्याकडून माहिती घेतलेली आहे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, हा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी कोणत्या मंत्रिमहोदयांना विचारला होता ? या ठिकाणी "वन मंत्री " असे लिहिले आहे. आपण मूळ प्रश्न बघून याबाबत निर्णय द्यावा.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण उपप्रश्न क्रमांक 4 चे उत्तर पाहिले तर स्पष्ट होईल. चौथा उपप्रश्न असा विचारलेला आहे की, चंद्रपूर, गोंदिया आदी भागात चळवळ मोडून काढण्यासाठी ....

**सभापती** : चौथ्या उपप्रश्नाचे उत्तर मी पाहिलेले आहे. सर्वसामान्यपणे पध्दत अशी आहे की, एखाद्या सन्माननीय सदस्यांनी एखाद्या मंत्रिमहोदयांना प्रश्न विचारल्यानंतर त्या अनुषंगाने अन्य विभागातून काही माहिती घ्यावयाची असेल तर उत्तर देण्याच्या अगोदर त्या विभागाकडून ती माहिती मंत्रिमहोदय घेऊ शकतात. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. बाजोरिया यांनी विचारलेला जो मूळ प्रश्न आहे तो मी बघितलेला आहे. त्यांनी हा प्रश्न वन मंत्र्यांना विचारलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी गृह विभागाशी संबंधित असणारा एखादा प्रश्न विचारल्यास त्याला उत्तर देण्याची माननीय मंत्रिमहोदयांची तयारी आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, होय.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही वेगळी पध्दत पडत आहे. कमांडो पथक, नक्षल सेल हे सगळे गृह खात्याशी संबंधित प्रश्न आहेत. त्या खात्याकडून माहिती यावयास पाहिजे.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, आपण मूळ प्रश्न पाहिला तर सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न वन मंत्र्यांना विचारलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ SBT/ यापूर्वी श्री.बरवड 11:45

ता.प्र.क्र.52303..... श्री.अशोक चव्हाण....

त्याबाबतचा सेट माझ्याजवळ आहे. मला एवढीच विनंती करावयाची आहे की, या प्रश्नाला सन्माननीय वन मंत्री उत्तर देतील. त्यांच्या उत्तराने सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले नाही तर सन्माननीय गृहमंत्र्यांकडून उत्तर घेता येईल.

डॉ.दीपक सावंत : नक्षलवाद्यांच्या चळवळीबद्दल सन्माननीय वन मंत्री काय सांगू शकतील ?

**सभापती** : सदनाचे कामकाज करीत असताना आपण प्रथा व परंपरा देखील पाळत असतो. एखाद्या मंत्रिमहोदयांना लोकप्रतिधींनी एखादा प्रश्न विचारल्यावर तो प्रश्न त्या मंत्रिमहोदयांकडे गेल्यानंतर जर तो दुसऱ्या विभागाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या संबंधित असला तर त्या विभागाकडून माहिती घेण्याबाबत विधिमंडळाकडून सुध्दा कळविण्यात येते की, आपल्या विभागाने उत्तर द्यावे. पण अन्य विभागाच्या मंत्रिमहोदयांना सुध्दा तेथे उपस्थित करावे असेही म्हटले जाते. ते संबंधित मंत्री सुध्दा त्याबाबतची माहिती दुसऱ्या विभागाकडून घेऊ शकतात. हा प्रश्न सन्माननीय वन मंत्र्यांना विचारलेला असल्यामुळे त्यांनीच या प्रश्नाला उत्तर देणे योग्य होईल असा माझा निर्णय आहे.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, मी मूळ व उपप्रश्न गृह विभागाला विचारला होता. गडचिरोली....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपल्याला मूळ प्रश्नासंबंधी सन्माननीय वन मंत्र्यांकडून माहिती मिळणे अपेक्षित होते असे दिसते. म्हणून आपल्या प्रश्नाला सन्माननीय वन मंत्री उत्तर देतील असा माझा निर्णय आहे.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, गडचिरोली जिल्हयामध्ये कोराडी भागातील 16 अधिकारी व कर्मचाऱ्यांची हत्या झाली. या प्रकरणामध्ये वन संपदा नष्ट झालेली आहे. हा संपूर्ण प्रश्न सन्माननीय गृहमंत्र्यांना विचारलेला आहे.

**सभापती** : गडचिरोली जिल्हयामध्ये वन विभागाच्या माध्यमातून वनाचे रक्षण केले जाते. तेथे वन विभाग कार्यरत आहे हे आपणही मानता. आपण मूळ प्रश्न सन्माननीय वन मंत्र्यांनाच विचारलेला आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.52303.....

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, सन्माननीय वन मंत्र्यांनी कमांडो व नक्षल सेल निर्माण केले असे लेखी उत्तरात नमूद केले आहे त्यामुळे याबाबत सन्माननीय गृहमंत्र्यांनी यासंबंधी उत्तर द्यावे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारावयाचा असेल तर त्यांनी तो विचारावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्याला अत्यंत नम्रपणे सांगतो. या सदनातील सन्माननीय सदस्य जेव्हा प्रश्न विचारतात तेव्हा असे कधीही म्हणत नाहीत की, या मंत्र्यांनीच उत्तर द्यावे, त्या मंत्र्यांनीच उत्तर द्यावे. आमच्या प्रश्नाची वर्गवारी संबंधित सचिवांकडून केल्यानंतर ते प्रश्न पुढील कार्यवाहीसाठी पुढे पाठविले जातात. तेव्हा त्या खात्यानेच आमच्या विभागाचा हा प्रश्न नाही असे म्हटले पाहिजे, तरच ते होऊ शकते. परंतु आम्ही ठराविक मंत्र्यांनीच उत्तर देण्याचा कधीच आग्रह धरत नाही.

**सभापती** : मी या अनुषंगाने माझा निर्णय दिलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.बाजोरिया यांनी सन्माननीय वन मंत्र्यांना प्रश्न विचारावा.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हा प्रश्न अत्यंत मर्यादित आहे. त्याला उत्तर देण्याची माझी तयारी आहे.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, आपण हा प्रश्न राखून ठेवावा.

**सभापती** : मी हा प्रश्न राखून ठेवणार नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही सभात्याग करीत आहोत.

(सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर वगळता विरोधी पक्षातील इतर सन्माननीय सदस्य सभात्याग करतात. )

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ SBT/

**मौजे महलमिऱ्या डोंगर (ता.पेण, जि.रायगड) येथे शासनाची वनजमीन बळकाविणांऱ्या विरुध्द कारवाई करण्याबाबत**

**(५) * ५०२८९ श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे महलमिऱ्या डोंगर (ता.पेण, जि.रायगड) येथील नवीन गट नं. १५८ हया जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर मालक म्हणून महाराष्ट्र शासनाचे वनखाते इतर हक्कामध्ये आदिवासींचे नाव कुळ म्हणून नोंदलेले असताना सदर जमिनीचे फेरफार करुन मालक म्हणून आदिवासी नांव व इतर हक्कात वनखाते अशी नोंद करुन सदर जमिनीची बक्षिस पत्राद्वारे विक्री केल्याची बाब २३ ऑक्टोबर,२००८ वा त्या सुमारास शासनाच्या निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास त्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, शासनाची वनजमिन लाटणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव पाचपुते** : १) हे अशंत: खरे आहे.

२) होय.

३) संबंधित तलाठी यांचेवर निलंबनाची कार्यवाही करणेत आली आहे.

४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी सभात्याग केला नसेल तर ते त्यांच्या पक्षाच्या भूमिकेशी सहमत नाहीत म्हणून त्यांनी सभात्याग केला नाही अशी येथे नोंद झाली पाहिजे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. रायगड जिल्हयामध्ये महलमिऱ्या डोंगर येथे मोठा जमीन घोटाळा झालेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 11:50

(ता.प्र.क्र. 50289.... (श्री. संजय केळकर...)

43 एकर जमीन ही वनखात्याच्या मालकीची आहे. शासकीय वन जमीन अशी 7/12मध्ये नोंद होती. याप्रकरणी मोठ्या प्रमाणात घोटाळा झालेला आहे. ही वन जमीन वैयक्तिक नावे करुन घेऊन तिची विक्री करण्याचा प्रयत्न झाला. याबाबतीत वन खात्याने जिल्हाधिका-यांना कारवाई करण्याबाबत कळविले. वर्तमानपत्रामध्ये विक्रीची नोटीस देखील दिली गेली. माझा प्रश्न असा आहे की, या प्रकरणी कारवाई करण्यासंबंधी वन खात्याने महसूल खात्याला ऑक्टोबर महिन्यामध्ये दोनदा पत्रे पाठविली. हबीब शेख आणि नईदा शेख यांनी या वन जमिनी प्रकरणी मोठा घोटाळा केलेला आहे. तेव्हा त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला गेला आहे काय ? या जमीन घोटाळा प्रकरणी तहसीलदार, नायब तहसीलदार, दुय्यम निबंधक, तालुका भूमी अभिलेख निरीक्षक यांच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. तेव्हा त्यांच्यावरही कारवाई केली जाईल काय ? या जमिनीची पुन्हा महाराष्ट्र शासन वन जमीन अशी नोंद करण्यात आलेली आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : या प्रकरणी चौकशी झालेली आहे. जो फेरबदल झालेला होता तो फेरबदल बदलून घेतलेला आहे. या प्रकरणी तलाठ्याने वेगळयापध्दतीने इण्टरप्रिटेशन केल्यामुळे हा प्रकार झालेला आहे. त्यामुळे तलाठ्याला निलंबित केलेले आहे. तसेच या प्रकरणी अन्य लोकही दोषी आहेत काय या संबंधी चौकशी नेमलेली आहे. चौकशीत जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर देखील कारवाई केली जाईल. तसेच फौजदारी खटला देखील भरला जाईल.

श्री. मधुकर चव्हाण : महसूल खात्याच्या अखत्यारित येणारे तहसीलदार,तलाठी व अन्य अधिकारी यांना शिक्षा करण्याचा वन खात्याला अधिकार आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : महसूल आणि वन हे एकच हेड आहे. तेव्हा घटना घडल्यानंतर त्यासंदर्भात त्या विभागाच्या वरिष्ठांना कळवून कारवाई करण्यात आली. एका विभागाने दुस-या विभागाला कळविण्याचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे वन विभागाने महसूल विभागाला कळविल्यानंतर त्या विभागाने कारवाई केलेली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : या प्रकरणी तलाठ्याला निलंबित केलेले आहे. परंतु ही बाब आरएफओ, डीएफओ यांच्या निदर्शनास आली नाही काय ? असल्यास, त्या अधिका-यांना का निलंबित करण्यात आले नाही ? या जमिनीमधून संबंधित मालकाने रस्ता केलेला आहे. या वन जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे हे खरे आहे काय ?

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 50289....

श्री. बबनराव पाचपुते : सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारलेला आहे. वस्तुस्थिती वेगळी आहे. या प्रकरणाची माहिती अशी आहे की, हा खाजगी वनाचा विषय आहे. या प्रकरणी कलम 35(3) प्रमाणे कार्यवाही व्हायला पाहिजे होती ती झाली नाही. प्रकरण हायकोर्टात गेले. मे 2005ला निर्णय झाला आणि तशा प्रकारच्या नोंदी लावण्याचे मुख्य सचिवांनी आदेश दिले. त्याप्रमाणे नोंदी लावून सुधारणा करण्याचे काम वन खात्याने केलेले आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : उत्तर चुकीचे दिलेले आहे. चुकीचे रेकॉर्ड होत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपा करुन खाली बसावे.

श्री. संजय केळकर : वन खात्याने ऑक्टोबर 2008 आणि डिसेंबर 2008ला जिल्हाधिका-यांना पत्र लिहून या प्रकरणी कारवाई करण्याची विनंती केलेली आहे. वन खात्याने हे पत्र महसूल विभागाला लिहिले याचा अर्थ हा जमीन घोटाळा झालेला आहे हे निश्चित होते. या प्रकरणी केवळ तलाठ्याला निलंबित करण्यात आलेले आहे. परंतु या प्रकरणाशी संबंधित असलेले तहसीलदार, नायब तहसीलदार, तालुका भूमी अभिलेख अधिकारी यांच्यावरही कारवाई होणे आवश्यक आहे. हा साधासुध्दा घोटाळा नाही. या जमिनीची किंमत 25 कोटी रुपये आहे.

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम... 11:55

ता.प्र.क्र.50289....

श्री.संजय केळकर...

त्या जमीनीच्या नोंदीत फेरफार करण्यात आलेला आहे. श्री. हबीब शेख, श्रीमती नईदा शेख हे या प्रकरणी दोषी आहेत, त्यांनी हा गुन्हा केला आहे, पण त्यांचेवर अजूनपर्यंत गुन्हा दाखल केला गेलेला नाही. तसेच कोणत्याही वरिष्ठ अधिका-यांवर कारवाई केली गेलेली नाही याबाबतीत माननीय मंत्री महोदय उत्तर देतील काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या प्रश्नाच्या बाबतीत मी प्रथमच उत्तर दिलेले आहे. दिनांक 3.12.2008 रोजी जिल्हाधिकारी, अलिबाग यांना या अनुषंगाने कारवाई करण्यासंदर्भात वन विभागाकडून कळविण्यात आले आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, त्या ठिकाणचे खाजगी वन सेक्शन 35 (3) प्रमाणे सदर जमीन नावावर चढविण्यात आली आहे. परंतु यासंबंधीचा परिपत्रकाचा अर्थ तलाठयाने वेगळा लावल्याचे चौकशीत दिसून आले आहे. या प्रकरणी अजून कोणी दोषी आहेत काय यासंबंधीची चौकशी करण्याचे काम जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर जे कोणी दोषी आढळून आले तर त्यांच्या विरुध्द निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री. संजय केळकर : या प्रकरणात तहसीलदारांचा हात आहे, त्याचप्रमाणे भूमि अभिलेख अधिका-यांच्या हात आहे. त्यांच्यावर कोणत्याच प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. या अधिका-यांवर आतापर्यंत का कारवाई करण्यात आली नाही ?

श्री. बबनराव पाचपुते : जिल्हाधिकारी यांना कळविले आहे की, याबाबतीत सखोल चौकशी करुन जर यात आणखी दोषी व्यक्ती आढळून आल्या तर त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात यावी. प्रथम दर्शनी असे आढळून आले आहे की, तलाठयाने परिपत्रकाचा चुकीचा अर्थ लावला म्हणून त्यास सेवेतून निलंबीत करण्यात आले आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : खाजगी वन जमीन घेतलेली आहे, त्या जमिनीवर उत्खनन करताना वन विभागाची परवानगी लागते किंवा नाही ? वन विभागाची परवानगी लागत नसेल तर आम्ही देखील खाजगी वन जमिनीवर उत्खननाचे काम करु. या प्रकरणी वन विभागाच्या संबंधित दोषी अधिका-यांवर वन विभागाने कारवाई का केली नाही? या प्रकरणी संबंधित वन विभागाच्या अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल काय ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50289....

श्री. बबनराव पाचपुते : या प्रश्नाबाबत मी तीन वेळा सभागृहात सांगितले की, सेक्शन 35 (3)प्रमाणे त्या जमिनीवर तशा प्रकारची नोंद घ्यावयास पाहिजे होती. अशा प्रकारचे महाराष्ट्रामध्ये 2 लाख 82 हजार हेक्टरवर नोंद घ्यावी असा निर्णय झाला. यासंबंधी एकत्रित निर्णय झाला. महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुख्य सचिवांनी उच्च न्यायालयास लिहून दिले की, महाराष्ट्रात जेथे जेथे अशा जमिनी आहेत तेथे सेक्शन 35 लावण्यात आले आहे. एकदा सेक्शन 35 लागल्यानंतर ते जमीन मालकाला पोहचो न पोहचो डिम टू फॉरेस्ट अशा प्रकारचा निर्णय होतो आहे. अशा प्रकारच्या नोंदी लावताना तलाठयांनी अर्थ चुकीचा लावलेला आहे. ही बाब वन विभागाच्या लक्षात आल्यानंतर त्यात सुधारणा करण्यात आली आहे. जमिनींचे 7/12 बदललेले आहेत. फेरफार बदललेले आहेत आणि जसे होते तसे पूर्वीप्रमाणे करुन घेतलेले आहे. वन विभागाने दिनांक 3.12.08 रोजी जिल्हाधिकारी, अलिबाग यांना पत्र पाठविले आहे की, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन तलाठया शिवाय आणखी कोणी दोषी असतील तर त्यांचावर सुध्दा फौजदारी खटला भरावा. त्यामुळे याबाबतची वेगळी चौकशी करण्याची काही आवश्यक आहे असे मला वाटत नाही.

----------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ MAP/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम... 11:55

**इचलकरंजी शहरातील कचरा एकत्र करण्यासाठी खरेदी केलेल्या घंटा गाडयांबाबत**

**(६) * ५१५५३ श्री. संजय पाटील , श्री. जितेंद्र आव्हाड : तारांकित प्रश्न क्रमांक ४६५७३ ला दिनांक १७ डिसेंबर, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी शहरातील छोटया छोटया गल्ल्यांमध्ये कचरा एकत्र करण्यासाठी राबविलेल्या योजनेंतर्गत खरेदी केलेल्या घंटागाडयांचा हिशोब लागत नसल्याप्रकरणी करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ, श्री.अशोकराव चव्हाण यांच्याकरिता** : (१),(२) व (३) इचलकरंजी नगरपरिषदेने खरेदी केलेल्या १५० घंटागाड्यांपैकी ८४ घंटागाड्या वापरुन खराब झाल्या असून १२ वापरात आहेत. उर्वरित घंटागाड्यांचा हिशेब लागत नाही. या प्रकरणी एक स्वच्छता निरिक्षक व नऊ प्रभाग निरिक्षक यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे. चौकशी लवकरात लवकर पूर्ण करुन दोषींविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी, असे निदेश देण्यात आले आहेत.

श्री. संजय पाटील : सभापती महोदय, इचलकरंजी शहरातील कचरा एकत्र करण्यासाठी खरेदी केलेल्या घंटागाडयांबाबतचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित झालेला आहे. सदरहू घंटा गाडया कधी खरेदी करण्यात आल्या होत्या ? सदर गाडया चांगल्या पध्दतीने घेतल्या होत्या काय ? या गाडयांचा हिशोब लागत नाही त्याबद्दल चौकशी सुरु केलेली आहे, त्या चौकशीची सद्य:स्थिती काय आहे?

श्री. हसन मुश्रीफ : इचलकरंजी नगरपालिकेने २००३ मध्ये १०० फायबर घंटा गाडया आणि ५० लोखंडी घंटागाडया खरेदी केल्या होत्या. त्यापैकी १२ लोखंडी घंटागाडया कार्यरत आहेत. उर्वरित ८४ गाडया खराब झालेल्या आहेत. ५४ गाडयांचा हिशोब लागत नाही. लोखंडी घंटा

४...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

गाडीची किंमत २९०० रुपये आहे आणि फायबद घंटा गाडीची किंमत ३४०० रुपये आहे. स्वच्छता निरीक्षक आणि नऊ प्रभाग निरीक्षक यांचे विरुध्द याबाबतीत विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. या गाडया कुठे गेल्या, त्यांची विल्हेवाट कशी लावली आहे या अनुषंगाने देखील चौकशी सुरु आहे. या प्रकरणी चौकशीअंती संबंधित कर्मचारी दोषी आढळून आले तर त्या गाडयांची संपूर्णपणे रक्कम त्यांच्याकडून वसूल केली जाईल व त्यांचे विरुध्द कारवाई केली जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हे प्रकरण डिसेंबर महिन्यातील आहे. आता जून महिना उजाडला आहे. सहा महिन्यांचा कालावधी होऊन सुध्दा चौकशी पूर्ण होत नाही. संबंधितांना पाठिशी घालण्यासाठी चौकशी लांबविली जाते आहे की काय अशी शंका माझ्या मनात येऊ लागली आहे. सदर चौकशी कधीपर्यंत पूर्ण होईल व संबंधित दोषींवर कधीपर्यंत कारवाई केली जाईल ?

श्री. हसन मुश्रीफ : विभागीय चौकशी नगरपालिकेचे अधिकारी करीत आहेत. सदर चौकशी लवकरात लवकर पूर्ण करण्यासंबंधी सूचना देण्यात येतील.

श्री. विनोद तावडे : किती कालावधीत ही चौकशी पूर्ण करण्यात येईल?

श्री. हसन मुश्रीफ : तीन महिन्यात सदर चौकशी पूर्ण करण्यात येईल.

--------

५....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**वाशी (नवी मुंबई) येथील सेक्टर-३० मधील ३०६२१ चौ.मी.च्या**

**भूखंडाचे वाटप करतांना झालेल्या अनियमिततेबाबत**

**(७) * ५०३२४ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. जगदीश गुप्ता** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी, नवी मुंबई येथील सेक्टर-३० मधील ३०६२१ चौ.मी.च्या भूखंडाचे सिडकोने वाटप करतांना आरक्षण बदलणे, एफ.एस.आय. वाढवून देण्यात येणे इत्यादी अनियमितता झाल्यामुळे शासनाचा सुमारे ९०० कोटी रुपयांचा महसूल बुडाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत दिनांक ६ मे, २००८ रोजी लोकप्रतिनिधीमार्फत मुख्य सचिवांकडे लेखी तक्रार करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महालेखा परिक्षकांच्या अहवालात तसेच धोंडगे समितीच्या अहवालात याप्रकरणी सिडकोच्या कार्यपध्दतीवर ठपका ठेवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी याप्रकरणातल्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे अनेक वेळा जाहिररित्या मान्य केल्यानंतर देखील अद्याप दोषींवर कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व ही कारवाई लवकरात लवकर केव्हा होणार आहे ?

**श्री. हसन मुश्रीफ व श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (१) सिडको महामंडाळाच्या विनियमावलीनुसार भूखंडाचे वाटप करण्यात आलेले होते. सदर वाटपास मा.उच्च न्यायानलामध्ये आव्हानित करण्यात आलेले आहे. सध्या सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(२) होय.

(३) या प्रकरणामध्ये धोंगडे समितीने कोणत्याही प्रकारचा ठपका ठेवलेला नाही. महालेखा परिक्षकांच्या अहवालात निविदा न मागविल्याने आर्थिक नुकसान झाले आहे अशा आशयाचे मत व्यक्त करण्यात आले आहे.

६..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(४) व (५) सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ असल्याने याबाबत मा.न्यायालयाच्या निर्णयानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न सभागृहात तीन वेळा आलेला आहे आणि त्या प्रश्नास शासनाकडून एक सारखीच उत्तरे दिली जात आहेत. हा सिडकोचा भूखंड ३०६२१ चौरस मिटरचा आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ SBT/ MMP/ 12:00

ता.प्र.क्र.50324.......... श्री.पांडुरंग फुंडकर....

प्रश्न विचारण्याचा मूळ हेतू हा आहे की, भूखंडाचे वाटप करीत असताना आरक्षण बदलले गेले, एफएसआय वाढवून देण्यात आला, हा भूखंड देत असताना कोणत्याही प्रकारची निविदा काढण्यात आली नाही. चीफ इकॉनॉमिस्ट यांनी त्यासंबंधी आक्षेप घेतला. तो आक्षेप बाजूला सारुन हा भूखंड दिला गेला हे खरे आहे काय? यासंबंधी शंकरन समिती नेमली होती, त्या समितीने दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची शिफारस केली होती, त्याप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली आहे का?

श्री.हसन मुश्रीफ : हे खरे आहे की, 1997 साली हा भूखंड माहिती व तंत्रज्ञान यासाठी राखीव ठेवला होता. त्याबाबत रहेजा कॉर्पोरेशन यांना निविदा न मागविता फर्स्ट कम फर्स्ट सर्व्ह या न्यायाने भूखंड दिला गेला. यामध्ये अनियमितता झाली म्हणून डी.के.शंकरन समिती नेमण्यात आली. विधीमंडळाच्या सार्वजनिक उपक्रम समितीने सुध्दा एक समिती नेमली होती. महालेखापाल यांचाही यासंबंधी अहवाल आला होता. या सर्वांनी हे मान्य केले की, सिडकोचे नुकसान झाले आहे. त्यामुळे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांची विभागीय चौकशी सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून सुरु आहे. शंकरन समितीने 50 प्रकरणांची चौकशी केली. 10 पैकी 6 अधिकाऱ्यांना शिक्षा देण्यात आली व उर्वरित 4 अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी सुरु आहे. यामध्ये सिडकोचे नुकसान झाल्याचे दोन्ही समित्यांनी मान्य केले. म्हणून पूर्णपणे चौकशी करु. दरम्यान हे प्रकरण उच्च न्यायालयामध्ये गेले. उच्च न्यायालयाने 50 कोटी रुपयांची हमी घेऊन त्यांना बांधकाम करण्यास सांगितले आहे. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधीन राहून भूखंड वापरण्यास देण्यात आला. शासनाच्या दोन्ही समितीकडून ज्या शिफारसी करण्यात आल्या त्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की, कार्यवाही सुरु आहे. एका बाजूला चीफ इकॉनॉमिस्ट यांनी भूखंडाच्या विक्रीवर आक्षेप घेतल्याचे मान्य केले, निविदा काढली नाही हे मान्य केले, अनियमितता झाली हे मान्य केले, महालेखापालांनी सुध्दा याबाबत आक्षेप घेऊन सिडकोचे नुकसान झाल्याचे मत मांडले. शंकरन समितीने सुध्दा आक्षेप घेऊन मत मांडले आहे. ज्या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार करुन कोट्यवधी रुपयांचे नुकसान केले त्यांच्यावर

...2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कारवाई करण्याची शंकरन समितीने शिफारस केली. परंतु मंत्रीमहोदय सांगतात की, चौकशी सुरु आहे. ही चौकशी किती दिवस चालणार आहे? गेली दोन वर्षे हा विषय सभागृहात उपस्थित होत आहे. परंतु अद्याप दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई होत नाही. शेकडो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार दडपण्याचा हा प्रकार आहे. ही चौकशी किती दिवसात पूर्ण होणार आहे? दोषी अधिकाऱ्यांवर किती दिवसात कारवाई केली जाईल?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे प्रकरण दडपून टाकायचे असते तर शासनाने समिती नेमली नसती. शासनाने नेमलेल्या समितीनेच हे निष्कर्ष काढले आहेत. त्यानंतर हे प्रकरण उच्च न्यायालयात गेल्यामुळे ही बाब न्यायप्रविष्ठ झाली आहे. सामान्य प्रशासन विभाग व्यवस्थापकीय संचालकांची चौकशी करीत आहे. ती चौकशी ताबडतोब पूर्ण करण्याबाबत आदेश देता येतील.

श्री.दिवाकर रावते : न्यायालयात प्रकरण गेल्यानंतर न्यायालयाने चौकशी करु नका, शिक्षा देऊ नका असे सांगितले आहे का?

श्री.हसन मुश्रीफ : मी असे म्हटलेले नाही. मी लवकरात लवकर चौकशी पूर्ण करण्याचे आदेश देण्यात येतील असे म्हणालो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे प्रकरण न्यायालयात गेले ते या भूखंडाचे वाटप रद्द करावे, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंबंधी कोणी न्यायालयात गेलेले नाही. मी दहा वेळा सांगितले आहे की, चीफ इकॉनॉमिस्ट, महालेखापाल, शंकरन समिती या तिघांनी अधिकाऱ्यांना दोषी धरले आहे. एका बाजूला सरकारच्या समित्यांकडून अधिकारी दोषी असल्याचे सिध्द झालेले असताना मंत्रीमहोदय सांगतात की, चौकशी चालू आहे. या अधिकाऱ्यांनी सिडकोचे 1000 कोटी रुपयांचे नुकसान केले अशा अधिकाऱ्यांवर ताबडतोब कारवाई का होत नाही? तीन समित्यांनी निष्कर्ष दिलेले असताना चौकशी करण्याची गरज आहे का? माननीय मुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. कोट्यवधी रुपयांचे शासनाचे नुकसान करणाऱ्या अधिकाऱ्यांवर ताबडतोबीने कारवाई करणार आहात का?

श्री.हसन मुश्रीफ : सभापमी महोदय, मी यापूर्वी सांगितले आहे की, सामान्य प्रशासन विभागामार्फत त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे.

एन.1.......

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 50324...... श्री. हसन मुश्रीफ ....

ही विभागीय चौकशी लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निदेश देण्यात येतील.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, तीन समित्यांनी दोषी ठरविलेले असताना अजून चौकशीची गरज काय आहे ?

श्री. दिवाकर रावते : तिन्ही समित्यांच्या चौकशीत दोषी अधिकारी असल्याचे सांगितले.....

**सभापती** : सध्या जी चौकशी सुरु आहे ती तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने निर्णय घ्यावा, असे मी निदेश देत आहे.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बोलत असतात.)

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ संपलेली असताना सुध्दा हा अत्यंत महत्वाचा प्रश्न असल्यामुळे मी पाच मिनिटे जास्त वेळ दिलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया शांत रहावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : शासन भ्रष्टाचाराला पाठीशी घालत आहे. एका हजार कोटीचा भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या शासनाचा निषेध करुन आम्ही सभात्याग करतो.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य घोषणा देत बहिर्गमन करतात.)

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MMP/

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.: अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्र. 1 ते 5 सभागृहासमोर ठेवणे**

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्र. 1 ते 5 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्र. 1 ते 5 सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MMP/

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. हसन मुश्रीफ (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे सन 2006-07 व 2007-08 चे प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

------------

श्री. दिलीप वळसे-पाटील (वित्त मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन 2008-09 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन 2008-09 सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

------------

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MMP/

**नियम 93 च्या निवेदनासंबंधी**

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 93 अन्वये अनुक्रमे सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, मधुकर चव्हाण, विनोद तावडे, तसेच सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण यांनी दिलेल्या दोन सूचनांवरील निवेदने चर्चेसाठी आलेली आहेत. परंतु सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत.

------

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MMP/

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी "अकोला जिल्ह्यातील काटेपूर्णा व वाण प्रकल्प तसेच कापसी तलाव या प्रकल्पातून संपूर्ण जिल्ह्याला पाणीपुरवठा करण्यात येतो. सदर धरणातील व तलावातील गाळ काढण्याकरिता अधिकाऱ्यांकडून कारवाई होत नसल्याने पाण्याचा स्त्रोत कमी होऊन जिल्ह्यात प्रचंड प्रमाणात पाणी टंचाई निर्माण होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी "महानगरपालिका, नगरपालिकांमध्ये भाडेतत्वावर मालमत्ता कर 57 टक्के आकारणे, शासनाचे धोरण असून सदर धोरणामुळे मालमत्ता धारकांना नुकसान होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "केंद्रशासनाने दि. 19 फेब्रुवारी, 1991 रोजी लागू केलेल्या कोस्टल रेग्युलेटर झोनमधील बाधित नागरिकांनी सीआरझेड दुसऱ्यामध्ये विकास कामांना परवानगी देताना रु. 1 ते 5 कोटी रुपयापर्यंत अपेक्षित खर्च असणाऱ्या सर्व विकास कामांना पूर्वी नगरपालिकेकडे असलेली परवानगी आता शासनाकडे असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते यांनी "महाराष्ट्र राज्यातील भटक्या व विमुक्त जातीच्या तरुणांसाठी हवाई वाहतूक आणि आदरातिथ्य क्षेत्रातील व्यवस्थापक योजना शासनाने आखणे यासाठी आवश्यक त्या तरतुदीची घोषणा करुनही सदर योजना तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..6

PFK/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. भोगले 12:05

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी "राज्यातील नगरपरिषदा व महानगरपालिकांच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या रु. 40 हजारच्या आतील वैद्यकीय प्रतिपूर्ती इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच लागू करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती....**

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी " विधानमंडळाने सन 2004 मध्ये मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्पयांवर राहील अशा आशयाचा कायदा पारित करणे, सदर कायद्यानुसार इतर मागासवर्गाचे 19 टक्के आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात न येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी "मेळघाट मधील कुपोषित बालके, गर्भवती महिला यांच्यातील लोहाचे प्रमाण वाढविण्यासाठी देण्यात येणा-या व्हीटॅमीनच्या गोळया एका नाल्यात माहे जून, 2009 मध्ये सापडणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलमग गो-हे यांनी "दि. 1.11.94 रोजी राज्यातील रोजंदारी वन मजुरांना सलग पाच वर्षे सेवा झालेल्यांना कायम करण्याचा निर्णय शासनाने घेऊनही तसेच त्यासाठी 8,036 पदे निर्माण करुनही सदर मजूरांना अद्यापही सेवेत कायम न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "मुंबईतील दहिसर (पूर्व) येथील जिल्हाधिका-याच्या अखत्यारितील जमीन बोगस फोटो पासच्या आधारे बळकावून सदर जमिनीवर अनधिकृत बांधकाम केले असूनही त्याबाबतची पोलिसांकडे तक्रार करुनही अद्याप कारवाई न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

आता पहिली लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. प्रथम लक्षवेधी सूचना क्र.1 चर्चेला घेण्यात येईल.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सांगली जिल्हयातील मांजर्डे (ता.तासगाव) येथे झालेल्या गारपीट व वादळी पावसामुळे शेतक-यांचे झालेले प्रचंड नुकसान

**मु. शी.** : सांगली जिल्हयातील मांजर्डे (ता.तासगाव) येथे झालेल्या गारपीट व वादळी पावसामुळे शेतक-यांचे झालेले प्रचंड नुकसान यासंबंधी सर्वश्री सर्वश्री, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, डॉ. वसंतपवार, सर्वश्री भास्कर जाधव, रमेश शेंडगे, संजय पाटील, प्रा. फौजिया खान,श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री विक्रम काळे, रणजितसिंह मोहिते-पाटील, हेमंत टकले,अरुण गुजराथी,राजन तेली ,जयप्रकाश छाजेड, उल्हास पवार, सुभाष चव्हाण, एस.क्यु.जमा, मोहन जोशी, चरणसिंग सप्रा ,डॉ.नीलमगोऱ्हे,सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, सुरेश जेथलिया, अनिल परब, परशुराम उपरकर, दिवाकर रावते, वि.प.स यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. रमेश शेंडगे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" सांगली जिल्हयातील मांजर्डे (ता.तासगांव) परिसरातील दि. २२ मे, २००९ रोजी झालेल्या गारपीट व वादळी वा-याने शेतक-यांचे झालेले प्रचंड नुकसान, यामध्ये पाचशे घरांचे अंशत: नुकसान झालेले असून मोठया प्रमाणावर परिसरातील घरकुले उध्वस्त झालेली असणे, याशिवाय सुमारे १०० हेक्टर परिसरातील द्राक्ष शेती, ऊस आणि केळींचे प्रचंड नुकसान झालेले असणे, सदर नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन नुकसान ग्रस्तांना मदत देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी, शेतकरी व नागरिकांनी शासनाकडे केलेली मागणी, यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील शेतकरी तसेच नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री. दिलीपराव देशमुख ( पुनर्वसन व मदत कार्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...



SGJ/ MMP/ KGS/ प्रथम श्री.खर्चे... 12:10

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, दिनांक 22 मे, 2009 रोजी सांगली जिल्हयातील मांजर्डे(ता.तासगाव) येथील परिसरातील गावांमध्ये अतिवृष्टी, वादळी पऊस व गारपीट मोठया प्रमाणात झाल्यामुळे येथील लोकांचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. येथे झालेल्या वादळी वा-यामुळे अनेक घरांची छप्परे उडून गेलेली आहेत.

## <u>नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदनाबाबत</u>

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, नियम 93 अन्वयेच्या सूचनावरील निवेदनाच्या बाबत गोंधळ झालेला दिसतो.

**सभापती** : नियम 93 च्या सूचनेच्या संदर्भात जी निवेदने आली होती दोन्ही निवेदने मी वाचली. ज्यांनी नियम 93 अन्वयेच्या सूचना दिल्या होत्या त्या सुध्दा मी वाचलेल्या आहेत. नियम 93 च्या सूचनेच्या संदर्भात अगोदर निवेदने घेतली व त्यानंतर नियम 93 च्या सूचना वाचल्या.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला आपल्याला एक छोटी विनंती करावयाची आहे. आम्हाला आपले मार्गदर्शन नेहमीच होत आलेले आहे. आपण जो काही निर्णय देता तो आम्हाला मान्य असतो. आपण कार्यक्रम पत्रिकेत जरी बदल केला तरी आमचे काही म्हणणे राहणार नाही परंतु मला असे सांगावयाचे आहे की, नियम 93 अन्वयेच्या सूचना आपण अगोदर घेतो व त्या संपल्यानंतर नियम 93 च्या सूचनांची निवेदने घेतली जातात. ही जी प्रथा आहे ती ब-याच वर्षापासून सुरु आहे. परंतु आज नियम 93 च्या सूचनेच्या संदर्भात क्रम बदलला गेला आहे. आम्ही सभात्याग केला असल्यामुळे आपण नियम 93 ची निवेदने अगोदर घेतली.

यानंतर श्री. गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 12.15

श्री.नितीन गडकरी ..

सभापती महोदय, आपणं जो निर्णय घेतला आहे तो आम्हाला मान्य आहे.लोकशाहीमध्ये सभात्याग केला जातो. परंतु मला याबाबतीत आपणास अशी विनंती करावयाची आहे की, नेहमीच्या पध्दतीने कामकाज न घेतल्यामुळे आम्ही आमच्या हक्का पासून वंचित झालो आहोत व आमच्यावर अन्याय झालेला आहे तेव्हा आम्हाला जर न्याय देता आला तर तो देण्यात यावा.

**सभापती** : वस्तुस्थिती अशी आहे की, आज दोन नियम 93 ची निवेदने आली होती त्यामुळे मी ही निवेदने लगेचच घेतली होती. त्यावेळी नियम 93 च्या सूचना देणारे सन्मननीय सदस्य सभागृहात उपस्थित नव्हते त्यामुळे मी पुढचे कामकाज घेतले. याबाबतीत सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे आणि नितीन गडकरी यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर आणि श्री रामनाथ मोते सभागृहात उपस्थित आहेत परंतु संबंधित विभागाचे मंत्री महोदय आता सभागृहाच्या बाहेर गेलेले असल्यामुळे ही निवेदने उद्या घेण्यात येतील.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : सांगली जिल्हयातील मांजर्डे (ता.तासगाव) येथे झालेल्या गारपीट व वादळी पावसामुळे शेतक-यांचे झालेले प्रंचड नुकसान

मु.शी : सांगली जिल्हयातील मांजर्डे (ता.तासगाव) येथे झालेल्या गारपीट व वादळी पावसामुळे शेतक-यांचे झालेले प्रंचड नुकसान यासंबंधी सर्वश्री जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, डॉ.वसंत पवार, सर्वश्री भास्कर जाधव, रमेश शेंडगे, संजय पाटील,प्रा.फौजिया खान श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री विक्रम काळे,रणजितसिंह मोहिते - पाटील, हेमंत टकले, अरुण गुजराथी, राजन तेली,जयप्रकाश छाजेड,उल्हास पवार, सुभाष चव्हाण, एस.क्यु.जमा,मोहन जोशी, चरणसिंग सप्रा, डॉ.नीलम गो-हे, सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, सुरेश जेथलिया,अनिल परब, परशुराम उपरकर, दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना ( पुढे सुरु )

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, सांगली जिल्हयातील तासगाव तालुक्यातील मांजर्डे परिसरात 22 मे 2009 रोजी मोठया प्रमाणावर वादळ ,पाऊस आणि गारपीट झाल्यामुळे पिकाचे आणि घराचे नुकसान झाले आहे. त्या भागात त्या दिवशी वा-याचा वेग एवढा मोठा होता की अनेक घरावरील पत्रे उडून गेली होती. त्याचप्रमाणे पावसामुळे जवळजवळ 250 ते 300 हेक्टर क्षेत्रातील द्राक्षाच्या बागाचे नुकसान झाले होते. त्या भागात मोठया प्रमाणावर गारपीट झाली होती आणि एक गार पाच ते सहा किलो वजनाची होती ती जनावराच्या अंगावर पडल्यामुळे अनेक जनावरांच्या अंगावर गाठ आली होती. या बाबतीत पशुसंवर्धन विभागाकडून माहिती घेतली आहे. ज्या व्यक्तिचे या पावसामुळे व वादळामुळे नुकसान झालेले आहे त्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी यासाठी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे व जिल्हाधिका-यांकडे मागणी केलेली आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले असतांनासुध्दा निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, " सदर बाधीत व्यक्तिंना शासनाच्या प्रचलित नियमानुसार 1000 प्रती व्यक्ती याप्रमाणे 54 हजार एवढे सानुग्रह अनुदान मदत म्हणून देण्यात आलेले आहे." वास्तविक या पावसामुळे आठ ते दहा कोटी रुपयांचे नुकसान झालेले असतांना 54 हजारा व्यतिरिक्त इतर कोणतीही मदत त्यांना देण्यात आलेली नाही त्यामुळे श्री.नारायण भगवान मोहिते या शेतक-याने परवा आत्महत्या केली होती .

3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे ....

आपदग्रस्त शेतक-यांना मदत देण्याच्या बाबतीत शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. तेव्हा जे काही नकसान झालेले आहे त्या बाबतीत सबंधित व्यक्तिंना नुकसान भरपाईचे वाटप केव्हा करण्यात येणार आहे ?

श्री.दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, सांगली जिल्हयातील तासगाव तालुक्यात मांजर्डे येथे दिनाक 22 मे 2009 रोजी वादळी वारा आणि पावसामुळे जे नुकसान झालेले आहे त्याची आकडेवारी शासनाकडे उपलब्ध आहे. अद्यापी काही शेतातील पिकांचा पंचनामा करण्याचे बाकी आहे. याबाबतीत प्राथमिक अंदाजानुसार एकूण पाच गावा मध्ये 153 हेक्टर्स क्षेत्र बाधित झाले असून शेतक-याची संख्या 439 आहे आणि नुकसानीचा अंदाज 6 कोटी 85 लाख 61 हजार इतका आहे. अर्थात हा प्राथमिक अंदाज आहे. हा आकडा कमी जास्त होऊ शकतो. अजूनही पंचनामे करण्याचे काम बाकी असल्यामुळे सगळे पंचनामे झाल्यानंतर शासनाच्या प्रचलित नियमानुसार आणि धोरणानुसार सबंधितांना ताबडतोब मदत दिली जाईल. घराच्या नुकसानीच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी प्रश्न विचारला असून त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, ज्यांच्या घरांचे नुकसान झालेले आहे अशी एकूण बाधित कुटूंबे 396 असून त्यापैकी अशंत: घरांचे नुकसान झालेली बाधित कुटुंबे 331 आहेत. एकूण 11 लाख 62 हजार रुपयांचे या घराचे नुकसान झालेले आहे. शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेली मदत 7 लाख 94 हजार असून त्याचे वाटप सुरु करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे ज्यांची घरे पूर्णत: बाधित झालेली आहेत अशा कुटुंबाची संख्या 65 असून त्यांच्या घराचे 8 लाख 45 हजार रुपयांचे नुकसान झालेले आहेत त्याना द्यावयाच्या मदतीच्या रकमेचे वाटप सुरु आहे. अशा प्रकारे त्या ठिकाणी झालेल्या नुकसानीचे पंचनामे दिनांक 23 व 24 मे 2009 रोजी करण्यात आले असून जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांनी तेथे भेटी दिल्या आहेत तसेच ज्यांचे नुकसान झालेले आहेत त्यांना नुकसान भरपाईचे वाटप सुरु करण्यात आले आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप देशमुख ....

सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेतील विषयाचा भाग नसला तरी याच कालखंडामध्ये त्या ठिकाणी श्री.नारायण भगवान मोहिते या शेतकऱ्याची आत्महत्या झालेली आहे त्यासंदर्भात मी आपल्याला सांगेन की, सदरहू श्री.नारायण मोहिते, वय वर्षे 54, यानी 31 मे 2009 रोजी सायंकाळी 5 वाजता आत्महत्या केली असून ते एस.टी.महामंडळामध्ये वाहन चालक होते आणि त्यांनी त्यांच्या राहत्या घराजवळ आत्महत्या केलेली आहे. त्यांच्या कुटुंबामध्ये 5 माणसे असून त्यांच्या नावावर 0.58 आर इतके शेती क्षेत्र आहे. त्यांनी एस.टी.महामंडळाच्या बँकेकडून मुलीच्या लग्नासाठी म्हणून जे कर्ज घेतले होते त्यातील 1,27,850 रूपये कर्ज बाकी होते तसेच पतसंस्थेचे 30 हजाराचे कर्ज देखील त्यांनी घेतले होते. त्याचबरोबर सहकारी विकास सोसायटीचे कर्ज असे मिळून एकूण 1,87,650 रूपयांचे कर्ज त्यांच्यावर असल्याचे दिसते. त्यांच्या आत्महत्येमागील नेमके कारण अजून स्पष्ट झालेले नाही. परंतु तेथील जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांनी तेथे जाऊन त्यांच्या कुटुंबियांना विश्वासात घेऊन त्यांचे सांत्वन केलेले आहे. या आत्महत्येबाबत जिल्हाधिकाऱ्याकडून सविस्तर अहवाल आल्यानंतर त्याबाबत शासनाच्या नियमानुसार त्यांच्या कुटुंबियांना सर्व मदत दिली जाईल. या प्रकरणामध्ये माननीय मंत्री नामदार डॉ.पतंगराव कदम यांनी स्वत: लक्ष घातलेले असून त्यांना जास्तीत जास्त मदत देण्याचीच शासनाची भूमिका राहणार आहे.

श्री. संजय पाटील : सभापती महोदय, मांजर्डे (ता.तासगाव,जि.सांगली) येथे 22.5.2009 रोजी जी गारपीट झाली आहे त्या संबंधात उत्तर देताना माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, त्याच कालखंडामध्ये श्री.नारायण मोहिते यांनी आत्महत्या केलेली आहे. सभापती महोदय, या प्रकरणात तेथे जो पंचनामा करून घेण्यात आला त्याबाबत मी जी माहिती घेतली आहे त्यात त्यांच्या घराचे तीन पंखे आणि टीव्हीचे नुकसान झालेले असल्याचे दाखविले आहे. पण प्रत्यक्षात तेथे झालेले नुकसान मी स्वत: पाहिले आहे त्यानुसार यापेक्षा किती तरी प्रचंड असे नुकसान झालेले आहे. तेथील सरकारी अधिकाऱ्यांना श्री. मोहिते यांनी या बाबत विचारणा केली आणि सांगितले की, या गारपीटीमध्ये माझे जे नुकसान झाले आहे त्याबद्दल मला किती मदत मिळणार आहे. कारण त्या नुकसानीबाबत गावात लोकांना एकंदर जे 54 हजाराचे सानुग्रह अनुदान दिले गेले तेही मला मिळालेले नाही. तेव्हा त्यांना सांगण्यात आले की, त्यांना 2400 रूपये अनुदान

..... क्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मिळणार आहे, यापेक्षा अधिक मदत होणार नाही. सभापती महोदय, माझी आपणास नम्र विनंती आहे की, या शेतकऱ्यांचे गारपीटीमुळे फार मोठे नुकसान झालेले आहे, आपल्याच म्हणण्यानुसार जवळपास साडेआठ कोटी रूपयांचे नुकसान झालेले असताना त्यांना भरीव अशी मदत शासनाकडून दिली गेली पाहिजे आणि या शेतकऱ्यांना, सामान्य गरीब माणसाला न्याय दिला पाहिजे. आता आत्महत्या केलेले श्री.नारायण मोहिते हे एसटी महामंडळामध्ये चालक म्हणून नोकरी करीत असले तरी ते एक शेतकरी देखील होते. त्यामुळेच शेतकऱ्यांना दिली जाणारी मदत त्यांनाही दिली गेली पाहिजे. तेव्हा त्यांच्या कुटुंबियांना ही मदत आपण देणार आहात की नाही याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री. दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, मूळ लक्षवेधी सूचनेमध्ये या आत्महत्येचा विषय नसला तरी मानवतेच्या दृष्टिकोनातून मी त्याबाबत देखील उत्तर दिले आहे व पुन्हा देऊ इच्छितो. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल आल्यानंतर निश्चितपणे शासनाच्या धोरणानुसार त्यांच्या कुटुंबियांना मदत केली जाईल. कारण ते चालक म्हणून नोकरी करीत असले तरी ते मूळचे शेतकरी आहेत याची माहिती आहे म्हणूनच जिल्हाधिकाऱ्यांनी सखोलपणे याबाबत अहवाल पाठवावा अशा सूचना आपण त्यांना दिल्या असून त्यांचेकडून अहवाल आल्यानंतर शासनाच्या धोरणानुसार त्यांना जास्तीत जास्त मदत देण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. विलासराव शिंदे : सभापती महोदय, या निवेदनामध्ये बाधित क्षेत्र 153 हेक्टर असे लिहिले आहे आणि शेतीपिकांच्या नुकसानीची पाहणी करण्यात येणार आहे असेही पुढे म्हटलेले आहे. सभापती महोदय, विशेषत: या क्षेत्रात द्राक्षबागा आहेत आणि त्या द्राक्षबागांच्या नुकसानीचा सर्व्हे करून चालणार नाही तर त्या बागाच उन्मळून पडल्या आहेत आणि हे द्राक्षाचे पीक एका वर्षाचे नसून अनेक वर्षांचे असल्याने त्या पिकांच्या संपूर्ण नुकसानीची भरपाई होणे गरजेचे आहे. यामध्ये आपण जे नुकसानीचा अंदाज सांगितला आहे तेवढेच नुकसान झालेले नाही तर तो आकडा फार मोठा आहे. तेव्हा त्याबाबत मदत देण्याबाबत आपले प्रचलित धोरण काय आहे ? शासन याबाबत या लोकांना मदत देणार आहे काय ? तसेच ज्यांची घरे या गारपीटीमध्ये वा वादळी वाऱ्यामुळे पूर्णपणे बाधित झालेली आहेत, पडली आहेत त्यांचे पुनर्वसन शासन करणार काय ?

( यानंतर री. सरफरे .... आर 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, गारपीट व वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीसंदर्भातील हा विषय असल्यामुळे त्या अंतर्गत जेवढी मदत द्यावयास पाहिजे तेवढी दिली जाईल. द्राक्ष बागा उन्मळून पडल्या असल्यामुळे त्याबाबत असलेल्या नियमाखाली आपल्याला मदत करता येणार नाही. परंतु यासंबंधी असलेल्या पुनर्वसन समितीमध्ये विशेष बाब म्हणून या गोष्टीचा विचार करावा लागेल. म्हणून आता याठिकाणी मला ठोस असे उत्तर देता येणार नाही. तसेच, यामध्ये केवळ द्राक्ष बागा नाहीतर गुलाब व झेंडू या फूल शेतीचे सुध्दा नुकसान झाले आहे, अशा विविध पिकांचे नुकसान झाले आहे, त्याबाबत सुध्दा प्रचलित नियमानुसार मदत दिली जाईल. विशेष बाब म्हणून जर आपल्याला मदत करावयाची असेल तर ती बाब उप समितीपुढे न्यावी लागेल. सभापती महोदय, या शासनाने सातत्याने शेतकऱ्यांच्या बाजूने निर्णय घेतले असल्यामुळे या प्रश्नाच्या बाबतीत सुध्दा सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल. ही बाब उप समिती समोर नेऊन त्या माध्यमातून जास्तीत जास्त मदत देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मांजर्डे या गावामध्ये गारपीट झाल्याचे शासनाने मान्य केले. त्यामध्ये प्राथमिक अंदाजानुसार 6 कोटी 85 लक्ष 61 हजाराचे नुकसान झाले आहे, घरांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, सर्व घरे उद्ध्वस्त झाली आहेत याची आपण नोंद घेतली आहे. इतके मोठया प्रमाणात नुकसान होऊन सुध्दा हे शासन कालबध्द स्वरुपामध्ये आश्वासन देण्यास तयार नाही. ज्या शेतकऱ्यांचे संपूर्ण नुकसान झाले आहे त्यांना एक महिन्यात नुकसान भरपाई हे शासन देणार आहे काय? ज्या शेतकऱ्याने आत्महत्त्या केली, त्याच्या डोक्यावर कर्ज होते, त्याचे या गारपीटीमध्ये नुकसान झाले आहे हे शासनाने मान्य केले आहे. हे सिध्द झाल्यामुळे त्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत मंत्रिमहोदय या सभागृहामध्ये घोषणा करणार आहेत काय?

श्री. दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, अशाप्रकारची घोषणा करण्याची आवश्यकता नाही. नियमामध्ये सर्व गोष्टींची तरतूद असल्यामुळे आणि जिल्हाधिकाऱ्यांकडून पंचनाम्याचे अहवाल येत असल्यामुळे त्यानुसार मदत केली जाते. त्यामुळे शासनाच्या धोरणाप्रमाणे आपण काम करणार आहोत. दुसरी गोष्ट अशी की, शासन नुकसान भरपाई देत नाही तर मदत करीत असते. एखाद्याचे 10 हजाराचे नुकसान झाले म्हणून त्याला 10 हजार देण्याचे शासनाचे धोरण नाही. त्यामुळे आपदग्रस्त कुटुंबांना मदत करण्याबाबत शासनाचे प्रचलित निकष आहेत त्यानुसारच मदत केली जाते. सभागृहातील सर्व माननीय सदस्यांच्या या बाबतीत सारख्या भावना असल्यामुळे विशेष

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/ MAP/

श्री. दिलीपराव देशमुख....

बाब म्हणून उप समितीमध्ये त्याबाबत चर्चा करुन व त्याला मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर त्यांना मदत मिळू शकेल. आत्महत्त्येच्या बाबतीत सुध्दा मी ती बाब मान्य केली असून नियमानुसार त्याबाबत कार्यवाही होईल असे मला वाटते.

श्री. प्रकाश शेंडगे : आपण किती दिवसात मदत करणार आहात?

श्री. दिलीपराव देशमुख : जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल आल्यानंतर लवकरात लवकर मदत केली जाईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, याठिकाणी शासनाने दिलेले निवेदन हे संपूर्णपणे शेतकऱ्यांची टिंगल टवाळी करणारे आहे. याठिकाणी असे म्हटले आहे की, "मौजे मांजर्डे येथे वादळी वारा व पावसामुळे एकूण 15 कुटुंबे निराधार/निराश्रीत झालेली असून सदर कुटुंबातील बाधीत व्यक्तींची एकूण संख्या 54 एवढी आहे. सदर बाधीत व्यक्तींना शासनाच्या प्रचलित नियमानुसार रु.1000/- प्रती व्यक्ती याप्रमाणे रु.54000/- एवढे सानुग्रह अनुदान मदत म्हणून तातडीने वाटप करण्यात आले आहेत". सभापती महोय, आपण या विभागाचे आमदार आणि या सभागृहाचे सभापती म्हणून देखील अनेक वर्षापासून प्रतिनिधीत्व करीत आहात. मांजर्डे या गावामध्ये तीन वर्षापूर्वी दुष्काळ पडला होता. त्यामधून मार्ग काढीत शेतकऱ्यांनी आपल्या बागा पुन्हा उभ्या केल्या. आज प्रत्येक बाग उभी करण्यासाठी शेतकऱ्याला 3 लाखाचे कर्ज घ्यावे लागते. तो आपले घर गहाण ठेवून, जमीन विकून, कर्जाऊ पैसे घेऊन उभी केलेली बाग आपल्या डोळयादेखत उद्ध्वस्त होत असल्याचे पहातो. दुष्काळी परिस्थितीतून बाहेर आल्यानंतर सुध्दा आज त्या भागात पाणी नसल्यामुळे टँकरने पाणी आणून त्या बागा जगविल्या जात आहेत याची आपल्याला कल्पना आहे. सभापती महोदय, मला आपल्यामार्फत शासनाला प्रश्न विचारावयाचा आहे की,

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KGS/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:30

श्री.जितेंद्र आव्हाड . . . .

शासन काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे की नाही ? आपण जरी प्रति हेक्टर 6000 रुपये नुकसान भरपाई देणार असलो तरी ते त्या शेतकऱ्यांना पुरेसे होणार आहेत काय ? या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये सहा कि.वजनाची एकेक गारपीट पडल्यानंतर शेतकऱ्यांच्या बागा नेस्तनाबूत झालेल्या आहेत. आता तेथे बागा शिल्लकच नाहीत. अशा वेळेस संपूर्ण महाराष्ट्रासाठी चांगल्या प्रकारचे धोरण,जे शेतकरीभिमुख असेल, ते ठरविण्याची आवश्यकता आहे.मघाशी माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले की, महाराष्ट्र शासन हे नेहमी शेतकऱ्यांसाठी निर्णय घेत असते. तीन वर्षापूर्वी अशाच प्रकारे दुष्काळामध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांनी पुन्हा तीन वर्षे मेहनत करुन या बागा उभ्या केल्या. पण आता गारपिटीमुळे, नैसर्गिक कोपामुळे त्या बागा परत उद्ध्वस्त झालेल्या आहेत. अशा वेळी या शेतकऱ्यांना सहा हजार रुपये देऊन पुन्हा उभे करु शकत नाही. यासाठी शासनाने ठोस निर्णय घेऊन, अशा प्रकारे नैसर्गिक आपत्ती सापडलेल्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना यातून बाहेर काढण्यासाठी, त्यांना मदत करण्यासाठी काही धोरणात्मक बदल करुन योग्य ते निर्णय घेणार आहे काय ?

श्री.दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, शासनाचा कधीही शेतकऱ्यांची टिंगलटवाळी करण्याचा हेतू नाही. याबाबतीत प्रचलित नियमाप्रमाणे जेवढया रकमेची मदत करावयाची आहे, ती करण्याच्या बाबतीत शासनाने पूर्वीच मान्यता दिलेली आहे. पण मी मघाशी सन्माननीय सदस्यांना असे सांगितले की, यासंदर्भात विशेष बैठक घेऊन अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आणखी किती जास्त मदत करता येईल, यासंदर्भातील निर्णय घेऊच घेऊ. पण मला सन्माननीय सदस्यांना एक माहिती द्यावयाची आहे की, ......

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा "टिंगलटवाळी" या शब्दाच्या संदर्भात हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तसे म्हटल्यामुळे मी तसे म्हटलेले आहे. पण माझा तसा हेतू नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, शेतकऱ्यांची टिंगलटवाळी करण्याचा शासनाचा उद्देश नाही. परंतु आमच्या तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी अकोला येथे आल्यानंतर असे सांगितले की,"आमचा विदर्भातील शेतकरी आळशी आहे, तो विडया

. . . .एस-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

फुकतो, तो कापसात पाणी घालतो, दगड घालतो" अशा प्रकारे जाहीररित्या वर्णन केले आहे आणि ते वर्तमानपत्रामध्येही छापून आले होते. तेव्हा ही टिंगलटवाळी नाही असे आपण मान्य केले, त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. धन्यवाद.

श्री.दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, विषयांतर होत आहे.

**सभापती** : बरोबर आहे. विषयांतर होत आहे.

श्री.दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, मला अशी माहिती द्यावयाची आहे की, शासनाच्या सुध्दा लक्षात आलेले आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या, माननीय महसूल मंत्री महोदयांच्या हे लक्षात आलेले आहे की, सध्या आपण जी मदत देत आहोत, ती अत्यंत तुटपूंजी आहे. म्हणून यासंदर्भात समिती किंवा उप समिती नेमून याचा फेर-विचार करुन शेतकऱ्यांना योग्य प्रकारची मदत कशी देता येईल याबाबत सुध्दा आपण भविष्यामध्ये निर्णय घेऊ असे मला वाटते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हा केवळ निकषाचा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाडसाहेबांनी व्यक्त केल्या, त्यातील शब्द जरी थोडेसे कठोर असले, टोकदार असले तरी शासनाकडून मिळणारी मदत तुटपूंजी असल्याने, त्यांच्या मनामध्ये क्रोध निर्माण झाला आणि त्यामुळे त्यांनी ते शब्द वापरले. सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय डॉ.पतंगराव कदम असून ते माननीय महसूल मंत्री आहेत. माझी माननीय डॉ.पतंगराव कदम साहेबांना एकच विनंती आहे की, याबाबतीत शासनाचे जे निकष आहेत, ते फार जुने आहेत. हे निकष बदलले पाहिजेत अशी मागणी करण्यात आली. तेव्हा ही सूचना योग्य आहे आणि त्याबाबत शासन विचार करीत आहे, यासाठी समिती स्थापन करीत आहोत वगैरे सांगण्यात आलेले आहे. तुमच्या सारखा एक पोटेन्शिअल असलेला आणि भविष्यातील महाराष्ट्रातील एक प्रभावी नेतृत्व म्हणून आम्ही तुमच्याकडे पहात आहोत. अशा वेळी तुम्ही असे सांगावे की, मी हे निकष बदललेले आहेत किंवा 8 दिवसामध्ये बदलतो आणि तुमच्यासमोर तसा जी.आर.सादर करतो, जेणेकरुन यापुढे शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही अशा प्रकारची बाणेदार वृत्ती आपण दाखवावी अशी आमची तुमच्याकडून अपेक्षा आहे. तेव्हा आपण यानिमित्ताने केवळ या पिकांच्या बाबतीत नाही तर पण अशा प्रकारच्या संकटांच्या वेळी देण्यात येणाऱ्या मदतीच्या संदर्भात मंत्रालयामध्ये ब्युरॉक्रसीसमोर जे निकष फ्रेममध्ये लावून ठेवलेले आहेत. त्यामुळे त्याच्या बाहेर जाऊन मदत करता येत नाही अशी स्थिती

. . . .एस-3

आहे. ते निकष बदलण्याचे धाडस तुमच्यासारख्या बाणेदार व्यक्तीने दाखवावे आणि महाराष्ट्राला दिशा द्यावी. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी यावर प्रकाश टाकावा अशी माझी विनंती आहे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य आणि भारतीय जनता पक्षाचे नेते श्री.नितीन गडकरीजी सांगितले. पण हा काही राजकीय प्रश्न नाही. याठिकाणी सन्माननीय मदत व पुनर्वसन मंत्री महोदयांनी बरोबर उत्तर दिलेले आहे. यासाठी आमचे सध्याचे स्टॅण्डींग रुल्स उपयोगाचे नाहीत. कारण मी स्वत:तेथ जाऊन परिस्थिती पाहिलेली आहे. तेथील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे आणि त्यातून शेतकरी वरच येऊ शकत नाही. म्हणून माननीय मंत्री महोदयांनी जे सांगितले, ते बरोबर आहे की, स्पेशल कॅबिनेट सब कमिटीमध्ये या संबंधीचा वेगळा निर्णय सध्याचे स्टॅण्डर्ड रुल्स् बाजूला ठेऊन घ्यावा लागेल आणि तो आम्ही घेऊ.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हा निर्णय कधी घेणार आहात ? अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेणार आहात काय ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

यानंतर कु.थोरात . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, दोन विषय आहेत. मांजर्डे आणि तासगावमधील हा विषय आहे त्याठिकाणी मदत देण्याच्या संदर्भात बै्ठक घेऊन हे अधिवेशन संपण्यापूर्वी या संदर्भातील निर्णय घेण्यात येईल. पण महाराष्ट्राचे निकष बदलण्याच्या दृष्टिकोनातून, त्यामध्ये धोरणात्मक बदल करण्याच्या दृष्टिकोनातून ताबडतोबिने एक उप समिती स्थापन करण्यात येत आहे. याबाबतचे मिटिन्स आजच्या कॅबिनेट मिटिंगमध्ये कन्फर्म झाल्यामुळे मला ते सभगृहात सांगण्यास हरकत नाही. सभापती महोदय, ती समिती गठीत झाल्यानंतर त्या समितीच्या बैठका घेऊन याबाबत विचार-विनिमय करण्यात येईल आणि दोन महिन्याच्या आत नवीन सुधारित निकष अमलात आणण्यात येतील.

श्री. नितीन गडकरी : दोन महिन्यांनी आचारसंहिता लागणार आहे.

श्री. दिलीपराव देशमुख : आचारसंहितेच्या पूर्वी हे करु.

श्री. संजय पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी भरीव मदत करण्याच्या संदर्भात सांगितलेले आहे.या अनुषंगाने मांजर्डे आणि त्या आसपासच्या परिसरातील शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून शासन ही भूमिका घेणार आहे. मागच्या वर्षी अवेळी पडलेल्या पावसामुळे द्राक्ष बागायतदारांचे बेदाण्याचे नुकसान झालेले आहे. त्यासंबंधीचे सगळे पंचनामे शासनाकडे आलेले आहेत. तेव्हा या निमित्ताने या द्राक्ष बायगायतदारांना नुकसानभरपाई मिळण्याच्या दृष्टीने शासन लवकरात लवकर निर्णय घेणार काय, आणि तोपर्यंत शेतकऱ्यांच्या कर्जवसुलीला स्थगिती देणार काय?

श्री. दिलीपराव देशमख : सभापती महोदय, हे सर्व निर्णय ताबडतोबीने घेतले जातील. कर्ज वसुलीला स्थगिती देण्याचा विषय येथे नाही. कर्जाच्या हप्त्याचा डयू पुढे आहे. द्राक्ष बागायतदारांचे जे वार्षिक कर्ज आहे त्याच्या वसुलीचा हप्ता आता येतच नाही. त्यामुळे सध्या ती स्थगिती असल्यासारखेच आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे समाधान व्हावे अशा प्रकारची सविस्तर उत्तरे देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे आणि त्याबध्दतीची शासनाची भूमिका आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सांगलीमधील या नुकसानीच्या संदर्भामध्ये अतिशय गांभीर्याने चर्चा झालेली आहे. निकष बदलण्याच्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, वादळी पासाळामुळे सांगली बरोबरच परभणी, मालेगाव,जळगाव या ठिकाणी देखील नुकसान झालेले आहे. म्हणून यासंदर्भात लक्षवेधी सूचना देत असतांना सगळया जिल्हयांची लक्षवेधी सूचना एकत्रित येईल असे आम्हाला अपेक्षित होते. तेव्हा यासर्व जिल्हयांच्या संदर्भात शासन समर्पक अशी उपाययोजना किती दिवसात करणार आहे?

श्री. दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, राज्यामध्ये इतरत्र कुठेही अशा प्रकारची गारपीट, वादळी वारे किंवा इतर कारणाने नुकसान झाले असेल तर हा नियम त्या ठिकणी लागू राहील. त्याचा या समितीमध्ये विचार करण्यात येईल आणि सर्व आपदग्रस्त शेतकऱ्यांना किंवा कुटुंबाना जी काही मदत करावयाची आहे ती करण्यात येईल.

---

**लक्षवेधी सूचना क्रमांक 2 आणि 3 पुढे ढकलण्याबाबत**

**सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर बाबक्रमांक चार वरील लक्षवेधी सूचना क्रमांक 2 आणि 3 पुढे ढकलण्याचा मी निर्णय घेतला आहे. तसेच या दोन्ही लक्षवेधी सूचना मी उद्या घेण्याचे ठरविले आहे.

आता लक्षवेधी सूचना क्रमांक 4 श्रीमती उषाताई दराडे यांची आहे त्यांनी ती मांडावी.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला उत्तर कोण देणार आहे?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, संबंधित मंत्रिमहोदय, सभागृहात उपस्थित नाहीत.

**सभापती** :ठीक आहे. तोपर्यंत पुढील लक्षवेधी सूचना क्रमांक 5 घेऊ. सदरहू लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांची आहे त्यांनी ती मांडावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3....

SMT/ MAP/ KGS/

**पृ. शी.** : चिकू पिकासाठी नुकसानभरपाई मिळण्याबाबत शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी.

**मु. शी.** : चिकू पिकासाठी नुकसानभरपाई मिळण्याबाबत शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी यासंबंधी सर्वश्री संजय केळकर,विनोद तावडे,सय्यद पाशा पटेल, वि. प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"डहाणु जि.ठाणे येथे मोठ्या प्रमाणात चिकू पिकाची लागवड होणे, त्यातच या वर्षी भीषण पाणी टंचाई व रोगराई निर्माण झाली असून विहिरी व बोअर यांच्या पाण्याची पातळी कमी होणे, चिकुच्या झाडांना पाणी मिळत नसल्याने मोठ्या प्रमाणात चिकुची झाडे जळत असणे, तसेच जिवंत झाडावर चिकू फळे न येणे, त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडणे, चिकू पीक शेतकऱ्यास फळे देत असले तरी एक प्रकारे निसर्गाचा समतोल राखून पर्यावरणास मदत करत असणे, डहाणु तालुक्यामध्ये चिकु लागवड क्षेत्र अंदाजित १ ते सव्वा लाख एकर असून अंदाजित उत्पादकता १५ टन प्रती हेक्टर असणे, राज्यातील चिकुच्या एकूण लागवड क्षेत्राच्या ५० टक्के पेक्षा जास्त लागवड क्षेत्र डहाणु तालुक्यात असल्याने यावर्षी आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे स्थानिक शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान होणे, सबब शासनातर्फे ज्या प्रमाणे नैसर्गिक आपत्तीमुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जाणे, त्याचप्रमाणे चिकू पिकासाठी सुध्दा नुकसान भरपाई मिळणेसाठी शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी, या प्रकरणी शासनाने त्वरीत करावयाची उपाययोजना व याबाबत शासनाची प्रतिक्रिया"

श्री. दिलीपराव देशमुख ( पुनर्वसन व मदत कार्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, हा ठाणे जिल्हयातील डाहाणू तालुक्यातील चिकूच्या संदर्भातील विषय आहे. राज्यातील चिकुच्या एकूण उत्पादनापैकी 50 टक्के उत्पादन या तालुक्यामध्ये होते. विशेषकरुन घोलवड, बोर्डी अशा भागामध्ये चिकूचे उत्पादन होते. येथील चिकू मोठया प्रमाणात एक्स्पोर्ट केला जातो. परंतु गेल्या वर्षभरामध्ये पाण्याच्या टंचाईमुळे त्याठिकाणची चिकुची झाडे जळल्यामुळे त्याठिकाणी चिकुचे उत्पादन झाले नाही. त्यामुळे तेथील शेतकरी आर्थिक अडचणीत आलेला आहे. याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले आहे की, "अशा प्रकारच्या कुठल्याही तक्रारी आलेल्या नाहीत." परंतु त्या भागातील शेतकऱ्यांचे कशा प्रकारे नुकसान झालेले आहे यासंदर्भातील त्या शेतकऱ्यांची निवेदने मी माननीय मंत्री महोदयांना देऊ शकतो. सभापती महोदय, माझा याबाबत स्पेसिफिक प्रश्न आहे. कोकणात आंबा उत्पादकांना नुकसान भरपाई दिली आणि ती या वर्षीही दिली गेली पाहिजे अशा प्रकारची मागणी झालेली आहे.

( **सभापतीस्थाती माननीय उपसभापती** )

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ....

तसेच या चिकू उत्पादकांना आपण नुकसानभरपाई देणार काय ? या निवेदनामध्ये आपण उत्तर दिले आहे की, अशा प्रकारे कोणतेही नुकसान झाल्याच्या तक्रारी आमच्याकडे आलेल्या नाहीत. पण अशा तक्रारी आल्या तर शासन नुकसानभरपाई देणार काय ?

श्री. दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, सय्यद पाशा पटेल यांनी ही लक्षवेधी सूचना या ठिकाणी उपस्थित केलेली आहे. उत्तराच्या शेवटी असे म्हटले आहे की, पाऊस चांगला झाला असल्यामुळे पाणी टंचाईबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून आलेल्या नाहीत. परंतु सन्माननीय सदस्यांनी या सभागृहामध्ये प्रश्न विचारला हीच महत्वाची तक्रार आहे असे गृहीत धरुन कृषी विभागाला यासंदर्भात फेर पाहणी करण्याच्या सूचना आम्ही देऊ. त्यांचे खरोखर नुकसान झाले आहे असे जर पंचनाम्यामध्ये आढळून आले तर मदत देण्याचे जे सुधारित नियम असतील त्या नियमाप्रमाणे मदत करु.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या निवेदनामध्ये चिकू फळ पिकाचे सरासरी उत्पन्न प्रति हेक्टरी 9 टन येते असे म्हटले आहे. तीन वर्षात किती उत्पन्न झाले याची आकडेवारी मिळाली तर किती उत्पन्न कमी झाले हे समजू शकेल. याची माहिती माननीय मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री. दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, ही माहिती उपलब्ध करुन पटलावर ठेवण्यात येईल.

----

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन बंद पडणे

**मु. शी**. : अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन बंद पडणे यासंबंधी ॲड. उषाताई दराडे , सर्वश्री जितेंद्र आव्हाड, रणजितसिंह माहिते-पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड. उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात असलेले सिटीस्कॅन मशिन व एक्सरे ट्यूब निकामी झाल्याने माहे मार्च-एप्रिल, २००९ पासून बंद पडणे, सदर मशिनच्या दुरुस्तीसाठी किमान ४० लाख रुपयांचा खर्च येत असल्याचा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण संचालक यांच्याकडे पाठविण्यात येऊन याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात न आल्याने रुग्णांना सिटीस्कॅनसाठी खाजगीरित्या रुपये १२०० ते २ हजार इतका खर्च करावा लागणे, तसेच स्वाराती रुग्णालयात दररोज सुमारे पाच ते सहा रुग्णालयाचे सिटीस्कॅन होत असल्याने या खाजगी रुग्णालयाचा जोरात चालू असलेला व्यवसाय, खाजगी दवाखान्यात सीटीस्कॅन, एक्सरे साठी जादा पैसे द्यावे लागत असल्याने, सदर परिसरातील नागरिकांकडून शासकीय दवाखान्यातील सिटीस्कॅन दुरुस्ती करणेबाबत होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राजेश टोपे ( वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3...

RDB/ KGS/ MAP

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, सिटीस्कॅन मशीनमधील एक्सरे ट्यूब निकामी झाल्यामुळे मी ही लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, एक विशेष बाब म्हणून संस्थेच्या स्वीयप्रपंची खात्यातून खरेदी करण्यास दिनांक 2.6.2009 रोजी मान्यता देण्यात आली आहे. या उत्तराने माझे समाधान झालेले आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, यामध्ये जर आपण सर्व तारखा पाहिल्या तर असे दिसते की, 30.3.2009 रोजी मशीन बंद पडले. त्याबाबत 29.4.2009 ला पत्राने कळविले. 8.5.2009 च्या पत्राव्दारे वैद्यकीय शिक्षण संचालक यांना कळविले गेले. त्यानंतर 2.6.2009 ला विशेष मान्यता दिली गेली. अशा प्रकारच्या सिटीस्कॅन मशिनच्या बाबतीत अडीच महिन्याचा कालावधी गमावला. माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे. ही मशिन जुनी होती हे माहीत आहे. या मशिनला 10 वर्षे झालेली आहेत आणि मशिनची क्षमता संपलेली होती. सिटीस्कॅन, एमआरआय मशीन ज्यावेळी बंद पडते त्यावेळी एक महिन्यामध्ये दुरुस्त करण्यासाठी शासन विशेष बाब म्हणून परवानगी देणार काय ? कारण या सर्व पत्रव्यवहारामध्ये वेळ जातो आणि रुग्णांचे नुकसान होते. सिटीस्कॅन ही इमर्जंसी डायग्नोस्टीक बाब आहे. त्यामुळे अशा प्रकारे आपण करणार काय ? आधी 9 कोटी रुपये अंबेजोगाई हॉस्पिटलला दिले गेले होते. 9 कोटी रुपयांमध्ये ही मशिन दुरुस्त होणार नव्हती काय ? विशेष बाब करण्याची काय गरज होती ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या सिटीस्कॅन मशिनच्या दुरुस्तीला दोन महिने लागले ही गोष्ट खरी आहे. सुरुवातीला या फिलिप्स कंपनीला कळविण्यात आले होते. यामध्ये खरोखरच ट्यूब गेली आहे की आणखी काही प्रॉब्लेम आहे हे त्या कंपनीच्या लोकांना कळू शकले नाही. त्यासाठी यामध्ये उशीर लागला. जो उशीर झालेला आहे त्यामुळे प्रश्न निर्माण झाला. या कारणास्तव किंवा एखादी घटना घडली तर लवकर दुरुस्ती व्हावी अशा पध्दतीची आपली सिस्टिम असणे आवश्यक आहे. यामध्ये अन्युअल मेन्टेनन्स कॉन्ट्रॅक्ट असतो. अशी पध्दत आहे. परंतु ॲन्युअल मेन्टेनन्स कॉन्ट्रॅक्टमध्ये ट्यूब गेली तर दुरुस्त करण्याची तरतूद नाही. कारण त्याची किंमत 36 ते 40 लाख रुपये असते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/ यापूर्वी श्री.बरवड 12:45

श्री.राजेश टोपे....

तेथे ए.एम.सी.च्या ज्या गोष्टी असावयास पाहिजे होत्या त्या हॉस्पिटलमध्ये होत्या. घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने नवीन सिस्टिम तयार करण्याचा माझा मानस आहे. ज्यामध्ये बायो-मेडिकल इक्विपमेंट मेंटेनन्स सेलचा समावेश आहे. अशाप्रकारचे सेल मुंबई महानगरपालिकांच्या सायन, नायर आणि के.इ.एम. या रुग्णालयांमध्ये आहे. ही रुग्णालये दुसऱ्या कोणावर अवलंबून नाहीत. त्याप्रमाणे 14 शासकीय वैद्यकीय रुग्णालयांमध्ये बायो-मेडिकल इक्विपमेंट मेंटेनन्स सेल तयार करण्यात येईल. सभापती महोदय, याठिकाणी मी हे सुध्दा सांगू इच्छितो की, सातत्याने अशाप्रकारच्या किंमती यंत्रसामुग्रींचा दरमहा आढावा घेणे आवश्यक आहे. याचे कारण असे की, सीटी स्कॅन मशिन, एमआरआय मशिन बंद पडल्यामुळे रुग्णांना खाजगी रुग्णालयात जाऊन तपासण्या करुन घ्याव्या लागतात. म्हणून सचिव व संचालक स्तरावर समिती गठित करुन या समितीद्वारे दरमहा अशा किंमती यंत्रसामुग्रींचा आढावा घेतला जाईल. शासनाने यासंबंधी दोन नवीन धोरणांचा अवलंब करण्याचे ठरविलेले आहे. त्यानुसार समिती गठित करण्यात येईल व या समितीच्या माध्यमातून यंत्रसामुग्रींचा आढावा घेतला जाईल व बायो-मेडिकल इक्विपमेंट मेंटेनन्स सेल तयार करण्यात येईल.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी चांगले उत्तर दिले आहे. या मशिनरीसाठी विशेष सेल निर्माण करण्यात येणार आहे. परंतु यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा महत्वाचा मुद्दा आहे. या विषयासाठी वेगळा फंड दिला पाहिजे. यासाठी मेंटेनन्स, रिपेअरिंग, इन्श्यूरन्स आणि फंड या 4 बाबींची आवश्यकता आहे. या चारही बाबी विभागाकडून केल्या जातील काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, यासाठी नॉन प्लॅनमध्ये पैसा असतो. त्यातून नवीन मशिनरी घेत आहे. त्यासाठी नॉन प्लॅनचे नियतव्यय वाढविण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याप्रमाणे निश्चितपणे त्याला मान्यता दिली जाईल.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

डॉ.वसंतराव पवार : या मशिनरींचा आढावा घेण्यासाठी नवीन सेल तयार केला जाणार असल्याचे सन्माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. सीटी स्कॅन, एमआरआय यासारखी मशिनरी विकत घेतली जाते त्यावेळी अशा मशिनरीची एखादी टयूब बंद पडल्यास स्टॅण्डबाय म्हणून ठेवलेली टयूब ताबडतोब बसवून दिली पाहिजे. त्यासाठी त्या टयूबचा इन्श्यूरन्स काढला जाऊ शकतो. अशाप्रकारे जर इन्श्यूरन्स काढला तर शासनाचे बरेच पैसे वाचू शकतात. तेव्हा अशाप्रकारच्या मशिनरीची खरेदी करीत असताना या अटी घातल्या जाणार आहेत काय ?

श्री.राजेश टोपे : अशाप्रकारची कोणतीही किंमती इक्विपमेण्ट खरेदी करीत असताना कंपनीबरोबर करार केला जातो. त्यानुसार 2 वर्षामध्ये इक्विपमेण्टमध्ये बिघाड झाल्यास त्याची मोफत दुरुस्ती करुन दिली जाते. त्याचप्रमाणे कॉम्प्रेहेन्सिव्ह मेंटेनन्स कॉन्ट्रॅक्टनुसार त्या इक्विपमेंटचा कोणताही पार्ट खराब झाला तर तो पार्ट बदलून देण्याचे काम ती कंपनी करीत असते. त्यासाठी 5+2 अशा 7 वर्षाकरिता सी.एम.सी.साईन करण्यात येतो. सी.एम.सी.साठी पैसे भरावे लागतात. त्यामध्ये कोणताही पार्ट खराब झाला तर संबंधित कंपनी तो पार्ट बदलून देते. त्यामुळे पहिल्या 7 वर्षात कोणतीही अडचण येत नाही. 7 वर्षानंतर जे काही काम निघेल त्यासाठी ए.एम.सी.असतो. त्यामध्ये पार्टचे पैसे द्यावे लागतात. परंतु मेंटेनन्स मोफत केले जाते.

श्री.हेमंत टकले : मंत्रिमहोदयांनी चांगल्या स्वरुपाचे उत्तर दिले आहे. यासाठी नवीन यंत्रणा निर्माण केली जाणार आहे. सर्वसाधारण जनतेचा अनुभव असा आहे की, सार्वजनिक रुग्णालयामध्ये असलेल्या या मशिनरींच्या देखभाल दुरुस्तीकडे विभागाकडून दुर्लक्ष केले जाते. त्याठिकाणी नेमण्यात आलेले तांत्रिक कर्मचारी या मशिनरीचा उपयोग न करता ती बंद कशी होईल अशाप्रकारची परिस्थिती निर्माण करतात. त्यामुळे त्यावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा सक्षम असावयास पाहिजे. याचे दोन भाग आहेत.

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 12:50

(श्री. हेमंत टकले.....)

एक म्हणजे वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित असलेली डॉक्टर मंडळी आणि दुसरे तांत्रिक बाजू सांभाळणारे तंत्रज्ञ. या सगळया काम करणा-या माणसांवर वचक राहील आणि शासकीय रुग्णालयातील यंत्रसामग्री सुस्थितीत राहून तिचा चांगल्या प्रकारे वापर होईल या दृष्टीने काही उपाययोजना करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्यांनी महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. या अनुषंगाने काही नवीन धोरणात्मक गोष्टी करण्याची गरज भासली आहे. अशी उदाहरणे घडलेली आहेत की, जवळच्या शहरामध्ये एखादे प्रायव्हेट सिटीस्कॅन किंवा एमआरआय मशिन असेल तर त्यांचा धंदा व्हावा म्हणून त्यांच्याकडून कमिशन घेऊन असे काम केले जाते आणि त्यामुळे सरकारी इक्विपमेण्टचा गरीब माणसांसाठी वापर करण्याच्या कामी बाधा निर्माण होते. याबाबतीत दोन गोष्टी केल्या आहेत. एक म्हणजे कोणतेही 50 हजार रुपयाचे इक्विपमेण्ट असेल तर त्याचे ॲन्युअल मेण्टेनन्स कॉण्ट्रॅक्ट करण्याचे बंधनकारक करण्यासंबंधी डायरेक्टर, मेडिकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च यांना कळविण्यात आलेले आहे.तसेच इक्विपमेण्टमध्ये बिघाड झाला तर बायोमेडिकल इक्विपमेण्ट मेण्टेनन्स सेल करण्यात येणार आहे. शासनाने घेतलेल्या मशिनरीचे पूर्ण युटिलायझेशन झाले आहे की नाही, मेण्टेनन्स झालेले आहे की नाही यासंबंधीचा मन्थली रिपोर्ट डायरेक्टर यांना किंवा जी समिती गठित करण्यात आली आहे त्या समितीला देण्याचे बंधनकारक राहाणार आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी सांगितल्याप्रमाणे तांत्रिक कर्मचा-यांमुळे जे प्रश्न निर्माण होतात त्यांना निश्चितपणे आळा बसेल.

----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नियम 93च्या निवेदनासंबंधी

श्री. अजित पवार : सभापती महोदय, मघाशी मी 93च्या निवेदनावर उत्तर देण्यासाठी सभागृहामध्ये उपस्थित राहिलो होतो. परंतु चर्चेच्या ओघात निवेदन क्रमांक 2 पुढे ढकल्यात आले. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते हे सदनामध्ये उपस्थित आहेत आणि माझी देखील उत्तर देण्याची तयारी आहे. तेव्हा निवेदन क्रमांक 2 घेण्यात यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 12:50

**पृ.शी.** : ठाणे जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थांना उपकराची रक्कम मिळण्याबाबत

**मु.शी.** : ठाणे जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थांना उपकराची रक्कम मिळण्याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर व मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी नियम 93अन्वये दिलेली सूचना

श्री. अजित पवार ( जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधरे महामंडळ वगळून).मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केवळकर व मधुकर चव्हाण, वि.प.स.यांनी "ठाणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना उपकराची रक्कम मिळण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : ठाणे जिल्ह्यातून विविध धरणातून जो काही पाणी पुरवठा केला जातो त्याच्या मोबदल्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेला उपकरापोटी जी देय्य रक्कम आहे त्याची थकबाकी आज शासनाकडे आहे. माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराने माझे समाधान झालेले आहे. त्यांनी ठाणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना जी रक्कम देय्य आहे ती देण्याचे मान्य केलेले आहे. ही रक्कम किती दिवसात दिली जाईल ? तसेच कोणकोणत्या स्थानिक स्वराज्य संस्थांना किती किती रक्कम देण्याचे प्रयोजन आहे ?

अजित पवार : दिनांक 4 जून 2009 रोजी आपण जो अर्थसंकल्प सादर करणार आहोत त्यामध्ये या रकमेची तरतूद करण्याचा विभागाचा प्रयत्न आहे. ठाणे जिल्हा परिषदेस 9.35 कोटी रु. इतकी रक्कम द्यावयाची आहे ती सर्व रक्कम देण्याचा प्रयत्न होईल. उल्हासनगर महानगरपालिकेला 96 लाख रु., मीरा-भाईंदर महानगरपालिकेस 23 लाख रुपये, भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेला 17 लाख रुपये अशी रक्कम द्यावयाची आहे. ही सर्व रक्कम देण्याचा प्रयत्न होईल. ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील 9 नगरपालिका/नगरपरिषदांना 28 कोटी रुपये द्यावयाचे आहेत. परंतु 18.98 कोटीचीच तरतूद केलेली आहे. ही तरतूद करीत असतना ठाणे जिल्ह्यातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थाना - जिल्हा परिषद आणि नगरपरिषदांना - तसेच ज्या महानगरपालिकांना तातडीने रक्कम देण्याची गरज आहे त्यांना ती प्राधान्याने देण्यात येईल. फक्त ठाणे महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका या आर्थिक बाबतीत संपन्न असलेल्या महानगरपालिकांची रक्कम शिल्लक राहिली आहे. परंतु त्यांचीही रक्कम दिली पाहिजे या मताशी शासन सहमत आहे. आता 18.98कोटी इतकी तरतूद असल्यामुळे उर्वरित रकमेकरिता पुढच्या सप्लिमेण्टरी बजेटमध्ये विचार केला जाईल.

----

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख

**पृ. शी.** : भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सर्वात अल्पवयीन हुतात्मा अनंत लक्ष्मण कान्हेरे यांच्या स्मारकाचे काम अर्धवट अवस्थेत असल्याबाबत

**मु. शी.** : भारतीय स्वातंत्र्य लढयातील सर्वात अल्पवयीन हुतात्मा अनंत लक्ष्मण कान्हेरे यांच्या स्मारकाचे काम अर्धवट अवस्थेत असल्याबाबत श्री.संजय केळकर,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, भारतीय स्वातंत्र्य लढयातील सर्वात अल्पवयीन हुतात्मा अनंत लक्ष्मण कान्हेरे यांचे मुळगांव आयनी, ता.खेड, जि.रत्नागिरी येथे सन 1991 पासून हुतात्मा स्मारकाचे काम सुरु असून अद्यापही सदर विकासकाम अर्धवट अवस्थेत आहे. सन 2010 साल हे हुतात्मा अनंत लक्ष्मण कान्हेरे यांचे स्मृती शताब्दीचे वर्ष आहे. तत्पुर्वी स्मारकाचे काम पूर्ण व्हावे अशी स्मारक प्रकल्प समितीची इच्छा आहे. स्मारक प्रकल्पाच्या बांधकामाच्या सुरुवातीपासून शासनाचे या प्रकल्पाकडे सातत्याने होत असलेल्या दुर्लक्षाबाबत प्रकल्प समितीमध्ये शासनाप्रति तीव्र स्वरुपाची नाराजी आहे. हुतात्म्याच्याबलीदानाकडे शासनाने श्रध्देने पाहून त्यांच्या स्मृती जपणे हे शासनाचे कर्तव्य आहे. शासन त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी सदरचा विषय विशेष उल्लेखाव्दारे निदर्शनास आणून देत आहे. तरी योग्य ती कार्यवाही व्हावी अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

-----------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणा-या विकास प्रकल्पांपैकी एकूण 33 टक्के प्रकल्प मजूर सहकारी संस्थांमार्फत कार्यान्वित करुनही सदर संस्थांना कामाचे वाटप न करणे

**मु. शी.** : ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणा-या विकास प्रकल्पांपैकी एकूण 33 टक्के प्रकल्प मजूर सहकारी संस्थांमार्फत कार्यान्वित करुनही सदर संस्थांना कामाचे वाटप न करणे याबाबत श्री.केशवराव मानकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.केशवराव मानकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.केशवराव मानकर ( विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील जिल्हा परिषदा सक्षम व्हाव्यात, त्यांच्या मार्फत राबविण्यात येणा-या वेगवेगळया विकास कामांचा दर्जा, गती व त्यावर वचक राहण्यासाठी राज्यात ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत राबविण्याता येणा-या विकास प्रकल्पातील एकूण 33 टक्के प्रकल्प हे मजूर सहकारी संस्थांमार्फत कार्यान्वित केले जाते, त्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, 1968 च्या नियम 137,138 व 139 ला अधिन राहून मजूर सहकारी संस्थांना जिल्हा परिषदांमार्फत कामे देण्याबाबत सुचना देण्यात येणे, त्याचप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय क्रमांक सीएटी07/06/प्र.क्र.94/इमा.2/,दि.16.11.2006 अन्वये मजूर सहकारी संस्थांना 33 टक्क्यांप्रमाणे कामाचे वाटप करण्यात येण्यासंबंधी आदेश निर्गमित करणे, परंतु राज्यातील मजूर सहकारी संस्थांना अद्यापही सार्वजनिक बांधकाम (जिल्हा परिषद)मार्फत कामाचे वाटप करण्यात न येणे, त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य मजूर संघ, पुणे आणि माननीय मुख्यमंत्री यांच्यासोबत झालेल्या बैठकीत यासंदर्भात सुधारित आदेश काढण्यासंदर्भात निर्णय घेण्यात येणे, त्याप्रमाणे सुधारित आदेश येणे क्रमप्राप्त असणे, परंतु नवीन शासन निर्णय

3...



ABG/ SBT/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 12:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

येण्यापूर्वी जुन्या शासन निर्णयानुसार मजूर सहकारी संस्थांना 33 टक्क्यांप्रमाणे काम वाटप करण्याची आवश्यकता असणे, म्हणून राज्यातील जिल्हा परिषद सक्षम होण्याच्या दृष्टीने मजूर सहकारी संस्थांना जुन्या शासन निर्णयाप्रमाणे 33 टक्के कामे वाटप करण्याची निकडीची आवश्यकता लक्षात घेता शासनाने त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा विषय असल्यामुळे तो मी आज सभागृहात "विशेष उल्लेखाव्दारे" उपस्थित केलेला आहे. याबाबतीत शासनाने गांभीर्याने कार्यवाही करावी अशी मी विनंती करतो.

------

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सहाव्या वेतन आयोगा संदर्भात हकीम समितीने सरळसेवा भरतीने थेट नियुक्ती होणा-या अधिका-यांना देय असलेली पे बँडवेतनश्रेणी सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांना लागू करणे

**मु. शी.** : सहाव्या वेतन आयोगा संदर्भात हकीम समितीने सरळसेवा भरतीने थेट नियुक्ती होणा-या अधिका-यांना देय असलेली पे बँडवेतनश्रेणी सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांना लागू करणे याबाबत ॲड.उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, राज्य शासनाच्या गृह खात्यामध्ये अभियोग संचालनालय या कार्यालयांअंतर्गत जिल्हा व तालुका स्तरावर राजपत्रित वर्ग-1 गट-अ या दर्जाचे सहाय्यक सरकारी अभियोक्ता न्यायालयात कार्यरत आहेत. सहाव्या वेतन आयोगाच्या धरतीवर राज्य शासनाने नेमलेल्या हमीम कमिटीने सरळ सेवा भरतीने नियुक्त होणा-या "वर्ग-1,गट-अ" या पदाच्या अधिका-यांना पे बॅण्ड तीन अन्वये प्रारंभिक वेतन रुपये 17600 व वेतन श्रेणी 15600-31400 ही देण्याची शिफारस केलेली आहे.

सभापती महोदया वरील प्रमाणे वर्ग-1, गट-अ सरळ सेवा भरती थेट नियुक्तीने अधिका-यांना देय असलेली वेतनश्रेणी सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांना वित्त विभागाच्या निर्णयानुसार देण्यात आलेली नाही तर त्यांना वेतन बॅण्ड पीबी-2 ची वेतनश्रेणी रुपये 9300-34800 देण्यात आलेली आहे. शासनाने मान्य केलेल्या हकीम कमिटीच्या शिफारशीनुसार सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देय असलेली वेतन बॅण्ड पीबी 3 ची वेतनश्रेणी रुपये 15600-39400 ही देण्याबाबत शासनाने अद्याप कोणत्याही प्रकारचे पाऊल उचललेले नाही. सदर वेतनश्रेणी मिळावी म्हणून महाराष्ट्र राज्य सरकारी अभियोक्ता संघटना, मुंबई यांचे सातत्याने प्रयत्न सुरु आहेत. परंतु त्याकडे शासनाने लक्ष दिलेले नाही.

सभापती महोदय, अतिशय तातडीचा आणि महत्वाच्या विषय असल्यामुळे मी "विशे्ष उल्लेखाच्या" माध्यमातून शासनाचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबतीत शासनाने सत्वर कार्यवाही करावी अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करते.

-------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे, नवी मुंबई येथील वीज ग्राहकांना प्रति युनिट 43 पैसे विश्वासार्हता आकार म्हणून सोसावा लागणारा भूर्दंड

**मु. शी.** : ठाणे, नवी मुंबई येथील वीज ग्राहकांना प्रति युनिट 43 पैसे विश्वासार्हता आकार म्हणून सोसावा लागणारा भूर्दंड याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

ठाणे, नवी मुंबई येथील वीज ग्राहकांकडून शून्य लोडशेडिंगच्या नावाखाली प्रति युनिट 43 पैसे इतका अतिरिक्त विश्वासार्हता आकार वसूल केल्याने या योजनेचा बोजवारा उडाल्याचे दिसून आले आहे. विजेची उपलब्धता आणि मागणी याचे प्रमाण व्यस्त असल्यामुळे परिस्थितीत बदल होण्याची चिन्हे दिसत नाहीत. याचा फायदा उद्योगांना अधिक होत असल्याचे आढळून आले आहे. मात्र त्याचा भूर्दंड सर्वसामान्य जनतेला सोसावा लागत असल्यामुळे वीज ग्राहकांमध्ये पसरलेला असंतोष आणि त्यावर शासनाने करावयाची उपाययोजना यासंबंधी मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. शासनाने याबाबत त्वरित कारवाई करावी.

---

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नवी मुंबई, उरण येथे द्रोणागिरी नोडमध्ये नवी मुंबई सेझ प्रकल्पाची भिंत बांधण्याच्या कामामुळे जनतेला होणारा त्रास

**मु. शी.** : नवी मुंबई, उरण येथे द्रोणागिरी नोडमध्ये नवी मुंबई सेझ प्रकल्पाची भिंत बांधण्याच्या कामामुळे जनतेला होणारा त्रास याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

नवी मुंबई, उरण येथील सिडकोने तयार केलेल्या द्रोणागिरी नोड मधील 1250 हेक्टर क्षेत्रावर नवी मुंबई सेझ प्रकल्पाची भिंत बांधण्याचे काम अखेरच्या टप्प्यात आले आहे. यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये आंदोलने पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेल्या असंतोषाची शासनाने वेळीच दखल घेऊन योग्य ती उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. शासनाने यासंबंधी त्वरित उपाययोजना करावी, अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करते.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांचे अनिर्णित असलेले प्रस्ताव

**मु. शी.** : विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांचे अनिर्णित असलेले प्रस्ताव याबाबत श्री.सुरेश जेथलिया,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.सुरेश जेथलिया यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.सुरेश जेथलिया (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

राज्यातील अनेक इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे प्रस्ताव शासनाकडे गेल्या तीन वर्षापासून प्रलंबित आहेत. प्रत्येक ठिकाणी आज ॲडमिशन आणि इतर प्रोसेससाठी अडचणी येत आहेत. कायम विनाअनुदानित शाळांना, शासनाचे कोणतेही अनुदान मिळणार नसताना गेल्या तीन वर्षापासून हे प्रस्ताव प्रलंबित आहेत. म्हणून इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या प्रस्तावाबाबत शासनाने त्वरित कार्यवाही करावी अशी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

-------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्यासंबंधी**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी विनंती केली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मी पुढीलप्रमाणे औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

राष्ट्रपुरुषांचा अनादर होत असल्याचे आपल्याला वारंवार दिसून येते. व्हिक्टोरिया टर्मिनस हे ब्रिटिशकालीन रेल्वे स्थानकाचे नाव बदलून छत्रपती शिवाजी टर्मिनस असे करण्यात आले. त्याचप्रमाणे 1999 साली कुर्ला टर्मिनस या रेल्वे स्थानकाचे नाव लोकमान्य टिळक टर्मिनस असे बदलण्यात आले. ज्यावेळी आपण महापुरुषांची नावे स्मरण म्हणून, स्फुर्ती म्हणून वापरतो, त्या नावांचा अपभ्रंश केंद्र व राज्य शासनातील वेगवेगळया खात्यातील अधिकाऱ्यांकडून सातत्याने केला जातो. ट्रेन्स ॲट अ ग्लान्स या रेल्वेच्या वेळापत्रकातील पुस्तकामध्ये छत्रपती शिवाजी टर्मिनस या रेल्वे स्थानकाच्या नावाचा उल्लेख सी.एस.टी. मुंबई असा केला असून इतर स्थानकांच्या बाबतीत मात्र पूर्ण नावाचा उल्लेख केला आहे. उदाहरण द्यायचे झाले तर श्री सत्य साई प्रशांती निलायम, चित्रकुट धाम कारवी, दिल्ली सराई रोहिला याप्रमाणे उल्लेख केलेला आहे. परंतु सी.एस.टी. मुंबई याऐवजी छत्रपती शिवाजी टर्मिनस असा उल्लेख का केला जात नाही? देवनागरी भाषेत छ.शि.ट. असा उल्लेख राजरोसपणे करण्यात येतो. हा उल्लेख केवळ त्या स्टेशनवर नव्हे तर त्याठिकाणी असलेल्या पोलीस ठाणे, त्या परिसरात वापरण्यात येणाऱ्या रुग्णवाहिकेवर देखील असाच शब्दप्रयोग करण्यात येतो. लोकमान्य टिळक टर्मिनस ऐवजी लो.टि.टर्मिनस अशा प्रकारे उल्लेख केला जात असेल तर या राष्ट्रपुरुषांबद्दल आपल्याला खरोखरच आदर आहे का? असा अपभ्रंश करुन या राष्ट्रपुरुषांची स्मृती कोणत्या प्रकारे आपण जनतेसमोर आणीत आहोत याबद्दल शासनाने निश्चितपणे काहीतरी निर्देश देण्याची आवश्यकता आहे.

-----------

...झेड.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले......

मला वाटते या वरिष्ठ सभागृहात एकदा माननीय श्री. जयंतरावजी टिळक सभापती असताना अशाच प्रकारचा विषय उपस्थित झाला होता व त्यावेळेस देखील त्यांनी तसे निदेश दिले होते. माझी अशी विनंती आहे की, शासनाने अशा प्रकारे राष्ट्रपुरुषांचा होणारा अनादर थांबविण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी.

श्री. दिवाकर रावते : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहेच, परंतु त्यांची जी व्यथा आहे ती त्यांनीच निर्माण केली आहे हे आमचे दुर्दैव आहे, असेही मी म्हणेन. केंद्रीय शाळांमध्ये इतिहासाची जी पुस्तके आहेत त्यात औरंगजेब आणि शाहिस्तेखान यांच्यावरील पाठ मोठमोठे आहेत आणि शिवाजी महाराजांवर मात्र चारच ओळी आहेत. म्हणून आपल्याच राष्ट्रपुरुषांचे अवमूल्यन मुळात जेथून होत आहे त्याचे त्यांना काहीच वाटत नाही. या मुंबई शहरात जेमतेम 27 टक्केच मराठी जनता आहे बाकी सर्व परप्रांतिय आहेत आणि त्यांना अशा राष्ट्रपुरुषांबाबत काही वाटावे असे काहीच नाही. तेव्हा ते पुचकाऱ्या मारतच फिरणार, आणि आपण कानफटात मारण्याचा प्रयत्न केला तरी गुंड म्हणून आतमध्ये टाकण्यात येते. सापडलो नाही तर आमच्या घरी जाऊन घरच्या लोकांना उचलून नेतात अशी परिस्थिती आहे.

महोदय, या सभागृहात मी असाच एक विषय उपस्थित केला होता तो म्हणजे महाराष्ट्राकरिता योगदान दिलेल्या, समर्पित झालेल्या महान लोकांची नावे रेल्वे स्टेशन्सना द्यावीत. त्यासंबंधी मला रेल्वे मंत्रालयाकडून एक पत्र आलेले आहे. आपल्या राज्यात जवळपास 80 टक्के आयएएस, आयपीएस अशा उच्च दर्जाचे अधिकारी अमराठी आहेत. त्यांनी अनेक ठिकाणी जमिनी घेतल्या, फ्लॅट्स घेतले अशा दोन दोन फ्लॅट्समध्ये ते राहत आहेत आणि निवृत्त झाल्यानंतर देखील त्यांनी मालमत्ता केल्या हे आपणच निर्माण केलेले पाप आहे. मला रेल्वेकडून असे पत्र पाठविण्यात आले की, सन 1953 च्या रेल्वे अधिनियमाप्रमाणे अशा प्रकारे नावे देता येत नाहीत. मग मी नवी दिल्ली येथे पत्रव्यवहार करुन विचारणा केली की, देशात अशा प्रकारे किती ठिकाणी नावे दिली ? त्याची माहिती मला अशी मिळाली की, जवळपास 80 ठिकाणी देशात वेगवेगळ्या रेल्वे स्टेशन्सना राष्ट्रपुरुषांची व महान व्यक्तिंची नावे दिलेली आहेत. ही माहिती मला नावासहित दिलेली आहे. यासंबंधीच मी सभागृहात तीन दिवसांपूर्वी हक्कभंगाची सूचना दिलेली

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ MMP/

श्री. दिवाकर रावते ....

आहे. परंतु मला माहीत नाही की, आम्ही दिलेले हक्कभंग विचारात घेतात की नाही ? म्हणून याबाबत खुलासा कसला मागवावयाचा ? जर देशात अशा प्रकारे 80 स्टेशन्सना नावे दिलेली असतील आणि त्यात राज्यातील 8 स्टेशन्सची नावे आहेत. असे असताना जे अधिकारी टाळाटाळ करीत असतील त्यांच्याविरुध्द दिलेला हक्कभंग दाखल करुन तो विशेष हक्कभंग समितीकडे पाठवावा आणि येत्या अधिवेशनात त्यांना शिक्षा दिली तरच जरब बसेल, म्हणून हे प्रकरण हक्कभंग समितीकडे पाठवावे, अशी मी विनंती करतो. अशा प्रकारच्या प्रवृत्ती वेळीच ठेचल्या नाही तर आपण काहीच करु शकणार नाही व त्यासाठी विल पॉवर आवश्यक असते. आपल्या आई-वडिलांना कुणी शिवीगाळ गेली तर ज्याप्रमाणे राग येतो त्याप्रमाणे राष्ट्रपुरुषांच्या बाबतीत राग येत असेल तरच आपल्याला राष्ट्रीयत्वाची जाणीव आहे असे मी समजतो. मी दिलेल्या हक्कभंगाच्या सूचनेला तीन दिवस होऊन गेले त्यासंदर्भात माझी विनंती आहे की, माननीय सभापतींनी राष्ट्रीयत्वाच्या भावनेतून या हक्कभंगाचा सन्मान करावा व तो ताबडतोब समितीकडे पाठवावा.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, लोकमान्य टिळक टर्मिनसचा उल्लेख लो.टि. असा केला जातो तसेच तसेच विमान तळावर सुध्दा असाच प्रकार आहे. लोकमान्य टिळक पोलीस स्टेशनचा उल्लेख सुध्दा लो.टि.मार्ग पोलीस स्टेशन असा सर्रास वापर केला जातो. लोटि म्हणजे छोटया मुलांसाठी जे छोटे भांडे दिले जाते त्याला लोटी म्हटले जाते. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचे अनाऊसमेंट सुध्दा सीएसटी अशा नावानेच केली जाते. सभागृहात माननीय कॅबिनेट मंत्री बसलेले आहेत त्यामुळे शासनाच्या वतीने केंद्रसरकारकडे यासंदर्भात तीव्र निषेध आणि मागणी केली पाहिजे की, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस तसेच लोकमान्य टर्मिनस या नावाचा उल्लेख संक्षिप्त नावाने न करता पूर्ण नावाने केला जावा. त्यामुळे या बाबीचा आपण सर्वांनी निषेध केला पाहिजे व स्टेशनला जी पूर्ण नावे देण्यात आलेली आहे ती पूर्णपणे घेतली गेली पाहिजेत व छापलीही पाहिजेत तसेच अनाऊंसमेंट सुध्दा पूर्ण शब्दात केली पाहिजे. थोर व्यक्तिंच्या नावाचा संक्षिप्तपणे उल्लेख करणे योग्य नाही. त्यांच्या नावाचा पूर्ण उल्लेख झाला पाहिजे ही फार महत्वाची आणि गंभीर बाब आहे. पूर्ण नावाचा उल्लेख न करणे ही गंभीर बाब आहे. त्यामुळे यासंदर्भात आपण आजच्या आज किंवा उद्यापर्यंत केंद्रशासनाला याबाबत कळविले पाहिजे व त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे व आपण तशा प्रकारे आदेश द्यावेत अशी विनंती आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून एक महत्वाचा विषय या ठिकाणी उपस्थित केलेला आहे व या मुद्याला सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी पाठिबा दिलेला आहे व आपले विचारही व्यक्त केलेले आहेत. या विषयाच्या संदर्भात यापूर्वी सुध्दा सभागृहात हा मुद्दा उपस्थित झाला होता. सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या संदर्भात हक्कभंग सुध्दा दिलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना महाराष्ट्रातील रेल्वेची काही नावे बदलवली आहे व काही बदलविण्यात आलेली नाही. किती नावे बदलविण्यात आलेली आहेत व किती नावे बदलविण्यात आलेली नाही याची संपूर्ण माहिती सन्माननीय सदस्यांनी रेल्वेच्या अधिका-यांनी कळविली आहे. परंतु रेल्वेच्या अधिका-यांनी 1953 च्या कायद्यानुसार रेल्वेची अशा प्रकारे नावे बदलविता येत नाही असे लेखी उत्तर त्यांना दिलेली आहे. खरे म्हणजे हा विषय शासनाच्या माध्यमातून केंद्र सरकारला कळविला पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी...

त्यामुळे यासंदर्भात शासनाच्या वतीने आपण निर्देश दिले पाहिजेत, केंद्रशासनाला या विषयाच्या संदर्भातसांगितले पाहिजे. माझा मुद्दा असा आहे की, संसदेच्या अधिवेशनाच्या आधी प्रत्येक राज्याचे मुख्यमंत्री संसदेमध्ये कोणते प्रश्न उपस्थित करावयाचे आहेत यासंदर्भात खासदारांची बैठक बोलवित असतात. आपलेही मुख्यमंत्री तशा प्रकारची बैठक आयोजित करीत असतात. दाक्षिणात्य भागातील राज्याचे मुख्यमंत्री सुध्दा संसदेच्या अधिवेशनाच्या आधी खासदारांची बैठक आयोजित करीत असतात व कोणते प्रश्न या अधिवेशनात सोडवावयाचे याची चर्चा करीत असतात. केंद्रामध्ये दाक्षिणात्य अधिकारीच उच्चपदी विराजमान आहेत व त्याचा फायदा त्या राज्यांना निश्चित प्रकारे प्रश्न सोडविण्याच्या संदर्भात तसेच योजनांचा निधी वळविण्याच्या संदर्भात होत असतो. दक्षिणेकडील राज्याचे प्रमुख या प्रश्नांच्या संदर्भात वेळोवेळी बैठका आयोजित करीत असतात, ऊहापोह करीत असतात. या सदनात माननीय कॅबिनेट मंत्री सुध्दा उपस्थित आहेत. एका पक्षाकडून हा प्रश्न सुटेल असे मला वाटत नाही. आपण यासंदर्भात केंद्राला 10 पत्र पाठविली तरी अशा प्रकारे हा प्रश्न सुटणार नाही असे मला वाटते. सभापती महोदय, केंद्रात केवळ काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचेच खासदार निवडून गेलेले आहेत असे नसून शिवसेना आणि भाजपाचे सुध्दा खासदार निवडून गेलेले आहेत. सर्व खासदारांनी मिळून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला, केंद्रात लावून धरला तरच निश्चितप्रकारे हा प्रश्न सुटू शकेल एवढीच मला सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यात सुधारणा करावयाची आहे.

श्री. दिवाकर रावते : माननीय सभापती, आपण या सदनाचे उपसभापती आहात, आपण हा प्रश्न निश्चित प्रकारे सोडवू शकाल अशी मला खात्री आहे. मी जेव्हा 1992 मध्ये महापौर होतो त्यावेळे एलफिस्टन रोडचे नाव प्रभादेवी करावे असे केंद्रसरकारला पत्र पाठवून मागणी केली होती. या विषयाच्या संदर्भात विधानमंडळाच्या माध्यमातून सभागृहात प्रस्ताव मांडला आणि एकमताने तो मंजूर करुन केंद्रसरकारला पाठविला व महाराष्ट्रातील मंत्र्यांनी आणि खासदारांनी त्याचा पाठपुरावा केला आणि आपल्या कार्यालयातून यासंदर्भात पाठपुरावा झाला तर निश्तिच प्रकारे हा प्रश्न सुटू शकतो. आपल्या कार्यालयातून पाठपुरावा झाला तर पीठासीन अधिकारी म्हणून या प्रश्नाला वजन प्राप्त होईल. एवढीच विनंती करण्यासाठी उभा राहिलो होतो. धन्यवाद. ..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** :सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला असून या औचित्याच्या मुद्यास सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते,मधुकर चव्हाण आणि सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. महत्वाचा भाग असा आहे की, या औचित्याच्या मुद्याच्या पाठीमागे सदस्यांच्या ज्या भावना आहेत त्या सभागृहाने निश्चित प्रकारे जाणून घेतल्या पाहिजेत. यासंदर्भात मला विरारचे माजी नगराध्यक्ष श्री. मुकेश सावे यांनी एक सविस्तर पत्र सुध्दा लिहिले आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**..

त्या पत्राच्या अनुषंगाने या ठिकाणी उपस्थित असलेले मंत्री श्री.राजेश टोपे यांना मी सांगू इच्छितो की, आता या ठिकाणी ज्या मुद्याच्या संदर्भात चर्चा झाली आहे त्या संदर्भात श्री. सावे यांनी मला जे पत्र पाठविले होते ते मी आपल्याकडे पाठवत आहे. पहिली गोष्ट अशी आहे की, या संदर्भात केन्द्र सरकारची जी जबाबदारी आहे ती जबाबदारी केन्द्र सरकारने पार पाडावी याकरता आपण म्हणता त्याप्रमाणे आपण निश्चितपणे प्रयत्न करु शकू परंतु त्यापूर्वी एखाद्या गोष्टीची सुरुवात करण्याची जी बाब आपल्या हातामध्ये आहे ती आपण केली पाहिजे. उदाहरणार्थ " लो.टि. टर्मिनस " अशा प्रकारचे बोर्डस जर एम.एम.आर.डी.ए.कडून लिहिले गेले असतील तर त्यात सुधारणा करणे ही बाब राज्य शासनाच्या अखत्यारातील आहे. त्याचप्रमाणे "लो.टि. मार्ग पोलीस स्टेशन " असा उल्लेख जर केला जात असेल तर तो भाग गृह खात्याशी संबंधित आहे.तेव्हा किमान पक्षी राज्यामध्ये या नावांचा सन्मान करण्यास आपण शिकले पाहिजे. म्हणून राज्य शासनाच्या अखत्यारातील ज्या दोन तीन गोष्टी आहेत त्याची अंमलबजावणी उद्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत करण्याच्या संदर्भात आपण संबंधितांना त्वरित सूचना द्याव्यात. उद्या सकाळी 11.00 वाजता त्या ठिकाणी हे बदल झालेले आहेत किंवा नाहीत हे पहाण्यासाठी मी स्वत: जाणार आहे. त्याचप्रमाणे माझ्याबरोबर येण्यास जे कोणी सन्माननीय सदस्य तयार असतील त्यांनाही मी घेऊन जाईन. या संदर्भात जर प्रशासनाने योग्य ती कार्यवाही केली नाही तर संबंधित खात्याच्या अधिका-यांविरुध्द कारवाई करण्यात यावी अशा प्रकारची स्पष्ट सूचना मी आपणास देऊ इच्छितो. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विषयाच्या संदर्भात एक हक्क भंगाच्या सूचनेसबंधी सुतोवाच केलेले आहे. विधिमंडळातील अधिका-यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी जो हक्क भंगाचा प्रस्ताव सादर केलेला आहे त्या बाबतीत ताबडतोब पुढील कार्यवाही करावी. सन्माननीय सदस्यांनी हक्क भंगाचा प्रस्ताव सादर केलेला आहे की करावयाचा आहे ?

श्री.दिवाकर रावते : सादर केलेला आहे.

**उपसभापती** : तेव्हा या प्रस्तावाच्या संदर्भात विधिमंडळाच्या अधिका-यांनी उद्याच सुस्पष्टपणे आपले मत मांडावे. त्याचबरोबर ज्या ज्या ठिकाणी राष्ट्रीय नेत्यांची अशा प्रकारे कुचंबणा किंवा अवहेलना केली जात असेल तर ते बरोबर नाही. ही जबाबदारी प्रशासनाची आहे. सगळयाच बाबतीत लोकप्रतिनिधींना जबाबदार धरु शकत नाही. काही वेळा लोकप्रतिनिधींना जनता

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**..

किंवा बाकीची मंडळी वेठीला धरत असते किंबहुना काही वेळा त्यांना दोंषास पात्रही ठरविले जाते परंतु ज्या काही गोष्टी ठरलेल्या आहेत त्याप्रमाणे प्रशासन जर अंमलबजावणी करीत नसेल तर ही जबाबदारी प्रशासनाची आहे.मी त्यांच्यावर टीका करु इच्छित नाही परंतु राष्ट्रीय नेत्यांच्या संदर्भात आदराची भावना त्यांनी लक्षात घ्याव्यात. त्याचबरोबर आता सभागृहामध्ये अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे की, याबाबतीत केन्द्र सरकारला ताबडतोब कळवून रेल्वे स्टेशनच्या नावाचा उल्लेख "छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस " अशा प्रकारे करण्यास त्यांना भाग पाडावे त्याच बरोबर "लोकमान्य टिळक टर्मिनस" अशा प्रकारे पूर्ण नाव लिहिण्यास त्यांना सांगण्यात यावे. ज्या ज्या ठिकाणी राष्ट्र पुरुषांची नावे देण्यात आलेली आहेत त्या नावाचा सन्मान राखणे हे आपले कर्तव्य ठरते ....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अनाऊन्समेन्ट करतांनासुध्दा ती योग्य प्रकारे करण्यात आली पाहिजे त्याचप्रमाणे रेल्वेच्या गाडयांच्या समोर जी पाटी लावण्यात येते ती इंग्रजीत असते . इतर प्रांतामध्ये ही पाटी त्यांच्या भाषेत लिहिलेली असते. त्यामुळे ती पाटी आपल्याला वाचता येत नाही तेव्हा ही पाटी आपल्या राज्यात मराठीतून का लिहिली जात नाही.? तेव्हा या पाटयासुध्दा मराठीतून लिहिण्यात आल्या पाहिजेत.

**उपसभापती** : या ठिकाणी जी चर्चा झालेली आहे त्या चर्चेचा आशय माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात आलेला आहे. त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्याच्या संदर्भात संबंधितांना सूचना द्याव्यात . श्री सावे यांनी मला पाठविलेले पत्र आणि त्या संदर्भात मी लिहिलेले पत्र, मी आपणाकडे पाठवतो ते पत्र आपण ताबडतोब माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठवून त्या बाबतीत पढील कार्यवाही करण्यास त्यांना अवगत करावे.

श्री.राजेश टोपे :सभापती महोदय, आपण जे निदेश दिलेले आहेत त्यामध्ये राज्य शासनाच्या कक्षेत जो विषय आहे त्याबाबतीत ताबडतोबीने सूचना देण्यात येतील परतु ही कार्यवाही उद्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत करावी असे आपण सागितलेले आहे तेव्हा त्याबाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, एवढया लवकर ही कार्यवाही होईल काय.? त्या बाबतीत आम्ही ताबडतोब सूचना देऊ परतु प्रॅक्टीकली इतक्या लवकर करणे शक्य होणार नाही म्हणून लवकरात लवकर तसे करण्यात येईल.

.



VTG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 13.15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : लवकरात लवकर या शब्दाला अर्थ राहत नाही. उद्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत होणार नाही असे तुम्ही मला सांगा. बोर्ड बदलण्याच्या सूचना फक्त आपल्याला द्यावयाच्या आहेत. गाडया बदलावयाच्या नाहीत.

श्री.राजेश टोपे : उद्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत करण्याच्या बाबतीत बंधन घालण्यात आलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मध्यंतरी नाशिक येथे एका शासकीय बैठकीसाठी गेलो होतो. आदिवासी विकास विभागाची तेथे पाच मजल्याची इमारत असून माझ्या नेहमीच्या सवयी प्रमाणे मी पाचही मजल्यांवर फिरुन आलो होतो. त्या ठिकाणी सगळया पाटया इंग्रजीतून लिहिलेल्या होत्या.त्यावेळी श्री.मिना नावाचे अधिकारी तेथे होते. या पाटया इंग्रजीतून लिहिण्यात आल्याबद्दल मी बैठकीत सुरुवातीलाच मुद्दा माडला होता.

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MMP/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 13:20

श्री. रावते ...

आणि दोन तासानी बैठकीत जेवणाची सुटी झाली तेव्हा मी पाहिले की, त्या दोन तासामध्ये त्या संपूर्ण कार्यालयातील इंग्रजीतील पाट्या बदलण्यात येऊन मराठी पाट्या लागल्या होत्या. म्हणजे मनावर घेतले तर निश्चितपणे असे बदल होऊ शकतात, करता येतात. केवळ आपली इच्छाशक्ती असली पाहिजे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आपण केलेली सूचना, आपण दिलेले निदेश मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या कनावर घालीन आणि त्याबाबतीत अमलबजावणी जी काही करायची असेल तीही करून घेतली जाईल. मात्र केंद्र सरकारच्या अखत्यारीतील ज्या बाबी आहेत त्या बाबत राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्र सरकारला निश्चितपणे कळविले जाईल.

**उपसभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना विचारू इच्छितो की, पाट्या बदलण्याचे काम हे उद्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत होऊ शकेल ना ?

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना आवाहन करतो की, त्यांना ही बाब शक्य होत नसेल तर त्यांनी आम्हाला सांगावी. आम्ही उद्या सकाळी 11.00 वाजण्याच्या आत हे काम पूर्ण करून दाखवितो.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मला वाटते की, आपण हा आठवडा पूर्ण होईपर्यंतचा अवधी द्यावा...

**उपसभापती** : मी यापुढे जाऊन आपल्याला सांगतो की, मी या बाबतीतील सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन निदेश दिलेले आहेत. त्याची अमलबजावणी करण्याचे काम शासनाचे आहे. तेव्हा मी दिलेल्या निदेशाप्रमाणे उद्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत याबाबत अमलबजावणी झाली पाहिजे.

आता यानंतरचे सभागृहापुढील कामकाज आपण घेऊ या. ..

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझी आपणास एक विनंती आहे की, विशेष उल्लेख राहिले आहेत तरी ते आपण कृपया घ्यावेत.

**उपसभापती** : माझ्याकडे आज एकंदर विशेष उल्लेखाच्या 7 सूचना आल्या होत्या आणि त्या साऱ्या मी वाचलेल्या आहेत. त्यातील केवळ एक राहिली होती. आता आपण म्हणत असाल तर तीही घेण्यास माझी हरकत नाही.

..... सीसी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ. शी.** : देवी अहिल्याबाई होळकर पुरस्कार देणेबाबत.

**मु. शी.** : देवी अहिल्याबाई होळकर पुरस्कार देणे याबाबत श्री.प्रकाश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

" राज्यात सन 1996-97 पासून देवी अहिल्याबाई होळकर पुरस्कार महिला व बाल विभाग क्षेत्रात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या महिला व संस्थांना दिला जातो. हे पुरस्कार राज्यस्तर, विभागस्तर व जिल्हास्तर असे देणे, तसेच राज्य स्तरीय एक पुरस्कार महिला व बालविकास क्षेत्रात गेली 25 वर्षे उत्कृष्ट योगदान देणाऱ्या महिलेस देण्यात येतो. परंतु 2002 पासून हा देवी अहिल्याबाई होळकर पुरस्कार देण्याचे शासनाने बंद केलेले आहे. मी गेली पाच वर्षे सातत्याने या सभागृहात हा पुरस्कार देणे पुन्हा सुरू करावे यासाठी मागणी करीत आहे. आता विधानसभेचे हे शेवटचे अधिवेशन आहे, त्यामुळे मी या ठिकाणी या विधानसभेच्या कालखंडातील ही शेवटची मागणी पुन्हा करतो. सभापती महोदय, विशेष म्हणजे याबाबत यापूर्वी आपण स्वत: निदेश शासनाला दिले होते. परंतु शासनाने त्याचे पालन केलेले नाही. तरी आपण पुन्हा याबाबत निदेश देऊन हा पुरस्कार चालू करावा. तरी देवी अहिल्याबाई होळकर यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार जो गेली पाच वर्षे देण्याचे थांबविले आहे वा बंद केले आहे, तो पुरस्कार देण्यास पुन्हा सुरूवात करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने करतो. सभापती महोदय, आपण स्वत: याबाबत शासनाला निदेश द्यावेत अशीही मी मागणी करतो.

***

.... सीसी 3 ..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग सहा पदरी करणे.

**मु. शी.** : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग सहा पदरी करणे याबाबत श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" दिनांक 1 मे पासून 15 मे पर्यंत रायगडमध्ये मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर एकूण 14 वाहन अपघात झाले. त्यात 19 प्रवासी मृत्यूमुखी पडले. या वर्षी जानेवारी ते एप्रिल 2009 या चार महिन्यांच्या काळात एकूण 179 अपघात झाले. यापैकी अतिगंभीर स्वरूपाचे 44 अपघात होऊन त्यामध्ये 67 जणांचा मृत्यू झाला. 131 जण गंभीररित्या जखमी झाले. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गा वरील अपघातास रस्त्यांच्या त्रुटी कारणीभूत असून प्रचंड प्रमाणात वाढलेली वाहतूक, अरूद मार्ग, साईडपट्ट्यांची जास्त खोली, धोकादायक वळणे यामुळे सतत अपघात घडत असतात. मुंबई-गोवा महामार्गाचा टप्पा सहा पदरी करण्याच्या घोषणा अनेक वेळा राज्य शासनाकडून करण्यात आल्या. परंतु अजून पर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर विषय अत्यंत महत्त्वाचा असून तो मी आज सभागृहात 'विशेष उल्लेखाद्वारे' उपस्थित करीत आहे. "

***

..... सीसी 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : स्थानिक स्वराज्य संस्थांतील पदाधिकाऱ्यांना मंत्रालयात येण्यासाठी प्रवेशपास तसेच विकासनिधी मिळणे.

**मु. शी.** : स्थानिक स्वराज्य संस्थांतील पदाधिकाऱ्यांना मंत्रालयात येण्यासाठी प्रवेशपास तसेच विकासनिधी मिळणे याबाबत श्री.गोपीकिशन बाजोरिया,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. गोपीकिसन बाजोरिया (अकोला,वाशिम,बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

" महाराष्ट्र राज्यात जवळपास 227 अ, ब, क वर्गाच्या नगरपालिका व 22 महानगरपालिका तसेच 35 जिल्हा परिषदा कार्यरत आहेत. या सर्व नगरपालिका, महानगरपालिका तसेच जिल्हा परिषदांतील पदाधिकारी, विशेष करून 'महापौर', जिल्हा परिषद अध्यक्ष तसेच पंचायत समिती सभापती यांना तासन् तास मंत्रालयात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विविध लोकहितार्थ कामासाठी यावे लागते. त्याकरिता त्यांना मंत्रालयीन प्रवेश पासेससाठी उभे राहावे लागते. कधी कधी तर दोन दोन दिवस त्यांना प्रवेश मिळत नाही. प्रवेश मिळाला तर अधिकारी वगैरेंची भेट होत नाही. म्हणजे मंत्री महोदय उपलब्ध नसतात. त्यामुळे त्यांना जास्त काळ मुंबईत राहावे लागते. म्हणून मी या 'विशेष उल्लेख'च्या माध्यमातून सभागृहाला विनंती करतो की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांना खालीलप्रमाणे योग्य मदत शासनाने करावी. ..

1) सर्व सदस्यांना निवडून आल्यानंतर त्यांच्या कार्यकाळासाठी मंत्रालयीन प्रवेशपास देण्यात यावा.

2) सर्व सदस्यांना आमदारासारखा विकासनिधी 'विशेष बाब' म्हणून दरवर्षी रूपये 2,00,000/- प्रमाणे प्रत्येकी देण्यात यावा. (विकास कामासाठी)

3) त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक सदस्याला त्याच्या वॉर्डात काम सुरळीत व्हावे म्हणून एक प्रशिक्षित सचिव कायमस्वरूपी देण्यात यावा.

अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला करतो.

**

(यानंतर श्री. सरफरे ....डीडी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया...

त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थेमधून प्रत्येक सदस्यांना त्यांच्या वॉर्डामधील कामे सुरळीत व्हावीत या करिता एक क्वॉलिफाईड कर्मचारी कायमचा देण्यात यावा अशी विनंती या विशेष उल्लेखाव्दारे मी करीत आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

**पृ. शी.** : शाळेमध्ये कला व क्रीडा विषय शिकविण्यासाठी स्वतंत्र शिक्षकाची नेमणूक करणे

**मु. शी.** : शाळेमध्ये कला व क्रीडा विषय शिकविण्यासाठी स्वतंत्र शिक्षकाची नेमणूक करणे याबाबत श्री. विक्रम काळे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. विक्रम काळे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्यामध्ये प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधून विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण दिले जाते. भाषा विषयाबरोबर इतरही विषय अभ्यासक्रमामध्ये आहेत. त्यासाठी विषयवार शिक्षक नेमला जातो. परंतु आजच्या विज्ञान युगामध्ये व देश एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करीत असतांना विद्यार्थ्यांना कला व क्रीडेचे ज्ञान देणे गरजेचे झाले आहे. कला व क्रीडा क्षेत्रामध्ये विद्यार्थी आपले करिअर करीत आहेत. परंतु कला व क्रीडा हे विषय शिकविण्यासाठी शाळेमध्ये स्वतंत्र शिक्षक नेमण्याची तरतूद नाही. काळाची गरज ओळखून सन 2009-10 या शैक्षणिक वर्षापासून प्रत्येक मान्यताप्राप्त शाळेमध्ये इयत्ता 5 वी ते 10 वीच्या वर्गासाठी किमान एक कला व क्रीडा हे विषय शिकविण्यासाठी शिक्षक नेमण्याची तरतूद सक्तीची करावी. यासाठी शासनाने तातडीने आदेश निर्गमित करण्याची विनंती मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महाड येथील सावित्री नदीच्या पात्रामधून बेकायदेशीर वाळू उपसा सुरु असणे

**मु. शी.** : महाड येथील सावित्री नदीच्या पात्रामधून बेकायदेशीर वाळू उपसा सुरु असणे याबाबत श्री.अरविंद सावंत,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"महाड येथील सावित्री नदीच्या पात्रात वाळूची अक्षरश: लूट सुरु असून वाळू उपसण्यासाठी केवळ 35 होडयांना परवानगी दिली असतांना 500 होडया वाळू उपसा करीत आहेत. तासगाव ते विचारेवाडी या 11 कि.मी.च्या राखीव क्षेत्रामध्ये 10 होडयांना तर तोराडी ते कुरगाव या साडे चार कि.मी.च्या क्षेत्रामध्ये 25 होडयांना वाळू उत्खननासाठी परवानगी दिली आहे. 1 होडी दिवसाला 12 ब्रास वाळू उत्खनन करते. याकरिता दिवसाला 2400 रुपयांचा महसूल घेतला जातो. त्यामुळे दिवसाला 35 होडयांकडून 84 हजार रुपयांचा महसूल मिळतो. परंतु 500 होडया बेकायदेशीररित्या वाळू उपसण्याचे काम करीत असल्यामुळे शासनाचा दिवसाला 12 लाखांचा महसूल बुडत आहे. सभापती महोदय, या वाळू उपशामुळे नदीच्या पात्राचे नुकसान होत आहे., कालांतराने पर्यावरणाचे सुध्दा नुकसान होणार आहे. या वाळूच्या उपशामधून वाळूचे गँगस्टर तयार झाले, त्यातून गुन्हेगारी वाढली, खून व्हावयास लागले आहेत. या वाळू उपशासंदर्भात आपण तातडीने नियंत्रण आणण्याची आवश्यकता आहे. एका बाजूला गुन्हेगारी तर दुसऱ्या बाजूला पर्यावरण आणि तिसऱ्या बाजूला राज्याचा बुडत चाललेला महसूल असे तीन विषय यामध्ये अंतर्भूत आहेत. म्हणून शासनाने याकडे वेळीच लक्ष देऊन हे चोरीचे वाळू उपसणे तातडीने थांबवावे अशी मी या निमित्ताने विनंती करतो. आपण मला विशेष उल्लेख मांडण्यास संधी दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देतो."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.00 वाजता पुन: भरेल.

(1.28 ते 2.00 मध्यंतर)

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी - माननीय उप सभापती**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहामध्ये एकही कॅबिनेट मंत्री उपस्थिती नाहीत. आता काय करावयाचे ? त्यांना दररोज तंबी द्यावयाची काय ? हा निर्लज्जपणा आहे. सभापती महोदय, मला सदनामध्ये हा शब्द वापरावा लागत आहे, आपण मला माफ करावे. पण प्रत्येक अधिवेशनामध्ये प्रत्येक दिवशी माननीय सभापतींनी माननीय मंत्री महोदयांना तंबी द्यावयाची आणि तरी त्यांनी सभागृहामध्ये उपस्थित रहावयाचे नाही, एवढा सरकारमध्ये निर्लज्जपणा आला असेल, कोडगेपणा आला असेल तर हे फारच झाले. आम्हाला एवढाच धंदा आहे काय ? जर झेपत नाही तर मंत्री कशासाठी होतात ? असा प्रश्न आहे.

**उपसभापती** : मी सभागृहाचे कामकाज 2.15 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाचे कामकाज 2 वाजून 01 मिनिटांनी, 2 वाजून 15 मिनिटांपर्यंत स्थगित झाले.)

-----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>सभापतीस्थानी माननीय उपसभापती</u>

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

( "प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला" )

**उपसभापती** :माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा आज पूर्ण करावयाची आहे. माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरासाठी एक तास सोडून उर्वरित वेळ सन्माननीय सदस्यांना भाषणाकरिता देण्यात येईल. ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चेत भाग घ्यावयाचा आहे त्यांनी आपली नावे पक्षप्रतोदामार्फत माझ्याकडे पाठवावित. वक्त्यांची नावे प्राप्त झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांच्या भाषणाला वेळेचे बंधन घालावे की काय याचा विचार करता येईल.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माझी अशी विनंती आहे की, गेल्या तीन दिवसात सभागृहात माननीय मंत्रिमहोदय उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचा जो वेळ वाया गेलेला आहे त्याचा हिशेब करुन सत्ताधारी पक्षाकडून बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांच्या भाषणाच्या वेळेमध्ये त्याप्रमाणे काटछाट करावी म्हणजे ते सन्माननीय सदस्य आपल्या पक्षाकडे वा सरकारकडे याचा निषेध व्यक्त करतील आणि भविष्यात माननीय मंत्रिमहोदय काटेकोरपणे सभागृहात उपस्थित रहातील. शेवटी कोणी तरी हा मुद्दा मांडल्याशिवाय हे होणार नाही. (अडथळा) श्री. गुरुनाथ कुलकर्णी तुमचा धाक आहे म्हणून तुमच्या बाजूचे सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित असतात. पण तसा धाक ठेवणारे दुसरे कोणी नाही. त्यामुळे सभागृहाचा वेळ वाया जातो.

सभापती महोदय, निवडणुकांच्या आचारसंहितेमुळे महाराष्ट्र राज्याचे भावी धोरण काय असणार आहे? हे राज्य भविष्यात येणाऱ्या वर्षामध्ये काय करणार आहे हे सांगण्याकरिता माननीय राज्यपाल महोदयांनी सरकारचे जे विचार व्यक्त केले आहेत ते आम्ही पाहिले आहेत. वाचले आहेत आणि ऐकले आहेत. आम्हाला कोठे तरी असे वाटले होते की, हे राज्य सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये पदार्पण करीत असताना महाराष्ट्रातील जनतेला महाराष्ट्र स्वतंत्र झाल्याचे समाधान मिळेल अशा प्रकारे माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या माध्यमातून सरकार जनतेला सांगेल.
पण या महाराष्ट्र राज्याचे दुर्दैव आहे. या महाराष्ट्रात आज अशी प्रवृत्ती सत्तेवर आहे की, हे महाराष्ट्र राज्य स्वतंत्र कां झाले अशा प्रकारचा प्रश्न निर्माण व्हावा. हे राज्य निर्माण कां झाले असा प्रश्न निर्माण व्हावा.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

आणि 50 वर्षामध्ये महाराष्ट्र प्रगतिपथापेक्षा अधोगतीकडे कसा नेला याची जाणीव व्हावी असे मला महामहिम राज्यपालांचे अभिभाषण ऐकल्यानंतर वाटले. म्हणून या अभिभाषणाच्या संदर्भात मी खेद व्यक्त करण्याकरिता उभा आहे. आम्ही खेद व्यक्त करण्याकरिता उभे राहिलो आणि उभे राहणार हे माहीत असताना माननीय राज्यपालांचे अभिनंदन करण्याकरिता सत्ताधारी बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी का उभे राहावे असा प्रश्न निर्माण करणारे कर्तृत्व ज्यावेळी माननीय मंत्रिमहोदय निर्माण करतात त्यावेळी खरोखर यांना हे राज्य पुढे न्यावयाचे आहे काय असा प्रश्न पडतो. सह्याद्री अतिथीगृहावर एक बैठक झाली. महामहिम राष्ट्रपती महोदयांच्या हस्ते पुढच्या 1 मे रोजी पन्नासावा वर्धापन दिन साजरा होणार आहे. ही फार अभिमानाची बाब आहे. शिवसेनेने मराठी राष्ट्रपतींना पाठिंबा देत असताना गौरवाने सांगितले होते. आमच्या राज्याच्या सुवर्ण महोत्सवाला आमच्या मराठी मातीतील माननीय राष्ट्रपती या ठिकाणी येणार आहेत या भावनेतून आम्ही सांगितले. पण ही भावना यांच्याकडे लोपलेली आहे. या वर्षी कसे स्वागत केले ? निवडणुका झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी 1 मे दिन शिवतीर्थावर साजरा झाला. तो कार्यक्रम मरगळलेला होता. कारण 30 तारखेला निवडणुका झाल्या आणि काही करता येत नव्हते, रिझर्वेशन होते. सर्व अधिकाऱ्यांनी केले होते. केवळ साजरा करावयाचा म्हणून 1 मे दिन साजरा झाला. त्यावेळी मी त्या ठिकाणी गेलेलो असताना हे सर्व बघून परत आलो. माझी त्या ठिकाणी बसण्याची हिंमत झाली नाही. प्रत्येक वेळी मी शिवतीर्थावरील कार्यक्रमाला हजर असतो परंतु यावेळी ते सर्व पाहून मी परत निघून आलो. कारण फक्त औपचारिकता म्हणून तो कार्यक्रम साजरा होत होता. मी आपल्याला दोष देत नाही. कारण मुंबईतील निवडणुका 30 तारखेला आटोपल्या आणि 1 तारखेला हा कार्यक्रम होता. महाराष्ट्रातील गरीब जनतेला पहिली भेट माननीय मंत्रिमहोदय श्री. तटकरे यांच्याकडून मिळाली. त्यांनी गौरवशाली महाराष्ट्राला काय दिले ? त्यांनी जाहीर केले की, दोन तास भारनियमन कमी करतो. ते असे म्हणाले की, 10 तास वीज देतो. ते बोलताना उलटे बोलले नाहीत. 16 तासांचे भारनियम होते आणि 8 तास वीज मिळत होती. ते असे म्हणाले की, आम्ही 10 तास वीज देऊ, 2 तास भारनियमन कमी करु. भारनियमनाची पहिली भेट आम्हाला माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. दिवाकर रावते .....

मंत्रिमहोदय श्री. तटकरे साहेबांनी दिली. कसे स्वागत झाले ? खेद का व्यक्त करतो ? तो खेद आपल्यालाही होणार आहे. 10 तास भारनियमनाची भेट आमच्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना देत असताना ही कौतुकाची भेट आहे काय ? 50 वर्षाच्या प्रगतिशील महाराष्ट्रामध्ये आम्ही भार नियमन रद्द करतो, एवढी वीज निर्माण केली आहे असे त्यांना सांगता आले नाही. अकोल्यामध्ये चपलांचा हार घालून एका दलित महिलेली धिंड काढण्यात आली. मला अत्यंत व्यथित अंत:करणाने सांगावयाचे आहे. भंडाऱ्यातील एका दलित महिलेची धिंड काढण्यात आली. त्याची सीडी आहे. जालन्यामध्ये दलित महिलेची धिंड काढली. त्या ठिकाणी सुध्दा मी जाऊन आलो. जयभीमचा नारा देऊन दलितांच्या मतावर सत्ता आल्यानंतर पन्नासाव्या वर्षी आम्हाला काय ऐकावयास मिळते ? काय पहावयास मिळते ? या महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे स्वागत एका दलित महिलेची धिंड काढून झाले. त्याकरिता आमच्या दलित बांधवांना निदर्शने करण्याची पाळी आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा असा सन्मान पाहिल्यानंतर का खेद व्यक्त करु नये असा प्रश्न निर्माण होतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, समृध्द व्हा आणि संघर्ष करा असा नारा दिला. सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे या सभागृहामध्ये आल्यानंतर चुकांसह आम्हाला आनंद होतो. मी त्यांच्याजवळ बसून त्यांच्या खांद्यावर हात ठेऊन सांगतो की, राम, असे करायचे नाही. आपण आमदार आहोत. आपल्या जबाबदाऱ्या आहेत. पण चुकांसह आम्ही दलितांना स्वीकारतो. कारण त्यांना गतिमान करण्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले जे स्वप्न होते, जे वचन होते त्या वचनाचे सगळे शिलेदार या ठिकाणी येतात. ते कोणत्या पक्षाचे आहेत याकडे आम्ही पाहात नाही. आदिवासी शाळेमध्ये 1 मे रोजी एका मुलीला बोलवून तिच्यावर बलात्कार झाला. ते प्रकरण आपल्या महाराष्ट्रामध्ये गाजले. ते आम्हाला ऐकावयास मिळाले. महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे स्वागत अशा पध्दतीने झाले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/ यापूर्वी श्री.बरवड 14:25

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, स्व.यशवंतराव चव्हाण यांनी केलेले पहिले भाषण माझ्याजवळ आहे. त्यात "जातीयतेला या महाराष्ट्रात थारा दिला जाणार नाही" अशाप्रकारचे वाक्य आहे. परंतु शासनाने काय निर्माण केले आहे ? या सभागृहाचे आदरणीय नेते, सन्माननीय उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्राची हद्द ओलांडून ओ.बी.सीं.ची संघटना बांधण्याचे ज्यांनी सामर्थ्य दाखविले ते श्री.छगन भुजबळ याठिकाणी बसलेले आहेत. सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असलेला महाराष्ट्र कोणत्या संघर्षावर आहे ? मराठा व ओ.बी.सीं.च्या आरक्षणासाठी गुडघे टेकून आपण काय बोललो ती वाक्ये परत गिळण्याची पाळी सर्व राजकारण्यांवर आली आहे. त्यांनी ही परिस्थिती निर्माण केलेली आहे. आपणच केलेली वांती पुन्हा गिळता येते हे जगात एकाच जीवाला शक्य आहे असे ज्ञानेश्वरीत लिहिलेले आहे. मी त्या ओव्यांचा येथे उल्लेख करणार नाही. कारण ते आदरणीय आहेत. पण ही गोष्ट केवळ श्वानच करु शकतो. आमच्या राजकारण्यांमुळे मराठा व ओ.बी.सीं.चा राज्यात संघर्ष निर्माण झाला आहे. कालपर्यंत आम्ही मुस्लीम समाजाचे शासन लाड करते असे आम्ही बोलत होतो. या राज्यात आरक्षण आले, अमूक आले, तमूक आले, हा विषय तर बाजूलाच पडला आणि नवीन विषय सुवर्ण महोत्सवाच्या वर्षात आमच्यासमोर आला आहे. मी मागील आठवडयामध्ये साता-याला गेलो होतो. त्यावेळी मी अनेक पुस्तके विकत घेऊन त्यावेळचा संपूर्ण संघर्ष वाचून काढला आहे. शाहू महाराजांच्या या महाराष्ट्रामध्ये आपण 50 व्या वर्षात कशात पदार्पण करीत आहोत ? तर आरक्षणाच्या संघर्षात आपण पदार्पण करीत आहोत. आसूड सावकाराचा, शेतक-याचा आसूड म्हणून ज्यांच्या नावाने या महाराष्ट्रात गौरवपूर्ण उद्‌गार काढले जातात, त्या महात्मा फुल्यांच्या या महाराष्ट्रात सुर्वण महोत्सवी वर्षात कशाने पदार्पण झाले तर सानंदा यांना सन्मानित करण्यासाठी व त्यांना वाचविण्याचे प्रयत्न केले म्हणून मुख्यमंत्र्यांना कोर्टाने फटकारले आणि सावकाराला वाचविले म्हणून 25 हजार रुपयांची दंडाची शिक्षा सरकारला झाली. मग महात्मा फुल्यांचा आत्मा काय म्हणत असेल ? कोठे गेला तो आसूड, हा प्रश्न निर्माण होतो. शाहू, फुले यांच्या महाराष्ट्रातील दुर्दशेची आणखी किती उदाहरणे देऊ. अशी भरपूर उदाहरणे आहेत. त्यासाठी माझ्याकडे अधिक वेळ नाही. एकेक उदाहरण मांडून तुमच्या कर्तृत्ववान शक्तीचे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/

श्री.दिवाकर रावते....

प्रदर्शन करता येईल. सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असताना राज्यपालांच्या अभिभाषणाचा ज्यावेळी मी लेखाजोखा करतो त्यावेळी माझ्या असे लक्षात येते की, शाहू, फुल्यांच्या या महाराष्ट्रात आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतल्यावर तुम्ही आम्हाला हिणवता. राष्ट्र पुरुष म्हणून ते तुम्हाला, आम्हाला सगळयांनाच वंदनीय, पूजनीय, आदरणीय आहेत. ते केवळ आम्हालाच वंदनीय आहेत अशातील भाग नाही. त्यांचे सुध्दा आता धिंडवडे निघत आहेत. प्रत्येक मराठी माणसाच्या मनामध्ये काहूर उठले आहे. कशाला ते स्मारक पाहिजे, नको ते शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रातील स्मारक. तुमच्या आमच्यासहित प्रत्येक मराठी माणसाच्या मनात हे काहूर उठले आहे. त्या विषयावर वेगळे बोलू. या संपूर्ण महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र निर्मितीचा विचार मांडत असताना माननीय स्व.यशवंतरावजी चव्हाण यांनी जे विचार मांडले त्याला काळिमा फासण्याचा विचार होतो त्यावेळी मनाला दुःख होते. स्व.यशवंतराव चव्हाण यांना भविष्याची किती जाणीव होती ते दिसून येते. त्यांची भाषणे वाचल्यानंतर मला खूप आनंद होतो. एवढा द्रष्टा नेता, हिंदुस्थानाला दिशा देण्याचे सामर्थ्य असलेले द्रष्टेपण आपल्याकडे होते. दुर्दैवाने तेथपर्यंत आपण ते नेऊ शकलो नाही. विदर्भ, मराठवाडा, कोकण व दुष्काळी भाग. म्हणजे पश्चिम महाराष्ट्रातील काही दुष्काळी तालुके त्यांच्या संकल्पनेत निश्चित असणार. ते पुढे असे म्हणतात की, "या भागाच्या विकासाकडे विशेष लक्ष पुरविण्यात येईल आणि महाराष्ट्र सरकार त्यांचे हितसंबंध डोळयात तेल घालून जपेल असे मी जे आश्वासन दिले होते त्याचा मी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या दिवशी पुनरुच्चार करतो." 50 व्या वर्षातील आजचे चित्र काय आहे तर विदर्भ, मराठवाडा हा अनुशेष भरुन काढण्यासाठी झगडा करीत आहे. कोकणाच्या वाटयाला काही येत नाही त्यासाठी त्यांची स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ नेमण्याची मागणी आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 13:50

(श्री. दिवाकर रावते....

हे महाराष्ट्राचे 50व्या सुवर्ण महोत्सवी वर्षातले वैभव. स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांना आणि त्यांनी दिलेल्या दिशेला तुम्ही काळिमा फासत असाल तर त्याबद्दल आम्ही खेद व्यक्त करायचा नाही तर काय करायचे ? त्यांनी आपल्या भाषणात "पहिल्या पंचवार्षिक योजनेचा भर ग्रामीण भागाची सुधारणा करण्यावर देण्यात आलेला आहे. ग्रामीण भागात नवे चैतन्य निर्माण करण्यास हे सरकार बांधील आहे. त्यादृष्टीने शेतीच्या उत्पादन पध्दतीचे आधुनिकीकरण करणे, ग्रामीण भागात विजेचा प्रसार करणे, छोट्या उद्योगधंद्याच्या वाढीस जोरदार चालना देणे या कार्यक्रमास अग्रक्रम देणे...."असे म्हटलेले आहे. परंतु माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर दृष्टीक्षेप टाकला तर कै. यशवंतराव चव्हाणांच्या विचारांना कोणत्याही प्रकारे स्पर्श केलेला नसल्याचे जाणवते म्हणून या ठिकाणी खेद व्यक्त करावासा वाटतो.

सभापती महोदय, मराठी भाषेच्या संदर्भात या सभागृहामध्ये 5 दिवस चर्चा झाली. मराठी भाषेच्या अंमलबजावणीच्या संदर्भात या सदनामध्ये जवळ जवळ दोन डझन सन्माननीय सदस्यांनी आक्रोश केला. त्यासंदर्भातील प्रस्ताव मी स्वत: मांडला होता. मी स्वत: दोन दिवस भाषण केले. परंतु त्याबाबतीत या सरकारने अद्याप काहीही केलेले नाही. रोज दूरदर्शन पाहिल्यानंतर मराठीच्या संदर्भात ठोस पावले उचलण्याची या सरकारची मानसिकताच नसल्याचे दिसून येते. त्यामुळे त्या खात्याच्या मंत्र्यांना त्या खुर्चीवर राहाण्याचा अधिकार नाही असे मला खेदाने म्हणावेसे वाटते. त्या चर्चेच्या वेळी माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या स्वत:च्या हस्ताक्षरातील चिठ्ठी मला पाठवली. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, आज विधानसभेमध्ये माझ्या 6 लक्षेवेधी तसेच इतर शासकीय आणि अशाकीय कामकाज आहे त्यामुळे मराठी "भाषेचा वापर" या विषयावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी मी माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री. वसंत पुरके साहेब यांना विनंती केली आहे. सभापती महोदय, ही चर्चा होऊन 3 वर्षे झाली. परंतु काहीही अंमलबजावणी झालेली दिसत नाही. आज सकाळी टी.व्ही. पाहिला तर एस.जी.पवार. एम.आर. शिंदे अशी नावे वाचावयास मिळाली. नावे मराठीमध्ये लिहिण्यासंबंधी शासनाने जी.आर. काढलेला आहे. तरीही त्याची अंमलबजावणी होत नाही. तेव्हा मराठीचा अवमान करणा-या आपणासारख्यांना पाहिल्यानंतर तुम्हाला राज्यावर बसण्याचा कोणताही अधिकार नाही असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. माझ्याकडे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

भत्त्यासंबंधीचा फॉर्म आहे. हा भत्त्याचा फॉर्म मराठीत द्यावा अशी मी 1 वर्षापासून सातत्याने आगणी करीत आहे. एक दिवस फॉर्म मराठीत दिला गेला. परंतु नंतर पुन्हा ये रे माझ्या मागल्या. पुन्हा इंग्रजीत फॉर्म देण्यात आले. सभापती महोदय, या विधिमंडळामध्ये देखील मराठीचा वापर होत नाही. 50 वर्षापूर्वी कै. यशवंतराव चव्हाण असे म्हणाले होते की, "राज्याचा राज्यकारभार इंग्रजी ऐवजी मराठीतून चालविणे कसे इष्ट आणि निकडीचे आहे याची सरकारला पूर्ण जाणीव आहे. हा बदल कारभारातील कार्यक्षकतेला बाधा येऊ ने देता करावयाचा आहे. या कार्यास चालना मिळावी म्हणून सरकार डायरेक्टोरेट ऑफ लॅन्वेजेस या नावाचे खाते ताबडतोब सुरु करीत आहे." असे असताना मराठी भाषेच्या वापरासंबंधी या राज्य सरकारला वारंवार सांगावे लागत आहे यासारखे दुसरे दुर्दैव कोणते ?

सभापती महोदय, श्री. बाबा सिद्दीकी यांना मंत्री मंडळामधून वगळून श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान यांना राज्यमंत्री केलेले आहे. मी त्यांचे अभिनंदन करतो. श्री. बाबा सिद्दीकी यांना हले-डुले बोलले जायचे. ते जेव्हा हिंदी बोलायला लागले त्यावेळी मी त्यांना मराठीमध्ये बोलण्यास सांगितले. त्यावेळी पीठासीन अधिका-यांनी हिंदीत बोलण्यास हरकत नाही असे सांगितले. त्यांनी हिंदी राष्ट्रभाषा आहे असे सांगितले. राष्ट्रभाषा हिंदी नाही. हिंदी ही राष्ट्रभाषा आहे असा आपण समज करुन का घेता हे मला कळत नाही. लोकसभेमध्ये दक्षिणेतील राज्यातील खासदारांनी, इतरांना समजो अथवा न समजो, त्यांच्या मातृभाषेतून शपथ घेतली आणि आमच्या महाराष्ट्रातील खासदारांनी हिंदीमध्ये शपथ घेतली.

...नंतर श्री. गिते...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री. शिगम 14:35

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, जे पंढरपुरला जातात, विठोबाच्या पाया पडतात, देवीच्या देवळात जातात, तेथे देवीच्या पाया पडतात. परंतु शपथ घेताना ईश्वरास स्मरुन घेत नाहीत. त्यांना ईश्वरास स्मरुन शपथ घेण्यास लाज वाटते. जनतेमध्ये सर्व धर्म समभावाची भावना असली पाहिजे, परंतु घरामध्ये पुजारी असला पाहिजे. ही ढोंगी वृत्ती देखील आम्ही काही लोकांमध्ये पाहतो आहोत. कै.यशवंतराव चव्हाण यांना मराठी भाषेचा मोठा अभिमान होता. ती भाषा महाराष्ट्रात रुजविण्याचा त्यांनी कसा कसा प्रयत्न केला आहे, त्यासंबंधीची माझ्याकडे भरपूर कागदपत्रे उपलब्ध आहेत. आपण या राज्यातील आमदार आहोत. कै.यशवंतराव चव्हाणांच्या राज्यात मातृभाषा मराठी असली पाहिजे. मराठी ही राजभाषा असली पाहिजे. मी मघाशी सन्माननीय नसीस खान यांचा उल्लेख का करीत होतो की, ते सभागृहात हिंदीत बोलत होते, त्यांचे कौतुक करण्यात आले. काल आय.बी.एन.लोकमत या दूरदर्शन वाहिनीवर सन्माननीय श्री. नसीम खान उपस्थित होते. या वाहिनीचे पत्रकार श्री.निखील वागळे हे त्यांना हिंदीत प्रश्न विचारावयास लागले. मला सन्माननीय श्री. नसीन खान यांच्याबद्दल अभिमान वाटला. त्यांनी प्रत्येक प्रश्नाचे उत्तर मराठी भाषेतून दिले. त्यांनी संपूर्ण चर्चा मराठीतून केली. या राज्याला शोभणारा मंत्री मला काल दिसला. श्री.निखील वागळे त्यांना हिंदीतून प्रश्न विचारत होते की, "आपकी क्या राय है". परंतु त्यांनी त्यांच्या प्रश्नाला मराठीतून उत्तर दिले. माननीय श्री. नवाब मलिक हे या सभागृहात नेहमी मराठी बोलत असतात. "मैं हिंदी में बोलूंगा" असे ते कधीच सभागृहात बोलले नाहीत. कारण त्यांच्या खात्याचा कामगारांशी संबंध आहे. या राज्याचे मराठीकरण होत नाही ही अत्यंत दुर्देवाची गोष्ट आहे. आजही वृत्तपत्रातील जाहिराती बघा. केंद्र शासनातील विविध विभागांच्या जाहिराती मराठीतून छापून येतात,रेल्वेच्या जाहिराती मराठीतून छापून येतात. परंतु या महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांच्या आणि नगरपालिका, महानगरपालिकांच्या जाहिराती मात्र इंग्रजी भाषेतून छापून येतात. माझ्याकडे ब-याच जाहिराती आहेत, त्या मी सोबत आणलेल्या आहेत. यासंदर्भात मी महाराष्ट्र शासनाच्या संबंधित खात्यास पत्र लिहितो. शासनाच्या विभागांकडून मला त्यासंबंधी पत्राची पोच देखील येत नाही. याबाबतीत काय करावयाचे यासंबंधी आम्हाला शासनाने मार्गदर्शन करावे. शासन व्यवहारात मराठीचा पूर्णपणे वापर व्हावा व त्याची कडकपणे अंमलबजावणी करण्यासंदर्भात सामान्य

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

प्रशासन विभागाच्या अधिका-यांना काही कडक सूचना देण्यात याव्यात. शासन व्यवहारात मराठी भाषेचा पूर्णपणे वापर होत नाही यासंबंधी अधिका-यांना जाब विचारला जाणार आहे किंवा नाही याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा. या राज्याचे मुख्य सचिव श्री. जॉनी जोसेफ यांना कशासाठी मुदतवाढ देण्यात आली? ज्या राज्यात मराठी भाषेची अंमलबजावणी होत नाही, त्या राज्याच्या मुख्य सचिवांना मुदतवाढ का दिली ? मी त्यांच्या कार्यकुशलतेवर बोलत नाही. माजी मुख्य सचिव श्री.डी.के.शंकरन यांना मुदतवाढ दिली होती की नाही याची मला माहिती नाही. श्री. शंकरन हे अतिशय हट्टी स्वभावाचे होते. मंत्रालयातील सर्व आय.एस.एस.अधिका-यांनी नावाच्या पाटया मराठी भाषेत लावाव्यात म्हणून त्यांच्या दालनासमोर आग्रह धरला होता. परंतु त्यांनी आय.ए.एस.अधिका-यांनी मराठीत पाटया लावू नयेत म्हणून लागलीच एक परिपत्रक काढले. ते परिपत्रक सर्व पत्रकारांना दिले. महाराष्ट्रात राहून आमचे मीठ खातात ना? आणि ती घाण सुध्दा महाराष्ट्राच्या संडासात होते ना. या महाराष्ट्राच्या मातीतून तुम्ही उगवता आहात आणि त्याच मातीत घाण करीत आहात आणि छाती वर काढून सांगता की, आम्ही असे करणार नाही. परंतु त्यांच्या बाबतीत एकही राज्यकर्ता असा म्हणाला नाही की, हे मराठी राज्य आहे. तुम्हाला नावाचे बोर्ड मराठीतूनच लावावे लागतील. या अधिका-यांचे अशा प्रकारचे म्हणणे ऐकल्यानंतर शरीराची आग होते. या बाबतीत शासनास काय सांगावयाचे ? या बाबतीत राज्यकर्त्यांना काहीही वाटत नाही. कै.यशवंतराव चव्हाणांच्या विचाराला हे शासन मातीत घालीत आहे. वास्तविक तुमच्याच पक्षाचे ते ज्येष्ठ नेते होते. मी या ठिकाणी कै.यशवंतराव चव्हाण यांचे विचार सांगतो आहे. कै.यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचा मंगल कलश शिवतिर्थावर आणला तेव्हा मी तेथे उपस्थित होतो. पूर्वी स्काऊट पॅव्हेलियनच्या येथे मंडप घालून तो कलश ठेवला होता. मी त्यावेळी खूप लहान होतो. तरी देखील मला त्यावेळचे सर्व प्रसंग आठवतात. काही गोष्टी असहय करणा-या गोष्टी होतात तसेच महाराष्ट्राच्या द्रष्टया अशा लोकांना काळीमा फासलो जातो, त्यावेळी खूप वाईट वाटते. याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे असे मला वाटते.

सभापती महोदय,माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कृषी क्षेत्राच्या विकासासंबंधीचा उल्लेख करण्यात आलेला आहे त्यावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. कृषी क्षेत्राला चालना देण्याकरिता केंद्रीय कर्ज सहाय्य योजना सुरु केली आहे. त्याचे काल या सभागृहात काही

3...



ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री. शिगम 14:35

श्री. दिवाकर रावते...

सन्माननीय सदस्यांकडून मोठया प्रमाणात कौतूक करण्यात आले. परंतु मी याबाबतीत असे म्हणतो की, "लबाडा घरचे आवतण नाहीच गेले हो " शेतक-यांपर्यंत कर्ज पोहोचलेले नाही. शेतक-यांना या योजनेतून कर्ज मिळालेले नाही. तुम्ही 20 हजार रुपये कधी देणार ? बाकीचे पैसे भरले तर तुम्ही कर्ज देणार ? या योजनेच्या माध्यमातून दिले जाणारे कर्ज शेतक-यांपर्यंत पोहोचत नाही अशी वस्तुस्थिती आहे. मी काल माननीय मुख्यमंत्र्यांना सहयांद्री अतिथी गृहावर भेटलो. त्या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ देखील उपस्थित होते. त्या ठिकाणी माननीय पणन मंत्री देखील उपस्थित होते. त्यांना सांगितले की, शेतकरी पीक सोसायटयांमधील सचिवांचा संप सुरु आहे. त्यामुळे शेतक-यांना कर्ज मिळण्यास अडचण निर्माण झाली आहे. म्हणून यासंदर्भात ताबडतोब कार्यवाही करा.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ 14:40

श्री.दिवाकर रावते..........

आम्ही सांगितले, जे काही करायचे ते करा, घरी पाठवा, उपाय करा परंतु निर्णय घ्या. मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, महाराष्ट्रातील शेतीचा दर हा शासनाच्या वार्षिक अहवालात म्हटल्याप्रमाणे 2007-08 मध्ये कृषि व संलग्न यामध्ये वृध्दी दर 3.8 टक्क्यापेक्षा कमी होऊन तो 2.6 टक्के इतका झाला आहे. कृषिप्रधान महाराष्ट्रामध्ये शेतकरी आत्महत्या का करतात? हा तुमचा दर खाली आला हे तुम्हीच वार्षिक अहवालात म्हटले आहे. मग राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त का करायचा नाही हा प्रश्न निर्माण होतो. सभागृहाचे नेते याठिकाणी उपस्थित आहेत. नम्रपणे मी त्यांना सांगणार आहे. तुमचा तो आवाका आहे. सांगा तुमच्या सरकारला. द्या राजीनामा. तुमची ती वट आहे. शासनाने राज्यात सावकारी पध्दतीचे नियमन करण्यासाठी निर्णय घेतला असे म्हटले आहे. सन्माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील याठिकाणी होते, त्यांनी उभे राहून सांगितले, आपण साक्षीदार आहात, पुढील अधिवेशनात सावकारी नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक आणू. आम्ही वाट पहात बसलो. अजून ते विधेयक सभागृहापुढे आलेले नाही. या अधिवेशनात येईल असे वाटत नाही. सावकारांना वाचविण्यासाठी सरकारला दंड भरण्याची पाळी आली. अभिभाषणात असे का लिहिता? आम्हाला खेद व्यक्त करावा लागतो. माननीय राज्यपालांच्या तोंडी असे भाषण देऊन त्यांच्या पदाला किती अवमानित करणार आहात? राज्यातील बहुतांश कापूस लागवडीच्या संदर्भात उल्लेख केला आहे. अध्यादेश काढण्यात आला आहे. विधेयक येईल त्यावेळी त्या विषयावर मी बोलणार आहे. तुम्ही नक्की काय केले हे सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहे. सिंचनाच्या बाबतीत अत्यंत गंभीर परिस्थिती आहे. अभिभाषणातील 24 ते 27 व्या परिच्छेदात सिंचन क्षेत्र कसे वाढविणार, कोणत्या सुविधा देणार याचा उल्लेख केलेला आहे. नेमकी परिस्थिती काय आहे? 1 मे, 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. 49 वर्षात महाराष्ट्राची सिंचन क्षमता 11 टक्क्यावरुन 17 टक्क्यापर्यंत वाढली पाहिजे होती. नव्हे ती 36 टक्क्यापर्यंत जायला पाहिजे होते. आज 50 वर्षानंतर ती 11 टक्क्यावरुन 36 टक्क्यापर्यंत जाणे अपेक्षित होते ते स्वप्नच राहिले आहे. शासनाच्या वार्षिक अहवालात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील पिकाखालील एकूण जमिनीपैकी 3 ते 4 टक्के जमीन ऊस लागवडीखाली आहे. विदर्भ, मराठवाड्यातील शेतकरी उद्ध्वस्त का झाले? पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागातील शेतकरी आणखी अडचणीत का येत आहेत याचे विश्लेषण

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

स्पष्टपणे या अहवालात केलेले आहे. महाराष्ट्रातील पिकाखालील एकूण जमिनीपैकी 3 ते 4 टक्के जमीन ऊस लागवडीखाली असून महाराष्ट्रातील सिंचनाच्या 7 टक्के एवढे पाणी फक्त ऊसासाठी म्हणजे 3 टक्के जमिनीसाठी 7 टक्के पाणी वापरले जात आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांना मात्र पाण्यासाठी टाचा घासाव्या लागत आहेत. स्व.यशवंतराव चव्हाणांच्या विचारांचे कधीतरी संकलन, आकलन, चिंतन, मनन करणार आहात का हा प्रश्न आहे. आतापर्यंत महाराष्ट्रात प्रभावी सिंचन क्षेत्र निर्माण करण्यासाठी राज्याला अग्रक्रम द्यावा लागला व त्यासाठी गुंतवणूक करावी लागली.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.हेमंत टकले)**

त्या संदर्भात आंध्रप्रदेशचे उदाहरण महत्वाचे आहे. त्या राज्याने 2009-10 च्या वार्षिक योजनेत 20 कोटी रुपये सिंचनासाठी प्रस्तावित केले. महाराष्ट्र राज्याची वार्षिक योजना 25 हजार कोटी रुपयांची आहे. शेजारचे राज्य सिंचनाला किती महत्व देते पहा. आमचा दीड टीएमसी पाण्याचा बंधारा नांदेड जिल्हयात कोपऱ्याच्या बाजूला बांधला, तेथे लाखो लोकांचा मोर्चा निघाला. जणू काही आंध्रप्रदेश कोरडा पडेल. महाराष्ट्र राज्य सिंचनासाठी निधी उपलब्ध करुन देत नाही ही वस्तुस्थिती आहे. दुधाच्या प्रकल्पाबाबतचा भ्रष्टाचाराचा मुद्दा सभागृहात आला होता.

....2एल.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

पण त्या दुधाच्या भ्रष्टाचारासंबंधीचे एवढे प्रकरण आहे की, ते केवळ लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून विषय काढला तरी पूर्ण होत नाही. यातील एक संचालक त्यांना अधिकार नसताना त्यांनी प्रत्येकी पाच-पाच, सहा-सहा लाख रुपये घेऊन 200-300 बल्या केल्या. एकदा ते माझ्याकडे आले आणि मला म्हणाले की, मला यवतमाळमधून विधानसभेचे तिकीट पाहिजे. आपल्याला किती पैसे पाहिजे ते सांगा. ते सोबत पैशांची बॅगच घेऊन फिरतात. बचत गटाचा एक विषय येथे मांडण्यात आला. परंतु आपण बचत गटाच्या बाबती कोणत्या पध्दतीने काम करतो हे मला माहीत नाही. राज्यातील साडेचार हाजर झुणका भाकर केंद्रासंबंधीची जी बैठक लावली होती त्यावेळेस मी म्हणालो होतो की, सध्या जे 450 झुणका भाकर केंद्रे अस्तित्वात आहेत ती केंद्रे बचत गटांना द्यावीत. त्यावर माननीय मंत्री महोदय म्हणाले की, ही चांगली कल्पना आहे तसे निदेश सभागृहात सुध्दा देण्यात आले होते. बेरोजगारीच्या संदर्भात विदर्भातील एक सन्माननीय सदस्य अतिशय सुंदर बोलले. डॉ. दीपक सावंत हे सुध्दा त्या विषयावर बोलले होते. राज्यातील 3.50 लाख बेरोजगारांच्या बाबतीत हा विषय होता. या सभागृहात बंद पडलेल्या कारखान्यातील कामगारांच्या सेटलमेंटसंबंधीचे विषय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून अनेक वेळा येतात. कारखान्याने जमीन विकली, त्याचे पैसे आले. आज राज्यात जवळपास 9500 आज ठाणे पट्टयात बेकार झाले, त्यांची नोंद आपल्याकडे आहे आणि वरुन रोजगार देण्याच्या गोष्टी हे शासन निवडणुकांच्या तोंडावर करीत आहे. कारखाने आणि बेरोजगारीच्या बाबतीत आपल्यापेक्षा गुजरातची परिस्थिती अत्यंत चांगली आहे. आपल्या राज्यात 17500 कारखाने आहेत तर तामिळनाडूमध्ये 20250, आंध्रप्रदेश आणि गुजरातमध्ये 14500 आणि 13 हजार असे उद्योग आहेत. तसेच त्यांचे स्थायी भांडवल हे देखील आपल्यापेक्षा जास्त आहे. भांडवल गुंतवणुकीसंबंधी विचार केलाअसता राज्यात 12400 कोटी आणि गुजरातमधील गुंतवणूक त्यापेक्षा जास्त किंवा सारखीच आहे. देशातील अग्रगण्य म्हणविल्या जाणाऱ्या महाराष्ट्रापेक्षा बाजूच्या प्रांतामध्ये गुंतवणूक जास्त आहे. आपल्या राज्यातील कारखान्यांमधील बेरोजगार 7.74 लाख हा आकडा सन 2003-04 मध्ये होता आता तो सर्वात जास्त म्हणजे 9 लाखावर गेला आहे म्हणजेच तामिळनाडूसारख्या छोटया राज्यापेक्षाही आपल्या राज्यात उद्योगातील बेकारी जास्त आहे. तरी देखील आपण आपलीच पाठ थोपटून घेत आहोत.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MAP/ KGS/

श्री. दिवाकर रावते .....

एम्प्लॉयमेंट नसलेले उद्योग जास्तीत जास्त आपल्याच राज्यात आहेत. एसईझेडचा विषय तर अत्यंत गंभीर आहे. शेतकरी उद्‌ध्वस्त करुन कारखाने आणावयाचे आहेत, असेच त्यावरुन दिसत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात नुकतेच एक प्रकरण घडले. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनी जो चमत्कार घडविला तो चमत्कार आम्हाला रस्त्यावर उतरुन घडवायला लावणार आहात काय याचेही स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. सभागृहात स्वतंत्र मुंबईचा विषय मी नेहमीच मांडतो. एसईझेड हा विषय शेतकऱ्यांना उद्‌ध्वस्त करणारा असेल तर आपल्याला राज्यकर्ते म्हणून राज्यावर ठेवावे की नाही याचाही विचार करावा लागणार आहे. अशा एसईझेडसाठी दुसऱ्या जमिनी आपल्याकडे नाहीत काय ? रायगडमध्ये सर्व बाजूची, संपूर्ण पट्टा फक्त एक गाव सोडून संपूर्ण जमीन एसईझेड साठी संपादित केली. जे गाव सोडले ते कोणते व का सोडण्यात आले हे सर्वांनाच माहीत आहे, ते मी सांगणार नाही. शिक्षणाच्या बाबतीत डॉ. दीपक सावंत म्हणाले ती एक गोष्ट फार महत्वाची आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, शिक्षणाच्या संदर्भात स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे बोल मला फार मोलाचे वाटतात. त्यांनी असे म्हटले आहे की, "शिक्षणाच्या बाबतीत माध्यमिक शिक्षणावर व्यावसायीक बाजुने विशेष भर देण्यात येईल. हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारे अडचणी येऊ नये शिष्यवृत्तीच्या मार्गाने सर्व प्रकारे सहाय्य करण्यात येईल." परंतु आता शिक्षण सम्राट तयार झाले आहे. तुमच्याजवळ पैसे असेल तरच तुम्हाला शिक्षण घेता येते, तुमच्या जवळ पैसे नसेल तर तुमच्या मुलांना शिक्षण घेता येत नाही ही सत्य परिस्थिती तुम्हाला, मला आणि सर्वांना माहीत आहे. शिक्षण आता फक्त श्रीमंत लोकांनाच घेता येते. शाहू-फुले यांच्या महाराष्ट्रात शिक्षणाच्या संदर्भात आता फार वेगळी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, देशातील सर्व राष्ट्रीकृत बँकानी आतापर्यंत 24 हजार कोटी रुपयांचे शैक्षणिक कर्ज दिलेले आहे. परंतु महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांच्या वाटयाला किती पैसे आले यासंदर्भात विविध बँकाच्या अधिका-याकडून माहिती घेतली तेव्हा मला समजले की, महाराष्ट्राच्या वाटयाला फक्त 1000 कोटी मिळाले. माझे चूक असेल तर माननीय मंत्रीमहोदयांनी माझे म्हणणे खोडून काढावे. 24 हजार कोटी रुपयांमधील 10 हजार कोटी रुपये महाराष्ट्राला मिळाले असते तर मला फार आनंद झाला असता. इतर प्रांतातील विद्यार्थ्यांना या कर्जाचा लाभ मोठया प्रमाणात झालेला आहे. महाराष्ट्रात परप्रांतीय येतात आणि नोक-या बळकावतात ही परिस्थिती महाराष्ट्राला भुषणावह आहे काय याचा विचार आपण करावा असे मला वाटते.

सभापती महोदय, आश्रमशाळेच्या संदर्भात अनुदानित माध्यमिक आश्रमशाळांमध्ये नवीन कनिष्ठ विद्यालय सुरु करण्याबद्दल माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात उल्लेख करण्यात आलेला आहे. या विषयाच्या संदर्भात सीबीआय चौकशी सुध्दा सुरु आहे. राज्यातील आश्रमशाळेची स्थिती खराब असल्याची कबूली राज्यशासनाने हायकोर्टात दिलेली आहे व हा कार्यक्रम कालबध्द करण्याबाबत हाय कोर्टाने शासनास नोटीस सुध्दा दिलेली आहे. आश्रम शाळेच्या संदर्भात अशी परिस्थिती असतांना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये तुम्ही ज्यावेळेला आम्हाला अभिवचन देता त्यावेळेला त्याची कीव किती करावी हा प्रश्न निर्माण होतो. कशाला आपण गरीबांची मस्करी करतात, अजून आपल्याला गरीबांना किती फसवायचे आहे?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये ग्रामीण इंदिरा आवास योजनेच्या संदर्भात उल्लेख आहे. यामध्ये म्हटले आहे की, इंदिरा आवास योजनेअंतर्गत 2 लाखाहून अधिक घरांचे बांधकाम करण्यात येणार आहे. इंदिरा आवास योजनेत महाराष्ट्र सरकार देशात "सी"ग्रेडला आहे असा रिमार्क्स केंद्रशासनाने दिलेला आहे. माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांच्या नांदेड मध्ये आणि माननीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांच्या पुणे जिल्हयातून आलेले अर्ज त्रुटी युक्त आढळून आलेले असल्यामुळे या जिल्हयांना इंदिरा आवास योजनेतील दुस-या टप्प्याचे अनुदान केंद्र सरकारने रोखलेले आहे. जर कर्तुत्ववान माणसांना आपल्या जिल्हयासाठी जे पैसे उपलब्ध झालेले आहेत ते जर वापरता येत नसतील तर इतर ठिकाणची काय अवस्था असेल याचा विचारच केलेला बरा. याच संदर्भामध्ये याच निधीमधून राज्यसरकारकडे सन 2008 च्या शेवट पर्यंत 69,521 घरकुले बांधणे अपेक्षित होते परंतु त्यापैकी केवळ 40 हजार घेरे बांधण्यात आली. यामुळे इंदिरा आवास योजनेच्या निधीमधून महाराष्ट्राने 60 टक्के निधी खर्च करावयास पाहिजे होता परंतु महाराष्ट्र शासनाने केवळ 41 टक्के निधी खर्च केलेला आहे त्यामुळे उत्तर प्रदेश, झारखंड, मध्यप्रदेश या राज्यांनी इंदिरा आवास योजनेत महाराष्ट्रापेक्षा आघाडी घेतली असल्यामुळे महाराष्ट्राला इंदिरा आवास योजनेत सगळया खालचा "सी" ग्रेड देण्यात आलेला आहे असे केंद्रसरकारने राज्य शासनाला कळविलेले आहे. तुम्हाला जे पैसे मिळाले त्यातून जर तुम्हाला घरे बांधता येत नाही असे असतांना माननीय राज्यपाल महोदय, दोन लाख घरे बांधण्याचा संकल्प करीत आहेत तो कसा काय पूर्ण होणार आहे याची माहिती या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे. जे तुमच्या हातामध्ये आहे ते जर तुम्हाला करता येत नसेल तर मी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर खेद का व्यक्त करु नये? जर अधिकारी महाराष्ट्रातील मोठया नेत्यांचे ऐकत नसेल तर बाकीच्यांची काय अवस्था असेल याचा विचारच केलेला बरा.

सभापती महोदय, मुंबईमध्ये एक निर्णय 33(7)33 (9) घेण्यात आलेला आहे. झोपड पट्टीय वासियांना अगोदर 180 चौरस फुटाचे घर मिळत होते नंतर त्यांना 225 करण्यात आले व आता ते 269 चौरस फुट करण्यात आलेले आहे. 269 चौरस फूट केल्यानंतर त्यांचा एफएसआय ताबडतोब वाढविला.

यानंतर श्री. गायकवाड...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ प्रथम श्री.जुन्नरे 14.55

श्री.दिवाकर रावते ....

अशा प्रकारे डेव्हलपमेन्ट करण्यासाठी एफ.एस.आय वाढवून देण्यात आला होता. त्या त्या झोपडपट्टीत राहणारे लोक कोण आहेत ? सान्माननीय सदस्य श्री मधुकर चव्हाण नेहमी त्यांच्या भाषणात सांगत असतात की , काल परवा जे मुंबईत आले ते झोपडपट्टीत राहू लागले आणि त्यांना पक्की घरे देण्यात आली होती. अर्थात मी त्यांचा व्देष करीत नाही. झोपडपट्टया नाहीशा व्हाव्यात म्हणूनच माननीय शिवसेना प्रमुखांनी शिवशाही प्रकल्प सुरु केला होता.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांचा एकदा पराभव कशामुळे झाला होता हे आपल्याला माहीत आहे काय ? ताडवाडीत राहणारे लोक 32 वर्षा पासून ट्रॅझिट कॅम्पमधून परत येतच नाहीत त्याच मुद्यावर श्री.बाळा नांदगावकर निवडून आले होते. ताडवाडीतील ज्या लोकांना ट्रॅझिट कॅम्पमध्ये हलविण्यात आले होते ते लोक 32 वर्षे परत आलेले नाहीत आणि श्री. छगन भुजबळ यांच्या सारख्या अंत्यत समर्थ नेत्यांना देखील या लोकांना ट्रॅझिट कॅम्पमधून परत आणता आले नाही अशा प्रकारे म्हाडाचे अत्यंत कर्तृत्ववान पध्दतीने काम चालले आहे. ही बाब मी त्यांच्या समोर मुद्दाम सांगत आहे. कारण मी सुध्दा त्यांच्या बरोबर होतो आणि त्यावेळी मी सर्व परिस्थिती पाहिलेली आहे. आता ते आमच्या पक्षात नसून राष्ट्रवादी पक्षात गेलेले आहेत आणि राष्ट्रवादी पक्ष जर राजकारणात आमचा शत्रू असेल तर ते सुध्दा आमचे शत्रूच आहेत. त्यांची दुर्दशा कशी झाली आहे हे मी सांगत आहे... अडथळा.. सभापती महोदय, त्याच्या बाबतीत बोलतांना मी मघाशी असेही सांगितले होते की, आरक्षणाचा मुद्दा त्यांनी मांडला होता. राज्याच्या सीमे बाहेर जाऊन त्यांनी हा मुद्दा गाजवला होता. या महाराष्ट्रातील मराठा आणि ओ.बी.सी. मधील आरक्षणाचा मुद्दा सुध्दा मी मघाशी मांडला होता. श्री.छगन भुजबळ हे सीमा प्रश्नासाठी सुध्दा लढले होते आणि सीमा प्रश्नासाठी लढणारे ते एकमेव शिलेदार आहेत. कर्नाटक राज्यातील पोलिसांच्या त्यांनी लाठया खाल्या होत्या तसेच ते जेलमध्ये गेले होते. या प्रश्नामध्ये त्यांचे मोठया प्रमाणावर योगदान होते. त्यांचे हे योगदान कधीही पुसले जाणार नाही. परंतु असे असले तरी ते जर आमच्या विरोधात उभे राहिले तर त्यांना पाडण्यासाठीच आम्ही शिकस्त करु, त्यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार नाही. अर्थात हा प्रत्येकाच्या तत्वाचा विषय आहे त्या विषयी मी जास्त काही बोलणार नाही परंतु या ठिकाणी बोलत असतांना मला एवढेच सांगावयाचे आहे की, मुंबईतील जुन्या चाळीचा विषय अत्यंत महत्वाचा आहे. 19 हजार जुन्या चाळीतील



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

इमारतीत राहणा-या रहिवाशांना 300 फुटाची घरे देण्यात येणार आहे परंतु आम्ही 400 ते 500 फुटाच्या घरांची मागणी केली होती . तेव्हा त्या प्रमाणे किमान 300 फुटाची तरी धरे त्या लोकांना दिली गेली पाहिजेत परंतु शासन त्यासाठी एफ.एस.आय. वाढवून देण्यास मात्र तयार नाही. तेव्हा त्यांच्या करता 3.33 इतका एफ.एस.आय.देण्यात आला पाहिजे. सुखटणकर समितीने केलेल्या शिफारशी प्रमाणे 180 स्केअर फुटाच्या घरा ऐवजी 225 स्केअर फुटाचे घर देण्यात आल्यानंतर हा एफ.एस.आय. 2.5 देण्यात आला होता परंतु आता 3.33 एफ.एस.आय. देण्याच्या बाबतीत शासन का निर्णय घेत नाही ? शासन पुढच्या निवडणुकीच्या आचारसहितेची वाट पहात आहे काय ?. माननीय उपमुख्यमंत्र्याना माझी अशी विनंती आहे की या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांना लवकर निर्णय घेण्यास सांगावे. एफ.एस.आय. वाढवून देण्याचा निर्णय अजूनही घेण्यात आलेला नसल्यामुळे पुढची सर्व प्रक्रिया थांबलेली आहे. आता लवकरच पावसाळा सुरु होणार असून काही चाळी धोकादायक अवस्थेत असल्याचे जाहीरसुध्दा करण्यात आलेले आहे. तेव्हा मुंबईतील जो मूळ रहिवाशी आहे त्यासंबंधीचा महत्वाचा मुद्दा मी या ठिकाणी मांडत आहे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा एक मुद्दा येथै मांडावयाचा आहे. राज्यातील वीज निर्मितीच्या बाबतीत मी जास्त बोलावे अशी स्थिती नाही. माननीय राज्यपालांनी परिच्छेद क्रमांक 67 मध्ये वीज निर्मिती करण्यासाठी 1 हजार 220 क्षमतेचे गॅस टर्बाइनचा उल्लेख केलेला आहे परंतु प्रत्यक्षात विजेच्या निर्मितीच्या बाबतीत फारशी प्रगती झालेली नाही त्यामुळे मी खेद व्यक्त करतो. माननीय उर्जामंत्री असे म्हणाले होते की, 8 तासा ऐवजी 10 तास वीज देईन. परंतु आजही आपल्याकडे पुरेशी वीज नाही म्हणून त्या बाबतीत मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 77 वर काही महत्वाच्या मार्गाचे चौपदरीकरण करण्याच्या संदर्भात उल्लेख् केलेला आहे . हा रोड डेव्हलपेन्टचा कार्यक्रम आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांच्याकडे बांधकाम खाते आहे आणि बांधकाम विभागातील (सार्वजनिक उपक्रम खाते) पूर्वी श्री.देशमुख याच्याकडे होते ते आता डॉ.विमल मुंदडा यांच्याकडे देण्यात अलेले आहे. एका खात्यात हमाली आणि मजुरी आहे आणि दुस-या खात्यात मात्र तिजोरी आहे .रस्ते दुरुस्त करण्याकरता माझ्याकडे पैसेच नाहीत त्युामुळे रस्त्याची दुरुस्ती मी कशी करु असे मागे त्यांनीच सभागृहात सागितले होते.माननीय शिवसेना



VTG/ प्रथम श्री.जुन्नरे 14.55

श्री.दिवाकर रावते ....

प्रमुखांनी मुंबई पुणे रस्त्याचे काम व्हावे असे सांगितल्यानंतर ते काम करण्यात आले याचा मला अभिमान वाटतो. आदरणीय श्री.शरद पवार यांना त्या घाटाच्या रस्त्यातून तीन किलोमिटर अंतर चालत जावे लागले होते त्यामुळे या सभागृहात माननीय मंत्री महोदय असे म्हणाले होते की,2 वर्षात या रस्त्याचा चौपदरी मार्ग करण्यात येईल आणि माझ्या नेत्याची गाडी या रस्त्यावरुनच प्रथम जाईल परंतु त्या रस्त्याच्या कामासाठी पुरेसे पैसे दिले जात नाहीत. पैसे देण्याकरता अनेक अडचणी येतात. हा रस्ता 60 ते 70 टक्के पूर्ण झालेला आहे परंतु अजूनही थोडे काम राहिलेले आहे मी ज्यावेळी या रस्त्यावरुन जातो त्यावेळी मला नेहमीच या गोष्टीची आठवण येते . हे काम आपण केले नाही याबद्दल मी तुमच्यावर टीका करीत नाही . एक समर्थ मंत्री ज्यावेळी आपल्या नेत्यासाठी जेव्हा असे बोलतो तेव्हा त्याने या कामासाठी अत्यत सामर्थ्याने रस्ता बनविण्याच्या कामाला लागले पाहिजे. परंतु ते कामाला लागले नाहीत तेव्हा त्याची कारणे काय आहेत हे आपण शोधून काढावीत . आपआपसात कितीही राजकारण असले तरी विकासाच्या कामामध्ये राजकारण करता कामा नये अशा पकारे विकासाच्या कामात मी कधीही राजकारण करीत नाही.

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/MAP/SBT. श्री. गायकवाड नंतर --- 15:00

श्री. रावते ....

माननीय मंत्री महोदय समोर बसले आहेत, एक उदाहरण म्हणून मी त्यांच्याबाबत सांगितले. आजपर्यंत माननीय श्री.शरद पवारांची गाडी त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे नाही नेता आली. त्यात आता वरळी सी-लिंक पुलाचा मुद्दा आला. या सागरी पुलाची काय बाब आहे ? आम्ही जेव्हा राज्यकर्ते होतो त्यावेळेस हा सागरी पूल व्हावा म्हणून प्रक्रिया सुरू केली. त्याचे भूमिपूजन केले. त्याचे बजेट काढले. त्यावेळी तो 362 कोटीचा होता आणि 2004 मध्ये तो पूर्ण होणार होता. पण वाढत वाढत आता त्याची किंमत 1,634 कोटी रूपये इतकी झाली आहे आणि अजूनही तो पूर्ण झालेला नाही, तो पूर्ण होतो आहे. अशाच प्रकारे सिंचनाचेही अनेक प्रकल्प आहेत, ते एवढे वाढतात की मग या राज्यावर कर्ज होणार नाही तर आणखी काय होणार ? हा प्रश्न निर्माण होतो. म्हणून याबद्दल खेद व्यक्त करीत असताना आम्ही आमची प्रगती कोठे तरी थांबली आहे हाही विषय येथे येतो. पण त्याबद्दल देखील या अभिभाषणात काही उल्लेख नाही. हा एक अत्यंत वेदनादायी विषय मी येथे मांडला आहे. हे असे का होत आहे हे मला समजत नाही. हे आपले कोण अधिकारी आहेत ? त्यांनी स्वत:ची सगळी सोय केलेली आहे, आपल्या मुला-बाळांची सोय केलेली आहे. या सगळ्या अधिकाऱ्यांची मुले परदेशात शिकताहेत, गडगंज पगार आहे. त्यात आता सहाव्या वेतन आयोगाने पगार वाढवून घेतले आहेत. तुम्ही तेथे त्या पदावर बसला आहात त्याबद्दल जरूर आनंद आहे. पण कष्ट करणाऱ्यांना जेव्हा तुम्ही रोकता तेव्हा त्याचे दु:ख होते. येथे मी म्हाडाच्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेदन देण्याचा प्रश्न उपस्थित करीत आहे. म्हाडाचे हे कर्मचारी वयाने 82-83 वर्षांचे आज आहेत. त्यांच्या बाबतीत निवृत्ती वेतनाचा निर्णय झाला. जेव्हा आमचे युतीचे सरकार होते त्यावेळी गृहनिर्माण मंत्री म्हणून श्री.सुरेशदादा जैन हे होते. त्यांनी या सभागृहात सांगितले की, या बाबतीतील सर्व प्रक्रिया जवळपास पूर्ण झालेल्या आहेत, आमचा निर्णयही झालेला आहे केवळ आता त्या निर्णयास मंत्रिमंडळाची संमती घेतो आणि तुम्हाला निवृत्तीवेतन लागू करून देतो. त्यानंतर आमचे सरकार गेले. कॉंग्रेसचे सरकार आले. त्यावेळेपासून हे म्हाडाचे कर्मचारी म्हातारे, वयोवृद्ध झालेले आहेत, त्यातील कित्येक कायमचे निघून गेले. पण त्याचे निवृत्तीवेतन लागू करण्याचे काम काही झाले नाही. मी त्याबद्दल माननीय मंत्री महोदयांना एक अत्यंत हृदयद्रावक असे पत्र लिहिले की, किमान आता तरी म्हाडाच्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन लागू करण्यास मान्यता द्यावी. आज ते म्हाडाचे कर्मचारी म्हातारे झाले आहेत, ते आपल्या मृत्यूला

.... ओओ 2 ..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

सामोरे जाताना किमान समाधान तरी लाभू द्यात की, आता मला पेन्शन मिळाले आहे, आता मी गेल्यानंतर माझ्या बायकोलाही पेन्शन मिळेल. पण अजूनही काहीही याबाबत झाले नाही. तुमचे अधिकारी याही बाबतीत झारीतील शुक्राचार्यासारखे बसले आहेत. अजूनही या गोष्टीस मान्यता देत नाहीत. त्यावर माझी अनेक पत्रे झाली. खालच्या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री.कथोरे आश्वासन समितीचे समिती प्रमुख आहेत. त्यांना देखील मी याबाबत लिहिले होते. ते देखील आनंदाने तेव्हा मला भेटायला आले म्हणाले की, साहेब तुमचे पत्र वाचले आणि आम्ही सगळ्या सभासदांनी एकमुखी निर्णय घेतला आहे. या विषयी आम्ही विभागीय सचिवांची साक्ष घेतली आहे आणि त्या सगळ्या वयोवृद्धांना, वडीलधाऱ्यांना पेन्शन देण्याचा निर्णय झाला आहे. यातही महत्त्वाची गोष्ट कोणती असेल तर हे पेन्शन कोण देणार आहे ? तर म्हाडा देणार आहे. म्हाडा त्यासाठी पैसे देणार आहे. सरकारच्या तिजोरीवर त्याचा काहीही भार पडणार नाही. पण तरीही आपले अधिकारी काड्या घालत बसतात. अशा अधिकाऱ्यांबद्दल अतिशय संताप येतो आणि कधी तरी असे वाटते की त्यांना ओणवे करून मारावे. कशासाठी हे असे करतात ? 80-90 वर्षे वयाचे म्हाडाचे हे कर्मचारी संख्येने केवळ दोन-अडीचशेच आता उरले असतील, तेही आता मरून जातील, संपतील. सभापती महोदय, मी या निमित्ताने आपल्या माध्यमातून पुन्हा मंत्री महोदयांना विनंती करतो की, माननीय श्री.भुजबळ साहेब, म्हाडाच्या या कर्मचाऱ्यांच्या पेन्शनच्या प्रश्नाबाबत आपण तातडीने निर्णय घ्या, सरकारला हा निर्णय घेण्यास भाग पाडा. इतका हा विषय करूणादायी आणि हृदयद्रावक आहे. हे होत नाही म्हणून मला या ठिकाणी खेद व्यक्त करावा लागतो आहे.

सभापती महोदय, जाता जाता मी दोन चार गोष्टी सांगणार आहे की, ज्या दुर्दैवी आहेत, खेदजनक आहेत. महाराष्ट्र टाईम्समध्ये राज्याला पन्नास वर्षे झाल्यानिमित्ताने पन्नाशीवरील अग्रलेख आलेला आहे. त्या अग्रलेखात जे काही लिहिले आहे त्यातून आपण आत्मचिंतन करावे असे मला वाटते. त्यात टीकाही जरूर आहे, पण ती लक्षात घेऊन आपण आत्मचिंतन करावे. त्यात म्हटले आहे की, "महाराष्ट्र दिन व कामगार दिन हा एकाच दिवशी म्हणजे 1 मे रोजी येतो, हा एक योगायोग नाही. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे अध्वर्यु कॉ.डांगे, एस.एम.जोशी, आचार्य अत्रे, दत्ता देशमुख, उद्धव पाटील, सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे आणि असे अनेक लोकाभिमुख नेते जे समाजातील ज्या वर्गाचे नेतृत्त्व करीत होते तो वर्ग होता कामगारांचा, मध्यमवर्गीयांचा.

..... ओओ 3 ..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

म्हणून कामगार, शेतकरी, कर्मचारी, मध्यमवर्गीय यांचा हा 1 मे दिन आहे. ...." सभापती महोदय, हा अग्रलेख मी संपूर्ण वाचत नाही. पण हा अग्रलेख संपविता संपविताना त्यांनी म्हटले आहे की, "...पवार हे महाराष्ट्राचे एकमेव द्रष्टे नेते म्हणून संबोधायची उच्चभ्रूंमध्ये प्रथा आहे. परंतु गेल्या तीस वर्षात त्यांच्या समांतर नेतृत्त्वाच्या द्रष्ट्या काळातच महाराष्ट्राची सर्वाधिक ऱ्हास झाली आहे. .." अध्यक्ष महाराज, ही जी नोंद करण्यात आलेली आहे ती महत्त्वाची आहे आणि या नोंदीचा आपण अंतर्मुख होऊन विचार करणार का ? हा प्रश्न मी येथे उपस्थित करीत असताना मनी नाही भाव, देवा मला पाव अशा प्रकारचा अशोकराव इतिहास चाळा, म्हणून 'सामना'ने या संदर्भात "महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा" हा अग्रलेख लिहिला. त्यात मुंबईतील गिरणी कामगारांच्या बलिदानाचा उल्लेख केलेला आहे. या अग्रलेखामध्ये म्हटले आहे की, "या गिरणी कामगारांच्या बाबतीत मुंबईतील सर्व आमदारांच्या भावना एकच आहेत, मग ते कोठल्याही पक्षाचे असोत. म्हणून 105 हुतात्मे झाले आणि त्यांच्यामुळेच मुंबई महाराष्ट्राला मिळाली हे तर खरेच. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... पीपी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

हा गिरणी कामगार सुध्दा बेरोजगारी व भुकेने शहीद झाला. मुंबईतल्या गिरण्या बंद झाल्या, मालकांच्या जमिनी गेल्या. त्या जमिनीवर बिल्डर्सनी मॉल, टॉवर उभे केले. आणि श्रमिक गिरणी कामगार मात्र देशोधडीला लागला. आता या हुतात्म्यांचे एखादे थडके मंत्रालयाच्या दरवाजात बांधा. त्याला रोज श्रध्दांजली वाहून लूटमारीचे उद्योग सुरु करा. अशाप्रकारच्या भावना आदरणीय शिवसेना प्रमुखांनी या महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी दिनाच्या निमित्ताने दै. सामनामधून व्यक्त केल्या आहेत. याठिकाणी महाराष्ट्राच्या विकासाचे आकडे आणखी वाचून दाखववावेत अशातला भाग नाही. परंतु एमईटीसी तर्फे सात मागास जिल्हयांतील रिर्सोसेसचा अभ्यास करण्यात आला. त्यानुसार आजही महाराष्ट्राच्या 50 व्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये उस्मानाबाद, हिंगोली, वाशिम, चंद्रपूर,गडचिरोली,परभणी आणि धुळे या जिल्हयांमध्ये मानव विकास निर्देशांक सर्वात कमी आहे, अशाप्रकारची नोंद झाली आहे. या प्रगतीशील 50 वर्षामध्ये आम्ही काय निर्माण केले? साक्षरतेमध्ये आपण केरळच्याही मागे आहोत. सभापती महोदय, हे सर्व सांगत असतांना मला खेदाने म्हणावेसे वाटते की, या 50 वर्षामध्ये पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यासारखे राज्यकर्ते कां निर्माण झाले नाहीत? त्या काळातील डॉ. राजेंद्र प्रसाद, वल्लभभाई पटेल यांची नावे घेतली की कसे वाटते? कै. यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे उत्तुंग नेतृत्व लाभलेल्या व्यक्तीचे नाव घेतले की, आपले ऊर भरुन येते. या महान नेत्यांचे नाव घेतांना आपली छाती धडकते. आपले राज्यकर्ते अशाप्रकारची उत्तुंगता कां निर्माण करु शकले नाहीत? हे मला समजू शकले नाही. राज्यामध्ये खूप चांगले नेते झाले आहेत परंतु मी राज्यकर्त्याबद्दल बोलत आहे. बाबा आमटेंसारखे समाज कार्यकर्ते खूप चांगले झाले आहेत. पुण्याच्या सिंधुताई सकपाळ यांचे नाव आदराने घ्यावे अशी खूप नेतेमंडळी आहेत. अशाप्रकारची समाजामध्ये काम करणारी उत्तुंग व्यक्तिमत्वे आहेत. परंतु ज्यांचे नाव आदराने घ्यावे असे राज्यकर्ते कां निर्माण होत नाहीत? माझ्या निर्णय प्रक्रियेमध्ये, माझ्या निष्ठेमध्ये काहीतरी कमतरता असेल तर माझ्यावर चांगले संस्कार करणारे राज्यकर्ते निर्माण व्हावेत असे आपण कां म्हणत नाही? सभापती महोदय, या सभागृहाचे माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांच्यावर कारवाई कां केली नाही? असे ज्यावेळी कोर्ट सरकारला विचारते. त्यावेळी ते माझ्या सभागृहाचे एक सदस्य आहेत. त्यांना अटक कां केली नाही? असे ज्यावेळी कोर्ट विचारते त्यावेळी माझ्या राज्याच्या विधानपरिषदेमध्ये मी कुणाबरोबर बसत आहे, अशाप्रकारचा प्रश्न माझ्या मनात निर्माण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

श्री. दिवाकर रावते...

होतो. सभापती महोदय, राज्य शासनावर न्यायालयाने कशाबद्दल ताशेरे मारले आहेत? भ्रष्टाचाराबद्दल असतील तर ते मी याठिकाणी सांगणार आहे. महाराष्ट्राच्या 50 व्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये आपण सर्वांनी अंतर्मुख होऊन याबाबत विचार करावयास पाहिजे. या अभिभाषणाला सन्मानित करण्यासाठी उभे राहण्यापूर्वी आपण याचा विचार करा. राज्यातील वाढत्या कुपोषणाबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारवर ताशेरे ओढले. आणि एक आठवडयात कुपोषण नियंत्रित करण्याबाबत कोणती पावले उचलणार आहात असे विचारले. शेवटच्या झोपडीतील माणसाकरिता आपण काय करीत आहोत हे राज्य शासनाला कोर्टाला सांगावे लागले. एवढी आपली जागरुकता असेल तर या 50 वर्षात आपण काय केले? सभापती महोदय, माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी सत्तेचा दुरुपयोग केला असे उच्च न्यायालयाने ताशेरे मारले. आमच्यासमोर येऊन उत्तर देणारे आमच्या महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री यांनी सत्तेचा दुरुपयोग करुन सानंदाला मदत केली. सावकारावर गुन्हा दाखल करण्याच्या प्रयत्नात त्यांनी पोलिसांची बदली केली. अशाप्रकारचे गेल्या 50 वर्षातील राज्यकर्ते आम्ही पहात आहोत. ज्यावेळी माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्यावर उच्च न्यायालयाने ताशेरे मारले त्यावेळी माजी महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनाही उच्च न्यायालयाची नोटीस आली. त्यांनी महसूल मंत्री पदाचा गैरवापर केला. त्याचप्रमाणे सहाराच्या जमिनीबाबत हायकोर्टाने दिलेल्या निर्देशानुसार श्री. नारायण राणे यांनी चुकीचे प्रतिज्ञापत्र केल्याचे मान्य केले. अशाप्रकारे या राज्याचा एक मंत्री उच्च न्यायालयामध्ये जाऊन उच्च न्यायालयाची सन्मानितता करतो त्यावेळी आम्हीही या महाराष्ट्र राज्याच्या 50 व्या वर्षात पदार्पण करीत आहोत. सभापती महोदय, एखादा माणूस किती चिंगट असावा? माननीय श्री. भुजबळ साहेब असते तर असे झाले नसते. श्री. अनामी रॉय यांना काढा असे संपूर्ण पोलीस खात्यामध्ये सांगितले जात आहे. काल मला श्री. सुराडकर यांचे शब्द आठवले.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे. . . . 15:10

श्री.दिवाकर रावते . . . .

सभापती महोदय, श्री.अनामी रॉय यांच्यासंदर्भात मागणी केली जात आहे की, त्यांना काढून टाकावे आणि तशी चर्चा संपूर्ण पोलीस विभागामध्ये आहे. काल टी.व्ही.वर आयबीएन चॅनेलवरील श्री.सुराडकर यांचे शब्द आठवले. ते म्हणाले की, आम्ही अधिकारी होतो, तेव्हा आमच्याकरता छातीचा कोट करणारे पोलीस होते. ते असे म्हणावयाचे की, साहेब, तुम्हाला काही इजा होण्याऐवजी अगोदर आम्हाला इजा व्हावी. आम्ही आमच्या नेत्याच्या पुढे जाऊन म्हणतो की, प्रथम आम्ही लाठी अंगावर घेऊ. पण श्री.सुराडकर असे म्हणाले की, आता पोलीस पुढे जातच नाहीत, तर "अधिकाऱ्याला मरु दे" असेच म्हणतात. श्री.अनामी रॉय यांना काढून टाकण्यात यावे अशी मागणी केली जात आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला 50 वर्षे पूर्ण होत असताना येथील आय. जी. यांना काढून टाकावे असे कोर्टाला सांगावे लागते, पण आमच्या निर्ढावलेल्या राज्यकर्त्यांना हे करावेसे वाटत नाही अशी स्थिती आहे.

सभापती महोदय, आमचे माननीय शिक्षण मंत्री हे पर्सेन्टाईलच्या बाबतीत अडचणीमध्ये आले. तसेच टी.व्ही.वर पहाण्यासारखा एक गमतीदार भाग असतो आणि तो म्हणजे या महाराष्ट्र राज्यामध्ये परीक्षा सुरु झाल्या की मग कॉपी करण्यासाठी कशी स्पर्धा चालते, ते आम्ही टी.व्ही. पहात असतो. हे शिक्षण मंत्र्यांच्या कारकिर्दीमध्ये सुरु आहे आणि पर्सेन्टाईलच्या बाबतीत सांगावयाचे तर मुंबई उच्च न्यायालयाने राज्याच्या शिक्षण विभागाला जी मार्गदर्शक तत्वे घालून दिली आहेत, ती शिक्षण विभागाने धुडकावल्याचे स्पष्ट झाले आहे, म्हणजे हे शासन कोर्टाला देखील मानत नाही. "हम करे सो कायदा, मी म्हणेन तेच".असा प्रकार सुरु आहे.

सभापती महोदय, वरळी चाळीच्या पुनर्बांधणीसाठी जी 1500 कोटी रुपयांची योजना करण्यात आली होती, ती हाय कोर्टाने रद्द केली. तेथील भूखंड गिळंकृत करण्याचा प्रयत्न कोणी केलेला आहे, ते पहावे. तेव्हा या राज्याच्या स्थापनेला 50 वर्ष झाल्याबद्दल येथील गरीबांना घरे देण्याऐवजी भूखंड गिळंकृत करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच एम.आय.डी.सी.चे भूखंड कवडी मोलाने विकण्याचे काम झाले आणि यासाठी माननीय श्री.विलासराव देशमुख, माननीय श्री.जयंतराव पाटील, माननीय डॉ.पतंगराव कदम, माननीय श्री.माणिकराव ठाकरे, श्री.डी.वाय.पाटील, श्री. प्रतापराव पवार यांना हाय कोर्टाने नोटीस दिली आहे. तसेच श्री.हिरानंदानी यांना 2000 कोटी रुपयांचा दंड करण्यात आला म्हणजे शासनाला यांनी चुना लावलेला आहे. त्यावेळी जे बिल

. . . .2 क्यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

आणले होते, तेव्हा मी सभागृहामध्ये एकटा बोलण्यासाठी उभा राहिलो होतो, या बिलाच्या विरोधासाठी उभा राहिलो होतो. कारण मला त्या बिलाच्या संदर्भात काही सांगावयाचे होते, माझे असे म्हणणे होते की, शासनाने यु.एल.सी.कायदा रद्द करु नये. पण तसे झाले नाही. येथे माननीय मुख्यमंत्री आले. आज याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार उपस्थित नाहीत. पण माननीय मुख्यमंत्र्यांनी उभे राहून सांगितले, ठीक आहे. तुम्ही बहुमताच्या जोरावर सगळे काही केले. हे सर्व करीत असताना, दुसरीकडे महाराष्ट्र कर्जाच्या खाईत बुडलेला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील उद्ध्वस्त झालेले जिल्हे पाण्यासाठी तुमच्याकडे "आ" वासून पहात आहेत. परंतु अजून कृष्णा खोऱ्याचे काम पूर्ण झालेले नाही. शेवटी मी अत्यंत खेदाने एक गोष्ट सांगू इच्छितो आणि आमच्यासाठी ती दुर्दैवाची बाब आहे. मी या महाराष्ट्रामध्ये का जन्माला आलो ? असा प्रश्न जर माझ्यासमोर निर्माण होणार असेल, अशी परिस्थिती असेल तर माझी मुले-बाळे, त्यांच्या पुढची पिढी ही महाराष्ट्रामध्ये उद्ध्वस्त होणार असेल, तर मी हे सगळे सहन का करावयाचे ? असा प्रश्न निर्माण होणार आहे. याठिकाणी सरकारने एक ध्येयवादी घोषणा केली. माननीय मंत्री श्री.जयंतराव पाटील यांनी सांगितले की, आता महाराष्ट्रात एम.एम.आर.डी.ए.अलिबागपर्यंत खर्च करणार आहे. त्याचे क्षेत्र वाढविणार. पण यातून स्वतंत्रपणे मुंबई निर्माण करण्याचा डाव करण्यात येत आहे असे वाटते. या देशामध्ये एक आर्थिक राज्य निर्माण करावयाचे आहे, जेथे शेती नसेल, काही नसेल. ठाणे आणि रायगडपर्यंतचा सगळा पट्टा हा सी.आर.झेड.मध्ये आहे. अगदी अंबानीने देखील जागा घेतलेली आहे, सर्वांनी जागा घेतलेली आहे. हे सर्व करीत असताना, आता तुम्ही काय निर्माण करणार आहात ? मी आज सकाळी टी.व्ही.वर पहात होतो आणि मला ते पाहिल्यावर दु:ख झाले. तसेच ते तुम्हाला-आम्हाला, महाराष्ट्रातील सर्वांनाच व्हावयास पाहिजे. आमचे श्री.रत्नाकर गायकवाड टी.व्ही. वर सांगत होते की, 50 लाख घरे बांधण्यात येणार आहेत आणि ती 800 रुपये भाडयाने देणार. परंतु हे त्यांचे काम आहे काय ? हे एम.एम.आर.डी.ए.चे काम आहे काय ? मुंबई स्वतंत्र करण्याचे हे कारस्थान आहे. तसेच ही घरे कोणाला देणार ? महाराष्ट्रामध्ये कोणीही, कुठूनही यावे. मग तुमची ऐपत, तुम्हाला 5000 किंवा त्याच्यावर कितीही पगार असला तरी 800 रुपये भाडयाने ही घरे देणार.परंतु अशा प्रकारे तुम्ही मुंबई लिलावामध्ये काढावयास निघाला आहात काय? मुंबई विकावयास काढली आहे काय ?असा प्रश्न निर्माण होतो.

. . . .2 क्यु-3



APR/ SBT/ MMP/ 15:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

एवढया प्रमाणात घरे उपलब्ध करुन देत असताना त्यांना पाणी उपलब्ध करुन द्यावयाचे आहे, जल नि:सारणाची सोय उपलब्ध करुन द्यावयाची आहे, रस्ते, वीज उपलब्ध करुन द्यावयाची आहे, शिक्षणाची सोय उपलब्ध करुन द्यावयाची आहे, हॉस्पिटलची सोय उपलब्ध करुन द्यावयाची आहे इ.कितीतरी गोष्टी आहेत. पण याबाबतीत विचार न करता, केवळ घोषणा करुन मोकळे झालेले आहेत. त्यानुसार 800 रुपये भाडे भरा. मग महाराष्ट्रामध्ये कोणीही यावे आणि रहावे. अशा प्रकारे हा महाराष्ट्र खुला करुन जर आमच्या मुला-बाळांचे भविष्य उद्‌ध्वस्त करणार असाल तर मी आज सभागृहामध्ये सांगू इच्छितो की, माझ्या मागे कोणी या किंवा नका येऊ. पण एकदा डोके फिरल्यानंतर श्री.रत्नाकर गायकवाड यांच्यासहित सर्वांना खूर्चीवरुन खेचल्याशिवाय रहाणार नाही एवढी उद्विग्नता निर्माण करणारी कामे तुम्ही करीत आहात. म्हाडाने कोणती अट घातली आहे ? तर मुंबईमध्ये रहाणाऱ्यांनी अर्ज करावयाचे नाहीत. मुंबईमध्ये रहाणाऱ्या लोकांनी दुसरे घर घ्यावयाचे नाही. जर मला चार मुले असतील, तर मी त्या मुलांसाठी घर घ्यावयाचे नाही काय ? अशी अट आहे की, जर तुमच्याकडे मुंबईमध्ये घर असेल तर तुम्हाला दुसरे घर मिळणार नाही. मुंबईमध्ये घर का मिळणार नाही ? कशासाठी मिळणार नाही ? ही मुंबई कोणाची आहे ? 105 हुतात्मे देऊन निर्माण झालेली ही मुंबई आमची आहे, ही आमची मुंबई आहे. मुंबई कोणत्याही येऱ्या-गबाळयाची नाही. मुंबईमध्ये कोणी यावयाचे आणि कोणी यावयाचे नाही हे सांगणारे तुम्ही कोण आहात? मुंबईमध्ये घर असताना, येथे दुसरे घर घ्यावयाचे नाही. मुंबईमध्ये घरांच्या बाबतीत लॉटरी काढत असताना, त्यामध्ये आम्ही सहभागी व्हावयाचे नाही. हा फार दुर्दैवी भाग आहे. कसले सरकार चालवित आहात ? कोणत्या धोरणानुसार चालवित आहात ?

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ SBT/ प्रथम सौ. रणदिवे..... 15:15

श्री. दिवाकर रावते ......

या महाराष्ट्राच्या भूमिपुत्राला निवडणुकीत खेळवण्यापेक्षाही त्याला निवडणुकीत सक्षम केले, त्याला महाष्ट्राची अस्मिता जोपासण्यासाठी सक्षम केले तर आम्ही या शासनाला मुजरा केल्या शिवाय रहाणार नाही. पण हे होणार नाही. सभापती महोदय, 50 लाख घरे बांधण्याचे काम शासनाने थांबावे. ही घरे बांधण्यात येणारच असतील तर एम.एम.आर.डी.ए.चे हे काम नाही. ते म्हाडाचे काम आहे. म्हाडाला निधी देऊन म्हाडाला ती घरे बांधू द्यावीत. आणि ही घरे महाराष्ट्रातील माणसाला मिळाली पाहिजेत. परप्रांतीयांना ही घरे मिळता कामा नये, अशा प्रकारचा दंडक करण्यात यावा. या सभागृहात परप्रांतीयांचे लोंढे थांबविण्यासाठी कायदा करण्याचे शासनाने सुतोवाच केले होते. त्या कायद्याचे काय झाले हे या ठिकाणी सांगण्यात यावे. सभापती महोदय, या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये या महाराष्ट्राचे अगदी मातेरे करण्यात आलेले आहे. पोतेरे करण्यात आलेले आहे, असे दृष्य ज्यावेळी मला पहावयास मिळते त्यावेळी मी अत्यंत व्यथित अंत:करणाने खेद व्यक्त करीत असतांना, भविष्यामध्ये तुम्ही का आम्ही, कोण राज्यकर्ता असावा हा या ठिकाणच्या चर्चेचा विषय नाही. महाराष्ट्राला वैभवशाली आणि दृष्टी देणारा राज्यकर्ता असावा मग ते शिवसेना प्रमुखांच्या विचारांचे असतील, कै. यशवंतराव चव्हाणांच्या विचारांचे असतील कै. यशवंतरावांच्या विचाराला सुध्दा येथे थारा मिळाला नाही. म्हणून मी दुर्दैवाने अत्यंत खेदजनक असे भाष्य थांबवत असताना पुन्हा एकदा कळकळीचे अवाहन करतो की, महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले, मराठाविना राष्ट्र गाडा न चाले, खरा वीर वैरी पराधीनतेचा महाराष्ट्र आधार या भारताचा, असे मर्द मराठी मनगट पुन्हा तुम्ही जोपासनार काय? हा प्रश्न विचारुन मी माझे भाषण पूर्ण् करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

---

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी याठिकाणी चांगले विचार मांडलेले आहेत. परंतु रेकॉर्डवर तसेच राहू नये म्हणून मी याठिकाणी उल्लेख करु इच्छितो की, सन्मानी सदस्य श्री. रावते या ठिकाणी बोलत असताना "हिंदी ही राष्ट्रभाषा नाही" असे दोन वेळा त्यांच्या तोंडातून शब्द आलेले आहेत.

श्री. दिवाकर रावते : हिंदी ही राष्ट्रभाषा नाही.

..2..



SMT/ MMP/ SBT/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : हिंदी ही संपर्काची भाषा आहे असे लिहिलेले आहे.

श्री. छगन भुजबळ :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे भाषण रेकॉर्डवर येईल त्यावेळी त्यांच्या भावना त्यामध्ये नसतात. हिंदी राष्ट्रभाषा नाही असे म्हणणे बरोबर होणार नाही.

श्री. दिवाकर रावते : विमानतळावर सुध्दा "हिंदी राष्ट्रभाषा होनी चाहिए" असे फलक लावलेले आहेत. त्यामुळे हिंदी ही राष्ट्रभाषा नाही. तुम्ही हिंदीचे विशारद आहात तेव्हा तुम्हाला याबाबतची माहिती आहे.

....3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या भाषणाची सुरुवातच दि.26 जुलैच्या दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख करुन झालेली आहे. सभापती महोदय, काल दिवसभर या सभागृहाचे कामकाज प्रधान समितीच्या अहवालावर झालेले आहे. प्रधान समितीने आपल्या अहवालात सर्व अधिकाऱ्यांना आणि पोलीस यंत्रणेला निर्दोष ठरविले आहे. त्याबद्दल मला या ठिकाणी खेद व्यक्त करावासा वाटातो. दि.26-11-2008 चा जो हल्ला झाला त्याबाबतीत मी मागील अधिवेशनात देखील बोललो होतो. हा दि.26-11-2008 च्या हल्ल्याच्या एक तास आधी मी स्वत हॉटेल ओबेरॉयमध्ये होतो. त्यानंतर गेट-वे ला होतो आणि गेट-वे वरुन मी स्पीड बोटने गेलो. सभापती महोदय, त्या हल्याच्यावेळी पोलीस यंत्रणा निष्क्रीय होती. पोलिसांकडे कुठलेही नियोजन नव्हते. पोलिसांनी सुरक्षिततेची कुठलीही दक्षता घेतलेली नव्हती. असे असताना प्रधान समितीने आपल्या अहवाल पोलीस यंत्रणा निर्दोष आहे असे म्हटलेले आहे. सभापती महोदय, सभागृहात गदारोळ झाल्यामुळे मला बोलण्याची संधी मिळाली नाही. मी या ठिकाणी निश्चितपणे सांगने की, प्रधान समितीने जो अहवाल सादर केला आहे तो अहवाल पहिल्यांदा या सभागृहासमोर यावयास पाहिजे होता. तो अहवाल देतांना त्याठिकाणी मिडियाला कोणी बोलावले? मिडियासमोर हा अहवाल सादर केल्यानंतर त्या अहवालात काय आहे हे आम्ही वर्तमानपत्रात वाचले. त्या समितीचे अध्यक्ष श्री. राम प्रधान हे आमच्या रायगड जिल्हयातीलच आहेत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

त्यांनी त्यांच्या शासकीय कारकिर्दीमध्ये चांगल्या प्रकारे काम केलेले आहे. परंतु ज्या पध्दतीने ते आले, ज्या पध्दतीने त्यांनी मांडणी केली, ज्या पध्दतीने ते बोलले, ज्या पदतीने ते गांधी जॅकेट घालून आले त्यामुळे राज्यसभेच्या पोटनिवडणुकीची ही तयारी आहे काय अशी शंका वाटावयास लागली. पुढे राज्यसभेच्या निवडणुका होतील आणि म्हणून त्या निमित्ताने धांदलीत हा अहवाल सादर केला का ? यापूर्वी ते बऱ्याचदा भेटले पण अशा वेषात मी त्यांना पाहिले नव्हते. काल या ठिकाणी चर्चा झाली. त्यांनी सगळ्यांना निर्दोष सोडले. गेल्या सहा महिन्यामध्ये 740 किलोमीटर सागरी किनारपट्टीमध्ये एकाही पोलीस स्टेशनची स्थापना शासकीय यंत्रणेकडून झालेली नाही. या 740 किलोमीटरमध्ये एकही सुरक्षेची सोय झाली नाही. एकही हत्यार खरेदी केलेले नाही. एकही स्पीड बोट राज्य शासनाने खरेदी केलेली नाही. राज्य शासनाकडे कोणतीही यंत्रणा नाही. राज्य शासन याबाबतीत गंभीर नाही. यादृष्टीकोनातून माननीय राज्यपालांच्या या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करावासा वाटतो. राज्य शासन याबाबतत अपुरे पडलेले आहे. राज्य शासन याकडे गांभीर्याने लक्ष देत नाही. श्री. राम प्रधान यांच्या अहवालावर या ठिकाणी चर्चा होणार आहे. माननीय सभापती महोदयांनी त्या पध्दतीचे आश्वासन दिलेले आहे. त्या चर्चेच्या वेळी त्याबाबतीत बोलता येईल. परंतु या सहा महिन्याच्या कालावधीमध्ये राज्य शासनाने कोणती प्रभावी यंत्रणा उभारलेली आहे, कोणती शस्त्रे खरेदी केलेली आहेत, कोणत्या आधुनिक बोटी खरेदी केलेल्या आहेत याचा साधा उल्लेख सुध्दा या अभिभाषणामध्ये आलेला नाही. जर त्या ठिकाणी पोलिसांकडे हत्यारे नसतील, आधुनिक यंत्रणा स्थापन केलेली नसेल तर पोलीस आपले संरक्षण करु शकणार नाही. यादृष्टीकोनातून या बाबतीत यामध्ये उल्लेख असण्याची आवश्यकता होती. तो उल्लेख यामध्ये नाही. त्यादृष्टीकोनातून माननीय राज्यपालांच्या या अभिभाषणाच्या निमित्ताने मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, शासनाने सन 2008-09 मध्ये सागरी जिल्ह्यातील मच्छिमारांना कोकण विकास पॅकेज दिले. त्यामध्ये 32 कोटी 56 लाख रुपयांचे पॅकेज वितरित करण्यात आले. मत्स्याचा दुष्काळा होता. मत्स्याचे उत्पन्न कमी झालेले आहे. पर्यावरण बिघडल्यामुळे समुद्र किनाऱ्यावरील मासे आता दूर पळत चालले आहेत. छोट्या माशांची मर झाल्यामुळे मच्छिमारांवर संकट आलेले

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

आहे. कोकणामध्ये जे प्रकल्प आलेले आहेत आणि विशेषत: रायगड जिल्ह्यात जे प्रकल्प आलेले आहेत त्या प्रकल्पांचे जे बांधकाम चालू आहे, जे सर्वेक्षण चालू आहे त्यामुळे मच्छिमांराची परंपरागत असलेली जाळी, मुंडे, त्यांची असलेली साधने सर्वेक्षण करताना नष्ट होत आहे. आम्ही अनेक वेळा जिल्हाधिकाऱ्यांना भेटलो, माननीय मंत्रिमहोदयांना भेटलो तसेच माननीय पालकमंत्र्यांना भेटलो आणि सांगितले की, याबाबतीत नुकसानभरपाई दिली गेली पाहिजे. समुद्र किनाऱ्यावर गॅस प्रकल्पाची लाईन टाकण्याचे काम चालू आहे. त्या ठिकाणी रिलायन्स, ओएनजीसी इत्यादी कंपन्यांकडून तेल उत्पादन करुन ते किनाऱ्यावर आणण्याच्या बाबतीत सर्वेक्षण चालू आहे. जमिनीमध्ये भूकंप होऊ शकतात काय याचे सर्वेक्षण चालू आहे. केवळ रायगड जिल्ह्यामध्ये 3 कोटी रुपयांचे नुकसान या निमित्ताने झालेले आहे. मी याकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. कोकण पॅकेजमध्ये याचा समावेश झाला पाहिजे. परवा मी पनवेल तालुक्यातील गव्हाण या गावी गेलो. समोर जेएनपीटीचा 10 हजार कोटी रुपयांचा प्रकल्प आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/ यापूर्वी श्री.बरवड 15:25

श्री.जयंत प्र.पाटील....

मी गव्हाणला गेलो, न्हावा गावाला गेलो, त्यांच्या पारंपरिक असलेल्या बोटी, पारंपरिक पध्दतीने मासेमारी करण्याची साधने जे.एन.पी.टी.आणि त्यांचे अधिकारी नष्ट करु इच्छितात. त्या गावांमध्ये 700-800 बोटी आहेत. मला ते मच्छिमार भेटल्यावर मी त्यांना म्हटले की, मी या विषयाची दखल घेतो. केंद्र सरकारचा हा जे.एन.पी.टी.प्रकल्प आहे. त्यामुळे राज्य सरकारचे अधिकारी आम्ही तेथे लक्ष देऊ शकणार नाही असे म्हणतात. मग हे चॅनल कोणाचे आहे, हा समुद्र कोणाचा आहे, त्याच्यावर हक्क कोणाचा आहे ? समुद्रात पारंपरिक मासेमारी करणारे कोळी बांधव आज त्यांच्या धंद्यापासून वंचित होत आहेत. या प्रश्नाकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. जे.एन.पी.टी.द्वारे होणाऱ्या अन्यायामुळे पारंपरिक मासेमारीचा व्यवसाय नष्ट होत आहे. त्यांच्या धंद्याला कोणत्याही परिस्थितीत संरक्षण मिळाले पाहिजे. खास बाब म्हणून त्यांच्या धंद्यासाठी आधुनिक साधने व जेट्टी बांधून देण्याची व्यवस्था झाली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे मूळ गाव अलिबाग हे आहे. त्यामुळे ते कोकणाविषयी बोलले. कोकणामध्ये विशेषत: आमच्या जिल्हयामध्ये सेझचा प्रकल्प होत आहे. रायगड जिल्हयामध्ये सिडकोचा प्रकल्प आला होता. सिडकोने 12.5 टक्के जमीन प्रकल्पग्रस्तांना परत देण्याचा निर्णय घेतला आहे. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख हे उरणमध्ये आले असताना त्यांनी जोरात भाषण करुन 12.5 टक्के जमिनीचा प्रश्न 12.5 दिवसात सोडवितो असे बोलल्याबरोबर आम्ही सर्वांनी टाळया वाजविल्या होत्या. त्यावेळी सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे सुध्दा व्यासपीठावर उपस्थित होत्या. आजही तो प्रश्न तसाच प्रलंबित आहे. तेथील शेतकरी हतबल झालेला आहे. रायगड जिल्हयामध्ये प्रकल्पासाठी गेलेली जमीन प्रकल्पग्रस्तांना परत करण्याचे त्यांनी दिलेले आश्वासन सरकारने आजही पाळलेले नाही. उलट हजारो एकर जमीन नवीन प्रकल्पांसाठी घेतली जात आहे. रायगड जिल्हयातील जमीन प्रकल्पासाठी घ्यायची की नाही यासाठी तेथील शेतक-यांनी मतदान केलेले आहे. पोलिसांचा असा अहवाल आहे की, 99 टक्के लोकांचा या प्रकल्पांना विरोध आहे. परंतु अद्याप त्या मतदानाचा निकाल जाहीर केलेला नाही. जोपर्यंत शासनाने दिलेली दोन

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.जयंत प्र.पाटील....

आश्वासने पूर्ण होत नाहीत तोपर्यंत रायगड जिल्हयामध्ये नवीन प्रकल्प होता कामा नये अशी तेथील शेतक-यांची भूमिका आहे. राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात सेझचा उल्लेख केलेला आहे त्याबद्दल मला खेद व्यक्त करावासा वाटतो. यापूर्वी आलेल्या प्रकल्पांमुळे राज्य शासनाने जनतेची व शेतक-यांची फसवणूक केलेली आहे. त्या प्रकल्पग्रस्तांना भरपाई मिळत नाही तोपर्यंत नवीन प्रकल्प तेथे होऊ नयेत अशी आमची भूमिका आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते बोलले ते खरे आहे. एमएमआरडीएने आमचा संपूर्ण जिल्हा खाऊन टाकला आहे. अनेक भांडवलदार तेथे येतात, स्थानिक शेतक-यांना 2-4 कोटी रुपये देतात आणि तेथील जमिनी गिळंकृत करीत आहेत. त्यामुळे आमच्या भागाची मुंबई होणार आहे. आम्ही तेथे नगण्य होणार आहोत. या संस्थेने तेथे काही नियोजन केलेले नाही.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.सुरेश जेथलिया )**

यानंतर श्री.गिते....

अशुध्दारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.शिगम 15:30

श्री. जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, मी गेल्या आठवडयामध्ये चौथ्यांदा चीन येथे गेलो. माननीय उप मुख्यमंत्री देखील चीनमध्ये अनेक वेळा गेलेले आहेत. चीनमध्ये नवीन प्रकल्प येतो, त्यावेळी प्रकल्पग्रस्तांसाठी नवीन शहर वसविताना प्रकल्पाच्या जवळील 150 कि.मी.पर्यंतची सगळी गावे प्रथम उठविली जातात. प्रथम त्या गावांमधील प्रकल्पबाधीत लोकांचे पुर्नवसन केले जाते. पुर्नवसीत गावांमध्ये सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. सर्व सुविधा करुन दिल्यानंतर नवीन शहरांमध्ये प्रकल्पबाधीत लोकांचे पुर्नवसन केले जाते. अशा पध्दतीने तेथे प्लॅनींग केले जाते. परंतु राज्य शासनाच्या प्लॅनींग डिपार्टमेंटकडून फक्त फाईली जाणीवपूर्वक डांबून ठेवल्या जातात. त्या विभागातील अधिका-यांच्या हातावर वजन ठेवल्या शिवाय एकही फाईल क्लिअर होत नाही ही वस्तुस्थिती आहे. चीन देशात प्रकल्प तयार करण्यासाठी जसे प्लॅनींग केले जाते, तशा प्रकारचे प्लॅनींग या राज्यात नवीन प्रकल्पांसाठी शासनाने तयार केले पाहिजेत. माननीय मंत्री महोदय श्री. नवाब मलिक साहेब तुम्ही मुंबई शहरात राहतात. आमच्या जिल्हयातील दुर्गम भागात येऊन बघा. तेथील लोक कसे जीवन जगत आहेत ते बघा. तेथील अडचणी बघा. त्या गावांमध्ये ड्रेनेजची सोय नाही. खाली गावे आहेत, आणि वरच्या बाजुला तीन मिटरचा भराव टाकले आहेत. उरण तालुक्यातील 12 गावे अशी आहेत की, ती गावे खालच्या बाजुला आहेत आणि वरच्या बाजुला चार मिटरचा भराव आहे. त्या गावातील लोकांना पिण्याचे पाणी नाही, ड्रेनेजची व्यवस्था नाही अशी वाईट परिस्थिती त्या ठिकाणची आहे. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे हे त्या विभागात कधी कधी जातात, त्यांना देखील या गावांची पूर्णपणे माहिती आहे. या ठिकाणी विकासाची कामे केली जातील अशा प्रकारची शासनाकडून वेळोवेळी आश्वासने दिली जातात, परंतु प्रत्यक्षात कोणतेही आश्वासन शासनाकडून पाळले जात नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सीमा भागाचा प्रश्नासंबंधीचा उल्लेख केला आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी सीमा प्रश्नाच्या बाबतीत पूर्वी अनेक लढे दिले आहेत. मी देखील अनेक वेळा या लढयांमध्ये सामील झालो आहे. या प्रश्नाच्या बाबतीत अनेक वेळा तुरुंगात गेलो आहे. बेळगाव,कारवार,निपाणी सह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे त्या लढयात भाग घेतला आहे. मी वयाच्या आठव्या वर्षापासून या लढयात सामील झालेलो आहे. माननीय श्री. छगन भुजबळ हे पूर्वी शिवसेना पक्षाचे एकमेव आमदार होते. ते या लढयासाठी

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील....

बेळगावला गेले. त्यांना तेथे येण्यास बंदी घातली. तरी देखील त्यांनी बेळगाव शहरात गुप्तपणे प्रवेश केला. माननीय उप मुख्यमंत्री यांना सीमा प्रश्नासंबंधीची पूर्णपणे माहिती आहे. म्हणून माझी त्यांना विनंती आहे की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात सीमा भागाचा प्रश्नासंबंधीचा परिच्छेद दिलेला आहे तो वगळून टाकावा. गेल्या 50 वर्षापासून सीमा भागातील लोक महाराष्ट्रात येण्यासाठी मोठया आशेने बघता आहेत. गेल्या तीन वर्षाच्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या प्रती मी सोबत आणलेल्या आहे. प्रत्येक अभिभाषणामध्ये हा परिच्छेद टाकण्यात आलेला आहे. मी गेल्या सात वर्षापासून या सभागृहाचा सदस्य आहे. गेल्या तीन वर्षाच्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेदामध्ये एकही अक्षर बदलण्यात आलेले नाही. पूर्वीचा जो परिच्छेद होता तसाच परिच्छेद प्रत्येक वर्षी अभिभाषणात नमूद करण्यात आलेला आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण तयार करणारे अधिकारी एकही वाक्य न बदलता जसाचा तसा परिच्छेद टाकून चेष्टा करीत आहे असे माझे म्हणणे आहे. सीमा प्रश्नाच्या बाबतीत गेल्या सात वर्षात तरी राज्य शासनाने काहीही प्रगती केलेली नाही असे मला दिसून आले आहे. म्हणून माझी विनंती आहे की, शासनाने या प्रश्नाकडे अतिशय गंभीरपणे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सिंचनाच्या बाबतीत अनेक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. कोकणातील पाणी समुद्रात सोडले जात आहे. चिपळूण व त्या परिसरातील संपूर्ण पाणी कोयना धरणात जाते. चिपळून ते मुंबईचे अंतर 275 कि.मी.एवढे आहे. सिंचनासाठी कोकणात विशेषत: रायगड जिल्हयात धरणे बांधली आहेत. त्या धरणातील संपूर्ण पाणी मुंबई आणि नवी मुंबईसाठी आणले गेले आहे. आमच्या जिल्हयात सिंचनासाठी मोरबा धरण बांधले आहे....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील......

सिंचनासाठी संपूर्ण तालुका ओलिताखाली आणतो म्हणून सांगितले. तीन वर्षांनी ते धरण नवी मुंबई महापालिकेला 200 कोटी रुपयांना विकले. ज्याच्यासाठी आम्ही लढलो. हेटवणे, पेण, रायगडमध्ये लढलो, दीड लाख लोकांचा मोर्चा निवडणुकीपूर्वी काढला, लोक रस्त्यावर आले, त्या हेटवणे धरणातील पाणी शेतीसाठी मिळाले पाहिजे म्हणून सरकारला जाब विचारला होता. त्या धरणातील 25 टक्के पाणी सिडकोला देण्यात आले. सिंचनासाठी राज्याने बजेटमधून तरतूद करुन खर्च केला व शेतकऱ्यांच्या शेतीसाठी पाण्याचा साठा केला ते पाणी उद्योगासाठी व नवी मुंबई आणि मुंबई शहरासाठी दिले जाते. कोकणातील समुद्रात जाणारे पाणी पाईपलाईन टाकून चिपळूणहून मुंबईत आणा. एक कि.मी.साठी तीन कोटी रुपये खर्च येणार आहे. 700 ते 800 कोटी रुपये खर्चून हे पाणी मुंबईत येऊ शकते असे मला वाटते. एमआयडीसीची पाईपलाईन महाडपर्यंत आलेले आहे. चिपळूणमध्ये बोगदा काढला तर संपूर्ण पाणी खाली येईल आणि कोकणातील सिंचनाचा प्रश्न संपुष्टात येऊ शकेल अशी स्थिती आहे. कृष्णा खोरे प्रकल्पामध्ये जेवढा पैसा आतापर्यंत खर्च केला त्यापेक्षा 10 टक्के खर्च कोकणासाठी केला तर कोकण सुजलाम सुफलाम होऊ शकतो. याचा उल्लेख निश्चितपणे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नाही त्याबद्दल खेद व्यक्त करुन मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करण्यासाठी आणि माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे संपूर्ण अभिभाषण वाचले तर प्रत्येक वाक्यागणिक एक एक व्रण आपल्यावर उमटल्याशिवाय राहणार नाही. राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे शासनाचा आरसा, चेहरा असे म्हटले जाते. या संपूर्ण अभिभाषणामध्ये शासन पुढे काय करणार आहे हेही सांगितले जाते. आशेचा किरण दिसायला लागतो. म्हणून प्रत्यक्ष अभिभाषण वाचले तर हे 50 वे वर्ष आहे, या सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असताना निदान मागच्या ज्या चुका झाल्या त्या आज होऊ नयेत अशी अपेक्षा होती. 1957 साली राजभाषा अभियोग अहवाल आला त्यापूर्वी भाषावार प्रांतरचना कोणी करावी, कशी करावी यावर लोकमान्य टिळक यांनी कॉंग्रेसच्या अधिवेशनामध्ये विषय मांडला होता. त्यांनी असे सांगितले की, ब्रिटिश इंग्रजांच्या काळात केरळपासून सिंध प्रांतापर्यंत आपला देश विविध भाषांचा आहे. त्यामुळे भाषावार प्रांतरचना करण्याची गरज आहे. लोकमान्य टिळक वेळेवर त्या अधिवेशनामध्ये पोहोचू शकत नव्हते. तो विषय मांडण्यात आला. त्याला महात्मा गांधींनी स्वत: विरोध केला होता. टिळक कॉंग्रेसच्या अधिवेशनात पोहोचले, तेव्हा त्यांनी विचारले, काय झाले? तेव्हा सांगण्यात आले की, असा असा विषयाला विरोध झाला. दस्तुरखुद्द महात्मा गांधींनी स्वत: विरोध केला. तेव्हा लोकमान्य टिळकांनी खुलासा केला आणि त्याच अधिवेशनात भाषावार प्रांतरचना मान्य केली गेली. 1917 सालच्या कॉंग्रेस अधिवेशनातील ही गोष्ट आहे. जेव्हा हा विषय उपस्थित झाला, त्यानंतर मग घटनेमध्ये विषय आला. 1957 साली भाषावार प्रांतरचनेबाबत राज्य आयोग अहवाल आला.

...2डब्ल्यू.1....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .......

एवढे करुन सुध्दा आम्हाला द्विभाषिक राज्य मिळत असेल तर मग आमची लढाई संयुक्त महाराष्ट्रासाठी सुरु झाली. त्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समिती निर्माण झाली, त्यासाठी संघर्ष सुध्दा झाला. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी बोलताना प्रकाश अत्रे, प्रबोधनकार ठाकरे अशा थोर नेत्यांचा उल्लेख केला. अशा थोर नेत्यांच्या आंदोलनातूनन शेवटी 1 मे, 1960 रोजी आपल्याला महाराष्ट्र राज्य मिळाले. तरी सुध्दा भाषिक प्रांतरचनेमध्ये विदर्भ हा मध्यप्रदेशातून नागपूरसह आपल्याकडे आला. पण कर्नाटकातील बेळगांव, कारवार, निपाणीसह सर्व मराठी भाग अजुनही तिकडेच आहे, हे दु:ख आजही घेऊन आम्ही उभे आहोत. 50 वर्षे होऊन गेली तरी देखील आमचे बांधव आजही तसेच अडकून आहेत. आता तर कर्नाटकाने बेळगावला उपराजधानीचा दर्जा दिला, तेथील महानगरपालिकेवरील भगवा काढावयाचा, मराठी पाट्या काढावयाच्या. या मराठी पाट्यांसाठी आम्हाला या राज्यात आंदोलने करावी लागतात ही आमची अस्मिता, त्या अस्मितेचा मात्र माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून कुठेही उल्लेख नाही, त्यांना त्याचे दु:ख नाही, काही सोयरसुतक सुध्दा नाही. मला आजही आठवते की, माननीय राज्यपाल नव्याने आले त्यावेळे पहिल्या अधिवेशनात आमच्या अधिवेशनाची सुरुवातच जी "वन्दे मातरम्" ने होते तशी ती झाली नव्हती तर ती "जन गण मन" ने झाली, हे देखील आपणास विसरता येणार नाही. म्हणजे तुमच्या पोटामध्ये महाराष्ट्राबद्दल किती आकस आहे हेच यावरुन समजते. दाखवायला फक्त सर्वधर्मसमभाव सांगतो आणि "वन्दे मातरम्" म्हणण्याचाही तुम्हाला त्रास होतो, त्यांचेच हे भाषण आहे. या वेदना घेऊन आम्ही ज्यावेळी बोलता याचा विचार होणे आवश्यक वाटत नाही काय ? या अभिभाषणात जे दोन उल्लेख करण्यात आले त्यातील पहिला उल्लेख आपल्या पोलिसांच्या संदर्भात आहे. 26 नोव्हेंबरच्या घटनेच्या संदर्भात आहे. 26 नोव्हेंबर बाबत मी जास्त बोलणार नाही कारण अनेक सन्माननीय सदस्यांनी तो विषय काढलाच आहे. माझा एकच प्रश्न आहे तो म्हणजेच शहीद हेमंत करकरे यांच्या पत्नीच्या वेदना, शहीद शिंदे यांच्या पत्नीच्या वेदना आपण जरा समजून घ्याव्यात. शहीद जवानांना अशोक चक्र देताना सुध्दा त्यांना डावलण्याचे दु:ख शिंदे यांच्या पत्नीला झाले. तसेच या जवानांचे पुनर्वसन करण्याचे शासनाने घोषित केले. त्यासाठी त्यांना 25 लाख रुपयेही जाहीर केले परंतु ही रक्कम त्यांना कशा

....2

PFK/ MMP/ SBT/

श्री. अरविंद सावंत .......

पध्दतीने देण्यात आली अथवा दिली नाही हेही आपण पहावे, अशी माझी माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती आहे. की त्यांना मिळालेले रिटायरमेंटचे पैसे विचारात घेऊन त्यात वर्ग केलेली रक्कम अशा प्रकारे ही 25 लाखाची रक्कम देण्याचा घाट घातला आहे. कर्नाटक राज्याने मात्र उन्नीकृष्णन् या आपल्या राज्यात शहीद झालेल्या त्यांच्या अधिकाऱ्याला कशा पध्दतीने मदत केली याचा विचार शासन करणार की नाही ? शहीद जवानांच्या पत्नीने स्पष्ट म्हटले आहे की, शेजारच्या कर्नाटक राज्याने उन्नीकृष्णन्ला पूर्ण मदत केली आणि आमच्या शासनाने मात्र आम्हाला काहीच मदत केली नाही, याचा खुलासा करताना आमचे शब्द चुकले तर आम्हाला बरे वाटेल कारण आपण खरे बोलल्याचा जास्त आनंद होईल. शासनाने या जवानांच्या मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत सांगितले की, बारावीपर्यंतचे शिक्षण मोफत देऊ असे सांगितले. परंतु उच्च शिक्षणाचा खर्च सरकार आता करणार नाही असे स्पष्ट दिसून येते. अशा प्रकारच्या घोषणा राज्यसरकारने केल्या हा एक प्रकारे त्यांच्या जखमांवर मीठ चोळण्याचाच प्रकार आहे. हे पोलीस खरे तर जवानांसारखे लढले. आपल्याला लता मंगेशकर यांचे " ए मेरे वतन के लोगो " या गाण्यातील एक ओळ मी सांगू इच्छितो. त्यात " हम खेल रहे थे होली, वे झेल रहे थे गोली " अशी एक ओळ आहे. त्यांनी गोळ्या झेलल्या आणि मुंबईचे संरक्षण केले. त्यात जे धारातीर्थी पडले त्यांच्याबद्दलच्या संवेदना इतक्या बोथट झाल्या काय की त्यांच्या पत्नीला वर्तमानपत्राकडे धाव घ्यावी लागते, याकडे मात्र माननीय राज्यपालांना लक्ष देण्याची गरज वाटली नाही. माननीय राज्यपालांनी मात्र कौतुक करताना सांगितले की, "ही अभिमानाची गोष्ट आहे" नक्षलवाद्यांशी लढताना पोलीस मरतात ही अभिमानाची गोष्ट नाही कारण आम्हाला दोन नक्षलवादी सुध्दा मारता आले नाहीत, याचे जास्त दु:ख आहे. आम्ही धारातीर्थी पडतो, त्यांच्या फोटोला हार घालतो, श्रध्दांजली अर्पण करतो तरी देखील मनात दु:ख होते. धारातीर्थी पडताना सुध्दा "गड आला पण सिंह गेला" असे असेल तर निदान गड जिंकल्याचा तरी आनंद आपल्याकडे असतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

निदान सिंह जरी गेला तरी गड जिंकल्याचे समाधान तरी आम्हाला मिळू द्या. परंतु आमचा सिंहही जातो आणि गडही जातो अशी आमची ख्याती. जेव्हा सिंह जातात तेव्हा तुम्ही त्यांची काय सुरक्षा करता?

सभापती महोदय, स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांच्या नंतर एकाही राज्यकर्त्याचा अभिमान वाटावा असा राज्यकर्ता आमच्या महाराष्ट्राला मिळाला नाही. आता जे राज्यकर्ते आहेत त्या प्रत्येकावर काही ना काही भ्रष्टाचाराचे आरोप आहेत, उच्च न्यायालयाचे ताशेरे आहेत, सर्व राज्यकर्त्यांचे हात बरबटलेले आहेत. परंतु या गोष्टीचा माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात कुठेही उल्लेख नाही. त्यामुळे माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर खेद प्रकट करावायाचा नाही तर आम्ही अजून काय करावयास हवे?

सभापती महोदय, ज्यावेळेस आमचे सरकार सत्तेवर होते त्यावेळेस पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात श्वेत पत्रिका काढण्यात आली होती, कृष्णा खो-याच्या कामाला आम्ही सुरुवात केली होती परंतु आमची सत्ता गेल्यानंतर 10 वर्षाच्या कालखंडात या शासनाला कृष्णा खो-याच्या कामाला एक सुध्दा वीट लावता आलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. आपण आताही सांगत आहात की, विदर्भातील सहा आपदग्रस्त जिल्हयाला सिंचन सुविधा पुरविण्याकडे शासनाने विशेष लक्ष दिले आहे. अजून आपण किती वर्षे अशा प्रकारे लिहिणार आहात? मला सांगा आपण गेल्या 10 वर्षात एक तरी टक्का सिंचन क्षमता वाढवली आहे काय ? माननीय राज्यपाल महोदयांना अभिमान वाटेल असे आपण एक तरी काम केलेले आहे काय ? माननीय राज्यपाल महोदयांनी असे सांगावयास पाहिजे होते की, " होय, माझ्या सरकारने सिंचनाची क्षमता एवढी एवढी वाढवली आहे." परंतु या गोष्टीचा माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात कुठेही उल्लेख नाही. हे सरकार सिंचनासाठी पैसे खर्च करते परंतु एक टक्क्याने सुध्दा सिंचन वाढत नाही त्यामुळे हे पैसे कोठे जातात हे लोकांना चांगल्या प्रकारे कळते. या शासनाने सिंचन क्षमता वाढविण्याचे सोडूनच द्या परंतु या शासनाने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न जरी सोडविला असता तर आम्हाला बरे वाटले असते. कोकणामध्ये प्रचंड पाऊस पडतो. कोकणात पिण्याच्या पाण्याची काय परिस्थिती आहे याचे चित्र

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

वर्तमानपत्रात पहात असाल. कोकणातील महिलांच्या डोक्यावरील हंडे आणि कळशा अजून पर्यंत गेल्या नाहीत. आमच्या कोकणातील भगिनींना न्हाळयाच्या दिवसात डोक्यावर आणि कंबरेवर हंडे घेऊन मैलोनमैल अंतरावरुन पाणी आणावे लागते. कोकणातील पाण्याची समस्या या शासनाला गेल्या 50 वर्षात दूर करता आलेली नाही याचे दु:ख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात नाही याचे मला दु:ख होत आहे, खेद होत आहे. अभिभाषणात म्हणावयास पाहिजे होते की, " होय 50 वर्षे झाली तरी आम्ही साधे पिण्याचे पाणी सुध्दा दिलेले नाही त्यामुळे आम्हाला खेद होत आहे असे आपण म्हणावयास पाहिजे होते. कोकणातील सिंचन क्षमतेचा विषयच वेगळा आहे. कोकणातील महमदवाडी धरणातून कालव्याने जे पाणी जात होते ते कालवे सुध्दा या शासनाने रद्द केलेले आहेत. गेल्या 25-30 वर्षात कोकणातील एका सुध्दा धरणाचे काम पूर्ण झालेले नाही. चिपळूणच्या पाण्याचा प्रश्न मी 10 वर्षापूर्वी मांडला होता. कोयनेच्या पाण्या काही उपयोग करता येईल काय यासाठी प्रयत्न सुरु आहेत परंतु त्यातून अजूनही काहीही मिळालेले नाही. पाण्याच्या संदर्भात या शासनाने जी काही आकडेवारी दिलेली आहे ती पाहिल्यानंतर हसू येते. सिंचनासाठी कोटयावधी रुपये खर्च करण्यात आलेले आहे परंतु त्याचा आऊटपूट काही दिसत नाही सभापती महोदय, ज्यावेळेस आम्ही सत्तेवर होतो तेव्हा आम्ही साडेचार वर्षात मुंबई-पुणे हायवेचे काम पूर्ण केले. या रस्त्याच्या संदर्भात किती तरी लोकांच्या निविदा आल्या परंतु त्या आम्हाला महाग वाटल्या. त्यावेळेस माननीय नितीन गडकरी यांनी सांगितले की, एवडया किमतीत हे काम करणे आम्हाला शक्य होणार नाही. त्यांनी सांगितले मुंबई-पुणे हायवेचे काम राज्य रस्ते विकास महामंडळाकडून केले तर स्वस्तात होईल आणि वेळेत पूर्ण होईल व त्या प्रमाणे त्यांनी रस्त्याचे काम साडेचार वर्षाच्या कालावधीत पूर्ण केले. आम्ही सत्तेवर असतांना कृष्णा खो-याचे काम जेवढे केले होते त्यामध्ये या शासनाने एक सुध्दा वीट लावण्याचे काम केलेले नाही. टेंभू धरणापासून सांगली साता-याच्या सर्व धरणांची नावे मी वाचू शकेल परंतु आपण एक तरी धरण सुरु केले का? एका तरी धरणाचे काम पूर्ण करुन त्याचे पाणी सिंचनासाठी दिले गेले आहे काय? एका तरी धरणातून गावातील लोकांना पिण्याचे पाणी मिळाले आहे काय? माननीय राज्यपाल

...3..

श्री. अरविंद सावंत ....

महोदयांच्या अभिभाषणामध्ये सर्व वाडयांना शुध्द पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत. भारत निर्माण कार्यक्रमाचा एक भाग म्हणून 32,703 वाडया वस्त्यांना पिण्याचे शुध्द पाणी पुरविण्याची योजना शासनाने यशस्वी रित्या सोडविली आहे. सभापती महोदय, या 32,700 वाडयांना पिण्याचे पाणी मिळाले आहे, आणि हे पाणी कोठे कोठे मिळाले आहे हे मला पहावयाचे आहे यासाठी तुम्ही या 32,700 वाडयांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली तर बरे होईल. कोकणातील गावांमध्ये जलस्वराज्य योजनेच्या माध्यमातून विहिरी घेण्यात आलेल्या आहेत परंतु या विहिरी पूर्णपणे आटलेल्या आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.सुंबरे 15.50

श्री.अरविंद सावंत ..

अनेक गावामध्ये आज पिण्याचे पाणी मिळत नाही. कोकणामध्ये मोठया प्रमाणावर पाऊस पडून देखील पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. या ठिकाणी कोयना आणि सावित्री नदीच्या बाबतीत अनेकदा बोलले गेले परतु कितीही वेळा बोलले तरी शासनाला काहीही फरक पडत नाही. नळी फुंकली सोनाराने इकडून तिकडे गेले वारे या प्रमाणे शासन एका बाजूने ऐकते आणि दुस-या बाजूने सोडून देते. कितीही वेळा चर्चा केली तरी शासनाला काहीही फरक पडत नाही. अनेक वाडया वस्त्यांमध्ये अजूनही पिण्याचे पाणी देण्यात आलेले नाही. टॅन्कर मुक्त गाव अशी एक योजना जाहीर करण्यात आली होती परंतु त्या नुसार खरोखर ती गावे टॅन्कर मुक्त झालेली आहेत काय ? ज्या जिल्हयातील सर्व तालुक्यातील लोकांना पिण्याचे पाणी मिळत आहे असा एक तरी जिल्हा माननीय मंत्री महोदयानी मला सागावा .

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 28 मध्ये असे म्हटलेले आहे की, " राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त माझ्या शासनाने, नागरी आणि ग्रामीण या दोन्ही क्षेत्रामध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता यांचा दर्जा सुधारण्यासाठी सुजल आणि निर्मल अभियान सुरु केले आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, आपल्याकडे जल नाही तेव्हा निर्मल जल कसे मिळू शकेल ?

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 31 मध्ये दूध उत्पादनात वाढ करण्याच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. या चर्चेच्या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, नागपूरच्या दूध योजनेमध्ये काम करणा-या कामगारांना कायम करण्यात यावे यासबंधीचा प्रश्न मी गेल्या सात आठ वर्षापासून मांडत आहे. हे कामगार वर्षानुवर्षा पासून रोजंदारीवर काम करीत आहेत त्यातील काही कामगार निवृत्त झालेले आहेत तर काही कामगार मृत्यूमुखी पडलेले आहेत. मागच्या अधिवेशनात माननीय मंत्री महोदयांनी असे आश्वासन दिले होते की, तीन महिन्याच्या आत 118 कामगारांना कायम स्वरुपी सेवेत घेण्यात येईल. सभागृहात आश्वासन देऊन सहा महिने होऊन गेलेली आहेत परंतु अजूनही या कामगारांना कायम स्वरुपी सेवेत घेण्यात आलेले नाही. दिनांक 27 नोव्हेंबर 2008 रोजी माननीय सभापतींनी माननीय मंत्री महोदयांना निदेश दिले होते त्यानंतर या कामगारांना कायम करण्याचे माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले होते परंतु सहा महिने होऊन सुध्दा अजूनही 118 कामगारांना कायम करण्यात आलेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ..

नाहीत अजूनही हे कामगार आपण कधी कायम होणार आहोत याची वाट पहात आहेत.त्यातील काही कामगार निवृत्त झालेले आहेत तसेच काही मृत्युमुखी पडलेले आहेत. रोजंदारीवर काम करणा-या कामगारांची ससेहोलपट माननीय राज्यपालांना माहीत नाही . त्यामुळे मला खेद होत आहे

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामधील परिच्छेद क्रमाक 40 मध्ये असे म्हटलेले आहे की, " माझ्या शासनाने, राज्यामधील सर्व सेवायोजन कार्यालयांचे संगणकीकरण केले आहे त्यामुळे नोकरीच्या शोधात असणा-या आणि नोकरी देणा-या अशा दोघांनाही नोकरीचा तपशील पारदर्शक रीतीने पहावयास मिळतो, याचेच फलित म्हणून रोजगार व स्वयंरोजगार विभागाला 2007-2008 या वर्षाचा " रोजगार वहिनी " या वेबपोर्टलसाठी " ई गव्हर्नन्स पुरस्कार " देण्यात आला आहे." सभापती महोदय,सेवा योजन कार्यालये कशासाठी निर्माण करण्यात आलेली आहेत ? . कंपलसरी नोटिफिकेशन ऑफ एम्प्लायमेन्ट एक्सचेंज ॲक्ट हा अस्तित्वात आहे काय ? याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी येथे दिले पाहिजे. हा कायदा जरी अस्तित्वात असला तरी त्याची प्रभावीपणे अंमजबजावणी होत नाही अशी आजची परिस्थिती आहे. सेवा योजन कार्यालया समोर नावांची नोंदणी करण्यासाठी तरुण बेरोजगारांच्या रांगा लागत होत्या. दहावी पास झाल्यानंतर किंवा बरावी पास झाल्यानंतर या कार्यालयात नाव नोंदविण्यासाठी अनेक तरुण रांगा लावत होते. या कायद्यातील "कंपलसरी " हा शब्द अत्यंत महत्वाचा आहे. ज्याच्याकडे रोजगार निर्माण होत असेल त्याने सेवा योजन कार्यालयाला असे कळविले पाहिजे की, आमच्याकडे अशा प्रकारचा रोजगार उपलब्ध आहे तुमच्या कार्यालयामध्ये ज्या तरुणांनी नावे नोंदविलेली आहेत त्यांची नावे आमच्याकडे पाठवावीत परंतु आज ही व्यवस्था पूर्णपणे कोलमडून पडलेली आहे या संबंधीचा कायदा आज जरी अस्तित्वात असला तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी शुन्य आहे. या चर्चेच्या निमित्ताने मी माननीय मंत्री महोदयांना असे विचारु इच्छितो की, सेवा योजन कार्यालयामध्ये किती तरुणानी नावे नोंदवलेली आहेत त्यापैकी दहावी आणि बारावी उत्तीर्ण किती आहेत आणि पदवीधर तसेच पदव्युत्तर शिक्षण घेतलेले किती तरुण आहेत, गेल्या दहा वर्षात सेवा योजन कार्यालयातून किती लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला होता हे सुध्दा माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. ई गर्व्हनन्स पुरस्कार जाहीर करीत असतांना या राज्यात जे 27 हजार



VTG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.सुंबरे 15.50

श्री.अरविंद सावंत ..

तरुण बेरोजगार आहेत त्यापैकी अमुक इतक्या लोकांना रोजगार या कार्यालयामार्फत देण्यात आला असे जर सांगण्यात आले असते तर मला आनंद वाटला असता व त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन केले असते.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ MMP/ श्री. गायकवाड नंतर --- 15:55

श्री.अरविंद सावंत .....

सगळी थातुरमातुर उत्तरे द्यायची, अधिकाऱ्यांनी लिहून दिलेली उत्तरे येथे द्यायची. सभापती महोदय, यामध्ये आणखी एक मजेदार किस्सा आहे. या संदर्भात मध्यंतरी मराठीचे जोरदार आंदोलन झाले. काहींना दुधाचे दात आले, त्यांनी मराठीचे आंदोलन सुरू केले आणि सरकारसुद्धा झोपेतून जागे झाले. त्यातून मग सरकारने एक जी.आर. इश्यू केला. सभापती महोदय, सेवायोजन कार्यालयामध्ये नोंद नोंदविणे हे आवश्यक असते. या संदर्भात आता सरकारने जो जीआर काढला आहे त्यात काय म्हटले आहे ? सरकारचे अधिकारी कसा जीआर इश्यू करतात ते पहा. सभापती महोदय, आज मुंबईतील एकही उद्योग तुमच्या सेवायोजन कार्यालयाला त्यांच्याकडे किती पदे आहेत, किती पदे भरायची आहेत वगैरे काहीही कळवित नाही. एका बाजूला रेल्वेचे स्वत:चे रिक्रूटमेंट आहे. बँकांचे देखील स्वत:चे रिक्रूटमेंट बोर्ड आहे. मग राहिले कोण ? तर प्रायवेट सेक्टर्समधील उद्योग. ते तर तुम्हाला कधीच कळवत नाहीत. आता तर ऑन लाईन सारे व्यवहार सुरू आहेत. वेबसाईट जाऊन बघायचे, असले तर लगेच अर्ज करायचा, वेबसाईटवरच कॉल देखील येतात. काहीच बाहेर कळत नाही. शासनाला देखील या बाबत कसलीच माहिती मिळत नाही. पूर्वी असे व्हायचे की, सेवायोजन कार्यालयायामध्ये मी पदवीधर झालो की लगेच मी माझे नाव नोंदवायचो. माझ्या मागून आणखी दहा जणांनी नावे नोंदविली. मग सेवायोजन कार्यालयाकडून कॉल देतानाही ज्येष्ठता यादीनुसार कॉल दिले जायचे. म्हणजे एखाद्या माणसाला नव्याने नाव नोंदविणाऱ्याला लगेच कॉल मिळेल आणि जुना तसाच राहील असे होता कामा नये म्हणून ज्याने अगोदर नाव नोंदविले असेल त्याचे नावे प्रथम कॉल काढला जायचा. पण आता ऑनलाईनवर सारे हे व्यवहार सुरू झाल्याने यावर कोणाचेच बंधन राहिलेले नाही. परिणामी डोमिसाईल हा विषयच संपला. कोणीही यावे, डायरेक्ट अर्ज करावा आणि नोकरीलाही लागावे. तो लागणारा माणूस बांगला देशी आहे काय ? हे देखील कोणी पाहत नाही. आता तुम्ही पाहिले असेल की, जेवढी कॉल सेंटर्स आहेत त्या ठिकाणी थेट नोकऱ्या लागतात. मग त्याच कॉल सेंटरमधील मुले अतिरेक्यांच्या संदर्भात अनेक ठिकाणी सापडली असल्याचे आपणास दिसते. अगदी बंगलोर पासून आपल्या पुणे-मुंबई पर्यंतची मुले त्यात सापडली आहेत. आता कॉल सेंटरमध्ये नोकरीला लागलेली मुले कोठून आली ? त्यांचा पत्ता काय आहे, त्यांची ओळख काय आहे ? काहीही माहिती नाही. वेबसाईटवर ऑन लाईन अर्ज केलेला आहे, त्यावरून ऑन लाईनवरच कॉल आला, नोकरी

..... झेडझेड 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...

लागली, झाले. तो माणूस केव्हा मुंबईत आला, तो राहतो कोठे ? काहीही माहिती नसते. सभापती महोदय, हे प्रकरण इतके गंभीर आहे की, त्याकडे शासनाने देखील तेवढ्याच गंभीरतेने पाहिले पाहिजे. आता एक राजकीय निर्णय सरकारने घेतला. तो निर्णय असा आहे की, औद्योगिक विकासाच्या लाभामध्ये स्थानिक जनतेला योग्य वाटा मिळावा या उद्देशाने राज्यातील सर्व औद्योगिक घटकांमध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान 50 टक्के व पर्यवेक्षकीयसहीत इतर श्रेणीत किमान 80 टक्के उमेदवारांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्याने घेण्याबाबत, तसेच नोकर भरती करणारा अधिकारी मराठी जाणणारा असावा या शासनाच्या विद्यमान धोरणाची अमलबजावणी खाली नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार करण्यात यावी. आता खाली जे नमूद केले आहे त्यातील (अ) मध्ये म्हटले आहे की, ज्या सूक्ष्म, लघू, मध्यम, मोठ्या व विशाल नोंदणीकृत औद्योगिक घटकांनी विविध प्रोत्साहने व सवलतींचा लाभ घेतलेला आहे अशा सर्व उपक्रमांनी खालील बाबींची पूर्तता करावी. म्हणजे ज्यांनी सरकारकडून सवलती घेतलेल्या आहेत त्यांनी हे करायचे आहे. पुढे म्हटले आहे की, 'उपरोक्त प्रत्येक औद्योगिक घटकाने विहित प्रपत्रात सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत पात्रता प्रमाणपत्रासाठीच्या अर्जासोबत संबंधित अभिकरण संस्थेकडे लेखी हमीपत्र सादर करावे. उपरोक्त प्रत्येक औद्योगिक घटकाने उत्पादन सुरू केल्यानंतर व तद्नंतर वार्षिक नियत कालीक अहवाल विहित प्रपत्रात संबंधित जिल्हा उद्योग केंद्र / उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग यांचेकडे त्या त्या आर्थिक वर्षानंतरच्या पुढील 30 जून या तारखेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील.' सभापती महोदय, यात महत्त्वाचा मुद्दा काय आहे ? यामध्ये म्हटले आहे की, 'उत्पादन सुरू केल्यानंतर...' सभापती महोदय, आज मुंबईतील सारे उद्योग बंद झाले आहेत. गिरण्या बंद झाल्या. इंडस्टीज बंद होत आहेत, फॅक्टरीज बंद होत आहेत. आता आपल्याकडे सर्व्हिस इंडस्ट्रीज म्हणजे सेवा उद्योग आले आहेत. आयटी सेक्टर काय आहे ? सर्विस सेक्टर आहे. सेझ काय आहे? सर्विस सेक्टर आहे. असे असताना तुम्ही हे निर्णय घेत आहात. आता तर येथील सारे कारखाने बंद झाले आहेत. उद्योग देखील बंद झाले आहेत. मग तुम्ही किती उद्योग काढले, बोलावले ते तरी सांगा. त्याचा देखील या अभिभाषणात उल्लेख आहे. उद्योगातील प्रचंड गुंतवणूक आणली. मी आपल्याला सांगतो की, याचेही आकडेवारी आपण केव्हा तरी सभागृहाला द्या. आम्ही या राज्यात इतकी कोटीची गुंतवणूक आणली त्यातून इतका हजार रोजगार निर्माण झाला आणि

..... झेडझेड 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तो रोजगार आम्ही राज्यातील 80 टक्के लोकांना दिला. (वेळ संपल्याची बेल वाजविण्यात येते.) सभापती महोदय, मला अजून 10 मिनिटे तरी पाहिजेत. तरीही मी जास्तीत जास्त कमी वेळात माझे भाषण आटोपते घेण्याचा प्रयत्न करतो. ...

( यानंतर श्री. सरफरे .... 3ए 1 ...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. सुरेश जेथलिया)** : माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, अजून 20 माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. त्यामुळे आपल्याला सभागृहाची वेळ वाढवावी लागेल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, सुरुवातीच्या माननीय सदस्यांना एकेक तास बोलण्यासाठी वेळ दिला जातो. आणि नंतरच्या माननीय सदस्यांना पाच-पाच मिनिटांचा वेळ दिला जातो हा अन्याय आहे. आम्हा सर्व माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली गेली पाहिजे. या सभागृहामध्ये असलेल्या अधिकाऱ्यांनी सुध्दा रोटेशन व्यवस्थित लावले पाहिजे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी उपस्थित केलेला विषय अतिशय महत्वाचा आहे. आपण मराठी माणसाची थट्टा करीत आहात. हा विषय माझ्यापुरता मर्यादित नाही. आपण त्यांना 80 टक्के देण्याचे मान्य करता...

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आपण उद्या सकाळी विशेष बैठक घ्यावी, उद्या सकाळी लवकर येण्याची आमची तयारी आहे...

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, आपण उद्या सकाळी विशेष बैठक घ्यावी...

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ 5.30 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मराठी माणसाची कशी थट्टी केली जात आहे? हे राजकीय निर्णय लोकांना समाधान देण्यासाठी आहेत. 17 नोव्हेबर 2008 रोजी हा जी.आर. काढण्यात आला. त्यामध्ये जिल्हा पातळीवर एक व राज्य पातळीवर एक अशा दोन समित्या निर्माण केल्या. त्या समित्यांनी तीन महिन्यातून एक बैठक घेण्यात यावी म्हणून त्यांना वेळ देण्यात आली. प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होते की नाही? त्यांची गेल्या सहा महहिन्यात एक तरी बैठक झाली आहे काय? वर्तमानपत्रामधून येणाऱ्या त्यांच्या जाहिराती किती? त्या उद्योगामध्ये होत असलेल्या नोकर भरतीमध्ये किती मराठी माणसे घेण्यात येतात याची माहिती त्या समितीला विचारा. या जी.आर. मध्ये ही खोट आहे. आज सर्व्हिस सेक्टरमध्ये सर्व इंजिनिअर मुले पाहिजेत. आपण महाराष्ट्रात अनेक इंजिनिअरींग कॉलेज काढले. उदा. आमच्या महानगर टेलिफोन निगममध्ये ज्युनिअर टेलिकॉम ऑफिसरच्या पदाकरिता वेबसाईटवर जाहिरात देण्यात आली. ती जाहिरात वर्तमानपत्रामध्ये दिली नाही, हिंदी वर्तमानपत्रामध्ये दिली नाही, इंग्रजी वर्तमानपत्रामध्ये दिली नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ SBT/ KGS/ MMP/

श्री. अरविंद सावंत...

स्थानिक वर्तमानपत्रामध्ये दिली नाही. उमेदवारांच्या परिक्षा घेऊन त्यांना उत्तीर्ण केले. त्यामध्ये मुंबई आणि महाराष्ट्रातील हाताच्या बोटावर मोजण्याइतकी मुले उत्तीर्ण झाली. दिल्लीमधील कार्यालयामध्ये भरती करण्यासाठी मुंबईतील इंजिनिअरींग कॉलेजमध्ये डिस्टिंक्शनने उत्तीर्ण झालेली मुले त्या परिक्षेत "ढ" निघाली काय? याठिकाणी आपल्या या कायद्याचा उपयोग काय आहे ते सांगा? सरकारकडून त्यांनी सवलती घेतल्या आहेत. त्यामुळे या उद्योगांची व्याख्या आपण बदलली पाहिजे. यामधील "पर्यवेक्षक" हा शब्द आपण काढून टाकला पाहिजे. आपल्याला 50 टक्के अधिकारी वर्ग मिळत असतांना मुंबई महाराष्ट्रातील लोकांना डावलले जात असेल तर त्यासाठी शासन काय कारवाई करणार आहे? त्याबाबत या जी.आर.मध्ये उल्लेख नाही. त्यासाठी तुम्ही काय उपाय योजना केली असे आपण त्यांना विचारणार आहात काय? सभापती महोदय, सेवा योजन कार्यालयासंदर्भातील कायदा असो, कामगार कायदा असो तो सेझमध्ये नोकरीला असलेल्या कामगाराला लागू आहे काय? नाही. सेझ म्हणजे स्वायत्त संस्थान आहे. त्यांना देशातील कोणताही कामगार कायदा लागू नाही. मी कोणत्याही युनियनमध्ये सहभागी होणार नाही असे प्रथम त्याठिकाणी नोकरीला लागतांना त्या उमेदवाराकडून लिहून घेतले जाते

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

आपल्याला हे माहिती आहे का ? शासन याबद्दल कोणते संरक्षण देणार आहे ते सांगावे. सभापती महोदय, मी दोन मिनिटांमध्ये दोन विषय मांडू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब यांनी सांगितले आहे, म्हणून मी त्या विषयांची पुनरावृत्ती करीत नाही.

सभापती महोदय, मुद्दा क्र.62 मध्ये असे म्हटलेले आहे की, शासनाचा झोपडपट्टी पुनर्विकासाला प्राधान्यक्रम असून "झोपडपट्टीविरहित शहरे" हे अंतिम उद्दिष्ट आहे. अरे वा, तुमचे स्वागत आहे. आम्ही 1995 पूर्वीच्या झोपडपट्टया रेग्युलर केल्या.

(विधीमंडळातील अधिकारी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांच्या आसनाजवळ जाऊन बोलतात.)

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, हे काय चालले आहे ? सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना हे चालते काय ? त्यांनी नंतर बोलावे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आमचे असे मत आहे की, येथील स्टाफ बरोबर ऑब्झर्वेशन करीत नाही. माननीय सभापतींना बरोबर मार्गदर्शन करीत नाही. असे झाले तर मग बाकीच्या सन्माननीय सदस्यांवर अन्याय होणार आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य भाषण करीत असताना आम्ही अशा प्रकारे मध्येच बोलण्यासाठी उभे राहिलो काय ?

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी त्यांच्याविषयी बोलत नाही. मी वेगळया प्रश्नाबाबत बोलत आहे. आम्ही याठिकाणी भाषण करण्यासाठी सन्माननीय सदस्यांची नावे दिलेली असताना देखील, ती दिली नाहीत असे सांगतात. आदल्या दिवशी दिलेली नावे दुसऱ्या दिवशी . . .

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, . . . .

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माझा विषय वेगळा आहे. मग नंतर ज्या सन्माननीय सदस्यांची नावे शिल्लक रहातील, त्यांना दोन-दोन मिनिटांमध्ये भाषण करावयास सांगणार आहात काय ? मग आपण सभागृहाची वेळ वाढवावी, आमची रात्रभर थांबण्याची तयारी आहे. तसेच आम्हाला सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील मुद्दे ऐकावयाचे आहेत. सगळया सन्माननीय सदस्यांना वेळ द्यावा.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मला असे वाटत नाही की, मी तुमच्या कुठल्या मुद्याबाबत . . ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मला सन्माननीय सदस्यांबद्दल काही म्हणावयाचे नाही.पण आमचा मुद्दा वेगळा आहे. रोटेशन देत नाहीत. आम्ही येथे पाट्या टाकण्यासाठी येतो काय ?

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, 1995 पूर्वीच्या झोपडपट्टया . . . .

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या संबंधात जे सन्माननीय सदस्य भाषण करणार आहेत, त्यांच्या नावाची यादी देण्यात आली आहे, ती क्रमानुसार वाचून दाखविण्यात यावी. लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत मनमानी, अर्धा तासाच्या चर्चेमध्ये मनमानी, प्रश्नोत्तराच्या बाबतीत मनमानी ...

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, आमच्या सूचना लागतच नाहीत, तुमच्या लागतात तरी. आमची कधीच लागत नाही. हे बरोबर नाही.

सभापती महोदय, मी पाच मिनिटांमध्ये भाषण संपविणार आहे. पण हे बरोबर नाही एवढेच सांगू इच्छितो. यापुढे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण असोत किंवा इतर कोणीही सन्माननीय सदस्य असोत, परंतु मी बोलण्यासाठी उभा रहाणार आहे. मी हे देखील सांगतो की, सन्माननीय सदस्यांनी जर पुन्हा कधी 10 मिनिटांच्या वर भाषण केले तर मग मी देखील उभा रहाणार. मला हे काही बरोबर वाटत नाही. मी महत्वाचा विषय मांडत आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये बेरोजगारांच्या बाबतीत मुद्दा मांडलेला आहे. आज संपूर्ण देशामध्ये, राज्यामध्ये बेरोजगारांचा प्रश्न मोठया प्रमाणात आहे. मी त्या संदर्भातील सर्व प्रश्न उपस्थित केलेले आहेत. या अभिभाषणामध्ये "झोपडपट्टी विरहित शहरे" संदर्भात मुद्दा मांडलेला आहे. आम्ही 1995 पूर्वीच्या झोपडपट्टया नियमित केल्या. पण तुम्ही याबाबतीत राजकारण केले आणि 2000 पर्यंत मुदत वाढविण्याचा मुद्दा मांडला. मुंबईमध्ये येणारे लोंढे थांबलेले नाहीत. एम.एम.आर.डी.ए.च्या बाबतीत जे नवीन प्रकरण सुरु झाले आहे. अशा वेळी एकतर असे सांगावे की, म्हाडा हे रिडन्डंट झाले आणि आता यापुढे म्हाडा घरे बांधणार नाही, तर एम.एम.आर.डी.ए.घरे बांधणार आहे. मग आम्हाला कळेल की, आता म्हाडा घरे बांधणार आहे की एम.एम.आर.डी.ए.घरे बांधणार आहे. तसेच यासाठी 15 वर्षाच्या वास्तव्याचे डोमिसाईल सर्टीफीकेट देखील लागणार नाही. येथे या आणि भाडयाने रहा. परंतु या बाबतीत अभिभाषणामध्ये कुठेही उल्लेख नाही.

. . . .3 बी-3



APR/ KGS/ MAP/ 16:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, यानंतर मी थोडक्यात शेवटचे दोन मुद्दे मांडणार आहे. सन्माननीय सदस्यांनी येथे एस.टी.च्या संदर्भात विषय मांडला आहे.याठिक्‌ाणी असे म्हटलेले आहे की, "शासनाने 65 वर्ष व त्यापेक्षा अधिक वय असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना, त्याचप्रमाणे विकलांग व्यक्तींना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या साध्या बसच्या भाडयांमध्ये सवलत दिलेली आहे. ही सुविधा आता महामंडळाच्या निमआराम बसमधून प्रवास करणाऱ्यांना देखील उपलब्ध आहे." ही चांगली गोष्ट असून याचे स्वागत आहे. विकलांग व्यक्तींना सवलत देत असताना, एस.टी.सुध्दा विकलांग करीत आहात. सभापती महोदय, शासनाकडून एस.टी.महामंडळाला टोल टॅक्स 61 कोटी रुपये मिळतो, प्रवासी कर 550 कोटी रुपये मिळतो. परंतु शासनाकडून एस.टी.महामंडळाकडे करारापोटी येणारी रक्कम 352 कोटी रुपये आहे.शासनाकडून सवलतीपोटी येणारी रक्कम 337 कोटी रुपये आहे. शासनाकडून पोलीस धोरण म्हणून येणारी रक्कम 32 कोटी आहे अशा प्रकारे शासनाकडून एस.टी.महामंडळाकडे जवळजवळ 750 कोटी रुपये द्यावयाचे आहेत. तसेच तुम्ही शासनाच्या कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करताना देखील फसवित आहात. त्यांचा एच.आर.ए.दाबून टाकला आहे. असे का ? या कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू केला, मग एच.आर.ए.का देत नाही ? तो सील केला आणि 2006 प्रमाणेच त्यांना मिळणार आहे, म्हणजे तेथेही त्यांची फसवणूक केली आहे. माझी याबाबतीत मागणी आहे की,या कर्मचाऱ्यांना एच.आर.ए.देखील देण्यात यावा, त्यांना मिळणारा टी.ए.देखील द्यावा. केंद्र शासनामध्ये सी.सी.ए.असतो, याठिकाणी टी.ए.आहे आणि तुम्ही तो देखील दिलेला नाही, म्हणजेच कर्मचाऱ्यांना ज्यामधून लाभ मिळणार होता, नेमका तोच काढून घेतला.परंतु अधिकाऱ्यांना मिळाले. एस.टी.महामंडळाच्या चेअरमनला सहावा वेतन आयोग लागू झाला, कारण आय.एस.अधिकारी आहेत. परंतु तेथील कर्मचाऱ्यांना नाही. तेव्हा माझा असा प्रश्न आहे की, एस.टी.महामंडळाला द्यावयाचे 750 कोटी रुपये कधी देणार आहात ? एस.टी.च्या कर्मचाऱ्यांचा करार थांबलेला आहे, तो करावा आणि खऱ्या अर्थाने विकलांग झालेल्या एस.टी.महामंडळाला सुरक्षित करावे.

सभापती महोदय, मी यानंतर शेवटचा मुद्दा मांडतो. जेव्हा संयुक्त महाराष्ट्र समितीचा विषय आला. गिरणी कामगारांच्या सोबत अनेकांनी लढा दिला. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामध्ये ज्यांनी भाग घेतला,त्यातील काही धारातीर्थी पडले.माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळसाहेब,

. . . .3 बी-4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांना पेन्शन देण्याबाबतचा जो विषय आहे, यासंदर्भात आपणच श्री.दत्ता धाडीगांवकर यांना 1986 मध्ये पत्रामधून उत्तर दिले की, होय, याबाबतीत मी पराकोटीचे प्रयत्न करीन आणि ज्या मंडळींनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढयामध्ये भाग घेतला, शिक्षा भोगली, त्या सगळयांना शासनातर्फे पेन्शन देऊ."

यानंतर कु.थोरात . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

सभापती महोदय, माझी या निमित्ताने विनंती आहे की, शासनाने यामध्ये लक्ष घालावे. या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये त्यावेळी लढा दिलेली माणसे किती हयात आहेत हे मला माहीत नाही. पण त्यांना पेन्शन देण्याच्या बाबतीत आणि त्यांना सहकार्य करण्याच्या बाबतीत शासनाने विचार करावा अशा प्रकारची विनंती करुन मी आपली रजा घेतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईन्ट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत**

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय,माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. मी परवा श्री. अण्णा हजारेंच्या संदर्भात सभागृहात औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी सभागृहात माननीय गृह मंत्री उपस्थित होते. त्यांनी काल सभागृहात निवेदन करण्याचे मान्य केले होते. कालचा पूर्ण दिवस गेला, आजचा दिवसही संपत आलेला आहे. तेव्हा आज ते निवेदन होणार आहे काय याबाबतची माहिती देण्यात यावी. सभापती महोदय, आम्ही वर्तमानपत्रातून आणि टी.व्ही.च्या माध्यमातून याबाबातच्या बातम्या ऐकत आहोत. राज्यातील सर्वात गंभीर अशी ही घटना आहे आणि शासन मात्र याबाबतीत गंभीर नाही. किंबहुना ज्यांनी सुपारी दिली त्यांना वाचविण्याचा अटोकाट प्रयत्न सुरु आहे आणि एवढयाचसाठी याबाबतचे निवेदन सभागृहात केले जात नाही, हे खरे आहे काय? सभापती महोदय, याबबातचे निवेदन आजच झाले पाहिजे असा माझा आग्रह आहे तसेच हा सभागृहाचा अधिकार आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांच्या सूचनेला माझे समर्थन आहे. श्री. अण्णा हजारे यांनी स्वत: संरक्षण नाकारले असल्यामुळे त्यांच्या जीवाला धोका होऊ शकतो. म्हणून याबाबतीत काय कार्यवाही केलेली आहे हे सभागृहाला कळले पाहिजे. आज अहमदनगरमध्ये देखील बरेच मोठया प्रमाणात लोक,संघटना व पत्रकार जाहीर सभा घेत आहेत आणि त्यांच्या संरक्षणाच्या संदर्भात शासनाकडे अपेक्षा व्यक्त करीत आहेत. सभापती महोदय, कोर्टाचा निकाल होईल त्यावेळी होईल परंतु प्रत्यक्षात याबाबतीत शासनाने ताबडतोब काय कृती केलेली आहे? सभागृह चालू असताना देखील दोन दिवस झाले निवेदन कां होत नाही? सदनाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री या ठिकाणी आहेत. तेव्हा याबाबतचे निर्णायक असे उत्तर सभागृहाला मिळले पाहिजे.

**तालिका सभापती** :( श्री. सुरेश जेथलिया) :सभागृहाचे कामकाज संपण्या अगोदर माननीय गृहमंत्री याबाबतचे निवेदन करतील.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, आपले असे निर्देश आहेत की माहिती आहे?

**तालिका सभापती** : आजचे सभागृहाचे कामकाज संपण्याच्या आत माननीय गृह मंत्री निवेदन करतील असे निर्देश आहेत.

काही सन्माननीय सदस्य : सभापती महोदय,बोलणाऱ्या वक्त्यांचा क्रम सांगावा.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ KGS/

**तालिका सभापती** :माननीय राज्पालांच्या अभिभाषणावर 20 ते 22 वक्ते बोलणार आहेत. तेव्हा बोलणाऱ्या वक्त्यांनी वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करावे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, पुढच्या अधिवेशनात वेळेचे बंधन पाळण्यात येईल. या अधिवेशनात पहिल्या वक्त्याला जो न्याय देण्यात आलेला आहे तोच न्याय सगळया वक्त्यांना देण्यात यावा,अशी विनंती आहे.

---4...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

( चर्चा पुढे चालू...)

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय,महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. एस.सी. जमीर यांनी दोन्ही सभागृहासमोर केलेल्या अभिभाषणावर मी माझे मत व्यक्त करण्यासाठी उभा आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे या सरकारची एकंदरीत पुढील वाटचालीची दिशा, हे सरकार कोठल्या योजना अंमलात आणणार आहे, कोणासाठी काम करणार आहे या सगळयाचा ऊहापोह अभिभाषणात केला जातो. या अभिभाषणात जे लिहिले आहे त्या सगळया मुद्यांना मी स्पर्श करणार नाही कारण बऱ्याच वक्त्यांनी त्यावर आपले विचार व्यक्त केलेले आहेत. पण एकंदरीत पहाता ज्या मुद्यांना वगळलेले आहे त्याबाबतीत मी या ठिकाणी बोलणार आहे. दि.26 नोव्हेंबर, 2008 रोजी जो हल्ला झालेला आहे त्या विषयी माननीय राज्यपाल महोदयांनी असे सांगितले आहे की, "हा हल्ला फक्त मुंबई शहरावरील नसून हा संपूर्ण देशावरचा हल्ला आहे"सभापती महोदय, मी त्या मताशी सहमत आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे .....

परंतु हा हल्ला परतविण्याची आपली जी जबाबदारी होती ती पेलण्यास आपण समर्थ ठरलो काय असा प्रश्न यातून निर्माण होतो. आठ-आठ किलो आरडीएक्स घेऊन हे अतिरेकी भर मनुष्यवस्तीत आपल्या सगळ्या साधनसामुग्रीसह शिरतात, दोन-दोनशे निष्पाप लोकांचे बळी घेतात, आमचे श्री. करकरे, श्री. कामटे, श्री. साळस्कर यांच्यासारखे मोहरे टिपतात. आजच्या इंडियन एक्स्प्रेस वृत्तपत्रामध्ये या घटनेच्या संदर्भात 'थरार' असा उल्लेख केला आहे. तो थरात तीन दिवस संपूर्ण देशाने पाहिला. त्यामध्ये काही अभिमानास्पद आहे असे मला वाटत नाही. तो प्रसंग आठवल्यानंतर आपली मान शरमेने खाली जाणार आहे. दहा जणांच्या टोळक्याने आमची संपूर्ण यंत्रणा वेठीस धरली आणि तीन दिवस आम्हाला झुंजवले. इतकी शर्मनाक बाब या महाराष्ट्राच्या आणि देशाच्या इतिहासामध्ये यापूर्वी कधी झाली असेल असे मला वाटत नाही. यासंदर्भात मला शासनाला एक प्रश्न विचारावयाचा आहे. श्री. कामटे, श्री. करकरे, श्री. साळस्कर यांचे जे बुलेटप्रूफ जॅकेट होते त्यांनी जर गोळ्या परतविल्या असत्या, जे हेल्मेट होते त्याने जर गोळ्या परतविल्या असत्या तर आपले नाक कापले गेले नसते. काल असे ऐकावयास मिळाले की, ती फाईलच गायब झालेली आहे. बुलेटप्रूफ जॅकेट खरेदीच्या चौकशीची फाईल महाराष्ट्र सरकारच्या कार्यालयातून गहाळ होणे हा त्याच्यापेक्षाही भयंकर आणि गंभीर विषय आहे. ती फाईल गहाळ झाली की गहाळ केली ते चौकशीतून बाहेर येईल. जर इतकी गंभीर फाईल गहाळ होऊ शकते तर सामान्य माणसाने कोणावर विश्वास ठेवावयाचा ? श्री. करकरे, श्री. साळस्कर यांच्या विधवा पत्नीने जरी टाहो फोडला तरी त्यांची ती किंकाळी ऐकून घेण्याचे कान या महाराष्ट्र सरकारकडे आहेत की, नाही याबद्दल मला शंका येते. त्यांना अनुदान किंवा मदत करण्यामध्ये जी हेळसांड झाली ती ऐकून मन अगदी उद्विग्न होते. मी याच्या डिटेलमध्ये जात नाही परंतु उल्लेख करणे आवश्यक वाटले म्हणून उल्लेख केला. एनएसजी येण्यासाठी कित्येक तास लागले. रात्री साडेनऊ ला हल्ला झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी एनएसजी आले. त्यावेळी खऱ्या अर्थाने या देशाला समजले की, मुंबई पोलिसांकडे अशा प्रकारचा हल्ला परतविण्याची यंत्रणा नाही. तशा प्रकारचे एनएसजी निर्माण करण्याचा विषय यामध्ये आलेला आहे. आम्ही एनएसजी निर्माण करु, कमांडोज तयार करु,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. प्रकाश शेंडगे ......

अमूक करु असे सांगितले जाते. हे जेव्हा व्हावयाचे तेव्हा होईल पण या गोष्टीकडे जे अक्षम्य दुर्लक्ष केले गेले, जी दिरंगाई झाली, एनएसजी आणण्यामध्ये जे दोषी आहेत त्यांना सोडू नये असे माझे मत मी व्यक्त करतो. पोलीस खात्याच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर गेल्या पंधरा वीस दिवसांपूर्वी धुळे आणि जळगाव भागामध्ये जे लोक आपली कच्चीबच्ची घेऊन आपल्या उदरनिर्वाहासाठी उन्हातान्हात आपल्या मेंढ्यांच्या कळपासह पोटाची खळगी भरण्यासाठी हिंडत होते त्यांच्यावर एका महिन्यामध्ये आठ वेळा दरोडे पडले. गेल्या आठवड्यात पाच हजार मेंढपाळांनी मोर्चा काढून सरकारला जाब विचारला की, या महाराष्ट्रामध्ये आम्ही जगावयाचे की नाही ? हे लोक दुष्काळी भागातील आहे. त्या ठिकाणी सिंचनाचा प्रश्न येतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे...

दुष्काळी भागामध्ये सिंचनाची व्यवस्था करण्यास महाराष्ट्र सरकार असमर्थ ठरले आहे. त्यामुळे सर्व दुष्काळी भागातील मेंढपाळ मंडळींना आपल्या शेळया मेंढया घेऊन, मुलाबाळांना घेऊन घोडयावर आपले संसार टाकून जगण्यासाठी बाहेर पडावे लागत आहे. ते आत्महत्या करीत नाहीत. पण जगण्यासाठी ऊसतोडीला जातात, हमाली करतात, परंतु जेथे ते जातात तेथे त्यांचे आयुष्य सुरक्षित नसेल तर त्यांनी कोणाकडे दाद मागावयाची हे कळत नाही. त्या भागात दरोडेखोर येतात, दरोडयामध्ये त्यांचे सोनेनाणे चोरतात. परंतु त्यापेक्षा त्यांच्या कुटुंबियांचे, महिलांच्या अब्रुचे धिंडवडे या महाराष्ट्रामध्ये निघत आहेत याच्यापेक्षा दुसरी शरमेची कोणती गोष्ट असू शकते ? धुळे, जळगांव या भागात हे हल्ले होत आहेत. तसेच ते इतरही भागामध्ये होत आहेत. धुळे व साक्री भागातील दुष्काळी भागातील मेंढपाळांना शासन संरक्षण कसे देणार आहे ? त्यांनी शस्त्रे बाळगण्याची सरकारकडे परवानगी मागितलेली आहे. पण सरकार त्यांना परवानगी देत नाही. मी तर अशी मागणी करतो की, सरकारच्या खर्चाने त्यांना शस्त्रे पुरविली पाहिजेत. याबाबत शासनाने उत्तरातून खुलासा करावा.

सभापती महोदय, या महाराष्ट्रात कायम दुष्काळी तालुके आहेत. यामध्ये जत, कवठेमहांकाळ, सांगोला, आटपाडी, खानापूर, ताकारी, म्हैसाळ, टेंभू या तालुक्यांचा समावेश आहे. युतीच्या काळामध्ये कृष्णा खोरे प्रकल्पाच्या 90 टक्के योजना पूर्ण झाल्या होत्या. उर्वरित 10 टक्के योजना आता पूर्ण होतील, नंतर पूर्ण होतील या आशेने 3 पिढयांनी वाट पाहिली आहे. पण त्यांच्या वाटयाला निराशा आली आहे. या दुष्काळी तालुक्यांसाठी दुष्काळी महामंडळ स्थापन करण्याची नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये घोषणा करुन 3 वर्षे झाली आहेत. घोषणा झाली त्यावेळी दुष्काळी भागातील जनतेला वाटले की, आता काही तरी आपल्या वाटयाला येईल. परंतु दुष्काळी तालुक्यांच्या यादीमध्ये आपला मतदार संघ कसा येईल यासाठी चढाओढ सुरु झाली. अगदी बारामती, माळशिरस यासारख्या तालुक्यांचा या दुष्काळी तालुक्यात कसा समावेश होईल यादृष्टीने मोठमोठया नेते मंडळींनी प्रयत्न सुरु केले. या नेत्यांच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या. या महामंडळाच्या निर्मितीचा निर्णय आजपावेतो सरकारला घेता आलेला नाही. या सरकारचे हे शेवटचे अधिवेशन असल्यामुळे निदान या अधिवेशनात तरी दुष्काळी महामंडळ जाहीर करावे आणि

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्री.प्रकाश शेंडगे...

दुष्काळग्रस्त भागातील जनतेला दिलासा द्यावा अशी मी विनंती करतो. सभापती महोदय, सिंचनाच्या संदर्भात सरकारचे मी यापेक्षा अधिक धिंडवडे काढू इच्छित नाही.

सभापती महोदय, राज्यपालांनी अभिभाषणामध्ये हजारो वाडया वस्त्यांमध्ये पाणीपुरवठा केल्याचा उल्लेख केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी तर सरकारला आवाहन करुन म्हटले होते की, या वाडया वस्त्यांची यादी पटलावर ठेवण्यात यावी. मी देखील तशीच मागणी करतो. वाडया वस्त्यांमध्ये देशमुख, पाटील ही मंडळी रहात नाहीत. (अडथळा) सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.दिलीपराव देशमुख हे राहतात तो वाडा आहे. वाडया व वाडा यात फरक आहे. कोकणात अशा हजारो वाडया वस्त्या आहेत. तेथे पाणी नाही, रस्ता नाही, वीज नाही, शाळा नाही, ग्रामपंचायत नाही. त्या लोकांचे जीवन अंध:कारमय झालेले आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आपण साजरे करीत आहोत. या वर्षामध्ये त्या लोकांना अशारितीने जगावे लागत आहे हे मोठया खेदाने नमूद करावेसे वाटते. गेल्या वर्षी दुष्काळ पडला तो कशामुळे निर्माण झाला होता ? कोकणामध्ये गोळप नावाच्या गावात दुष्काळ पडला होता. त्या वस्तीतील लोकांनी पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी घाण केली....

यानंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे....

म्हणून त्या झ-याचे पिण्याचे पाणी त्या वस्तीला देण्यास ते गावकरी तयार नाहीत.

**तालिका सभापती (श्री.सुरेश जेथलिया )** : आपल्या भाषणास सुरुवात होऊन जवळपास वीस मिनिटे होऊन गेलेली आहेत. आपण अजून किती वेळ बोलणार आहात ?

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मी कधीही जास्त वेळ बोलत नाही. मी प्रत्येक वेळी माझे म्हणणे पाच मिनिटात मांडलेले आहे. परंतु या सरकारचे हे शेवटचे अधिवेशन आहे. म्हणून सरकारसमोर मला काही मागण्या मांडावयाच्या आहेत. ज्या भावना व्यक्त करावयाच्या आहेत त्या व्यक्त करण्यासाठी मला थोडा वेळ द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे. मी पुढील अधिवेशनात आपल्याकडून जास्त वेळ मागणार नाही.

सभापती महोदय, वाडया-वस्त्याच्या विकास करण्याकामी हे सरकार खरोखरच गंभीर आहे काय असा माझा खरा प्रश्न आहे. त्याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. त्याचप्रमाणे पशुसंवर्धनाच्या बाबतीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख करण्यात आलेला आहे. 50 वर्षामध्ये पहिल्यांदाच या सरकारला याबाबतचा साक्षात्कार झालेला आहे की, पशुसंवर्धन हे रोजगार निर्मितीचे प्रचंड क्षमता असलेले क्षेत्र आहे. त्यासाठी उस्मानाबाद शेळीची जात विकसित करण्यासाठी संशोधन केंद्र स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. मला असे सांगावयाचे आहे की, पुणे येथे शेळी-मेंढी विकास महामंडळाचे गोखले नगर येथे कार्यालय आहे. शेळी- मेंढी विकसित करणे व त्या अनुषंगाने संधोधन करण्यासाठी त्या ठिकाणी या कार्यालयाची दोन एकर भूखंड आरक्षित ठेवण्यात आला होता. हा दोन एकरचा भूखंड राज्य शासनाने श्री.शहा बिल्डरला देऊन टाकला. त्या भूखंडावर श्री. शहा बिल्डरची मोठी इमारत उभी आहे. या भूखंडाच्या बाबतीत चौकशी करण्यात यावी अशा प्रकारची मी सभागृहात मागणी केली होती. ती मागणी करताना तत्कालिन माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित होते. तसेच माननीय श्री. अजित पवार देखील सभागृहात उपस्थित होते. हा विषय पुणे शहरातील असल्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय अजित पवार यांच्याकडे हात केला. माननीय श्री. अजित पवारांनी माझ्याकडे हात केला. तत्कालिन मुख्यमंत्री श्री. विलासराव देखमुख यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले. त्या चौकशीचे पुढे काय झाले ? त्या भूखंडाची पूर्णपणे फाईल लुप्त झाली आणि त्या प्रकरणाची पुढे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे....

कोणत्याही प्रकारची चौकशी झाली नाही. त्या भूखंडावर बिल्डरची मोठी टोलेगंज इमारत उभी राहिली आहे. त्या इमारतीतील सदनिका विकण्यास सुरुवात देखील झाली आहे. विमुक्त जाती व भटक्या जमातीचा विकास करणार आहोत असे माननीय राज्यपालांच्या प्रत्येक अभिभाषणात नमूद केले जाते. परंतु या प्रवर्गाचा पाहिजे तसा विकास शासनाकडून केला जात नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. शेळी-मेंढी विकास महामंडळाचा 40 कोटी रुपयांचा भूखंड आहे. त्या भूखंडाच्या प्रकरणात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. त्याची पुन्हा चौकशी करण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो. या चौकशीमध्ये जो कोणी दोषी असतील त्यांचे विरुध्द कडक कारवाई करण्यात यावी अशी देखील मी मागणी करतो.

सभापती महोदय, दुग्ध संवर्धनासाठी 33 कोटी रुपयांच्या नवीन योजना हाती घेण्याचे शासनाने ठरविले आहे. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, मीरज येथे 50 कोटी रुपयांचा चिलींग प्लॉन्ट सुरु करण्यात आला होता, त्याची अवस्था आज अतिशय वाईट आहे. या प्लॉन्टच्या संदर्भात मी गेल्या अधिवेशनात सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी सांगण्यात आले होते की, या प्लॉन्टमध्ये एवढया प्रमाणात दुध संकलनाचे काम होत आहे. परंतु आता 50 कोटी रुपयांचा चिलींग प्लॉन्ट बंद पडला आहे. तेथील सर्व कामगार बेरोजगार झालेले आहेत. तेथील सर्व मशिनरी खराब झाली आहे. एकीकडे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात सांगितले गेले आहे की, आम्ही दुधात मोठया प्रमाणात वाढ करणार आहोत. दुसरीकडे दुधाच्या संदर्भातील योजना आहेत त्या बंद करुन त्या योजना दुस-याला विकण्याचा घाट रचला जात आहे. याबाबतची वस्तुस्थिती काय आहे याचे विश्लेषण माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात करावे. मीरज येथील चिलींग प्लॉन्ट बंद आहे तो सुरु करणार आहात की नाही याचा देखील खुलासा या ठिकाणी करण्यात आला पाहिजे. वरळी येथील डेअरी देखील बंद पडण्याच्या मार्गावर आहे. त्या ठिकाणी कर्मचारी कमी करण्यात आले आहे, जे कर्मचारी काम करीत आहेत, त्यांचे पगार वेळेवर दिले जात नाहीत. त्या ठिकाणी पूर्वी दुधाचे संकलन मोठया प्रमाणात होत होते, आता दूध संकलनाचे प्रमाण देखील खूप कमी झालेले आहे. वरळी डेअरी सारखी अवस्था महाराष्ट्रातील इतर डेअरींची होणार आहे काय यासंबंधी देखील खुलासा शासनाने केला पाहिजे.

3...



ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री. शिगम 16:25

श्री.प्रकाश शेंडगे...

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात अल्पसंख्याकांच्या बाबतीत बराच उहापोह करण्यात आलेला आहे. यासंदर्भात केंद्र सरकारने 15 कलमी कार्यक्रम जाहीर केलेला आहे. राज्य शासनाने अल्पसंख्याकांसाठी स्वतंत्र विभाग सुरु केलेला आहे. अल्पसंख्याकांसाठी शासनाने जी तत्परता दाखविली आहे, तेवढी तत्परता विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी शासनाकडून का दाखविली जात नाही ? असा माझा प्रश्न आहे. महाराष्ट्रात विमुक्त व भटक्या जमातीचा अडीच ते पवणेतीन टक्के वर्ग आहे. परंतु या प्रवर्गाचा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात साधा उल्ले्खही असू नये याची मला खंत वाटते....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ 16:30

श्री.प्रकाश शेंडगे.....

या महाराष्ट्रामध्ये यांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार हे सरकार देणार की नाही? ज्यांचा उल्लेख सुध्दा अभिभाषणामध्ये असू नये? अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्याक यांचा उल्लेख केला जातो मग इतक्या मोठ्या संख्येने ही जमात आहे, आपल्या रोजीरोटीसाठी ते भटकतात, न्यायाच्या प्रतिक्षेत गेली 50 वर्षे वाट पहात आहेत त्यांचा उल्लेख अभिभाषणात करण्यास राज्यपाल महोदय का विसरले याचे उत्तर देणार आहात की नाही? भटक्या विमुक्त जातींसाठी विकास महामंडळ आहे. शेळी मेंढी विकास मंडळाचे काल निधी मिळावा म्हणून पोस्टर लागले होते. गेली 25 वर्षे या महामंडळाला निधी दिलेला नाही. सभागृहात उत्तर देताना काल मंत्रीमहोदयांनी सांगितले की, अर्थखात्याने सांगितले आहे की, या महामंडळाला देण्यासाठी निधी नाही. एकीकडे श्री.आर.आर.पाटील, श्री.हसन मुश्रीफ मोठमोठी भाषणे करतात, शेळी मेंढी विकास महामंडळाला 25 कोटी रुपयांचा निधी देऊ म्हणून सांगतात. आमच्या बापूंच्या पुण्यतिथी निमित्त आमचे भाऊ श्री.रमेश शेंडगे यांनी कार्यक्रम आयोजित केला होता. त्या कार्यक्रमात त्यांना खूष करण्यासाठी सन्माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांनी 50 कोटी रुपये देऊ असे रेकॉर्डवर सांगितले. परंतु निधी नाही. फक्त गाडी घ्या आणि फिरा. एका धनगराचा विकास नाही, एकाही मेंढीचा विकास नाही. भटक्या विमुक्तांसाठी वसंतराव नाईक विकास महामंडळ स्थापन केले त्याची काय अवस्था आहे? स्व.शिवाजीबापू शेंडगे यांनी 25 वर्षात टाचा झिजविल्या, बूट झिजविले, निधी मागूनही एक नया पैसा दिला नाही. आतापर्यंत या महामंडळाला वेगवेगळया माध्यमातून 195 कोटी रुपये देण्याची घोषणा सरकारकडून झाली. कधी 50 कोटी, कधी 45 कोटी, कधी 25 कोटी अशाप्रकारे एकूण 195 कोटी रुपये सरकारकडून येणे अपेक्षित आहे. मौलाना आझाद विकास महामंडळाला शासनाने 50 कोटी रुपये दिले. मग भटक्या विमुक्तांसाठी असलेल्या वसंतराव नाईक विकास महामंडळाला निधी का दिला जात नाही? तिजोरीची चावी यांच्यासाठी सुध्दा फिरवा. सर्वांना समान न्याय द्या. मौलाना आझाद महामंडळाला निधी देता तसा ओबीसी विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, दलितांसाठी असलेल्या विकास महामंडळाला निधी द्या. चौंडी क्षेत्र विकासासाठी 8 वर्षे होऊनही निधी दिला नाही. 2 कोटी रुपये मागील बजेटमध्ये जाहीर केले परंतु अद्याप निधी दिला गेला नाही. 5 कोटी रुपयांचे नवीन शिल्प चालू केले, ते केव्हा तयार होणार हे माहिती नाही.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.संजय केळकर)** ...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ 16:30

श्री.प्रकाश शेंडगे.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी वरळी सागरी सेतूचा उल्लेख केला. 362 कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प आज 1634 कोटी रुपयांवर जाऊन पोहोचला. मी एका अधिवेशनात प्रश्न विचारला होता. 400 कोटी रुपयांचा प्रकल्प 1600 कोटी रुपयांवर कसा पोहोचला? तत्कालीन मंत्री श्री.अनिल देशमुख यांनी उत्तर दिले होते की, माहीम येथील कोळी बांधवांनी आंदोलन केले म्हणून हा प्रकल्प 400 कोटी रुपयांवरुन 1600 कोटी रुपयांवर पोहोचला. कोळी समाजाने आंदोलन केले म्हणून 800 कोटी रुपयांचा फायदा ठेकेदाराचा झाला. त्यापेक्षा निम्मी रक्कम कोळी बांधवांना दिली असती तर त्यांनी त्यांची जाळी आणि होड्या सरकारकडे जमा केल्या असत्या आणि त्यांना मिळालेल्या पैशातून बसून खाता आले असते. यामध्ये कोण सुखी झाला? ठेकेदार सुखी झाला. याबाबतची माहिती पटलावर ठेवतो म्हणून सांगितले होते, अद्याप ती माहिती पटलावर आलेली नाही. 400 कोटी रुपयांचा प्रकल्प 1600 कोटी रुपयांवर कसा गेला याची माहिती पटलावर ठेवावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो आणि या विषयावर खेद व्यक्त करुन माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र, जय मल्हार.

--------

3एच.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी कालपासून बोलण्याची संधी मागत आहे, ती आज मला मिळाली त्याबद्दल मी प्रथमत: आपल्याला धन्यवाद देते.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलत असताना मी काही मुद्दे मांडणार आहे. मार्च, 2009 मध्ये ज्यावेळी माननीय राज्यपालांनी आपले विचार मांडले त्यावेळेस राज्यातील खास करुन मुंबई शहरातील वातावरण एका वेगळ्याच वळणावर होते. चार दिवसांचे ते अधिवेशन होते. देशात आपल्या राज्याचा सहावा क्रमांक असला तरी इतर राज्याकडे आपण जेव्हा पाहतो तेव्हा कोणाचे सरकार त्या राज्यात आहे आणि ते सरकार काय करते हा विचार करीत नाही तर केवळ दृष्टीक्षेप टाकला तरी मला वाटते की, आपल्या राज्यात आपण बऱ्याच अंशी सुखी आहोत, प्रगतीकडे जाणारे आपले राज्य असून ते प्रगती देखील करीत आहे असे दिसून येते. नोव्हेंबरच्या 26 तारखेला मुंबईवर जो हल्ला झाला, वास्तविक असे हल्ले होता कामा नये परंतु दुर्दैवाने हा हल्ला या शहरावर झाला त्या अनुषंगाला मला एका गोष्टीची आठवण करुन द्यावीशी वाटते की या शहरातून खऱ्या अर्थाने आतंकवादाला सुरुवात झाली. या देशाचे पंतप्रधान माननीय अटलबिहारी वाजपेयी असताना संसदेवर सुध्दा आतंकवाद्यांनी हल्ला करण्याचे धाडस केले होते हे कशाचे द्योतक समजावयाचे ? या देशाचे तत्कालीन संरक्षण मंत्री कंदहारला आतंकवाद्यांना सोडविण्यासाठी 200 करोड रुपये घेऊन जातात हे कशाचे द्योतक समजावयाचे ? या निमित्ताने मी अशी सूचना करु इच्छिते की, दहशतवादाला तोंड देताना आपण सगळ्यांनी एकत्र होणे ही काळाजी गरज आहे, असे मला वाटते. धारातीर्थी पडलेला मग ते अधिकारी असो अथवा सामान्य जनता असो अथवा एखादा पोलीस शिपाई असो ही सगळी माणसेच आहेत आणि माणसांचा जीव गेला. त्यात कोणी काय काम केले आणि काय केले यापेक्षा आपण सर्वांनी मिळून जबाबदारीने काय करायला हवे हा माझा मुद्दा आहे. दुसरा उल्लेख असाही करण्यात आला की, गडचिरोलीमधील धानोरा येथे नक्षलवाद्यांनी हल्ला केला व त्यात पोलीस अधिकारी व शिपाई मारले गेले, त्यात आपलेही काही चुकले असेल की आदिवासी वस्तीमध्ये आवश्यक रस्ते, शिक्षण, पाणी इ. समस्या सोडविण्यासाठी कुठे तरी मागे पडलो, असेही कदाचित असेल. पण याचा अर्थ असा नाही की, आपण सगळीकडेच हाहा:कार घेऊन मोकळे आहोत.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई...

सभापती महोदय, चांगल्याला चांगले म्हणण्याची वृत्ती माणसामध्ये असावयास पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, शहीद जवानांना अभिवादन करुन मी माझा दुसरा मुद्दा मांडते. माझा दुसरा मुद्दा असा आहे की, मी मुंबई शहरामध्ये गेल्या 20 वर्षापासून राजकारण करीत आहे. 1995 मध्ये महाराष्ट्र राज्यात सत्तांतर झाले. सत्तांतर झाल्यानंतर कोणता पक्ष सत्तेवर आला याबाबत मी येथे चर्चा करणार नाही. 1995 नंतर मुंबई शहरातील जो कामगार होता तो पूर्णपणे उद्ध्वस्त झाला, देशोधडीला लागला ही वस्तुस्थिती आहे. सत्तांतर झाल्यामुळे मुंबईतील गिरणी कामगाराला त्याची प्रगती करता आली नाही. मुंबई शहर हे औद्योगिक शहर म्हणून गणले जाते. परंतु 1995 ते 2000 सालापर्यंत येथील गिरण्या बंद पडल्या, गिरणीत काम करणारे कामगार देशोधडीला लागले. त्यावेळी जे राज्यकर्ते होते त्यांनी गिरण्यांच्या जमिनी आपल्या ताब्यात घेतल्या आणि त्यांच्या मुलांनी बिल्डर म्हणून आपल्या नावाचे बोर्ड लावले. प्रिमिअरच्या रस्त्यावरुन गेलो तर आपल्याला सर्व वस्तुस्थिती दिसून येईल. सभापती महोदय, माझा जन्म लालबाग येथे झालेला असल्यामुळे मुंबई शहराची इत्थ्यंभूत माहिती मला आहे. फिनिक्स मिल होती त्या ठिकाणी सुध्दा त्यावेळच्या राज्यकर्त्यांच्या मुलांच्या नावाने लावलेले बिल्डरांचे बोर्ड आपल्याला पहावयास मिळतील. ज्यावेळेस आपण दुस-याकडे एक बोट करतो त्यावेळेस आपल्याकडे चार बोटे असतात याचा आपण विसर पडू देऊ नये एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मी फार मोठे भाषण न करता एकच मुद्दा मांडणार आहे. या ठिकाणी मी मुंबई महानगरपालिकेच्या संदर्भात एक ठराव वाचलेला आहे. आपल्याला मुंबई शहराचे शांघाय करावयाचे आहे. मुंबई शहराला शांघाय करावयाचे असल्यामुळे केंद्रसरकारने महाराष्ट्र सरकारला मुंबई शहरासाठी आर्थिक पॅकेज द्यावयास पाहिजे. उद्योगधंदे बद झालेले आहेत. आज मोठ मोठया इमारती मुंबईमध्ये उभ्या राहत आहेत. या मोठ मोठया इमारतींना लागणारे पिण्याचे पाणी, वीज, अंडर ग्राऊंड ड्रेनेज यासाठी आपल्याला मोठया प्रमाणात पैसा खर्च करावा लागणार आहे. मी मुंबई महानगरपालिकेत काम केलेले आहे त्यामुळे मला मुंबई महानगरपालिकेची संपूर्ण

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई...

माहिती आहे. या ठिकाणी बसलेले सन्माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी महापालिकेत ज्या प्रमाणे काम केलेले आहे त्याच प्रमाणे मी सुध्दा मुंबई महानगरपालिकेत काम केलेले आहे. मुंबई शहराचे नाव संपूर्ण देशात एक नंबरवर होते त्या मुंबई महानगरपालिकेची आजची अवस्था काय आहे, या महानगरपालिकेला आज कोठे आणून ठेवले आहे हे पहाण्याची गरज आहे. काही वर्षापूर्वी मुंबई महानगरपालिका दुस-यांना पैसे देत होती त्याच महापालिकेला आज दुस-याकडून पैशांची मदत घ्यावी लागत आहे. राज्यशासनाने मुंबई महानगरपालिकेला आर्थिक मदत जरुर केली पाहिजे असे मलाही वाटते. कारण मी स्वत: मुंबई महापालिकेत 20 वर्षे काम केलेले आहे. आज मुंबई शहराची अवस्था अत्यंत वाईट झालेली आहे. आज मुंबई शहरात चालण्यासाठी साधे चांगले रस्ते सुध्दा नाहीत. मुंबईतील सर्व रस्त्यांना खड्डे पडलेले आहेत. यासंदर्भात मी आपल्याला एवढेच सांगेन की, मुंबई महानगरपालिकेला आघाडी सरकारने आर्थिक मदत केली पाहिजे अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या मोठया दवाखान्यात जनतेला चांगल्या प्रकारच्या आरोग्याच्या सुविधा मिळत नाहीत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ...

के..इ.एम. हॉस्पिटल हे महानगरपालिकेतर्फे चालविण्यात येत असून त्या हॉस्पिटलची अवस्था अत्यत दयनीय आहे. त्या हॉस्पिटलमध्ये जर पेशंटला नेले तर तो व्यवस्थित बरा होऊन हॉस्पिटलच्या बाहेर येईल किंवा नाही अशा प्रकारची शंका त्याच्या कुटुबियांना वाटते.ग्रामीण भागात जे हॉस्पिटल्स आणि लहान लहान दवाखाने आहेत त्यांची सुध्दा अशीच अवस्था आहे. सेंटस जॉर्जेस हॉस्पिटलचीसुध्दा अशी अवस्था आहे किंवा नाही हे मला माहीत नाही. परंतु त्या ठिकाणी जाऊन मी माहिती घेईन. विंचू चावला किंवा साप चावला की त्या व्यक्तिला औषधोपचार मिळत नाही असे मी म्हणणार नाही. परंतु एखाद्या व्यक्तिला जो आजार असेल त्याला त्यावरचे औषधे त्या ठिकाणी मिळाली पाहिजेत.. देश स्वातंत्र्य होऊन 60 वर्षे झालेली आहेत अशा वेळी तेथे अशी परिस्थिती असेल तर ते सुध्दा आपल्याला भूषणावह नाही. परंतु सगळयाच ठिकाणी औषधे नाहीत असे कोणी म्हणता कामा नये. शहरामधील हॉस्पिटलमध्ये पूर्वी जी चांगली सोय होती ती आता कोठे गेली याचा सुध्दा शोध घेतला पाहिजे आणि त्या ठिकाणी सर्व पेशंटना वैद्यकीय सुविधा देण्याच्या बाबतीत शासनाने कटिबध्द असले पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी आपल्या भाषणात अमुक सागितलेले आहे वा तमुक सांगितलेले आहे असे मी या ठिकाणी पुन्हा पुन्हा सांगणार नाही. या ठिकाणी शेवटचा एक मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. मुंबई आणि ठाणे शहरामध्ये ज्या प्रमाणे खाजगी इमारती आहेत त्याप्रमाणे काही हॉसिग बोर्डाच्यासुध्दा इमारती आहेत. त्या बिल्डींगची रिपेअर करण्याकरिता किंवा नव्याने बांधण्याकरिता 300 चौरस फुटाच्या बांधकामाची परवानगी देण्याबाबत शासनाने एक जी.आर. काढला होता परंतु अजून त्या जी.आर.ची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे या संदर्भात आमच्या समोर नेहमीच प्रश्न उपस्थित राहतात तेव्हा या ठिकाणी केवळ भाषणे करुन आणि ते दफतरी दाखल करुन घेण्या पेक्षा या संदर्भात जो काही निर्णय घेण्यात आला आहे तो लवकरात लवकर कसा कार्यान्वित होईल हे पाहण्याची अत्यंत गरज आहे. मुंबई शहरामध्ये एकूण 54 हौसिंग बोर्डाच्या कॉलनीज असून त्या ठिकाणच्या घरांची जी दुरावस्था आहे संपवली पाहिजे व त्या दृष्टीने शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशी शासनाला विनंती करुन मी माझे भाषण संपविते. धन्यवाद.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MAP/ प्रथ्म श्री.जुन्नरे

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त): सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्याकरिता मी येथे उभा आहे. माननीय राज्यपालांनी केलेले भाषण आपण ऐकल्यानंतर आणि वाचल्यानंतर एक गोष्ट प्रकर्षाने सर्वाना जाणवली की, संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे लागले आहे. लोकशाही असलेला हा जगातील सर्वात मोठा देश आहे. या देशामध्ये अतिशय वेगाने आणि समर्थपणे आपले राज्य प्रगती करीत आहे आपल्या राज्याच्या प्रगतीच्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात अतिशय चांगल्या प्रकारचल प्रतीमा उमटली असल्याचवे आपणा सर्वांना दिसून येत आहे. आपल्या राज्याने केलेल्या प्रगतीकडे संपूर्ण जगाचे आणि देशातील इतर राज्याचे लक्ष लागलेले आहे. महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर याच्या विचाराच्या माध्यमातून पुरोगमी महाराष्ट्राची कशी जडणघडण होत आहे आणि हे राज्य या मार्गाने पुढे जात असतांना सर्व क्षेत्रामध्ये कशी प्रगती करीत आहे हे पहात असतांना दिनांक 26.11.2008 रोजी मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला .

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. गायकवाड नंतर --- 16:50

श्री. रमेश शेंडगे ...

आणि पुन्हा एकदा तुम्हा-आम्हा सर्वांवर एक फार मोठे संकट कोसळले. संपूर्ण देशामध्येच नाही तर जगामध्ये अशा प्रकारचा हल्ला करून मुंबई शहर, महाराष्ट्र राज्याची राजधानी असलेले हे शहर कसे महत्त्वाचे आहे हे दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण जगाला कळायला लागले आणि या शहरावर एवढा प्रखर हल्ला झाल्यानंतर आता हे शहर, हे राज्य याला कसे सामोरे जाणार, यातून पुन्हा उभारू शकते की नाही हे पाहत असताना या महाराष्ट्र राज्याने देशालाच नव्हे तर जगाला दाखवून दिलेले आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांचा हा महाराष्ट्र अनेक वर्षांपासून अनेक आपत्तींना आजवर सामोरे गेलेला आहे. कोठल्याही संकटाला कधीही न डगमगता, नेहमीच हिमालयाच्या मदतीला सह्याद्री जाणारा, असा हा इतिहास जपणारा तुमचा महाराष्ट्र अशा प्रकारच्या भ्याड हल्ल्याला देखील कणखरपणे सामोरे गेला की संपूर्ण जगाने त्याची वाहवा केली. या हल्ल्यात हेमंक करकरे, अशोक कामटे, साळसकर, शशांक शिंदे, तुकाराम ओंबळे यांच्या सारखे आपले अनेक पोलीस अधिकारी आणि कर्मचारी कामी आले. पण राज्य सरकारने या दहशतवादी हल्ल्यामध्ये ज्यांनी हौतात्म्य पत्करले, त्यांच्या कुटुंबियांना असेल, त्यांच्या नातेवाईकांना असेल किंवा त्यांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील जनतेला हे दाखवून दिले आहे की, अशा प्रकारे हल्ला करून आमच्या कितीही मोठ्या अधिकाऱ्यांना आणि जनतेला नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न केला तरी हे राज्य सरकार कायमच त्यांच्या पाठीशी राहील. पिढ्यान् पिढ्या त्यांचे संगोपन व्हावे, त्यांना आधार मिळावा म्हणून आम्ही ठामपणे त्यांच्या पाठीशी उभे आहोत हे दाखवून दिले. त्यामध्ये मग त्यांना देण्यात आलेले 25 लाख रूपयांचे सानुग्रह अनुदान असेल वा त्यांना मोफत घर दिले असेल वा त्यांच्या मुलांना मोफत शिक्षण असेल या माध्यमातून राज्य सरकारने केलेली कामगिरी असेल किंवा त्यांना दिलेली चार अशोक चक्र असतील, 4 कीर्तीचक्र, 12 राष्ट्रपती शौर्यपदके असतील वा 21 पोलीस शौर्यपदके दिली असतील., अशा प्रकारे त्यांच्या कुटुंबियांचा गौरव करून आम्ही दाखवून दिलेले आहे की, झालेला हल्ला आम्ही जेवढ्या तीव्रतेने आम्ही परवून लावला आणि त्यावेळी तुकाराम ओंबळे सारख्या पोलीस कर्मचाऱ्याने स्वत:च्या पोटात अतिरेक्याच्या स्टेनगनमधून येणाऱ्या शेकडो गोळ्या झेलल्या पण कसाब सारख्या अतिरेक्याला जीवंत पकडण्यास मदत केली. त्यासाठी त्याने स्वत:च्या प्राणाची आहुती दिली. म्हणून अशा प्रकारे आपण जात असताना संपूर्ण देशाला, जगाला वाटू लागले होते की, या राज्याची जी औद्योगिक

...... 3के 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. गायकवाड नंतर --- 16:50

श्री. रमेश शेंडगे .....

प्रगती होत आहे, त्यासाठी देशातूनच नव्हे तर परदेशातून देखील या राज्यामध्ये मोठी आर्थिक गुंतवणूक येऊ लागली होती, ज्या माध्यमातून जगामध्ये अमेरिका आणि ब्रिटन सारख्या महा आर्थिक सत्ता मागे पडून या जगामध्ये भारत आणि चीन हे दोन देश आर्थिकदृष्टया पुढारलेले व्हायला लागले होते. म्हणून अशा भ्याड हल्ल्यानंतर कदाचित आपली आर्थिक आणि औद्योगिक प्रगती खुंटते किंवा काय, या राज्यातील गुंतवणूक कमी होते काय ? अशा प्रकारचे वैचारिक घोळ सर्व देशात व जगामध्ये सुरू झाला होता. सभापती महोदय, मी आपले लक्ष वेधू इच्छितो की, ज्यावेळेस आपल्या मुंबईवर भ्याड हल्ला झाला तेव्हा त्या हल्ल्याचा निषेध संपूर्ण जगातून होत होता, पण एक बलाढ्य आर्थिक सत्ता असणाऱ्या देशाने मात्र वेगळेच जाहीर केले होते. कारण त्याने पाहिले होते की, या राज्यात, या देशामध्ये मोठ्या प्रमाणात परकीय गुंतवणूक चालली आहे, आर्थिक महासत्ता होण्याकडे हे राज्य आणि हा देश वाटचाल करीत आहे म्हणूनच हा भ्याड हल्ला झाल्यानंतर त्या देशाने जाहीर केले की, या जगातील सगळ्यात धोकादायक अशा 20 देशांमध्ये भारत देशाचा नंबर लागतो. या भ्याड हल्ल्यानंतर सर्व जगाला चिंता वाटू लागली होती की, या देशात, या राज्यात गुंतवणूक करावी की नाही ? या देशात पैसा गुंतवावा की नाही ? अशा प्रकारे होत असताना देखील हे राज्य, हा देश या साऱ्याला सामोरे गेले आणि पुन्हा एकदा, आज आपण पाहिले की, या राज्यात परत एकदा मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक होऊ लागली आहे. राज्यात एसइझेडच्या माध्यमातून दिलेल्या सवलती असतील वा उद्योगधंद्यांना औद्योगिकीकरण करण्यासाठी म्हणून दिलेल्या सोयी-सवलती असतील. या माध्यमातून पुन्हा एकदा हे राज्य या आघाडी सरकारच्या योजनांमुळे आणि प्रयत्नांमुळे अग्रक्रमाने प्रगती करीत असलेले दिसत आहे. ..

( यानंतर श्री. सरफरे .....3एल 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

1 लाख 80 हजार 734 कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे, आणि 65 लाख रोजगार मिळणे अपेक्षित आहे व त्यामधून आपल्या राज्यात औद्योगिक घोडदौड मोठया प्रमाणात सुरु आहे. शैक्षणिक क्षेत्रामध्ये युपीएससी, एमपीएससीच्या परिक्षेच्या माध्यमातून राज्यातील काही विद्यार्थी चांगल्या प्रकारचे यश प्राप्त करीत आहेत. शैक्षणिक सोयी सवलतीच्या बाबतीत कायम मागास राहिलेल्या, पिछाडीवर राहिलेल्या वर्गाचा अभ्यास करुन व त्याची माहिती घेऊन वेगवेगळया जातीमधील अल्पसंख्यांक असलेल्या 55 हजार 200 विद्यार्थ्यांना वेगवेगळया सोयी सवलती पहिल्यांदा शासनामार्फत दिल्या जात आहेत. परदेशामध्ये जाऊन उच्च शिक्षण घेणे किंवा उच्च शिक्षण घेऊन चांगल्या मोठया नोक-या मिळविणे ही काही बोटावर मोजणाऱ्या समाजातील लोकांची मक्तेदारी होती. याचा अभ्यास करुन राज्य सरकारने दलित, अल्पसंख्यांक, पददलित बांधवांना सुध्दा परदेशामध्ये जाता आले पाहिजे. त्यांच्या बौध्दिक पातळीची क्षमता पाहून त्यांना परदेशामध्ये मोफत उच्च शिक्षण दिले जात आहे त्याचे श्रेय फुले, आंबेडकर, शाहू महाराजांच्या विचाराने काम करणाऱ्या आघाडी सरकारला जाते म्हणून त्याचे कौतुक करावेसे वाटते. सभापती महोदय, पददलित, मागासवर्गीय बांधवांबाबत विचार करीत असतांना मुंबई शहरामध्ये जी गोरगरीब जनता रहाते त्यांचाही आपण विचार केला आहे. या शहरामध्ये आज घरेलु कामगार महिन्याला हजार ते दीड हजार रुपये कमावीत आहे. त्यांना कोण्त्याही प्रकारचे संरक्षण मिळत नव्हते. म्हणून या सरकारने निर्णय घेतला की, घरेलू कामगार भगिनी आहेत, पुरुष घरेलू कामगार म्हणून काम करीत आहेत त्यांना संरक्षण मिळाले पाहिजे. त्यांना माणूस म्हणून जगता आले पाहिजे, त्यांना सोयी सवलती मिळाल्या पाहिजेत. म्हणून शासनाने महाराष्ट्र घरेलू कमगार कल्याण मंडळ या राज्यात पहिल्यांदाच निर्माण करुन त्यांना चांगल्या प्रकारे संरक्षण देण्यात आले आहे. सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामधून एक गोष्ट जाणवते की, खऱ्या अर्थाने या राज्याने संपूर्ण देशामध्ये सर्व क्षेत्रात प्रगती केली आहे. तसेच, सर्व समाज घटकांना बरोबर घेऊन प्रगती कशी करता येईल याचा अभ्यास करुन कठोर निर्णय घेतले आहेत. म्हणून राज्यातील काही नेते मंडळी केंद्राच्या मंत्रिमंडळामध्ये प्रतिनिधीत्व करीत असल्यामुळे आज जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान अंतर्गत देशातील ज्या राज्यांना निधी मिळाला त्या सर्व राज्यामध्ये जास्तीत जास्त निधी आपल्या राज्य सरकारने केंद्र सरकारकडून मिळविला आहे. त्या अंतर्गत 11

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/ MAP/ KGS/

श्री. रमेश शेंडगे...

हजार 478 कोटींचे 77 प्रकल्प मंजूर करुन घेतले आहेत. आपण जर मागे वळून पाहिले तर या राज्यात असलेले आघाडी सरकार किंवा केंद्रात असलेले युपीए सरकार या व्यतिरिक्त इतर जी सरकारे काम करीत आहेत त्यामध्ये एवढया मोठया प्रमाणात निधी या राज्य सरकारला या माध्यमातून मिळाला नव्हता. एकूण निधीच्या एक तृतियांश इतका निधी या राज्याला पहिल्यांदा मिळाला आहे. सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये शेतावर काम करणारा जो शेतकरी वर्ग आहे त्याच्यावर देशातील 65 टक्के जनता अवलंबून आहे. त्या शेतकऱ्यासाठी हे शासन विविध योजना राबवीत आहे. त्यामध्ये आपण पाहिले तर शेतकऱ्याच्या उत्पन्नामध्ये वाढ झाली आहे, त्याच्या शेतमालाला योग्य दर मिळत आहे. त्याचबरोबर त्याच्याकरिता केंद्र सरकारच्या माध्यमातून 7 हजार 872 कोटींची कर्जमाफी या सरकारने मिळविली आहे. केंद्र सरकार जर एवढया मोठया प्रमाणावर कर्ज माफ करीत आहे तर मग आमचे सरकार सुध्दा त्यामध्ये कमी पडलेले नाही हे मला याठिकाणी मुद्दाम नमूद केले पाहिजे. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेबांनी पहिल्यांदा या देशामध्ये ऐतिहासिक निर्णय घेतला आणि या देशातील सर्व शेतकऱ्यांना 71 हजार कोटींपेक्षा जास्त कर्जमाफी मिळवून दिली. तसेच, या राज्यातील शेतकऱ्यांना 7 हजार 872 कोटींची कर्जमाफी मिळवून दिली. केंद्र सरकारने दिलेल्या निधीमध्ये राज्य सरकारचा सुध्दा हिस्सा असला पाहिजे. म्हणून या आघाडी सरकारने त्याबाबत एक पाऊल पुढे टाकून राज्य सरकारचे 6208 कोटी रुपये असे मिळून 14 हजार 80 कोटी रुपयांची कर्जमाफी दिलेले या देशातील हे पहिले राज्य आहे असे मी याठिकाणी नमूद करतो.

सभापती महोदय, पशू संवर्धनाच्या बाबतीत सांगितले पाहिजे की, पशुसंवर्धन हा सुध्दा एक शेतीमधील घटक व्यवसाय आहे. माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये पशुसंवर्धन हा शेती पूरक व्यवसाय असल्याचे नमूद केले आहे.

(यानंतर सौ रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/SBT/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:00

श्री.रमेश शेंडगे . . . .

मला पशु संवर्धनाच्या बाबतीत सांगावेसे वाटते की, वेगवेगळया प्रकारे योजना राबवित असताना सुध्दा गाई,म्हशी,शेळी,मेंढी इ.जनावरांची संख्या वाढली पाहिजे यासाठी त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. इतर घटकांकडे लक्ष देत असताना, शेळी-मेंढी व्यवसाय असेल, भटके-विमुक्त जमातीचे लोक व्यवसाय करीत असतील, त्यांच्याकडे देखील लक्ष द्यावयास पाहिजे. आज आदिवासी असतील, दलित बांधव असतील, एस.सी.,एस.टी.असतील, या लोकांसाठी चांगल्या प्रकारे नियोजन करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे ओ.बी.सी., भटके आणि विमुक्त जमातीच्या लोकांसाठी सुध्दा चांगल्या प्रकारचे नियोजन करणे आवश्यक आहे. मग शेळी-मेंढीच्या व्यवसायावर अवलंबून असणारा शेतकरी असेल, मैला वाहून नेणारा असेल, धनगर समाज असेल किंवा बाकीचा समाज असेल तर त्यांच्यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यांच्या मनामध्ये एक प्रकारची सुरक्षिततेची भावना निर्माण करणे आवश्यक आहे. आघाडी सरकारने ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांची शिल्पसृष्टी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची शिल्पसृष्टी तसेच कै.अण्णाभाऊ साठे यांची शिल्पसृष्टी साकारली, त्याचप्रमाणे आमच्या मागणीला दाद दिली. चौंडी येथे अहिल्याबाई होळकर यांचे जन्मगाव आहे. त्यासाठी दोन कोटी रुपये मंजूर केले असून त्या माध्यमातून तेथेही शिल्पसृष्टी उभारण्याचे काम सुरु झालेले आहे. 31 मे रोजी अहिल्याबाई होळकर यांची जयंती झाली, त्यावेळी आम्ही तेथे जाऊन कामाचे स्वरुप पाहिलेले आहे. सन्माननीय मंत्री श्री.विजयसिंह मोहिते-पाटीलसाहेब, सन्माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटीलसाहेब, सन्माननीय सदस्य श्री.बबनराव पाचपुतेसाहेब यांच्या उपस्थितीत तेथील कामाचे उद्‌घाटन करण्यात आले आहे.या कामासाठी जिल्हा परिषदेकडे दोन रुपये वर्ग झाल्याचे तेथील सभापतींनी मला 31 तारखेला सांगितले आहे. अशा प्रकारे काम करीत असताना सुध्दा वेगवेगळे जे समाजघटक आहेत, त्यांच्या विकासासाठी, त्यांच्या उन्नतीसाठी आपण जास्त प्रमाणात काम करणे आवश्यक आहे,हे देखील मला नमूद केले पाहिजे.सन्माननीय सदस्यांनी शेळी-मेंढी महामंडळाच्या प्लॉटबाबत सांगितले. सध्या मी त्या महामंडळाचा अध्यक्ष आहे. पण त्यापूर्वी या महामंडळाचे दुसरे कोणीतरी अध्यक्ष होते. तेथे त्या अध्यक्षांनी काहीतरी घोटाळे केले असा त्यांचा आरोप आहे. अजून त्यातून काय निष्पन्न झाले आहे हे मला माहिती नाही. परंतु त्यांना अध्यक्ष करावे हे सांगावयास तेच गेले होते असे मला नंतर कळले. पण नंतर त्या अध्यक्षांनी काय घोटाळे केले हे मला माहिती नाही.पण

. . . .3 एम-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे . . . .

त्या अध्यक्षांनी काही घोटाळे केले असतील तर त्यांची जरुर चौकशी करावी.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

जे काही असेल ते. ते खाल्ल्याशिवाय आपले जेवण पूर्ण होत नाही. ते खाल्ल्याशिवाय आपल्याला समाधान लाभत नाही. म्हणून शेळी-मेंढीचा व्यवसाय महत्वाचा आहे. शेळी-मेंढी व्यवसायाच्या माध्यमातून जे मटण मिळत आहे, त्याचा सुध्दा दर वाढत आहे. अशा वेळी जर शेळया-मेंढ्यांची संख्या वाढली नाही तर मटणाचे दर इतके वाढतील की एक दिवस 500 ते 600 रुपये किलो या दराने देखील मटण मिळणार नाही. म्हणून शेळी-मेंढी महामंडळाला निधी मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांशी संबंधित असणारे जे इतर व्यवसाय आहेत, त्यांना सुध्दा मोठया प्रमाणात निधी द्यावा अशी मागणी करतो. सभापती महोदय, मी पुन्हा एकदा माननीय राज्यपाल महोदयांचे त्यांच्या अभिभाषणाबद्दल अभिनंदन करतो आणि आपण मला भाषण करण्यासाठी संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, एकाच घरातील दोन भाऊ असून, खेदपण व्यक्त करीत आहे आणि आनंदही व्यक्त करीत आहे म्हणजे आपल्याकडे केवढी मोठी लोकशाही आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, मी चांगल्या गोष्टीसाठी आनंद व्यक्त केलेला आहे आणि ज्या गोष्टी झालेल्या नाहीत, त्यासाठी खेद व्यक्त केलेला आहे.

-----

. . . .3 एम-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनावणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी मांडलेले विचार आणि त्यांचे अभिभाषण म्हणजे राज्याचा लेखाजोखा होय. आपल्या विचारांना सुरुवात करण्यापूर्वी् त्यांनी आपल्या भाषणामध्ये मुंबईमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या संदर्भात नोंद घेतली. हा हल्ला भ्याड स्वरुपाचा होता. या हल्ल्यामध्ये शहीद झालेले पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचारीह, सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक, कमांडो यांच्यासह अनेक निष्पाप नागरिकांना आपला प्राण गमवावा लागला. या परिस्थितीचा सामना करण्यासाठी शासनाने आणि सामान्य जनतेपासून सर्वांनी हातभार लावला आहे. याबाबतीत शासनाने ज्या काही उपाययोजना केलेल्या आहेत. खरोखरच यामध्ये धारातिर्थी पडलेल्यांच्या कुटुंबाची काळजी घेणे, त्यांना सानुग्रह अनुदान देणे, सदनिकांचे वाटप असेल, मुलांच्या मोफत शिक्षणाच्या संबंधातील विषय असेल इ.गोष्टी अत्यंत योग्य प्रकारे केलेले आहेत. जेणेकरुन या लोकांचे नितीधैर्य वाढविण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे.

यानंतर कु.थोरात .. . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनावणे....

सभापती महोदय,

सर्व प्रकारच्या सवलती देत असताना आणि त्यांना प्रोत्साहीत करीत असताना त्यातून इतरांना चांगला अर्थ घेता येईल अशा पध्दतीचा मदतीचा हात शासनाने दिलेला आहे. परंतु याबाबतची कार्यवाही होत असताना त्यामध्ये कुचराई होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. हा केलेला प्रयत्न निश्चितपणे चांगला आहे. उपाययोजनेच्या संदर्भात निरनिराळया प्रकारची पावले टाकत असताना पोलीस यंत्रणेमध्ये सुधारणा करण्यासाठी प्रशिक्षणाची सोय करणे महत्वाचे आहे. तसेच अत्याधुनिक शस्त्रास्त्रांच्या प्रशिक्षणाची सोय होणे देखील आवश्यक आहे. सभापती महोदय, अतिशय अमानुषपध्दतीने नक्षलवादी हल्ले झालेले आहेत. त्यामध्ये अनेक पोलिसांच्या हत्या झाल्या आहेत. अतिशय निंदनीय असे ते कृत्य आहे. त्याबाबतीत शासनाने ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पर्जन्यमान सातत्याने कमी होत असून पावसाच्या अनियमिततेमुळे पिकांवर होणारा परिणाम, घटनारे उत्पादन, पाणी टंचाई इत्यादी प्रश्न भेडसावत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना आणि नागरिकांना जिवन जगणे असहय होत आहे. या बाबत शासनाने ठोस उपाययोजना करणे ही काळाची गरज आहे.

सभापती महोदय, शेतीच्या संदर्भात शेततळी, जलसंधारणाची कामे व विहिरींचे जल पुनर्भरण इत्यादी कामे मोठया प्रमाणात घेतली तर मला वाटते या पुढच्या काळात अशा कृती कार्यक्रमातून आणि अंमलबजावणीतून निश्चितपणे शेतकऱ्यांना फायदा होईल.

सभापती माहोदय, केंद्र शासनाने आणि राज्य शासनाने कर्जमाफीच्या संदर्भात शेतकऱ्यांसाठी जे पॅकेज दिलेले आहे त्याबाबतीत या ठिकाणी उल्लेख करणे हे माझे कर्तव्य आहे. अतिशय महत्वाची भूमिका केंद्र सरकारने आणि या आघाडी शासनाने घेतलेली आहे. कर्जाची परतफेड नियमितपणे करणाऱ्या शेतकऱ्यांना देखील अशा प्रकारचे पॅकेज मिळाले पाहिजे अशी सर्व सामान्य शेतकऱ्यांची मागणी होती. केंद्र सरकारने आणि राज्य सरकारने 78 लाख शेतकऱ्यांना 14 हजार 80 कोटी रुपयांचे कर्ज माफ करुन एक चांगले काम केलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चैतन्य निर्माण झालेले आहे. नवीन पतपुरवठा सुरु झालेला असून शेतकरी जोमाने कामाला लागलेला आहे. शासनाचे हे स्पृहणीय असे काम आहे. तसेच नवीन सावकारी कायद्यामुळे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MMP/

श्री. दिलीपराव सोनावणे

निश्चितच शेतकरी सावकाराच्या पिळवणुकीतून वाचेल. हे सरकारचे अतिशय चांगले असे पाऊल आहे. मी याबाबतीतही सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, गेल्या वर्षी कापूस उत्पादकांना चांगल्या प्रकारचा भाव दिल्यामुळे शेतकरी समाधानी झालेले आहेत. त्यामुळे कापूस लावण्याकडे शेतकऱ्यांचा कल आहे.परंतु त्यांना चांगल्या प्रकारचे बी.टी. वाण मिळणे, फवारणीसाठी चांगल्या प्रकारच्या औषधांचा पुरवठा होणे तसेच मुबलक प्रमाणात खतांचा पुरवठा होणे गरजेचे आहे. पण त्यासाठी लागणाऱ्या सोयीसुविधा शेतकऱ्यांना मिळत नाहीत ही चिंतेची बाब आहे. याबाबतीत त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांना पावसाच्या लहरीपणावर अवलंबून रहावे लागते. त्यामुळे शेतकऱ्याला शेतीचा उत्पन्नाचा मेळ बसत नाही. त्यामुळे शेतकरी हवालदिल होतो नैराश्याकडे जातो यासाठी सिंचन व्यवस्थेमध्ये वाढ करणे अत्यंत आवश्यक आहे. गेल्या वर्षीच्या तलुनेत या वर्षी सिंचनाच्या बऱ्याचशा सोयी निर्माण झालेल्या आहेत. या अर्थसंकल्पातील तरतुदींमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. ठिबक सिंचन पध्दती, स्प्रिंकल सिंचन पध्दती, आधुनिक शेती अवजारे व यांत्रिक उपकरणेशेतकऱ्यांना अनुदान देऊन उपलब्ध करुन दिली तर शेतकऱ्यांना त्याचा निश्चितपणे फायदा होईल. सभापती महोदय, यासंदर्भात भरीव अशा मदतीची आवश्यकता आहे. पुरक व्यवसायामध्ये दुग्ध व्यवसाय, पशु संवर्धन या क्षेत्रामध्ये देखील भरीव तरतुद उपलब्ध झाली पाहिजे. महिला बचत गटाना स्वंय रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात या शासनाने भरीव असे काम केलेले आहे. या महिला बचत गटांना बाजार पेठेची उपलब्धता आणि जास्त कर्ज उपलब्ध करुन दिले तर निश्चितपणे त्याचाही शेतकऱ्यांना फायदा होईल.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनावणे ....

सभापती महोदय, या ठिकाणी निश्चितपणे एक गोष्ट सांगावीशी वाटते की, खादी ग्रामोद्योगाच्या माध्यतातून रोजगारासाठी बेरोजगारांना कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. त्या माध्यमातून त्या ठिकाणी व्यवसाय चालतो परंतु शासनाच्या काही धोरणामध्ये आवश्यक असे बदल होणे आवश्यक आहे. अशा स्वयंरोजगार आणि बेरोजगारांच्या व्यवसायामधून निर्माण झालेल्या वस्तूंना जकात करात माफी दिली पाहिजे. काही ठिकाणी जकात कर घेतला जातो परंतु ज्या ठिकाणी कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने करार होतो अशा लोकांना मात्र अनावश्यक किंवा त्यांच्या उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करावा लागतो. ते कमी झाले तर निश्चितपणे चांगले होईल.

सभापती महोदय, शिक्षणाबरोबरच संगणकाचे शिक्षण देणे आवश्यक आहे.त्यासाठी जास्तीत जास्त शाळा कॉलेजेसमधून अशा प्रकारच्या संगणक शिक्षणाची सोय करण्याची तरतूद झाली तर निश्चितपणे त्याचा उपयोग होईल. नवीन उद्योग व रोजगाराची संधी युवकाना उपलब्ध करुन दिली तर निश्चितपणे त्याचा चांगला परिणाम होईल. आरोग्य सेवेच्या संदर्भात निश्चितपणे काही गोष्टी होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागामध्ये तज्ज्ञ डॉक्टर्स कशा पध्दतीने उपलब्ध करुन देता येतील, त्याची राहण्याची सोय तसेच ग्रामीण भागात आरोग्याच्या सुविधा मिळण्याच्या दृष्टीने देखील प्रयत्न करणे आवश्यक आहे. बालमृत्यू आणि कुपोषित बालकांच्या संदर्भात वैद्यकीय सेवेचा जो अभाव आहे तो पूर्ण करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाची जी एनआरएचएम योजना आहे त्याचा लाभ राज्य सरकारने घेतला पाहिजे. एनआरएचएम योजनेचा जास्तीत जास्त निधी कसा मिळविता येईल यासंदर्भात प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसे झाले तर निश्चितपणे त्याचा फायदा होईल. शिक्षणामध्ये आर्थिकदृष्ट्या मागास, अल्पसंख्यांक समाजातील इयत्ता पहिली ते दहावीच्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती देण्याचा चांगला प्रयत्न शासनाने केलेला आहे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या पालकांच्या मुलाना ती सवलत उपलब्ध करुन दिली तर चांगले होईल. पायाभूत सोयी, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, पोषण आहार अशा प्रकारच्या विविध योजना जर मुलांसाठी राबविल्या गेल्या तर ग्रामीण भागातील मुलांना पुढे जाण्यासाठी चांगली मदत होईल.

सभापती महोदय, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमूख शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. के.जी. ते पी.जी. पर्यंत शिष्यवृत्ती दिली तर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/

श्री. दिलीपराव सोनावणे ......

त्याचा चांगला परिणाम होईल. माध्यमिक विभागासाठी जास्तीत जास्त पैशाची तरतूद झाली तर त्याचा देखील चांगला फायदा होईल. अलीकडे केवळ श्रीमंतांच्या मुलांनीच परदेशात शिक्षण घ्यावे अशी परिस्थिती राहिलेली नाही. शासनाने या ठिकाणी निश्चितपणे चांगली योजना आणली आहे. मागासवर्गीय पालकांच्या पाल्यांना परदेशात पाठविण्यासाठी शिष्यवृत्ती तसेच त्यांना कर्ज देण्याची पध्दत या ठिकाणी सुरु केलेली आहे. त्याचा निश्चितपणे फायदा होईल आणि या समाजातील मुलांनी पुढे जाण्यासाठी या निमित्ताने चांगला प्रयत्न होत आहे.

सभापती महोदय, इंदिरा आवा योजनेच्या संदर्भात ग्रामीण आणि शहरी भागामध्ये जास्तीत जास्त अनुदान मिळाले पाहिजे. त्यादृष्टीने आवश्यक ती तरतूद केली पाहिजे. निश्चितपणे त्याचा सर्वांना फायदा मिळेल. आघाडी सरकारने आदिवासी बांधवांच्या प्रगतीसाठी, त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी चांगली सोय केली आहे. तसेच इतर मागासवर्गीय, अल्प उत्पन्न असलेल्या, आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या घटकांच्या संदर्भात सुध्दा त्यांचे आर्थिक उन्नयन करणे आवश्यक आहे. विजेच्या संदर्भात निश्चितपणे लोडशेडींग कमी करणे आवश्यक आहे. शेतीसाठी वीज पुरवठा करणे आवश्यक आहे. सिंचनाच्या संदर्भात आमच्या भागामध्ये पाडळसे धरणातून पाण्याची सोय होऊ शकते. त्या धरणाच्या बाबतीत पैसे उपलब्ध करुन दिले तर निश्चितपणे पिण्याच्या पाण्याचा आणि सिंचनाचा प्रश्न सुटू शकेल. वाहून जाणारे पाणी त्या ठिकाणी अडवले गेले तर निश्चितपणे त्याचा फायदा होईल. म्हणून अंमळनेर तालुक्यातील पाडळसे धरणासाठी निधी उपलब्ध करुन दिला तर तो भाग सुजलाम सुफलाम होईल. तसेच त्या भागातील लोकांच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल. अशा अनेक प्रश्नांच्या संदर्भात या ठिकाणी ऊहापोह करीत असताना निश्चितपणे शासनाचे अभिनंदन करतो तसेच चांगल्या कामाला शुभेच्छा देतो. आपण मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

---

**तालिका सभापती** ( श्री. संजय केळकर ) : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी दिनांक 1 जून, 2009 रोजी या सदनामध्ये जो विषय उपस्थित केला होता त्यासंदर्भात निवेदन करण्यासाठी माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी सदरहू निवेदन करावे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/ यापूर्वी श्री.बरवड 17:15

**पृ.शी.**: समाजसेवक श्री.अण्णा हजारे यांना ठार मारण्यासाठी सुपारी दिल्याचा कट उघडकीस येणे

**मु.शी.**: समाजसेवक श्री.अण्णा हजारे यांना ठार मारण्यासाठी सुपारी दिल्याचा कट उघडकीस येणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यासंबंधी माननीय गृहमंत्र्यांचे निवेदन.

श्री.नितीन राऊत ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, "समाजसेवक श्री.अण्णा हजारे यांना ठार मारण्यासाठी सुपारी दिल्याचा कट उघडकीस येणे" यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यासंबंधी मी खालीलप्रमाणे नियम 46 अन्वये पुढील निवेदन करीत आहे :-

श्री.पवनराजे निंबाळकर व त्यांचे वाहन चालक, समद अब्दुल वाहिद काझी यांच्या दिनांक 3.6.2006 रोजी कळंबोली भागात झालेल्या खुनासंदर्भातील कळंबोली पोलीस ठाणे येथील गु.नों.क्र.220/2006 भा.दं.वि.सं.कलम 302 सह भा.ह.का.कलम 3,25,27 चा तपास मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक 23.10.2008 च्या आदेशानुसार केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग झाला आहे. या गुन्हयाच्या तपासात पारसमल ताराचंद बडाला जैन आणि दिनेश राममणी तिवारी यांना सी.बी.आय.ने अटक करुन प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पनवेल यांचेकडून दिनांक 1.6.2009 पर्यंत पोलीस कस्टडी मिळविण्यात आली. नंतर सदरची पोलीस कस्टडी दिनांक 7.6.2009 पर्यंत वाढविण्यात आली आहे.

सदर गुन्हयाचा तपास केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे प्राथमिक टप्प्यात असून गुन्हा घडल्याचे महत्वाचे धागेदोरे प्राप्त झाले असून त्याची छाननी सुरु आहे. सदर गुन्हयाच्या तपासामध्ये वरील दोन आरोपींसह आणखी दोन आरोपी गुन्हयामध्ये सहभागी होते, असे तपासात निष्पन्न झाले आहे. यामध्ये पिस्तुल आणि रिव्हॉल्व्हरचा वापर केल्याचे दिसून येते. सदरचे फायरआर्म कसे मिळविले याचा तपास सुरु आहे. सदर हत्तेच्या कटामध्ये सुपारी घेतल्याचा संशय आहे. यामधील मुख्य आरोपी श्री.अण्णा हजारे यांना सुध्दा ठार मारु इच्छित होता ही बाब तपासामध्ये प्रकाशात आली व सदरचा मुख्य आरोपी यांनी याकरिता देऊ केलेली सुपारी श्री.पारसमल यांनी फेटाळली, असे समजते, गुन्हयाचा तपास प्रगतीपथावर आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.नितीन राऊत...

राळेगणसिध्दी, ता.पारनेर, जि.अहमदनगर येथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित होऊ नये म्हणून 1 + 3 सशस्त्र पोलीस कर्मचाऱ्यांचे संरक्षण देण्यात आले असून पोलीस निरीक्षक, पारनेर पोलीस स्टेशन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या निवेदनामध्ये 'मुख्य आरोपी श्री.अण्णा हजारे' असा उल्लेख आलेला आहे. त्यामुळे या निवेदनात दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

श्री.नितीन राऊत : या निवेदनामध्ये 'मुख्य आरोपी श्री.अण्णा हजारे' याऐवजी 'मुख्य आरोपी श्री.पारसमल ताराचंद बडाला जैन' अशी दुरुस्ती केली जाईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या निवेदनातून हे स्पष्ट झालेले आहे की, श्री.अण्णा हजारे यांना ठार मारण्याची आरोपींनी सुपारी दिली होती. ही सुपारी कोणी दिली होती, कोणामार्फत दिली होती ते स्पष्ट झालेले नाही. कारण पवनराजे निंबाळकर यांच्या हत्येमागे जे होते तेच सूत्रधार या गुन्हयामागे आहेत. त्यांची माहिती निवेदनातून आलेली नाही. 'गुन्हयाचा तपास सुरु आहे' असे निवेदनात म्हटले आहे. पण पवनराजे निंबाळकर यांच्या गुन्हयाचा तपास सुरु आहे. श्री.अण्णा हजारे यांना ठार मारण्याच्या गुन्हयाचा तपास सुरु आहे काय ते स्पष्ट झालेले नाही. या लोकांना झाकण्याचा सरकार प्रयत्न करीत आहे काय, त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करीत आहे काय असा माझा प्रश्न आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, हायकोर्टाच्या निदेशाखाली या गुन्हयाचा तपास सुरु आहे. हायकोर्टाच्या देखरेखीखाली तपास सुरु आहे. अशाप्रकारच्या मोठया घटना घडतात त्यानंतर आरोपी फितुर होतात, साक्षीदार फितुर होतात. त्यामुळे सीआरपीसीच्या कलमाखाली नोंद केली जाते. या निवेदनामध्ये असे काहीही आलेले नाही. आरोपीच्या म्हणण्याची 164 कलमाखाली दंडाधिका-यांच्या समक्ष नोंद केली जाते. अशाप्रकारे प्रमुख आरोपीच्या म्हणण्याची नोंद केली आहे काय, साक्षीदाराचे म्हणणे आहे त्याची नोंद सीआरपीसीखाली केली किंवा नाही याची सभागृहाला माहिती द्यावी.

श्री.अरुण गुजराथी : या निवेदनामध्ये 'मुख्य आरोपी यांनी याकरिता देऊ केलेली सुपारी श्री.पारसमल यांनी फेटाळली, असे समजते' असे नमूद करण्यात आलेले आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 17:20

(श्री. अरुण गुजराथी...

अशा प्रकारे शासनाकडून निवेदन येऊ शकत नाही. त्यांनी ती सुपारी फेटाळली किंवा कसे या संदर्भात शासनाची तपासणी सुरु आहे, असे शासन म्हणू शकते. "असे समजते" असे शासन म्हणू शकणार नाही.

श्री. नितीन राऊत : या प्रकरणी केन्द्रीय गुन्हे अन्वेषण शाखेमार्फत तपास सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी या सदनामध्ये प्रश्न उपस्थित केल्यानंतर गुन्हे अन्वेषण विभागाकडून आम्ही माहिती मागविली आणि ती आपणास सादर केली. या प्रकरणी आवश्यक त्या बाबींची नोंद घेऊन तपास कार्य सुरु आहे.

श्री. कपिल पाटील : तपास कोण करीत आहे ?

श्री. नितीन राऊत : केन्द्रीय गुन्हे अन्वेषण विभाग तपास करीत आहे.

श्री. कपिल पाटील : श्री. अण्णा हजारे यांनी ज्यांच्या बद्दल संशय व्यक्त केलेला आहे त्यांच्या बाबतीत कारवाई केली आहे काय ?

श्री. नितीन राऊत : राज्य शासनाने त्यांना सूचना पाठविलेल्या आहेत. त्या बाबतीत तपासणी करुन संबंधितांना अटक करण्यात येईल आणि गुन्ह्याची नोंद करण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : किती दिवसात ही कारवाई करणार आहात ?

श्री. नितीन राऊत : त्या बाबतीत कारवाई सुरु झालेली आहे.

ॲड. अनिल परब : हे मोठे प्रकरण आहे. जबाब दोन प्रकारे नोंदविले जातात. वर्तमानपत्राध्ये रोज या प्रकरणी बातम्या येत आहेत. आजच्या वर्तमानपत्रात अशी बातमी आलेली आहे की, ज्या व्यक्तीने पवनराजेंची सुपारी घेतली त्यांने अण्णाना मारण्याची सुपारी नाकारल्याचे सांगितले. त्याचा हा जबाब सीआरपीसीखाली नोंदलेला आहे काय ? दुसरे आरोपी असते तर त्यांना केव्हाच आत टाकले असते. त्याने दिलेले जबाब हे कायद्यानुसार नोंदविलेले आहेत की नाही हे समजले पाहिजे.

श्री. अरविंद सावंत : शासनाने निवेदनामध्ये "असे समजते" असे जे नमूद केलेले आहे तसे ते शासनाला करता येणार नाही असे सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितले. प्रश्न

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...)

असा आहे की, श्री. अण्णा हजारे यांची सुपारी कोणी दिली होती ? सुपारी देणा-याचे नाव का लपविले जात आहे ? सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितल्याप्रमाणे सीआरपीसीच्या कलम 164 प्रमाणे जबाब नोंदविण्यात आलेला आहे काय ?

श्री. नितीन राऊत : हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे...

श्री. कपिल पाटील : सभागृहाची दिशाभूल केली जात आहे.

श्री. नितीन राऊत : सन्माननीय सदस्यांनी प्रथम माझे उत्तर ऐकून घ्यावे. श्री. अण्णा हजारे यांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जो प्रश्न उपस्थित केला होता त्यासंबंधीची माहिती देण्याकरिता हे निवेदन मी केले. पवनराजे निंबाळकर खून प्रकरण उच्च न्यायालयामध्ये आहे तेथून हे सोर्सेस डेव्हलप झालेले आहेत. त्याची माहिती देण्यासाठी निवेदन करण्यात आले. श्री. अण्णा हजारे यांच्या संरक्षणाची व्यवस्था चांगली राहील याची काळजी राज्य शासन घेत असून ज्याने धमकी दिली त्याबाबतीत राज्य सरकार तपास करीत आहे.

डॉ. नीलम गो-हे : सन्माननीय सदस्यांनी मागणी केली म्हणून निवेदन केले असे आपण सांगितले. मुद्दा असा आहे की, हा दुसरा एक स्वतंत्र गुन्हा करण्याची बाब समोर आलेली आहे. तेव्हा अशा स्वतंत्र गुन्ह्यासंबंधीची कलमे आपण लावावयास पाहिजेत. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे श्री. अण्णा हजारे यांची सुपारी देणारे कोण आहेत ? त्यांच्यावर गुन्हा दाखल करणार काय ? सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी सांगितल्याप्रमाणे सीआरपीसीच्या कलम 164 अन्वये आरोपिचा जबाब नोंदवून घेण्यात येणे आवश्यक आहे. हे प्रकरण स्वतिंत्र असल्याने त्या प्रकरणाचा तपास स्वतंत्रपणे होऊ शकलो. पहिले प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. परंतु दुस-या प्रकरणी गुन्हा दाखल झालेला नाही म्हणून ते प्रकरण न्यायप्रविष्ट होऊ शकत नाही.

श्री. अरविंद सावंत : माननीय श्री. अण्णा हजारे यांना मारण्याची सुपारी कोणी दिली ?

श्री. नितीन राऊत : सदर प्रकरणी अधिकची माहिती घेऊन ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

...नंतर श्री. गिते...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, सभागृहाची कामकाजाची वेळ सायंकाळी 5.30 वाजेपर्यंत वाढविण्यात आली होती. अजून अनेक सन्माननीय सदस्यांना या चर्चेत सहभाग घ्यावयाचा आहे. त्यामुळे सभागृहाच्या कामकाजाची वेळ अजून अर्धा तास वाढवावी अशी माझी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभागृहाच्या कामकाजाची वेळ अर्धा तासाने वाढविण्यात यावी अशी माझी देखील आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती ( श्री. संजय केळकर )** : ठीक आहे. सभागृहाच्या कामकाजाची वेळ सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे. आता आपण माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा पुढे सुरु करु.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

( चर्चा पुढे सुरु....)

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणाच्या सुरुवातीला 26 नोव्हेंबर,2008 रोजी मुंबई शहरावर दहशतवादी हल्ला झाला त्याबद्दलचा उल्लेख केलेला आहे. यापुढे अशा प्रकारचे हल्ले होऊ नयेत म्हणून अनेक उपाययोजना त्यांनी आपल्या अभिभाषणात नमूद केलेल्या आहेत. मुंबई शहरात 1993 साली मुंबई शहरात मोठया प्रमाणात बॉम्बस्फोट झाले. त्यावर सभागृहात बरीच चर्चा झाली व त्या अनुषंगाने अनेक उपाययोजना सुचविल्या होत्या. परंतु हे शासन कायदा व सुव्यवस्था राखण्यात एवढे कोडगे झाले आहे की, त्या उपाययोजनातील एकही उपाययोजना शासनाने प्रत्यक्षात अंमलात आणली नाही आणि त्यामुळेच हा दहशतवादी हल्ल्याचा प्रकार पुन्हा मुंबई शहरात झाला आहे. 1993 मध्ये जे बॉम्बस्फोट झाले, त्यावेळी कोकण किनारपट्टीतून बॉम्बस्फोटाचे साहित्य आणले गेले होते. या 26/11 हल्ल्याचे दहशतवादी देखील कोकणातील समुद्र मार्गाने आले व त्यांनी मुंबई शहरात वेगवेगळया ठिकाणी हल्ले केले. 1993 साली मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटाच्या वेळी कोकण किनारपट्टीवर बंदोबस्त ठेवण्यासाठी अनेक प्रकारच्या उपाययोजना सुचविण्यात आल्या होत्या, कोकण किनारपट्टीवर तटरक्षक दल वाढविणे, समुद्रात गस्तीसाठी स्पीड बोटी उपलब्ध करुन देणे, तटरक्षक दलास अत्याधुनिक शस्त्र उपलब्ध करुन देणे इत्यादी उपाययोजना सुचविण्यात आल्या होत्या. परंतु त्यातील एकही उपाययोजना शासनाकडून प्रत्यक्षात अंमलात आणली गेली नाही. मुंबई येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या घटनेला सहा कालावधी होऊन गेलेला आहे. पुन्हा अशा प्रकारचे हल्ले होऊ नयेत म्हणून राज्य शासनाने कोणत्याही प्रकारची उपायोजना केलेली नाही. मुंबईत शहरात नुकताच झालेला दहशतवादी हल्ला या

3...



श्री. परशुराम उपरकर......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अनुषंगाने सागरी पोलीस दल निर्माण केले जाईल अशा प्रकारची शासनाने घोषणा केली आहे. तसेच समुद्रात गस्त घालण्यासाठी स्पीड बोटी खरेदी करण्याचा देखील शासनाने घोषणा केली आहे. परंतु या स्पीड बोटी खरेदी करण्यासंबंधीची नस्ती माननीय मंत्र्यांकडे पडून आहे अशा प्रकारची बातमी वृत्तपत्रात छापून आली आहे. या बाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून कोकण किनारपट्टीवर गस्त घालण्यासाठी स्पीड बोटी तात्काळ उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, मी काही दिवसापूर्वी सिंधुदूर्ग जिल्हयातील जिल्हा पोलीस अधीक्षकांना भेटलो. त्यांना विचारले की, पोलीस दलासाठी कोणत्या प्रकारची अत्याधुनिक शस्त्रे शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. त्यावेळी त्यांनी मला माहिती दिली की, पोलीस दलासाठी नव्याने एक-47 ही शस्त्रास्त्रे नव्याने देण्यात आलेली नाहीत. तसेच एकही वाहन शासनाने नव्याने उपलब्ध करुन दिलेले नाही. तसेच कोणत्याही प्रकारचे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे या जिल्हयासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. मुंबई शहरात अशा प्रकारच्या घटना घडून सुध्दा कोकणातील सागरी किनारपट्टीवर संरक्षण करण्याकामी शासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. या गोष्टीचा उल्ल्ेख माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात केलेला नाही. त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, राज्य शासनाने सिंचनासाठी भरीव वाढ केलेली असे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नमूद केलेले आहे. कोकणातील सिंचन प्रकल्प गेल्या तीन वर्षापासून बंद पडलेले आहेत. या सिंचन प्रकल्पांची अंदाजपत्रकीय मूळ किंमत होती, त्या किंमतीत दुपटीने, तीन पटीने वाढ झालेली आहे. सद्यस्थितीत सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये एक मोठा प्रकल्प, चार मध्यम प्रकल्प आणि 11 लघुपाटबंधारे यांची कामे सुरु आहेत. या प्रकल्पांची कामे करणा-या ठेकेदारांची 475 कोटी रुपये देणी प्रलंबित आहेत. शासनाने सिंचन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याकामी देखील पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. सभापती महोदय, कोकणामध्ये मोठया प्रमाणात पाऊस पडतो...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर........

पण पावसाचे पाणी अडविण्यासाठी जे प्रकल्प होऊ घातले होते ते 20-22 वर्षे उलटूनही पूर्ण होऊ शकले नाहीत याबद्दल मी खेद व्यक्त करीत आहे. सभापती महोदय, ग्रामीण वस्त्यांसाठी शुध्द पाणी देण्यासाठी भारत निर्माण योजना लागू केली आहे. भारत निर्माण योजना राबवित असताना सिंधुदुर्ग जिल्हयातील अनेक विहिरी तीन-तीन वर्षापासून अपूर्ण आहेत. मागील अधिवेशनात माणगाव खोऱ्यातील वासोली गावातील 14 अपूर्ण विहिरींबाबत भ्रष्टाचार झाल्याचा उल्लेख केला होता. मंत्रीमहोदयांनी चौकशी करण्याची घोषणा केली. परंतु अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. सिंधुदुर्ग जिल्हयात भारत निर्माण योजनेंतर्गत अनेक विहिरी अपूर्ण असून मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्यामुळे मी खेद व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, या आर्थिक वर्षात मच्छिमारांना पॅकेज देण्याची शासनाने घोषणा केली. परंतु जे मासेमारी करणारे घटक आहेत त्यांना शासनाने वगळले आहे. अर्थसंकल्पीय भाषणात सभागृहात सांगितले गेले की, छोटे मच्छिमार, पागणारे, मासे सुकविणारे, मुळे पकडणारे घटक आहेत त्यांना यातून वगळले आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील 12 हजार छोट्या मच्छिमारांची नोंद झाली आहे त्यातील फक्त 3 हजार मच्छिमारांना 2000 रुपयांप्रमाणे अनुदान मिळाले. उर्वरित 9016 लोकांचे अनुदान अद्याप प्रलंबित आहे. ते शिल्लक अनुदान अद्याप मिळावयाचे असताना यावर्षी पुन्हा दुष्काळ निर्माण झाला आहे. या दुष्काळात मदत मिळावी म्हणून सातत्याने सभागृहात मागणी करुनही शासनाचे मच्छिमारांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत आहे. त्यावर किरकोळ मलमपट्टी करण्याचा शासनाकडून प्रयत्न केला जातो. परंतु मच्छिमारांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही. शासनाची कॅच मोजण्याची पध्दत ही ब्रिटिश काळापासून चालत आलेली पध्दत आहे. ही पध्दत बदलण्याची गरज आहे. सभागृहात वारंवार मागणी करुनही शासनाने नवीन पध्दत निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला नाही. शासन पॅकेज जाहीर करेल, निवडणुका जवळ आल्यामुळे कदाचित पॅकेज जाहीर केले जाईल. परंतु मच्छिमारांचे प्रश्न त्यामुळे सुटणार नाहीत. मच्छिमारांना डिझेल परतावा म्हणून केंद्र शासनाकडून सुमारे 4 कोटी रुपये प्राप्त करुन घेण्यासाठी शासनाने कोणतीही हालचाल केलेली नाही. आज सिंधुदुर्ग जिल्हयातील मत्स्य विभागात वर्ग.1 चे अधिकारी कार्यरत नसल्यामुळे मच्छिमारांकडे शासनाचे पूर्ण दुर्लक्ष होत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ SBT/ 17:30

श्री.परशुराम उपरकर........

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील आरोग्य यंत्रणेबद्दल मी याठिकाणी अनेकदा बोललो आहे. महाराष्ट्राचे आरोग्य संपूर्णपणे बिघडले आहे. केंद्र सरकारच्या योजनांतर्गत तज्ज्ञ डॉक्टर दिल्याची घोषणा करण्यात आली. परंतु सिंधुदुर्ग जिल्हयात जिल्हा रुग्णालय, 3 उपजिल्हा रुग्णालय, अनेक ग्रामीण रुग्णालये आहेत तेथे डॉक्टरांची कमतरता आहे. त्यामुळे खाजगी डॉक्टरांचा व्यवसाय जोरात सुरु आहे. एखादा गरीब रुग्ण सरकारी दवाखान्यात गेला तर त्याला कोल्हापूर, मुंबई, पुणे किंवा गोवा याठिकाणी हलवावे लागते. अतिदक्षता विभागातील रुग्ण अनेकदा रस्त्यावरच दगावल्याची अनेक उदाहरणे समोर आलेली आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयामध्ये केंद्र सरकारच्या योजनेंतर्गत डॉक्टर देण्याची कार्यवाही शासनाकडून झालेली नाही.

3टी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. हेमंत टकले)**

श्री. परशुराम उपरकर ....

त्यामुळे शासनाचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले दिसते. मालवणसारख्या शहरी भागात सुध्दा ग्रामीण रुग्णालयांवर जास्त प्रमाणात रुग्णांचा भार पडतो म्हणून त्या रुग्णालयाला उप जिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याची गरज आहे. परंतु मागणी करुनही असा दर्जा मिळाला नाही म्हणून आरोग्य यंत्रणेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. पुणे-नाशिक रस्त्याचे चौपदरीकरण करण्यासंबंधीचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात केलेला आहे. पण गेली दहा वर्षे कोकणातून जाणारा 17 नंबरचा महामार्ग जो गोवा आणि महाराष्ट्र या दोन राज्यांना जोडतो हा महामार्ग चार पदरी करण्यासंबंधीचा निर्णय या सभागृहात फक्त कागदावरच झालेला आहे. त्यासाठी आवश्यक मंजुरी व निधी मात्र उपलब्ध झालेला नाही. आजच्या परिस्थितीत या रस्त्यावर अनेक अपघात होऊन लोक मृत्युमुखी पडतात. पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांना रस्त्याचा अंदाज येत नसल्याने असे अपघात होतात. परंतु हा रस्ता चार पदरी होण्याच्या दृष्टीने कुठलाही उल्लेख अभिभाषणात केलेला नाही. पर्यटनाच्या अनुषंगाने राज्यातील अनेक ठिकाणांची उदाहरणे दिलेली आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा हा केंद्रशासन तसेच राज्य शासनाने पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेला असताना मात्र त्याकडे लक्ष दिले जात नाही, हे दुर्दैव आहे. आज सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटनाला धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे या जिल्ह्याचे सौंदर्य नष्ट करण्याचा प्रयत्न चालू आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जवळपास 60 टक्के जमीन खनीज संपत्तीखाली येत असतील तर या जिल्ह्याकडे पर्यटक पाठ फिरवतील व कोट्यावधी रुपयांचा खर्च वाया जाईल. त्याचबरोबर सिंधुदुर्ग नाव असलेला किल्ला एका बाजूने पडत चालला आहे. परराज्यातून तसेच परदेशातून किल्ला बघण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात येत असतात परंतु किल्ल्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर मात्र गळत आहे. हे मंदिर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येत असल्याने त्याकडे लक्ष द्यावे व मंदिराची दुरुस्ती करावी, अशी माझी सूचना आहे. कारण या भागातील गावकऱ्यांनी एक ट्रस्ट निर्माण करुन दुरुस्तीसाठी निधी गोळा करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे असा निधी गोळा करु न देता शासनाने ती दुरुस्ती करावी. अशा प्रकारे शासन पर्यटनाकडे देखील पाठ फिरवीत आहे म्हणून मी खेद व्यक्त करतो.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ MMP/

श्री. परशुराम उपरकर .....

महोदय, शीघ्र गतीने न्याय मिळावा म्हणून 300 पदे निर्माण करणार असल्याची घोषणा देखील अभिभाषणातून करण्यात आली. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी तालुका निर्माण होऊन 20 वर्षे झाली, दोडामार्ग तालुका निर्माण होऊन 9 वर्षे झाली असताना ा सुध्दा कुठलेही न्यायालय शासनाने अद्यापपर्यंत मंजूर केलेले नाही. त्याचबरोबर संपूर्ण राज्यात ग्राहक मंच निर्माण केलेले आहेत. या ग्राहक मंचांची अपीले जी येतात त्यांची सुनावधी वेळेवर होत नसल्याने 10-10 वर्षांपासूनची प्रकरणे प्रलंबित आहेत, ती सुनावणी लवकरात लवकर व जलदगतीने व्हावी म्हणून नवीन न्यायालये निर्माण करण्यासंबंधीचाही उल्लेख अभिभाषणात नाही. कोकणात ज्या ज्या वेळी निवडणुकांचा काळ येतो त्या त्या वेळेस सांगितले जाते की, 500 कोटीचे पॅकेज दिले जाईल पण गेल्या चार वर्षात शासनाने अनेक सिंचन प्रकल्प, रस्त्यांचे प्रकल्प यांना निधीचा पुरवठा न केल्यामुळे केवळ शेवटच्या टप्प्यात व निवडणुका डोळ्यासमोर ठेवून फक्त पॅकेज जाहीर केले जाते. अशा प्रकारे केवळ पॅकेज जाहीर करुन कोकणचा प्रश्न सुटत नसल्यामुळे मी पुन्हा खेद व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

जयहिन्द. जय महाराष्ट्र.

-----

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय,माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये ज्या मुद्यांचा उल्लेख यावयास पाहिजे होता तो दुर्दैवाने झालेला नाही, किंबहुना माननीय राज्यपाल महोदयांचे भाषण हे राज्यशासनाच्या कर्तबगारीचा एका अर्थाने लेखा जोखा असतो आणि दुस-या अर्थाने ती भविष्याची दिशा असते. परंतु राज्य शासन किती उथळ पध्दीतीने काम करते आहे, मार्केटींग पध्दतीने शासन कशा प्रकारे काम करीत आहे याचा उत्तम नमुना म्हणजे माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण आहे, असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

सभापती महोदय, ज्या मुद्यांचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आलेला नाही तेवढयाच मुद्यांचा उल्लेख मी एका एका मिनिटात करणार आहे. राज्य शासन हे शालेय शिक्षण, उच्च शिक्षण आणि व्यवसाय शिक्षण या तिनही शिक्षणाच्या बाबतीत पूर्णपणे उदासीन असल्यामुळे त्यासंदर्भातील उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या भाषणात कोठेही आलेला नाही. शालेय शिक्षण या संकल्पनेत पूर्व प्राथमिक शिक्षण ते उच्च माध्यमिक शिक्षण म्हणजे 12 वी पर्यंत शिक्षणाचा समावेश असतो. देशाला स्वातंत्र मिळून 60 वर्षाचा कालावधी लोटला आहे परंतु आपल्या महाराष्ट्र राज्यात पूर्व प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी अद्याप देखील शासनाने स्वीकारलेली नाही. पूर्व प्राथमिक शिक्षणामध्ये काम करणा-या ज्या बालवाडीच्या शिक्षिका आहेत त्यांना आजही 500 रुपये मानधनावर काम करावे लागत आहे तसेच काही ठिकाणी तर मुलांकडून गोळा होणा-या फी वरच त्यांना आपली गुजराण करावी लागते. मग हया बालवाडया मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील असो किंवा एखाद्या ग्रामीण भागातील बालवाडी असो तेथे त्यांना काही सुध्दा मिळत नाही. अनाथ मुलाची जशी कोणीही दखल घेत नाही तसा प्रकार यासंदर्भात होत आहे. पूर्व प्राथमिक शाळेची जबाबदारी केव्हाही या शासनाने घेतलेली नाही, किंवा कोणताही उल्लेख केव्हाही केलेला नाही. यासंदर्भातील उल्लेख जर माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आला असता तर महाराष्ट्रातील सामान्य माणसाला निश्चितपणे दिलासा मिळाला असता. त्याच बरोबर आपण ज्याला प्राथमिक शिक्षण म्हणतो, या पूर्वी शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या माध्यमातून जेवढया पंचवार्षिक योजना झाल्या तेवढ्या पंचवार्षिक योजनेतून आपण जिल्हापरिषदेच्या,नगरपालिकेच्या व महानगरपालिकेच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

03-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3U-2

SGJ/ MMP/ SBT/ प्रथम श्री. खर्चे ... 17:40

श्री. भगवान साळुंखे....

माध्यमातून प्राथमिक शाळांचा प्रचार, प्रसार आणि संख्या देखील वाढली होती. पण या शासनाच्या सुमारे 10 वर्षाच्या कालावधीमध्ये जर आपण सांख्यकीय माहिती गोळा केली तर महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेच्या, नगरपालिकेच्या आणि महानगरपालिकेच्या मराठी माध्यमांच्या शाळा दिवसेंदिवस बंद पडत आहेत. गरिबाचा मुलाला, मध्यम वर्गीयाच्या मुलाला, झोपडपट्टीतील मुलाला, शेतक-यांची मुले ज्या शाळेत शिकत होते त्या शाळा आज झपाटयाने बंद पडत आहेत. परंतु या ज्या शाळा बंद पडत आहेत त्यासंदर्भातील खंत कोणालाही वाटत नाही. तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या गटशिक्षण अधिकारी, मी एवढया एवढया शाळा सुरु केल्या होत्या असे निवृत्तीनंतर सांगत होता, सभापती सुध्दा मी मराठी माध्यमांच्या एवढया एवढया शाळा सुरु केल्या होत्या, असे अभिमानाने सांगत होते त्याच सभापतीला आणि त्याच गटशिक्षण अधिका-याला दोन दोन शाळेचे विलीनीकरण आणि आता तर त्या शाळांचे विसर्जीकरण होतांना पहावे लागत आहे. पूर्वी खेडयामध्ये सातवी पर्यंत मुलांची आणि मुलींची स्वतंत्र शाळा होती, या सदनामध्ये बसलेले आणि महराष्ट्रातील कानाकोप-यात बसलेले जे विद्वान आहेत ते जिल्हा परिषदेच्या शाळेतच शिकलेले आहेत. पण आता त्याच जिल्हापरिषदेच्या शाळा बंद पाडण्याचे षड्यंत्र सुरु आहे. आता शिक्षण सम्राट मोठया प्रमाणात निर्माण झालेले आहेत. आता कायम विना अनुदानित तत्वावरील प्राथमिक शाळा आणि माध्यमिक शाळांचे प्रंचड पेव महाराष्ट्रात फुटले आहे. काही वर्षापर्यंत इंजिनिअरिंग कॉलेज, मेडिकल कॉलेज, डी.एड. कॉलेज, बी.एड. कॉलेजच्या माध्यमातून शिक्षण सम्राट निर्माण झाले होते परंतु आज पुरोगामी म्हणविणा-या महाराष्ट्रामध्ये प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून प्रचंड शिक्षण सम्राट निर्माण होत आहेत. पूर्वी मुंबईकडे येणा-या कार्यकर्त्यांचा लोंढा सुत गिरण्या, साखर कारखाने,बँका, पतसंस्था मागत होता परंतु आता प्रत्येक मंत्र्यांच्या भोवती घिरटया घालणारे कार्यकर्ते प्राथमिक शाळेची मागणी करीत आहेत, इंग्रजी माध्यमाच्या शाळा मागत आहेत. शाळेसाठी हे लोक फिल्डींग लावत आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे ..

त्यासाठी फिल्डींग लावण्यात येत आहे. याचें कारण असे की, शाळा हे मनी मेकींग इन्स्ट्रुमेन्ट आहे. आणि शासनाने शिक्षणातून आर्थिक दृष्टया अंग काढून घेण्याचे ठरविले आहे याची खात्री शाळा चालविणा-यांची झालेली आहे. त्याचीच ही पोच पावती आहे. दुर्देवाने महाराष्ट शासन याबाबतीत पूर्णपणे उदासीन असून प्राथमिक शिक्षणावर जो काही खर्च केला जात आहे तो हळूहळू बंद कसा करावयचा याचे षडयंत्र रचण्यात येत आहे. त्यामध्ये सरकारने शालेय शिक्षणाच्या संदर्भात चुकीचा संदेश दिला आहे. " करा फी गोळा आणि चालवा तुमच्या शाळा " अशा प्रकारचा संदेश सरकार शिक्षणाच्या क्षेत्रात आज देत आहे. त्यातून पालकांची धनवत्ता ही विद्यार्थ्याची गुणवत्ता बनत आहे. पालकांच्या खिशातून जो काही पैसा मिळेल त्यातून शाळा चालविल्या जात आहेत.

सभापती महोदय, या ठिकाणी मला अत्यंत पोटतिडकीने एक विधान करावयाचे असून ती कठोर वस्तुस्थिती आहे. तुमच्या माझ्या महराष्ट्रात शाळांचा एक चातुर्वण्य शासनाने तयार केलेला आहे. अब्जाधिशांच्या शाळा, कोटयाधिशांच्या शाळा , लक्षाधिशांच्या शाळा आणि जनसामान्यांच्या शाळा अशा प्रकारचा हा चातुर्वण्य आहे. सभापती महोदय, मुंबईमध्ये 22 आंतरराष्ट्रीय शाळा असून पुण्यामध्ये 18 आंतरराष्ट्रीय शाळा आहेत. त्याचप्रमाणे सी.बी.एस.ई. पॅटर्नवर चालणा-या शाळा आणि इतर पॅटर्नवर चालणा-या शाळांचीसुध्दा त्यात भर पडत आहे.या शाळांची वर्षाची फी दहा लाख रुपयांची आहे. मुलाच्या शिक्षणावर वर्षाला दहा लाख रुपये खर्च करणरा पालक हा अब्जाधिशच असू शकतो. अशा प्रकारे जास्त फी असलेल्या शाळेमध्ये श्रीमंताचा मुलगाच प्रवेश घेऊ शकतो अशा प्रकारे या राज्यामध्ये कोटयाधिशांच्या अनेक शाळा आहेत . पाचगणीमध्ये 40 शाळा पब्लिक स्कूलच्या नावाखाली सुरु करण्यात आलेल्या आहेत. अशा प्रकारच्या पब्लिक स्कूल आता जिल्हयामध्ये आणि तालुक्यामध्ये देखील सुरु होत आहेत. या पब्लिक स्कूलमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्याची वर्षाची फी दीड लाख रुपये आहे. या ठिकाणी मी राजकीय भाषण करणार नाही परंतु या राज्यामध्ये कोणताही पक्ष सत्तेवर असला तरी. आज राज्यामध्ये जो कार्यकर्ता तुमच्या व माझ्या अवती भोवती येत असतो तो केवळ शाळा काढण्यासाठी येत असतो. तो या शाळांची नावेसुध्दा चांगल्या प्रकारची ठेवत असतो. तालुक्याच्या पातळीवर तो इंग्रजी माध्यमाची शाळा काढत आहे .

2..

श्री.भगवान साळुंखे ..

रेसिडेशिंअल स्कूल , सैनिक पॅटर्न स्कूल , चाणक्य ॲकॅडमी, एकलव्य ॲकॅडमी, ज्ञानेश्वरी ॲकॅडमी अशा प्रकारची नावे शाळेला दिली जात आहेत. अशा प्रकारची शाळा तालुक्याच्या ठिकाणी सुरु करण्याची ऑर्डर तो मुंबईहून घेऊन जात आहे. या ठिकाणी मी सदनाला जी माहिती देत आहे ती अत्यंत धक्कादायक आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मान्यता देण्याची शासनाची घाई सुरु आहे.इंग्रजी माध्यमिक शाळासाठी 50 लाख रुपये खर्च करुन इमारती बांधण्यात आलेल्या आहेत. या इमारती बांधून तयार आहेत फक्त त्यांना शाळा सुरु करण्याचे आदेश मिळण्याचे बाकी आहे.. तो आदेश दोन दिवसात आदेश मिळेल म्हणून संबंधित संस्था चालक वाटत पहात आहेत एकदा त्यांच्या हातात आदेश मिळाला की, ते शाळेचे दुकान मांडणार आहेत. आईला मम्मी, वडिलांना डॅडी, असे तो विद्यार्थी म्हणणार आहे तसेच गळयात नेक टाय, पायात बूट घालून स्कूलबसमधून त्या मुलाची वरात शाळेत जाणार आहे. एवढा खर्च केल्यानंतर त्या विद्यार्थ्याचे शिक्षण पूर्ण होणार आहे. मात्र त्या शाळेमध्ये शिकविणा-या शिक्षकाच्या हातामध्ये पुरेसा पगार दिला जात नाही. एम.ए.,बी.एड. झालेल्या शिक्षकाच्या हातामध्ये हजार ते दीड हजार रुपये पगार दिला जातो . अशा प्रकारे त्या शिक्षकाचे शोषण केले जात आहे . आज तो सुशिक्षित बेरोजगार आहे त्याला चांगल्या पगाराची नोकरी नाही म्हणून सध्या तो शिक्षक हताश आणि असहाय्य आहे म्हणूनच तो शिक्षक कमी पगारात शाळेत काम करीत असून पुढे केव्हा तरी चांगले दिवस येतील अशी त्याला आशा असते. अशा प्रकारे इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे महाराष्ट्र राज्यामध्ये मोठया प्रमाणावर पेव फुटलेले आहे आणि महाराष्ट्रातून मराठीचा क्षणोक्षणी खून केला जात आहे. याबद्दल कोणालाही गांर्भीर्य नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात या संदर्भात गांभीर्य व्यक्त केले असते तर हे सरकार योग्य दिशने निघालेले आहे असे आम्ही म्हटले असते परंतु मला सांगण्यास अत्यंत वाईट वाटते की या विषयाच्या बाबतीत सरकार अजिबात गंभीर नाही .

सभापती महोदय, 14 वर्ष वयापर्यतच्या मुलांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याच्या सबंधी घटनेत उल्लेख करण्यात आलेला आहे.परंतु ते कागदावर आहे आणि दुसरीकडे मात्र अशा प्रकारची समांतर अर्थपायाधिष्टीत शिक्षण व्यवस्था निर्माण केली जात आहे त्याकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे ..

सभापती महोदय, यानंतर मला उच्च शिक्षणाच्या बाबतीत बोलावयाचे आहे. उच्च शिक्षणामध्ये कला , वाणिज्य विज्ञान ही महाविद्यालये असून ती सुदा कायम विना अनुदान तत्वावर दिली जात आहेत. मूळ जी महाविद्यालये सुरु करण्यात आलेली आहेत ती कशी बंद होतील या दृष्टीने प्रयत्न केले जात आहेत. मूळ महाविद्यालयामध्ये नवीन विषय शिकवावयाचा असला तरी तो शिकविण्यासाठी कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिली जाते त्यामुळे जे जुने आणि अनुदान तत्वावर चाललेले कॉलेज आहे ते नवीन विषय सुरु करण्यास तयार होत नाही. पोस्ट ग्रॅज्युएट अभ्यासक्रमासाठी म्हणजे एम.ए. आणि एम.एड. अभ्यासक्रमाच्या कॉलेजेसना परवानगी मिळविण्यासाठी मंत्रालयाच्या भोवताली अनेक संस्था चालक येऊन थांबलेले आहेत . पोस्ट ग्रॅज्युएशनचे कॉलेजेस सुरु करण्यास परवानगी देण्यात यावी यासाठी ते शासनाकडे मागणी करीत आहेत. त्याकरिता काही दलाल येथे आहेत

नंतर श्री.सुंबरे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. साळुंखे ....

सभापती महोदय, मी अत्यंत जबाबदारीने सांगतो की, मंत्रालयात आणि मंत्रालया भोवती घिरट्या घालणारी मंडळी कडून रोज कमीत कमी 50 कोटी पासून 100 कोटी पर्यंत उलाढाल होते आणि त्यातून शाळा-कॉलेजांचे वाटप केले जाते. तुम्ही आम्ही सगळे याबाबतीत उदासिनतेने राहतो आहोत. We are learned people. we are all qualified people. असे असतानाही आपण हे सारे घडवितो आहोत, घडू देत आहोत. We are all equally responsible for all these things and we have to stop this business. आपणच याला सारे जबाबदार आहोत असे मला वाटते. हे सारे आपण थांबविले नाही तर महाराष्ट्रातील सामान्य माणसाच्या मुलांचे शिक्षण थांबल्याशिवाय, नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. They will be thrown out of the main stream of the Education. शिक्षणाच्या प्रवाहातून सामान्याचा मुलगा हा निश्चितपणे यामुळे बाजूला फेकला जाणार आहे अशी दुरावस्था या शिक्षणाच्या क्षेत्राची आज झालेली आहे व भविष्यात होऊ घातलेली आहे. त्याचबरोबर व्यवसाय शिक्षणासंबंधी बोलावयाचे झाले तर... आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ. पवार उपस्थित आहेत., मेडिकल कॉलेजेस, इंजिनिअरींग कॉलेजेस आहेत त्यांच्या बाबतीत देखील मी जबाबदारी येथे विधाने करतो की, यंदा एम.डी.चा प्रवेश तुमच्या माझ्या या महाराष्ट्रामध्ये घेण्यासाठी सव्वा कोट रूपयांमध्ये होतो आहे. सव्वा कोट रूपये मोजून एम.डी.ला प्रवेश घेणारा मुलगा भविष्यात डॉक्टर झाल्यानंतर डॉक्टर म्हणून लोकांना काय आणि कोणती सेवा देणार ? याचा आपण कधी विचार करणार आहोत की नाही ? इतकेच नाही तर मी आपल्याला सांगेन यंदाच्या वर्षामध्ये बालवाडीमध्ये प्रवेश देताना 1 लाख रूपये मोजावे लागले आहेत. बालवाडीतील प्रवेशासाठी 1 लाख रूपये मोजणारा पालक आणि त्यात शिकणारा मुलगा 'भारत माझा देश आहे आणि सारे भारतीय माझे बांधव आहेत' असे म्हणून समाजाला सेवा देणारा म्हणून तयार होणार आहे का ? याचा विचार आम्ही कधी तरी गंभीरतेने करणार आहोत की नाही ? या संदर्भात हे सदन कधी गंभीर होणार की नाही ? सभापती महोदय, शिक्षणाच्या बाबतीतील हा विषय आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये शासनाची एकंदर भूमिका काय आहे याचे दिग्दर्शन असते. पण हे शासन शिक्षणाच्या बाबतीत किती उदासिन आहे याच्या या फॅक्टस् ॲण्ड फिगर्स आहेत, पण

..... 3डब्ल्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याकडे हे सरकार पूर्णपणे पाठ फिरवते आहे. मात्र सरकारला असा पळपुटेपणा करता येणार नाही हे लक्षात आणून देण्यासाठी मी या विषयाचा येथे उल्लेख केला आहे.

सभापती महोदय, राज्यपालांच्या भाषणातून जे मुद्दे सुटले आहेत त्यातील केवळ शिक्षणाच्या मुद्यावरच मी बोलतो आहे. या शिक्षणाच्या विषयावर आणखी खूप काही बोलता येण्यासारखे आहे. पण काही मुद्दे हायलाईट करण्यासाठीच मी येथे बोललो आहे. यानंतर मी माझ्या इतर मुद्यांकडे वळतो. सभापती महोदय, तुमच्या माझ्या महाराष्ट्रात अनेक भयानक घटना घडत आहेत. पण त्याही बाबतीत तुम्ही आम्ही अुदासिन आहोत. आपण ज्याला षडरिपू म्हणतो, म्हणजे काम, क्रोध, मद, मत्सर, लोभ-मोह, माया हे जे षडरिपू आहेत त्यापेक्षाही आता आधुनिक षडरिपू पुढे आले आहेत. त्यातील एक रिपू आहे 'एडस्'. या 'एडस्' रिपूने तुमच्या आमच्या या महाराष्ट्रातील 35-40 वयोगटातील अगदी तरूण मुले धडाधडा मरताहेत आणि तरूण मुली एक दोन मुलांच्या आया होऊन विधवा होत आहेत, उद्ध्वस्त होत आहेत. त्या मुलींनी असे काय पाप केले असेल की त्यांच्यावर असा प्रसंग यावा. सभापती महोदय, हा एडस् एक मोठा विकार आहे. व्यसनग्रस्ततेतून येणारा हा मोठा रोग आहे, रिपू आहे. त्याचबरोबर मला आपल्याला इतरही आधुनिक रिपू विषयी सांगावयाचे आहे. सभापती महोदय, ज्यांनी यापूर्वीच्या काळात दारूबंदीसाठी मोर्चे काढले त्यांच्याच मुलांनी आता देशी दारूची दुकाने काढली आणि त्यांच्याच नातवांनी आता बिअर बारस् काढले. अशा प्रकारे हे बार सुरू झाले आणि त्यातून आलेल्या बार संस्कृतीने 'लिव्हर सिरॉसिस' आजार आणला आहे. आता 'लिव्हर सिरॉसिस' म्हणजे काय याची सांखिकी माहिती येथे बसणाऱ्या अनेक विद्वान देऊ शकतील. या आजाराला बळी पडलेल्यांची संख्या किती आहे हेही ते सांगू शकतील. आपण कोणत्याही दवाखान्यात जा, तेथे आपल्याला रोज दारूने मरणारी मुले आणि एडस् ने मरणारी मुले आपल्याला दिसतील. ही तरूण मुले कोठे तरी चांगली नोकरीला लागलेली असतात, कोठे कोणी शिक्षक असतात, पण ते दारूने आणि ड्रग्जने ॲडिक्ट झालेली असतात त्यातून त्यांना नाना प्रकारचे रोग, आजार झालेले असतात. तेव्हा दारूने होणारा विकार हा दुसरा रिपू आहे. म्हणजे ज्याप्रमाणे एडस्ने मरणाऱ्यांची संख्या मोठी आहे तशीच दारू पिण्यामुळे मरणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. तिसरा जो आधुनिक रिपू आहे तोही भयानक आहे, तो रोखण्यासाठी आबांनी प्रयत्न केला. पण त्यात ते दुबळे ठरले. तो रिपू म्हणजे तंबाकू आणि गुटखा. या तंबाकू आणि

..... 3डब्ल्यू 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गुटख्यामुळे देखील नाना रोग होतात, विशेषत: कॅन्सरसारखा दुर्धर रोग यातून होतो. आता या तंबाकूच्या पदार्थांच्या पाकिटांवर आपण स्टॅट्युटरी वॉर्निंग देतो. त्याबाबतीत कायदे करतो आहोत. धूम्रपानाला बंदी करतो आहोत. तंबाकूला बंदी आणतो आहोत. पण हे सारे कागदावरच ठेवतो आहोत. तंबाकू मळत मळत तंबाकू वाईट आहे असे म्हणतो आहोत. त्याबाबतीत आम्ही कोठेही गंभीर नाही. हा तिसरा षडरिपू मी सांगतो आहे. शिंकणे, थुंकणे, फुंकणे, घासणे हे चार विकार तंबाकूतून होतात. खरे तर हा तपशीलात बोलण्याचा विषय आहे पण मी तो केवळ हायलाईट करतो आहे. त्यानंतर चौथा रिपू सांगतो. तो म्हणजे हिंसाचार. तरणी मुले आज दूरदर्शनच्या माध्यमातून हिंसाचार शिकताहेत. त्यामुळे त्यांना हिंसाचार म्हणजे दैनंदिन व्यवहार वाटतो आहे. परिणामी त्यातून हिंसाचार प्रचंड वाढतो आहे. पाचवा रिपू म्हणजे रस्त्यांवर होणारे अपघात. आज रस्त्यांवर नाना प्रकारचे अपघात होतात आणि त्यात अनेक माणसे मृत्युमुखी पडत आहेत. त्या बाबतीत कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने जितके आम्ही गंभीर असायला पाहिजे तेवढे नसतो. त्यामुळे रस्त्यांवर निरनिराळ्या प्रकारचे अपघात होऊन प्रेतेच्या प्रेते पडताहेत. त्यानंतर सहावा रिपू सांगताना मी आपल्याला सांगेन की, तो दिसायला अगदी वेलटू डू आहे. सगळा व्यवस्थित आहे पण अचानक अटॅकने संपतो. कारण तो कोठे तरी जेलसीने मरत असतो. त्याचे मॉरल एज्युकेशन नीटसे होत नाही. वैचारिकदृष्ट्या त्याचा पिंड चांगल्या प्रकारे जोपासला जात नाही त्यामुळे तो चांगल्या प्रकारे धष्टपुष्ट व्हायला पाहिजे तसा होत नाही. परिणामी तो वयाच्या चाळीशीच्या आतच संपून जातो. तेव्हा हे जे आधुनिक षडरिपू आहेत त्यामुळे तुमची आमची मुले अगदी तरूण वयात मरताहेत.

( यानंतर श्री. सरफरे ....3एक्स 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे...

त्या व्यसनग्रस्त मुलांच्या बाबतीत शासनाने कुठेही गंभीरपणे दखल घेतली नाही. त्याबाबत सांख्यिकीय माहिती मिळविली आहे काय? आपले मनुष्यबळ कसे संपत आहे, याकडे हे सरकार गांभीर्याने बघणार आहे काय? याकडे शासनाने लक्ष द्यावयास हवे होते. सभापती महोदय, खेडयाकडे चला असे म्हणत असतांना ग्रामीण भागात खेडी आपण उद्ध्वस्त करीत आहोत. राज्यामध्ये शहरीकरण झाले आहे हे मी समजू शकत असलो तरी आपण खेडी उद्ध्वस्त करीत आहोत. या खेडयांच्या सबलीकरणाच्या दृष्टीकोनातून कोणताही उल्लेख याठिकाणी करण्यात आला नाही. खेडयांचा उल्लेख केवळ मतदान करण्यापुरता करतो, परंतु त्यांच्या सबलीकरणासाठी काहीही केले गेले नाही. आपण 73 व्या घटना दुरुस्तीन्वये पंचायत राज आणण्याचे धोरण स्वीकारले.परंतु आज सुध्दा महाराष्ट्रात ग्रामसभा कागदावर घेतल्या जातात. ज्या पक्षांचे राज्य असते, त्यांचे कार्यकर्ते आपल्या गावातील 5-50 लोकांच्या घरी जाऊन व त्यांच्या सहया कागदावर घेऊन बोगस ग्राम सभा घेऊन दारिद्रय रेषेखालील लाभार्थींच्या यादीमध्ये आपल्या माणसांची नावे टाकतात. त्यामध्ये आपल्या पक्षाच्या माणसांची नावे टाकण्यात येतात. त्याठिकाणी एखादा विरोधी पक्षाकडील लाभार्थी असेल तर त्याचे नाव टाकण्यात येत नाहीत. आपल्याला पंचायत राज चांगले करावयाचे असेल तर राज्यातील राज्यकर्त्यांची राजकीय इच्छाशक्ती दृढीकरणाच्या दृष्टीने त्यामध्ये असावयास पाहिजे व त्याचा विचार झाला पाहिजे. आपण लोकशाहीच्या दृढीकरणाबद्दल बोलतो. डेमॉक्रेटीक नॉर्म्सबाबत मी अत्यंत जबाबदारीने बोलत आहे. सभापती महोदय, आपल्या इथे असलेले काही आमदार हे आयएएस अधिकाऱ्यांपुढें लाचार म्हणून उभे राहिल्याचे आपण पहातो.

(गोंधळ)

सभापती महोदय, मी सर्व आमदारांविषयी बोलत नाही. ठीक आहे, मी माझे विधान मागे घेतो. याठिकाणी मतदानाच्या पेटीतून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या भावनांचा, त्यांच्या मतांचा आदर आयएएस अधिकाऱ्यांनी, नोकरशहांनी केला पाहिजे. परंतु त्याचे भान त्यांना रहात नाही. आमच्या लोकप्रतिनिधींचा सन्मान कसा राखला जाईल? तो जे याठिकाणी बोलतो त्या लोकांच्या भावना असतात. त्याबाबतीत हे शासन गंभीर असले पाहिजे. यामध्ये केवळ आमदारांचा नाही तर ग्रामपंचायत सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, सरपंच या लोकप्रतिनिधींचा लोकशाहीमध्ये आदर कसा राखला जाईल, त्यांच्या भावनांची कशी दखल घेतली जाईल याबाबत लोकशाहीच्या दृढीकरणाच्या दृष्टीकोनातून अभिभाषणामध्ये कोणताही उल्लेख केल्याचे दिसत नाही.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ SBT/ KGS/ MMP/

सभापती महोदय, कै. यशवंतराव चव्हाण यांनी कृषी औद्योगिक क्रांतीचे स्वप्न पाहिले. त्याबाबत आपण काही टप्पे गाठले असले तरी आज सुध्दा आणखी टप्पे गाठण्याची आवश्यकता आहे. त्याबाबत या अभिभाषणामध्ये उल्लेख करण्यात आला असता तर या सरकारला खूप काही करता येण्यासारखे होते. सभापती महोदय, क्षारपड जमिनीचा उल्लेख याठिकाणी करण्याची आवश्यकता आहे. यामध्ये दोन प्रकारच्या जमिनी आहेत. एक म्हणजे पारंपारिक असलेली क्षारपड जमीन आणि दुसरी म्हणजे मॅनमेड सॉल्टी सॉईल. या करिता डेव्हलपमेंट प्लॅनचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला नाही. आमच्या ग्रीन बेल्टमध्ये सुध्दा सॉल्टी सॉईलचे प्रमाण वाढत आहे. त्याकरिता वॉटर मॅनेजमेंटसारख्या योजनांचा उल्लेख यामध्ये करावयास पाहिजे. दुर्दैवाने त्याचा उल्लेख या अभिभाषणामध्ये करण्यात आलेला नाही. सभापती महोदय, सेंद्रिय शेतीचा विकास...

**तालिका सभापती (श्री. हेमंत टकले)** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ 6 वाजेपर्यंत वाढविण्यात आली होती. अजून बऱ्याच माननीय सदस्यांना बोलावयाचे असल्यामुळे सभागृहाची वेळ वाढवावी लागणार आहे...

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, सभागृहाची विशेष बैठक उद्या सकाळी 9 वाजता घेण्यात यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे, उद्या सकाळी 10 वाजता सभागृहाची विशेष बैठक होईल. त्यामध्ये यादीतील काही माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळेल. माननीय सदस्य सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी, वसंत पवार, किरण पावस्कर व रामनाथ मोते या चार माननीय सदस्यांना उद्या सकाळी बोलण्याची संधी मिळेल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, पक्षाचे प्रतोद म्हणून मी माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, पाशा पटेल यांची नावे श्री. शिंदेकर साहेबांकडे दिलेली आहेत. ती आपणास कशी गाळता येतील?

**तालिका सभापती** : कालपासून माझ्याकडे जी नावे आलेली आहेत, त्यामध्ये ज्यांनी चर्चेमध्ये भाग घेतलेला नाही अशी काही सदस्यांची नावे अजून शिल्लक आहेत.

(यानंतर सौ.रणदिवे)

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.हेमंत टकले)** : मी सर्व सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. माझ्याकडे काल विविध पक्षाच्या प्रतोदांनी येथे भाषण करण्यासाठी सन्माननीय सदस्यांच्या नावाची जी यादी पाठविलेली आहे, त्यापैकी अजून ज्या सन्माननीय सदस्यांची भाषण व्हावयाची आहेत, ती नावे मी वाचून दाखवितो. 1) श्रीमती मंदा म्हात्रे 2) श्री.विक्रम काळे 3) रमेश शेंडगे 4) श्री.संजय पाटील 5) हेमंत टकले 6) श्री.जैनुद्दीन जव्हेरी 7) श्री.एस.के.जामा 8) श्री.सुरेश नवले 9) श्रीमती फौजिया खान 10) वसंत पवार 11) श्री.अरुणभाई गुजराथी 12) सुरेश जेथलिया 13) श्री.गोपीकिसन बाजोरिया 14) श्री.भगवानराव साळुंखे 15) श्री.चंद्रकांत पाटील 16) श्री.पाशा पटेल. आता 6.00 वाजले आहेत . . . .

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मला असे वाटते की, सभागृहाची बैठक अर्धा तास वाढविण्यात यावी म्हणजे निदान दोन सन्माननीय सदस्यांची भाषणे होऊ शकतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहाची वेळ 6.30 पर्यंत वाढविण्यात यावी म्हणजे दोन-चार सन्माननीय सदस्यांची भाषणे होऊ शकतील.

**तालिका सभापती** : ठीक आहे. सभागृहाची वेळ 6 वाजून 30 मिनिटांपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, धन्यवाद.

-----

. . . .3 वाय-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी - माननीय उप सभापती)**

**उपसभापती** : मघाशी सन्माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांचे भाषण सुरु होते. त्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.भगवानराव साळुंखे : सभापती महोदय, मी फक्त दोन ते तीन मिनिटे बोलणार आहे. सेंद्रीय शेती ही आता काळाची गरज झालेली आहे आणि सर्वांनी ही बाब मान्य केलेली आहे. राज्य शासनाने सेंद्रीय शेतीच्या बाबतीत कोणती भूमिका घेण्याचे ठरविलेले आहे, याबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्याचबरोबर आपण वैधानिक विकास महामंडळे निर्माण केली. या महामंडळांच्या माध्यमातून राज्यातील विविध भागांमध्ये जो असमतोलपणा निर्माण झालेला आहे, तो दूर करणे हा आपला हेतू होता. परंतु आतापर्यंत राज्याच्या विविध भागातील असमतोलपणा किती प्रमाणात दूर झाला आहे ? हा हेतू किती प्रमाणात साध्य केलेला आहे आणि पुढे काय करणार आहोत ? याबाबतीत अभिभाषणामध्ये उल्लेख करण्यात आलेला नाही, तसा उल्लेख करण्याची नितांत आवश्यकता होती.

सभापती महोदय, आपण अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताच्या बाबतीत केवळ विंड मिल्स् किंवा पवनचक्क्यांकडे लक्ष दिलेले आहे. पण सौरशक्ती आणि इतर बाबींच्या बाबतीत आपल्या डोळया समोर कोणत्या योजना आहेत, आपण त्याबाबतीत काय करणार आहोत ? याबाबत अभिभाषणामध्ये कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. तसा उल्लेख करण्याची नितांत गरज आहे. केंद्र शासनाच्या माध्यमातून निरंतन शिक्षण केंद्र खेडयापाडयामध्ये निर्माण केली, पण त्याचे सबलीकरण करण्याची जबाबदारी एका अर्थाने राज्य शासनावरच आहे. यासाठी जी योजना करण्यात आली आहे, त्याबाबतीत मात्र राज्य शासन हूं की चूं करीत नाही. कारण निरंतन शिक्षण केंद्रावर राज्य शासनाने आपली भूमिका मांडण्याची नितांत आवश्यकता आहे. त्याचबरोबर निरनिराळया क्षेत्रात ज्या विविध समस्या निर्माण होत आहेत, त्या संबंधात संशोधन करणारी यंत्रणा देखील आपल्याकडे असली पाहिजे. पण दुर्दैवाने निर्माण होणाऱ्या समस्यांचा जेवढा वेग आहे, त्या प्रमाणात त्यावर संशोधन करणाऱ्या केंद्रांचा कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. याबाबतीत देखील अभिभाषणा मध्ये शासनाची भूमिका स्पष्ट व्हावयास हवी होती. या अभिभाषणामध्ये जे मुद्दे समाविष्ट नव्हते, त्या बाबतीत मी विचार मांडलेले आहेत. परंतु आता मी दोन मुद्दे मांडू इच्छितो.

सभापती महोदय,मी मुद्दा क्र.3 बाबत विचार मांडू इच्छितो.राज्य शासनाने मुंबईवर झालेला

. . . . 3 वाय-3

श्री.भगवानराव साळुंखे . . . .

झालेला हल्ला हा देशावर झालेला हल्ला आहे असे म्हणून स्वत:वरील जबाबदारी झटकण्याचा एक दुबळा प्रयत्न केलेला आहे. या माध्यमातून देशाच्या पातळीवर याची ग्रॅव्हीटी वाढविणे, गंभीरता लक्षात आणून देणे ही बाब आम्ही समजू शकतो. पण राज्य शासनाने मात्र या मुद्याचा उपयोग करुन आपल्यावरील जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केलेला आहे असे वाटते. येथे दहशतवादी हल्ला झाला, पण त्यातून शासनाच्या प्रशासनामधील दुबळेपणा आणि इतर अनेक गोष्टी कारणीभूत असल्याचे दिसून येते. याबाबतीत आम्ही अगोदर पासून काही प्रिव्हेन्टीव्ह मेजर्स् घ्यावयास हव्या होत्या, त्या घेऊ शकलो नाही हा बोध जरी शासनाने घेतला तरी पुष्कळ झाले असे मला वाटते.

सभापती महोदय, यानंतर मुद्दा क्रमांक 47 बाबत सांगावयाचे आहे. त्यामध्ये महाराष्ट्र घरेलू कामगार कायदाच्या बाबतीत सरकार शेखी मिरवत असले तरी त्यामध्ये प्रत्यक्षात माथाडी कायद्याप्रमाणे ते कन्व्हर्ट व्हावयास पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. सभापती महोदय, आपण मला भाषण करण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो. धन्यवाद.

-----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ KGS/ प्रथम सौ. रणदिवे.. 18:05

डॉ. वसंत पवार (स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी माननीय राज्यपालांच्या अभिनंदनाचा आणि आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला अरहे. त्याला सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी अनुमोदन दिले आहे. त्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. माननीय राज्यपालांनी आघाडी आतापर्यंत सरकारने केलेली कामे आणि यापुढे करण्यात येणारी कामे या अभिभाषणामध्ये नमूद केलेले आहेत. दि. 26 नोव्हेंबर, 2008 रोजी जी घटना घडली त्याबद्दल या सभागृहात उलट-सुलट चर्चा झालेली आहे. मी या शासनाला धन्यवाद देईन की, राष्ट्रीय सुरक्षा रक्षकांप्रमाणेच राज्य सुरक्षारक्षक दल या ठिकाणी स्थापन करण्यात आले आहे. गुप्तचर संघटनेमध्ये सायबर नियंत्रण कक्ष हा महत्वाचा कक्ष असतो तो कक्ष सुध्दा स्थापन करण्यात आलेला आहे. प्रत्येक जिल्हयामध्ये 20 बॉम्ब शोधक पथके व बॉम्ब निकामी करण्याची पथके काम करीत आहेत. सागरी किनाऱ्यावर सुध्दा गस्त घालण्याचे काम सुरु झालेले आहे. दि.26 नोव्हेंबर, 2008 रोजी झालेल्या हल्यातील दहशतवादी कसाब याला फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे असे माझे मत आहे. परंतु आपल्या घटनेप्रमाणे कायदेशीर कोर्टाकडून संपूर्ण कायदेशीररीत्या प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच त्याला शिक्षा होणे हे गरजेचे आहे. त्यामुळे "हम करे सो कायदा" अशा प्रकारे आल्याला करता येणार नाही. सभापती महोदय, ज्या ठिकाणी दि.26-11-2008 चा कट घडला त्या कटातील पाकिस्तानमधील मुख्य सुत्रधार सईद याला पाकिस्तानने सोडलेले आहे. केंद्र सरकार त्याबाबतीत जागृत असून त्याला इशारा देण्यात आलेला आहे. प्रख्यात वकील श्री. उज्वल निकम ही केस चांगल्या प्रकारे लढत आहेत.त्याबद्दल मी यांना धन्यवाद देईन. न्याय प्रक्रिया पूर्ण करण्यासठी वकिलाची नियुक्ती करण्यात येते. या प्रकरणामध्ये वकिलाची नियुक्ती झाल्यानंतर न्याय प्रक्रिया थांबविण्यासाठी कारण नसतांना त्यांना त्रास देण्यात आला. समजाकंटकांनी त्या वकिलांना जो त्रास दिलेला आहे तो सुध्दा निषेधार्ह आहे. ते होता कामा नये असे मला वाटते.

सभापती महोदय, विदर्भातील 6 आपदग्रस्त जिल्हयांमध्ये 70500 हेक्टर इतकी सिचंन व्यवस्था करावयाची होती. त्यासाठी 536 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली असून 1500 कोटी रुपयाचे पॅकेज तयार करण्यात आले आहे. तसेच माननीय पंतप्रधानांचे पॅकेज जाहीर करण्यात आलेले आहे.त्या पॅकेज अंतर्गत प्रत्येक तालुक्यामध्ये 1300 विहिरी घेण्याचे काम जोरात चालू आहे. 6000 चेक डॅम तयार झालेले आहेत. शेततळीसुध्दा तयार झालेली आहेत. अशा प्रकारे सिंचन व्यवस्थेकडे शासनाने जास्तीत जास्त लक्ष दिलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ KGS/

डॉ. वतंर पवार.....

सभापती महोदय, शेतीचा पतपुरवठा याबाबतीत केंद्र शासनाने 71 हजार कोटी रुपयाचे पॅकेज जाहीर करुन शेतकऱ्यांची कर्जमाफी केलेली आहे. माननीय पंतप्रधान श्री. मनमोहन सिंग, युपीएच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी आणि आमचे नेते श्री. शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हे पॅकेज जाहीर करण्यात आले असून जवळ जवळ 38 लाख शेतकऱ्यांना त्याचा फायदा मिळालेला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने 6208 कोटी रुपयाचे पॅकेज जाहीर केले असून महाराष्ट्रातील एकूण 78 लाख श्ेतकऱ्यांना त्याचा फायदा झालेला आहे. 14 हजार 80 कोटी रुपये शेतकऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला दिलासा मिळालेला आहे. त्याचा समाजाला निश्चितपणे फायदा झालेला आहे. बी.टी. कापसाला 2700 रुपये भाव दिला पाहिजे अशी मागणी होती. पंरतु या बी.टी. कापसाला 3000 रुपये भाव दिल्यामुळे कापूस उत्पादक आनंदी झालेले आहेत. सिचंनावर जवळपास 13,447 कोटी रुपये खर्च करुन 4,82,000 हेक्टर एवढे क्षेत्र पाण्याखाल आणण्याचे महत्वाचे काम राज्य शासनाने केलेले आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ....

सभापती महोदय, व्हाईट रिव्हॉल्यूशन किंवा दुधाचा महापूर महाराष्ट्रात आणि संपूर्ण देशामध्ये आहे परंतु महाराष्ट्रात तो सर्वात जास्त आहे. त्याचा सुध्दा पाठपुरावा शासनाने केलेला आहे. म्हणून शासनाला आणि माननीय राज्यपालांना धन्यवाद द्यावे लागतील. मच्छिमारांबद्दल सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील या ठिकाणी बोलले. सर्व मच्छिमारांचा विमा उतरविला गेला आहे आणि त्या ठिकाणी त्यांना 31.36 कोटी रुपयांची मदत देण्यात आली. त्यामुळे निश्चितपणे त्यांचा सुध्दा चांगल्या प्रकारे फायदा झालेला आहे.

सभापती महोदय, अंगणवाड्यांमध्ये महिला बचत गटातर्फे पूरक पोषण आहार पुरविण्याचे काम अत्यंत चांगल्या पध्दतीने चालू आहे. कारण नसताना काही सन्माननीय सदस्य त्या पोषण आहाराविरुध्द बोलले की, त्यामध्ये किडे देतात, अळ्या देतात. पण असे कधी होत नाही. काही ठिकाणी अन्नधान्य न मिळाल्यामुळे काही वेळ लागला असेल परंतु पोषण आहाराची ही योजना चांगल्या प्रकारे चालू आहे. शिक्षणाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे या ठिकाणी बोलले. कै. वसंतदादा पाटील यांनी विनाअनुदानित प्रोफेशनल कॉलेजेसच्या बाबतीत जो निर्णय घेतला तो अत्यंत क्रांतिकारक निर्णय आहे. त्या ठिकाणी 15 टक्के प्रवेश सोडून बाकीचे 85 टक्के प्रवेश मेरीटवर होतात हे आपल्याला विसरुन चालणार नाही. त्यामुळे परराज्यातील पैसे महाराष्ट्रात येत आहेत आणि महाराष्ट्रातून बाहेर जाणारे पैसे आता थांबलेले आहेत. ही गोष्ट सुध्दा आपण लक्षात घेणे गरजेचे आहे. कायम विनाअनुदानित शाळांचा जो विषय आहे तो वेगळा आहे. आपण यातून 'कायम' हा शब्द काढण्यासाठी भांडत आहोत. हायकोर्टाचा निर्णय आल्यानंतर सरकारने त्यासंदर्भात सकारात्मक भूमिका घेतली आणि त्याबाबतीत लवकर निर्णय बाहेर येईल असे मला वाटते. एम्प्लॉयमेंट एक्स्चेजचा विषय या ठिकाणी नमूद केला होता. मी एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजकडे नेहमी पत्रव्यवहार करतो आणि नावे मागवतो. ज्या ज्या वेळी नावे मागवतो त्या त्या वेळी सर्व कॅटेगरीजची नावे त्यांच्याकडून येतात. त्या ठिकाणी जे संगणकीकरण झालेले आहे तसेच रोजगार वाहिनीचे जे पोर्टल तयार झालेले आहे त्यातून लोकांना चांगल्या प्रकारे नोकऱ्या सुध्दा देता येतात हे मला या ठिकाणी नमूद करावयाचे आहे. त्यासाठी शासनाला धन्यवाद द्यावे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. वसंत पवार ......

लागतील. अनेक गोष्टी आपल्याला या ठिकाणी बोलता येतील. अल्पसंख्यांक समाजासाठी 15 कलमी कार्यक्रम राबविला जातो. त्यामधून अल्पसंख्याकांना चांगल्या प्रकारची मदत होत आहे. स्वयंरोजगार निर्माण करताना आमच्या अनेक मित्रांनी ज्या संस्था तयार केल्या त्यातून अल्पसंख्याकांना मदत होते. महाराष्ट्रातील घरेलू कामगार कल्याण मंडळामार्फत स्मार्ट कार्ड तयार केले. त्यामुळे निश्चितपणे त्यांना चांगल्या प्रकारची मदत होत आहे. पंतप्रधान ग्राम सडक योजनेमध्ये 9520 किलोमीटर लांबीचे जवळपास 3139 रस्ते या ठिकाणी बीओटी तत्वावर तयार झालेले आहेत. नाशिक - मुंबई असा घाटातील चौपदरी रस्ता आता तयार झालेला आहे. त्याबद्दल माननीय उपमुख्यमंत्र्यांना धन्यवाद द्यावे लागतील. त्या ठिकाणी नाशिक-पुणे-मुंबई हा जो गोल्डन ट्रँगल आहे त्यामध्ये पुणे-नाशिक चौपदरी रस्ता सुध्दा घेतलेला आहे. हा गोल्डन ट्रँगल औद्योगिक लोकांच्या दृष्टीने अत्यंत चांगला राहणार आहे. जेएनएनयुआरएम अंतर्गत सर्व कॉर्पोरेशन तसेच लहान-मोठ्या शहरांसाठी जवळपास 1814 कोटी रुपये महाराष्ट्रामध्ये आले तसेच लहान शहरांसाठी 552 कोटी रुपये आले. आमच्या सप्तशृंगी गडावर फ्युनिक्युलर ट्रॉली सिस्टीम बसविण्यास सरकारने परवानगी दिली आहे. हे सुध्दा अत्यंत महत्वाचे तीर्थस्थान आणि अर्धे शक्तीपीठ आहे. त्या ठिकाणी ही परवानगी मिळालेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंतराव पवार....

ज्याप्रमाणे तुळजापूर आणि पंढरपूर या तीर्थक्षेत्रांसाठी प्राधिकरण निर्माण केले आहे त्याच धर्तीवर त्र्यंबकेश्वर आणि श्रीक्षेत्र सप्तश्रृंगी या तीर्थक्षेत्रांसाठी प्राधिकरण निर्माण केले जाईल अशी सदिच्छा मी व्यक्त केली तर ती चुकीची ठरणार नाही.

इंदिरा आवास, राजीव गांधी निवारा योजना या योजनेंतर्गत 5 लाख घरे बांधण्यात येत असल्याचा उल्लेख अभिभाषणात आहे त्याबद्दल सरकारचे मी अभिनंदन करतो.

सभापती महोदय, रेल्वेच्या संदर्भात मी सरकारचे अभिनंदन करु इच्छितो. वर्धा-यवतमाळ-नांदेड-मनमाड-मालेगांव-धुळे-शिरपूर-इंदौर, अहमदनगर-बीड-परळी-वैजनाथ, वडसा-देसाईगंज-गडचिरोली ही ठिकाणे रेल्वे मार्गाने जोडण्यासाठी नवीन रेल्वेमार्ग बांधण्याचा 50 टक्के खर्च राज्य सरकार करणार आहे. या प्रकल्पासाठी 1,302 कोटी रुपये इतका हिस्सा राज्य सरकार उचलणार आहे. त्याचप्रमाणे पुणे-सोलापूर, पुणे-शिर्डी, अमरावती, जळगाव, या विमानतळांचा विकास करण्याचा निर्णय घेतलेला आहे. आघाडी सरकारने विमानाद्वारे दळणवळणाची चांगली सोय केली आहे त्याचे फायदे लक्षात घेणे आवश्यक आहे. जे चांगले आहे त्याला चांगले म्हणण्याची तयारी ठेवली पाहिजे.

राज्यपालांच्या अभिभाषणात आणखी एक महत्वाचा मुद्दा आहे. महात्मा गांधी तंटा मुक्त गाव योजनेचे हे दुसरे वर्ष आहे. या योजनेद्वारे पहिल्या वर्षात 2,325 गावे तंटा मुक्त म्हणून जाहीर झाली आहेत. त्याचप्रमाणे पुरुष स्वातंत्र्य सैनिकांना व त्यांच्या विधवांना दरमहा 6000 रुपये एवढी आणि महिला स्वातंत्र्य सैनिकांना दरमहा 6100 रुपये एवढी रक्कम दिली जात आहे. याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो माननीय राज्यपालांना धन्यवाद देऊन मी माझे दोन शब्द संपवितो.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/

श्री.जैनुद्दीन जव्हेरी ( वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, दिनांक 16 मार्च, 2009 रोजी माननीय राज्यपालांनी अभिभाषण केले. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये राज्यातील समस्यांबाबत शासनाने केलेल्या उपाययोजनांबाबत विस्ताराने उल्लेख केलेला आहे. संपूर्ण विश्वात आर्थिक मंदी आहे, त्याप्रमाणे राज्यात सुध्दा परिस्थिती असताना राज्य सरकारने अनेक विकासाची कामे राज्यात सुरु केली आहेत. कास्तकारांसाठी अनेक उपाय योजले आहेत, कर्जमाफीची योजना लागू केली आहे. कास्तकारांच्या मालाला जास्त भाव दिला आहे. शासनाने विदर्भातील अनेक सिंचनासाठी, आपद्ग्रस्त वा आत्महत्याग्रस्त जिल्हयांसाठी पॅकेज दिले आहे, तसेच विदर्भासाठी अनेक योजना चालू केल्या आहेत. राज्यात विदर्भाचा भाग मागासलेला आहे. त्यामुळे विदर्भात आणखी काही महत्वाच्या योजना राबविणे जरुरी आहे. विदर्भातील रस्त्याच्या कामाकडे पाटबंधारे प्रकल्पांकडे, पर्यटन यासारख्या विषयात अधिक लक्ष देण्याचा विचार केला पाहिजे. विदर्भात अनेक मोठी जंगले आहेत. खनिज संपत्ती, नद्या आहेत. अशी नैसर्गिक संपत्ती अमाप आहे. त्याबाबत शासनाने विचार करुन विदर्भाला फायदा द्यावा.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 18:20

(श्री. जैनुद्दिन जव्हेरी.....)

आता नुकतेच गडचिरोली जिल्हयामध्ये नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात 16 पोलीस कर्मचारी मारले गेले. त्या घटनेबाबत या सभागृहामध्ये चर्चा झाली. अनेक सन्माननीय सदस्यांनी त्या घटनेच्या संदर्भात आपले विचार व्यक्त केले. सभापती महोदय, मी वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्थेमधून निवडून आलो आहे त्यामुळे त्या भागाची मला संपूर्ण माहिती आहे. मी हे नमूद करु इच्छितो की, विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यामध्ये शासनाने जर विकासाची कामे मोठ्या प्रमाणावर केली तर आता ज्या प्रकारच्या घटना घडत आहेत त्या घडणार नाहीत. मागासलेल्या भागातील आदिवासी लोकांच्या कल्याणासाठी, त्यांच्या उन्नतीसाठी शासनाने अनेक योजना जाहीर केल्या ख-या, परंतु त्या आदिवासीपर्यन्त पोहोचल्या नाहीत. तेव्हा या गोष्टीची शासनाने गांभीर्याने दखल घेऊन आदिवासी विभागासाठी खास करुन गडचिरोली, चंद्रपूर आणि गोंदिया या मागासलेल्या भागामध्ये मूलभूत सुविधा निर्माण करुन दिल्या पाहिजेत. आज महाराष्ट्र 50व्या सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असताना देखील या विदर्भातील या मागासलेल्या भागामध्ये शाळा नाहीत, दवाखाने नाहीत, रोजगाराची साधने नाहीत. या गोष्टींचा फायदा नक्षलवादी घेत आहेत. तेव्हा या गोष्टी लक्षात घेऊन शासनाने गडचिरोली, चंद्रपूर आणि गोंदिया या मागासलेल्या जिल्ह्यांच्या विकासासाठी शासनाने खास पॅकेज द्यावे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, जेथे उद्योग असतात तेथे प्रदूषण असते हे जरी खरे असले तरी आमच्या चंद्रपूर जिल्ह्यामध्ये प्रदूषण खूप मोठ्या प्रमाणावर आहे. पर्यावरणवादी संघटनांनी दिलेल्या अहवालानुसार संपूर्ण जगात सर्वात जास्त प्रदूषण चंद्रपूर जिल्ह्यामध्ये आहे. आमच्या कोकणातील काही सन्माननीय सदस्यांनी आम्हाला उद्योग नको पर्यटन हवे आहे अशी मागणी केली. ज्या प्रमाणे कोकणामध्ये पर्यटन विकास होऊ शकतो त्याप्रमाणे विदर्भातही तो होऊ शकतो. याचे कारण असे की, विदर्भामध्ये मोठमोठी जंगले आणि टायगर प्रोजेक्ट आहे. तसेच गोंड राजाचे किल्ले आहेत. परंतु पर्यटनाच्या दृष्टीने या किल्ल्यांचा विकास करण्यासाठी शासनाकडून आवश्यक तो निधी उपलब्ध करुन दिला जात नाही. तेव्हा पर्यटन विकासासाठी शासनाने विदर्भाला निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी विनंती करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जैनुद्दीन जव्हेरी...)

सभापती महोदय, प्रदूषण होऊ नये यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच पर्यावरण विभागाने अनेक नियम केलेले आहेत. परंतु त्या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जात नाही. छोटे मोठे उद्योग नदीमध्ये रसायने सोडतात, चिमण्यांचे पंखे चालू ठेवले जात नाहीत. प्रत्यक्ष पाहणीमध्ये सगळे काही ठीक आहे असे सांगितले जाते. जेव्हा इन्स्पेक्शन करण्यात येते त्यावेळी चिमणीचे पंखे चालू करण्यात येतात आणि इन्स्पेक्टर गेले की विजेची बचत व्हावी म्हणून ते पुन्हा बंद करण्यात येतात. तेव्हा या निमित्ताने मी अशी विनंती करतो की, चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषण कमी होण्याच्या दृष्टीने कडक उपाययोजना करावी.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये अल्पसंख्यांकाकरिता 15 कलमी कार्यक्रम जाहीर केलेला असून त्यांच्यासाठी अनेक योजना राबविण्याचा उल्लेख केलेला आहे. या योजनांसाठी शासनाने बजेटमध्ये जास्तीत जास्त निधी उपलब्धकरुन द्यावा अशी विनंती करतो आणि माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये 86 मुद्दे दिलेले आहेत. त्यानंतर "या अधिवेशनातील आपल्या सर्व विचारविमर्शास मी सुयश चिंतितो" असे वाक्य देण्यात आलेले आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर...

मी त्यांच्या शुभेच्छा घेऊन त्यांनी केलेल्या अभिभाषणाच्या अनुषंगाने काही मुद्दे सभागृहात मांडणार आहे.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक 3 मध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबई शहरावर दहशतवादी हल्ला झाला. हा हल्ला केवळ शहरावरच झाला नसून तो आपल्या संपूर्ण देशावरच हल्ला होता. ही गोष्ट सरकारने एवढी गांभीर्याने घेतली असती तर मला वाटत नाही की, सरकारने दिलेला शब्द ज्यावेळी हा हल्ला झाला, त्यावेळच्या लोकांच्या भावना समजून प्रत्येक शहीद झालेल्या अधिका-यांच्या वारसांना 25 लाख रुपयांची मदत जाहीर केली होती. सभापती महोदय, कै.हेमंत करकरे यांच्या कुटुंबियांना फक्त 13 लाख रुपये देण्यात आले. ते वर्क्समॅन कॉम्पेनसेशन ॲक्ट प्रमाणे द्यावयाचे होते तर त्याला शासनाने 25 लाख रुपये एवढी मोठी रक्कम दाखविण्याची गरज नव्हती. आपण असे दाखविता आहात की, शहीद झालेल्या लोकांच्या कुटुंबियांसाठी मोठी मदत करीत आहोत. परंतु वस्तुत: जी रक्कम दिलेली आहे, तो त्यांचा अधिकार आहे. वर्क्समॅन कॉम्पेनसेशन ॲक्टप्रमाणे जर ते या हल्ल्यातही शहीद झाले नसते आणि सेवेमध्ये असताना त्यांचे निधन झाले असते तर सर्व्हीस कॉम्पेनसेशन ॲक्ट त्यांना लागू झाला असता.

सभापती महोदय, यासंदर्भात दुसरा मुद्दा असा आहे की, शासनाच्या आदेशानुसार दिनांक 1 डिसेंबर, 2008 रोजी असे सांगण्यात आले आहे की, पोलीस दलातील मृत्यू पावलेल्या पोलीस अधिका-यांच्या मुलांचा उच्च तंत्र शिक्षण व पदवीत्तर शिक्षणाचा खर्च शासनातर्फे करण्यात येईल. त्याच अनुषंगाने दिनांक 23 जानेवारी, 2009 रोजी शासनाने दुसरा असा आदेश काढला आहे की, शिक्षणाचा खर्च फक्त इयत्ता 12 वी पर्यंतच केला जाईल. तसे म्हणाल तर या राज्यात इयत्ता 12 वी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण दिले जात आहे. एकीकडे त्यावेळेला देशातील, राज्यातील, शहरातील लोकांच्या भडकलेल्या भावना लक्षात घेऊन शासनाने मोठमोठया घोषण केल्या. या अभिभाषणात या अनुषंगाने ज्या गोष्टी नमूद केल्या आहेत, त्यातील एकही गोष्ट त्यांच्या कुटुंबियांना मिळत नाही. शहीद झालेल्यांच्या वारसांना 600 ते 1000 चौरस फुटाच्या सदनिका मोफत देण्यात येणार आहेत असा उल्लेख अभिभाषणाच्या सातव्या परिच्छेदात करण्यात आलेला

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

आहे. सभापती महोदय, खेदाने असे म्हणावे लागते आहे की, सरकारने हा हल्ला ज्या पध्दतीने गांभीर्याने घ्यावयास पाहिजे होता त्या पध्दतीने घेण्यात आलेला नाही. यासंबंधी आणखी एक उदाहरण मला देता येईल. मुंबई क्राईम ब्रँचमध्ये पूर्वी पोलीस आयुक्त पद होते. मुंबई शहरात टोळीयुध्द भडकले त्यावेळी पोलीस उपायुक्त पद निर्माण करण्यात आले. वर्ग-1 अधिका-यांना हे पद देण्यात आले. मुंबई पोलीस उपायुक्त होण्याचा पहिला मान श्री. राकेश मारिया यांना मिळाला. आता मुंबई शहरावर झाला त्यानंतर या पदावर श्री.देवेन भारती कार्यरत आहेत. त्यांना अतिरिक्त पोलीस आयुक्त पदी बढती मिळूनही मुंबई क्राईम ब्रँचच्या उपायुक्त पदावर अजूनही कोणी डी.सी.पी. म्हणून नेमले गेले नाहीत. या गोष्टीकडे शासन किती गांभीर्याने बघत आहे हे यावरुन दिसून येते. खरे म्हणावयाचे झाले तर मुंबई शहर हे दहशतवाद्यांचे नेहमीच टार्गेट राहिलेले आहे. दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख श्री. हेमंत करकरे हे या हल्ल्यात शहीद झालेले आहेत. माननीय गृहमंत्र्यांनी या सभागृहात सांगितले की, पोलिसांचे मनोबल वाढविले जाईल. पोलिसांना आणखी वेल इक्वीप्ड केले जाईल. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात या गोष्टीचा बहुतेक ठिकाणी उल्लेख आहे. परंतु आजही दहशतविरोधी पथकाच्या प्रमुखांची जागा आजही रिक्त आहे. एका पोलीस अधिका-याकडे अतिरिक्त दहशतवाद विरोधी पथकाचा अतिरिक्त चार्ज देण्यात आला आहे. या पदावर अजूनही स्वतंत्रपणे पोलीस अधिका-यांची नेमणूक केली गेलेली नाही. दुसरी गोष्ट अशी की, खंडणी विरोधी पथकाचे प्रमुख श्री.विजय साळसकर होते. ते देखील या हल्ल्यामध्ये शहीद झाले आहेत. आजही या हल्ल्याला गांभीर्याने बघितले जात नाही. खंडणी विरोधी पथकाचे प्रमुख या पदावर दुस-या पोलीस अधिका-यांची अद्याप नेमणूक केली गेलेली नाही. यावरुन या हल्ल्याला सरकार किती गांभीर्याने घेते आहे याचा विचार करण्याची गरज आहे. क्राईम ब्रँचच्या उपायुक्त पदावर शहीद झालेले विजय साळसकर यांनी काम केले आहे. श्री. के.एल.प्रसाद, श्री. राकेश मारिया, श्री.दीपक जोग यांनी देखील क्राईम ब्रँचच्या उपायुक्त पदी काम केले आहे. त्याही जागेवर आज दुस-या पोलीस अधिका-यांना शासन नेमू शकत नाही. श्री. देवेन भारती यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविलेला आहे. क्राईम ब्रॅच डी.सी.पी.चा चार्ज ॲडिशनल चार्ज अजूनही राहतोय.

यानंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ 18:30

श्री.किरण पावसकर...

दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख स्व.हेमंत करकरे यांचा ॲडिशनल चार्ज राहतोय, स्व.साळसकर यांची जागा सहा महिने होऊनही चार्ज राहतोय. एवढा मोठा हल्ला झाला त्याची देश परदेशात चर्चा झाली, त्यानंतरही अशा मुद्यांकडे शासनाने गांभीर्याने पाहिले नाही. ज्या अधिकाऱ्यांना वीरगती प्राप्त झाली त्यांना बुलेटप्रूफ जॅकेट दिले गेले असते तर अशी वेळ आली नसती. परंतु पोलिसांच्या दृष्टीने खरेदी करावयाच्या अत्याधुनिक उपकरणामध्ये भ्रष्टाचार झाल्याची चर्चा करण्यात आली. त्याची सखोल चौकशी सुरु करण्यात आली परंतु फाईल मिळत नाही. आतापर्यंत अधिकारी गायब होत होते, परंतु आता फाईल गायब होऊ लागली आहे. त्यामुळे ज्या शहिदांच्या कुटुंबांना सरकारने काही मदत देऊ केली ती मिळत नसल्यामुळे ती कुटुंबे चिंतेत आहेत. जे पोलीस अधिकारी, कर्मचारी आज सेवेत आहेत ते देखील अशा फाईल गायब होण्याच्या प्रकारामुळे चिंतेत आहेत. यामुळे पोलिसांचे मनोधैर्य वाढेल असे वाटत नाही. काही लोक घरांच्या प्रतिक्षेत असतात. आज ना उद्या शासनाकडून घर मिळेल अशी अपेक्षा बाळगून असतात. परंतु सायन येथे 650 घरे पोलिसांच्या प्रतिक्षेत वर्षानुवर्षे वाट पहात आहेत. एकीकडे राष्ट्रपती पुरस्कार जाहीर होऊनही तो वेळेवर दिला जात नाही, तो आज ना उद्या मिळेल अशा प्रतिक्षेत पोलीस आहेत. सरकार या विषयांकडे गांभीर्याने पहाते असे वाटत नाही.

सभापती महोदय, जून महिन्यामध्ये विशाल प्रकल्पांचे धोरण शासनाने जाहीर केले. ज्यामुळे 3 लाख लोकांना नोकऱ्या मिळणार आहेत. 3 लाख लोकांना नोकऱ्या मिळणार असताना राज्यात अनेक ठिकाणी लोकांच्या नोकरी राहिलेल्या नाहीत. पुणे येथील हिंजवडी परिसरात आय.टी.पार्क आहे. तेथे बहुतांश युवकांना नोकऱ्या मिळाल्या. परंतु आज 30 टक्के लोकांची कामगार कपात करण्यात आली. हिंजवडीमध्ये प्रकल्प आले. परंतु तेथे 30 टक्के लोकांचा रोजगार हिरावून घेण्यात आला आहे. वेतन कपात करण्यात आली आहे. कामगार कपात झाली आहे. मुंबई शहरात हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्रीमध्ये 40 टक्के लोकांचा रोजगार कमी झाला आहे. त्यात हॉटेल्स, हॉस्पिटल्स, एअरपोर्ट यांचा समावेश आहे. 22 फार्मास्युटिकल मल्टिनॅशनल कंपन्या राज्यातून निघून गेल्या आहेत. इंजिनिअरिंग युनिटस् मुंबईमध्ये मोठया प्रमाणात होत्या. आज बहुतांश युनिट आपली जागा विकून राज्यातून त्या बाहेर गेल्या आहेत. अशा काळात 3 लाख लोकांना कोणती नोकरी देणार आहात याचा खुलासा सभागृहापुढे केला पाहिजे. 3 लाख

..2..

श्री.किरण पावसकर...

लोकांना नोकऱ्या दिल्यानंतर पुढे असेही म्हटले आहे की, येणाऱ्या प्रकल्पातून 65 लाख अतिरिक्त रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. 43 विशेष आर्थिक क्षेत्रे अधिसूचित करण्यात आली आहेत. या सर्व क्षेत्रात येणाऱ्या प्रकल्पांना वीज कुठून देणार आहात? हा प्रश्न समोर असताना नोकऱ्या मिळणे तर दूर राहील परंतु असलेल्या नोकऱ्या टिकविणे हे महाराष्ट्रातील लोकांना कठीण होऊन बसले आहे.

सभापती महोदय, बाल कामगार प्रथांचे निर्मूलन करण्यासाठी शासनाने सर्व प्रकारच्या बाल कामगार प्रथांचे उच्चाटन करण्यासाठी कृती योजना तयार केली आहे. बाल कामगारांच्या बाबतीत म्हणावयाचे झाले तर.................

4एफ.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर .....

बाल कामगारांसाठी सांगली, जळगांव आणि शिर्डी येथील कारखान्यात स्फोट झाले आणि 26 मे, 2009 रोजी धारावी कारखान्यात स्फोट झाला त्यात दोन कामगार ठार झाले. अंबरनाथ येथील बुवापाडा परिसरातील कारखान्यात काम करणाऱ्या एका बालकामगार मुलीची बोटे तुटली, तिला उपचारार्थ दवाखान्यात भरती करण्यात आली. अशा प्रकारे बालकामगारांना किमान वेतनावर राबवून घेणे व बालमजुरी हा गुन्हा असून त्याकडे सहाय्यक आयुक्त, कामगार आणि आस्थापना दुकाने निरीक्षक हे लक्ष देत नाहीत. तीन वर्षापूर्वी उल्हासनगर येथे यंत्रमाग कारखान्यात एका मुलाचा हात कापला गेला होता. अशा प्रकारे शासन अभिभाषणातून बालकामगार विषयक धोरणाचा उल्लेख करते परंतु बालकामगार प्रथा निर्मुलन तर दूरच राहिले पण ज्या ठिकाणी त्यांना नोकरीवर ठेवले जाते त्या ठिकाणच्या मालकांवर सुध्दा कारवाई होत नाही. उलट त्या ठिकाणी स्फोट झाल्यानंतर, अपघात झाल्यानंतर अथवा मृत्युमुखी पडल्यानंतर ही घटना समजते. अशा प्रकारे बालकामगार प्रथेचे निर्मुलन करण्यासाठी शासनाकडून प्रयत्न होत असतील तर मला वाटत नाही की यात सुधारणा होणार आहे. कारण सद्य:स्थिती आणि भाषणातील उल्लेखयामधील तफावत फारच दिसत आहे.

महोदय, सार्वजनिक रुग्णालयांमार्फत सर्वांना विशेषोपचार यासंदर्भात मी आपल्यासमोर निदर्शनास आणू इच्छितो की, आज रुग्णालयांची परिस्थिती अशी आहे की, राज्यातील काही रुग्णालये खरोखरच वाईट परिस्थितीत आहेत. राज्यातील जिल्हा रुग्णालये आजारी पडलेली आहेत. राज्यातील 32 रुग्णालयांचे सर्व्हेक्षण सकाळ या दैनिकातर्फे करण्यात आले. त्यानुसार 27 रुग्णालयांमध्ये मुत्रपिंडविकाराची सोय नाही, 23 रुग्णालयांमध्ये नेफ्रॉलॉजी हा विभागच नाही, 22 जिल्ह्यांमध्ये हृदयरोगावरील उपचाराच्या सुविधेचा अभाव आहे. रायात हृदयरोग तज्ज्ञ 1431 असताना 798 जागा रिक्त आहेत. आपण कोट्यवधी रुपये खर्च करुन शहापूर येथे 100 खाटांचे रुग्णालय तयार केले परंतु तज्ज्ञ डॉक्टरांच्या अभावी ते देखील व्हेंटिलेटरवरच आहे. टाटा मेमोरियल या कॅन्सर हॉस्पिटलमध्ये 100 कोटीचा जो घोटाळा उघडकीस आला त्यात डिस्पेन्सरी विभागातील रेखा बतुरा, वाय.बी.दिक्षीत, पी.बी.ढाके, नमिता देशपांडे, लीना नाखरे आणि चेतन पवार इ. लोकांना अटक करण्यात आली आहे. त्यांची बेहिशेबी मालमत्ता असल्याचे सीबीआयच्या

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

तपासात निष्पन्न झाले. इकडे मात्र अभिभाषणातून आरोग्यासाठी शासनाने अमुक सुविधा देण्यात आल्याचे सांगतात दुसरीकडे मात्र सार्वजनिक आरोग्याच्या बाबतीत राज्यातील परिस्थिती वेगळीच आहे.

महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्याला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आले पण याच ठिकाणी पर्यटनासाठी दिलेला निधी मात्र स्मशान भूमीसाठी वापरला जातो ही पर्यटनाची दुर्दशा आहे. पर्यटन जिल्हा असताना बाग-बागायती आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याचे सौंदर्य टिकवावयाचे सोडून तेथे मायनिंग प्रकल्प आणून पर्यटन उद्ध्वस्त होत असेल, लोकांचे जीवन उद्ध्वस्त करुन मायनिंगचे कारखाने आणणार असतील तर ते योग्य नाही, याचा विचार शासनाने करावा. या अभिभाषणातून एकूण 86 मुद्यांचा उल्लेख केलेला आहे. मात्र वस्तुस्थिती खेदजनक व खंत वाटण्यासारखी आहे म्हणून या अभिभाषणाबाबत पुन्हा खेद व्यक्त करतो आणि माझी दोन शब्द पूर्ण करतो.

जयहिन्द जय महाराष्ट्र.

-------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यातील बहुतांशी भागामध्ये बी.टी. लागवडीच्या क्षेत्रात वाढ झालेली आहे. बी.टी. लागवडीचे क्षेत्र वाढल्यामुळे त्यासाठी लागणा-या बियाण्यांचा व खताचा पुरवठा करण्याची जबाबदारी ही शासनाची आहे. परंतु लोकसभेचा निकाल लागल्यानंतर नाशिक, धुळे व जळगाव या तीन जिल्हयामध्ये शेतक-यांनी बीटीच्या बियाण्यांची व खताची मागणी केल्यानंतर त्या शेतक-यांना बीटीच्या बियाण्यांचा व खताचा पुरवठा न करता त्यांच्यावर लाठी हल्ला आणि गोळीबार करण्यात आला. त्यामुळे हे सरकार शेतक-यांच्या बियाण्यांच्या संदर्भात आणि खतांच्या संदर्भात किती गंभीर आहे हे दिसून येते. बी.टी. लागवडीच्या क्षेत्रात वाढ झालेली आहे हे शासनानेच सांगितलेले आहे परंतु त्यासाठी लागणा-या बियाण्यांची तसेच खतांची उपलब्धता मात्र या शासनाने करुन दिलेली नसल्यामुळे हे शासन शेतक-यांच्या संदर्भात किती गंभीर आहे हे दिसून येते. शेतक-यांना बियाणे व खते मिळत नसल्यामुळे शेतक-यांची कुचंबणा होत आहे.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की, अल्पसंख्यांक समाजासाठी 15 कलमी कार्यक्रम तयार करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमामध्ये माध्यमिक पूर्व शिष्यवृत्ती देण्यासाठी 55,200 इतक्या विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे परंतु ही योजना एकदम फोल ठरलेली आहे. शिष्यवृत्तीच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने जाहिरात देऊन 14.5 लाख विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवले होते. प्रत्येक मुलाकडून 500 रुपये अर्जाची फी घेण्यात आली प्रत्यक्षात या अर्जामुळे शासनाकडे 30 ते 35 कोटी रुपये जमा झाले. परंतु महाराष्ट्र शासनाने मुलांना केवळ 5 ते 6 कोटी रुपयांचे वाटप केले. शिष्यवृत्तीमध्ये सुध्दा नफा कमावण्याचा धंदा या राज्य शासनाने केलेला आहे.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये राज्यातील अल्पसंख्याकांसाठी ब-याच योजनांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांना गणवेषासाठी 14.7 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. परंतु दुर्दैवाने आतापर्यंत एकाही अल्पसंख्यांक मुलाला गणवेष मिळालेला नाही. ही जी माहिती आहे ती मागील वर्षाची आहे या वर्षाची काय परिस्थिती आहे याची काहीही माहिती नाही. हा निधी संचालक शालेय शिक्षण यांच्याकडे आहे. अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांना या पैशामधून गणवेष किंवा कफनही दिलेले नाही.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल....

सभापती महोदय, अल्पसंख्याक समाजाच्या शाळांना पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी जाहीरात देण्यात आली होती परंतु आतापर्यंत एकाही शाळेला एक पैसा देखील या शासनाने दिलेला नाही . उच्च शिक्षण घेणा-या अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी 36 कोटी रुपये दिले गेले.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल ....

मागच्या वर्षीच्या मुलांसाठी 36 कोटी देण्यात आलेले आहेत. या वर्षी नवीन प्रवेश सुरु होणार आहेत तेव्हा मागच्या वर्षीच्या मुलांसाठी 36 कोटी रुपये देण्यात आले होते परंतु हे पैसे मिळविण्याकरिता बॅन्क ऑफ महाराष्ट्रमध्येच त्यांनी खाते उघडले पाहिजे. असे सांगण्यात आलेले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यानी बॅक ऑफ महाराष्ट्राची शाखा कोठे शोधावयाची ? या बॅकेत जर खाते उधडण्यात आले नाही तर पैसे मिळणार नाहीत. अशा प्रकारे लोकांना मूर्ख बनविण्याचा धंदा सुरु आहे.या देशातील अल्पसंख्याकाना मूर्ख बनवून त्यांची मते घेण्याचा प्रयत्न केला जात आहे...

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ इन्फोरमेशन है. माननीय सदस्य बहुत अच्छी भावना से भाषण कर रहे हैं. लेकिन जो फिगर्स उन्होंने बताए हैं, वे कौन से बजट और कौन से खाते से संबंधित हैं ? उनके फिगर्स सुनकर हमारा कन्फ्यूजन हो रहा है, इसलिए यह जानकारी माननीय सदस्य बताएंगे तो ठीक रहेगा.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांचे कनफयूज होऊ देऊ नये. सन्माननीय सदस्यांना जेवढे हित कळते तेवढे मलासुध्दा कळते. या ठिकाणी मी ही आकडेवारी लिहून आणलेली असून ती शासनाची आकडेवारी आहे. मी हवेत वार करीत नाही. माझ्याकडे जी आकडेवारी आहे ती शासनाने दिलेली आहे. सरकार काही माझे नाही. सरकार तुमचेच आहे.तेव्हा या आकडेवारीमध्ये फोलपणा आहे किंवा ते खरेपणा आहे हे सिध्द करण्याचीसुध्दा माझी तयारी आहे.

सभापती महोदय, अल्पसंख्याक बहुल क्षेत्राच्या विकासासाठी एक कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून त्यामध्ये महाराष्ट्रातील 43 शहरांचा समावेश करण्यात आला होता . बहुतांशी मुस्लीम समाजाची मते कॉग्रेस पक्षाला मिळत असून देशामध्ये 60 वर्षे कॉग्रेसचे सरकार आहे परंतु मुस्लीम बहूल गल्लीमधून जर जावयाचे असेल तर नाकाला रुमाल लावल्याशिवाय जाता येत

. . . 4 H 2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल ....

नाही. शहरातील मुस्लीम वस्त्याचा विकास करण्याकरिता एक योजना आखण्यात आली असून त्यानुसार अ वर्ग नगरपालिकेला 30 लाख रुपये, ब वर्ग नगरपालिकेला 20 लाख रुपये आणि क वर्ग नगरपालिकेला 10 लाख रुपये देण्यात येणार होते त्याप्रमाणे संबंधित नगरपालिकेकडून अर्ज मागविण्यात आले होते परंतु प्रत्यक्षात कोणत्याही नगरपालिकेला एक रुपयासुध्दा दिला गेला नाही.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळासाठी 95 कोटी रुपये देण्यात आले असून ते पैसे त्यांनी फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवले आहेत व त्या रकमेवरील व्याज हे महामंडळ घेत आहे. हे पैसे फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवण्या ऐवजी जर अल्पसंख्याक तरुणांना वाटले असते तर त्यांना रोजगार मिळाला असता परंतु सरकार दाखवते एक आणि प्रत्यक्षात मात्र दुसरे करते. यामध्ये मनाला वेदना होणारी एक गोष्ट अशी आहे की टेकनिकल आणि प्रोफेशनल डिग्री घेणा-या विद्यार्थ्यासाठी 25हजार रुपये शिष्यवृत्ती देण्याची एक योजना होती परंतु 31 मार्च रोजी या योजनेसाठी असलेले 15 कोटी रुपये दुसरीकडे वळते करुन त्या पैशातून औषधांची खरेदी करण्यात आली होती. अशाप्रकारे औषधाचा आणि शिक्षणाचा काही सबंध आहे काय ? परंतु हे शासन दाखवते एक आणि प्रत्यक्षात दुसरे करीत असते. अल्पसंख्याक समाजाच्या नावावर पैसे घ्यावयाचे आणि ते इतर ठिकाणी वापरावयाचवे ही गोष्ट इतर लोकांना अजून कळलेली नाही परंतु ज्या दिवशी ही गोष्ट त्यांना कळेल त्या दिवशी सर्वच लोक शहाणे होतील . आता फक्त दोन चार जिल्हयातील लोकांनाच ही गोष्ट कळलेली आहे परंतु विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी सर्वच लोकांना ते कळेल आणि सर्वजण शहाणे् होतील.

सभापती महोदय, यानंतर आणखी एक बाब मी या ठिकाणी मांडू इच्छितो. सरकारी कर्मचा-यांसाठी सहावा येतन आयोग लागू करण्याची घोषणा सरकारने केली आहे. सहावा वेतन आयोग देण्यासाठी माझा विरोध नाही. परंतु सहावा वेतन आयोग सरकारी कर्मचा-यांना देत असतांना ज्याप्रमाणे त्यांना फायदा व्हावा असा विचार केला जात आहे त्याचप्रमाणे माझ्या गावात

3.



VTG/ MAP/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 18:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल ....

शेतामध्ये काम करणा-या शेतमजुरांचा देखील विचार केला असता तर बरे झाले असते. सहाव्या वेतन आयोगामुळे सरकारी कर्मचा-यांना रोज दोन हजार ते अडीच हजार रुपये मिळणार आहेत परंतु गावात राहणा-या शेत मजुरांना 66 रुपये आणि 82 रुपये रोज मिळणार आहे.

नतर श्री.सुंबरे

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा ....

समजा मी आमदार झाले नसतो, मला भाषण करता आले नसते आणि मी गावात राहिलो असतो तर आज मला 82 रूपये मिळाले असते. मला 82 रूपये रोज आणि तुम्हाला मात्र हजार रूपये रोज मिळतात. हा विचार करून मग माझे डोके पागल झाले असते आणि मग मी मुंबईत येऊन काय काय उपद्व्याप केले असते ते सांगता येत नाही. आज जे काही सुपाऱ्या घेणे देणे वगैरे चालू आहे हे सगळे जीवाला किंमत नाही म्हणून चालू आहे. सभापती महोदय, या निमित्ताने मी आपणा सगळ्यांनाच विनंती करणार आहे की, बेशक तुम्ही घ्या, पण घेताना आपले जीवन सुरक्षित राहील, आपल्याला कोणी भुकेपोटी गोळी घालणार नाही याची काळजी घ्या. जसे सरकारी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सरकार विचार करते तसे गावातील कर्मचाऱ्याच्या संदर्भात देखील विचार होणे गरजेचे आहे. हेच नेमके यात राहिले आहे आणि तसे ते राहू नये अशी मी सरकारला सूचना करतो आणि या सगळ्या गोष्टीकडे गंभीरपणे पहावे एवढी एक विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

***

..... 4आय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. गायकवाड नंतर --- 18:50

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी या ठिकाणी माननीय राज्यपालांनी केलैल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. सभापती महोदय, पुरोगामी विचारांचा वसा आणि वारसा ज्या महाराष्ट्राच्या भूमिमध्ये रूजला, अंकुरला आणि विस्तार पावला त्याच भूमीमध्ये योजनांची वेल कशी विस्तार पावत जाते याचे उत्तम उदाहरण म्हणून राज्यपालांच्या अभिभाषणाकडे पाहता येईल. सभापती महोदय, आदरणीय सोनियाजी गांधी यांना अभिप्रेत असणाऱ्या सर्व घटकांचे प्रतिबिंब राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये निश्चितपणे आपल्याला पाहता येते. महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या योजनांचा आंतर्भाव या अभिभाषणात निश्चितपणे घडून आलेला आहे. सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणातील व्यापक मांडणीमुळे राज्य सरकारचा वेलू गगनाला भिडेल आणि निश्चितपणे पाहणाऱ्यांच्याहि डोळ्याचे पारणे फेडल्याशिवाय राहणार नाही अशी अपेक्षा व्यक्त केल्यास ती अप्रस्तुत ठरू नये. सभापती महोदय, मुंबई प्रांताची पहिली विधानसभा 1937 मध्ये अस्तित्वात आली. त्यानंतर महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले 1960 ला आणि आजपर्यंत महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमाप्रश्न आहे तसाच आहे. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सर्वोच्च न्यायालयात जो दिवाणी दावा दाखल केलेला आहे, महाराष्ट्र शासनाच्या वतीने नामांकित वकील मंडळी महाराष्ट्र शासनाची बाजू तेथे मांडत आहेत. माझी आपल्यामार्फत विनंती आहे की, हे जे नामांकित वकील आहेत हे या महाराष्ट्राला आणि सभागृहाला कळले म्हणजे जेव्हा केव्हा हा सीमाप्रश्न सुटेल तेव्हा या वकील मंडळींचा स्वागत आणि सत्कार करण्याचे एक उत्तम काम निश्चितपणे आमच्या हातून घडेल. सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये स्वातंत्र्य सैनिकांचे निवृत्ती वेतन दोन हजार रूपयांनी वाढविले आहे. त्यांच्या वैद्यकीय बिलांची प्रतिपूर्ती देखील महाराष्ट्र शासन करणार आहे. माझी शासनाला आपल्यामार्फत विनंती आहे की, आपला हा निर्णय उत्तम आहे, स्तुत्य आहे. पण महागाई निर्देशांकाप्रमाणे या स्वातंत्र्य सैनिकांना निवृत्ती वेतन मिळाले तर निश्चितपणे या स्वातंत्र्य सैनिकांचे जीवन सुसह्य होऊ शकेल. महाराष्ट्र सरकारने रत्नागिरी येथील विमानतळ संरक्षण खात्याकडे सुपूर्द करण्याचा एक उत्तम निर्णय घेतला आहे. मला असे वाटते की, हा अतिशय दूरदर्शीपणे घेतलेला निर्णय आहे. त्यामुळे जी राज्याची सागरी किनारपट्टी आहे त्या किनारपट्टीवर एक प्रकारे नैतिक दरारा निर्माण होईल. तसेच या

..... 4आय 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. नवले ....

सागरी किनारपट्टीच्या बाजूकडून जो काही या राज्याला किंवा देशाला धोका आहे त्यावर देखील नियंत्रण ठेवण्यासाठी नौसेना व तटरक्षक दलाच्या मदतीने फायदा होऊ शकेल.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने अहमदनगर-बीड-परळी या रेल्वे मार्गाचा 50 टक्के खर्च सोसण्याची तयारी दर्शविली आहे. गेली 50 वर्षे बीड जिल्ह्यातील जनतेची ही मागणी आहे. ..

( यानंतर श्री. सरफरे .....4जे 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

आणि 50 वर्षानंतर कां होईना हे महाराष्ट्र शासन ही मागणी पूर्ण करीत आहे याबद्दल या शासनाचे आणि विशेषत: आदरणीय राज्यपाल महोदयांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.बीड जिल्हा ग्रामीण भागातील आर्थिकदृष्टया मागासलेला शोषित भाग आहेत, त्या भागासाठी रेल्वे देण्याचा पुरोगामी निर्णय घेतल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये 39 हजार 106 गावे बारमाही रस्त्यांनी जोडण्यात आली. परंतु आजही महाराष्ट्रामध्ये 1302 गावे बारमाही रस्त्यांनी जोडलेली नाहीत. माझी महाराष्ट्र शासनाला विनंती आहे की, 1302 गावे सुध्दा बारमाही रस्त्यांना जोडण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत. हे महाराष्ट्र शासन तुळजापूर आणि पंढरपूर याठिकाणी प्राधिकरण स्थापन करणार आहे. तुळजापूर आणि पंढरपूर ही महाराष्ट्रातील शक्तीपिठे आहेत, प्रेरणास्त्रोत आहेत. त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासन प्राधिकरणाची निर्मिती करणार असेल तर त्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन केले पाहिजे. या निर्णयाबद्दल महाराष्ट्रातील वारकरी, धारकरी या सर्वांना आनंद झाल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील पारधी समाजाच्या लोकांना घरे देण्यासाठी 9 कोटींच्या तरतुदीला माननीय राज्यपालांनी मंजूरी दिली आहे. "पारधी समाज म्हणजे वाऱ्यावरची वरात आणि कुणाच्याही घरात" अशाप्रकारचे चित्र पारधी समाजाच्या वाटयाला आले आहे. त्या समाजावर एक वेगळया प्रकारचा शिक्का पोलीस खात्यामार्फत मारण्यात आला आहे. त्याबाबत सरकारला विनंती आहे की, राज्यातील सर्व पारधी समाजाचा सर्व्हे करुन येत्या दोन-तीन वर्षामध्ये संपूर्ण पारधी समाजाला घरे दिली जातील यादृष्टीने महाराष्ट्र शासनाने योजना आखली पाहिजे. सभापती महोदय, मी यानिमित्ताने राष्ट्रसंत भैय्यू महाराजांचे अभिनंदन करतो. त्यांनी पारधी समाजाच्या मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी याकरिता बुलढाणा जिल्हयात आश्रमशाळा सुरु केली आहे.त्या आश्रमशाळेला संगणक देण्यासाठी मी माझ्या आमदार निधीमधून शिफारस केली होती. त्या शिफारशीला सहा महिने उलटून गेले तरी नियोजन अधिकाऱ्यांच्या कोडगेपणामुळे त्या शाळेकडे निधी पोहोचू शकला नाही. मधल्या काळात आचारसंहितेचे कारण सांगण्यात आले. ही आचारसंहिता म्हणजे आणीबाणी नाही. या आचारसंहितेचे स्तोम माजविले जात आहे. अशाप्रकारे शासनातील काही अधिकारी हेतूत: हे पैसे त्या शाळेपर्यंत पोहोचणार नाहीत याची काळजी घेत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ KGS/

प्रा. सुरेश नवले...

आहेत. तेव्हा आमदार फंडामधून ज्या ज्या संस्थांना मदत दिली गेली आहे त्या संस्थांकडे ताबडतोब ती मदत पोहोचविली जाईल यादृष्टीने सरकारने प्रयत्न करावेत अशी मी आग्रहपूर्वक विनंती करतो.

सभापती महोदय, बाल कामगारांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्यात 206 शाळा अस्तित्वात आहेत. आपणास जर बाल कामगार पहावयाचे असतील तर या विधान भवनापासून हाकेच्या अंतरावर मरिन ड्राईव्हच्या परिसरात ते भीक मागतांना पहावयास मिळतील. त्यांना भीक मागायला लावणारे कोण आहेत? त्यांचे पुनर्वसन तुरुंगामध्ये करण्याची आवश्यकता आहे. "स्लम डॉग मिलेनियर" या चित्रपटाला ऑस्कर पुरस्कार मिळाला. तो चित्रपट देखील या विषयावर आधारीत आहे. या बाल कामगारांचे पुनर्वसन करीत असतांना हाकेच्या अंतरावर असलेल्या बाल कामगारांचाही आपण बंदोबस्त करा. त्यांचेही या 206 शाळांमध्ये पुनर्वसन करण्यासाठी शासनाने निश्चितपणे प्रयत्न करावेत. आणि महाराष्ट्राच्या कोणत्याही शहरात एकही बाल कामगार भीक मागणार नाही याची दक्षता महाराष्ट्र शासनाने घ्यावी. त्या बालकांना शाळेत जाता येत नाही, त्यांची भीक मागण्याची इच्छा नसते. परंतु त्यांना जबरदस्तीने भिकेला लावले जाते. हे कृत्य काही समाजकंटक करीत असतात, त्यांचा बंदोबस्त महाराष्ट्र शासनाने निश्चितपणे करावा अशी विनंती आपल्यामार्फत राज्य शासनाला करणार आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले . . . .

सभापती महोदय, दूध संघासाठी 16 प्रकल्पांना मंजूरी देऊन, महाराष्ट्र शासनाच्या वतीने जवळजवळ 33 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे आणि याचा आनंद आहे. परंतु मला असेही दूध संघ माहिती आहेत की, या दूध संघामध्ये येणाऱ्या दुधामध्ये युरिया मिसळला जातो. त्या दुधामध्ये सुफला मिसळला जातो, काही केमिकल्स् मिसळली जातात. सॅकरीन मिसळले जाते. त्यामुळे दूध संघाच्या परिसरातील कुत्री,मांजरी उरले-सुरलेले, सांडलेले दूध पितात. परंतु आता या कुत्र्या-मांजरांच्या अंगावर एकही केस शिल्लक राहिलेला नाही. सभापती महोदय, आपण जर मला परवानगी देणार असाल तर मी अशा कुत्र्या-मांजरांना सभागृहामध्ये आणून दाखवू शकतो. या तालुका दूध महासंघातील गोष्टींचे दुष्परिणाम त्या परिसरातील कुत्र्या-मांजरावर झाल्याचे दिसून येत आहेत आणि याच तालुका महासंघाचे दूध महानंदा कडे येते आणि तेच दूध तेथून मुंबई आणि इतर परिसरातील लोकांना दिले जाते. त्यामुळे याबाबतीत महाराष्ट्र शासनाच्यावतीने आवश्यक ती कारवाई करावयास पाहिजे आणि अशा दूध संघाच्या चालकांना तुरुंगाची हवा दाखविली पाहिजे. नाहीतर अशा प्रकारचे दूध प्यायल्यामुळे ब्लड प्रेशर, हार्ट ॲटॅक, कॅन्सर असे अनेक प्रकारचे रोग होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. म्हणून हा प्रश्न महाराष्ट्र शासनाने अतिशय गांभीर्याने घ्यावा, अशी मी शासनाला विनंती करणार आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्यावतीने शेत तळयांना प्राधान्य दिलेले आहे. पण ते आवश्यक त्या प्रमाणात देण्यात आलेले नाही अशी माझी रास्त तक्रार आहे. सभापती महोदय, माझी आपल्यामार्फत राज्य शासनाला विनंती आहे की, या राज्यातील कमीतकमी 5 टक्के जमीन शेततळयाखाली आणावी. असे झाले तर या राज्यातील ओलिताखालील क्षेत्राचे प्रमाण हे निश्चितपणे 50 टक्क्याच्या पुढे गेल्याशिवाय रहाणार नाही. त्यासाठी आवश्यक तो कायदा करण्याची गरज असली तरी, याबाबतीत शासनाने तसा कायदा करावा आणि या राज्यातील 5 टक्के जमीन शेततळयाखाली आणावी. असे केले तर राज्यातील सिंचनाचे क्षेत्र वाढेल आणि दुष्काळाची परिस्थिती दूर होण्यास मदत झाल्याशिवाय रहाणार नाही.

सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने शेवटचा मुद्दा मांडणार आहे. महाराष्ट्र शासनाने 2005 मध्ये "विशाल प्रकपाच्या" बाबतीत धोरण जाहीर केले आणि तेव्हापासून 135 विशाल प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली. या विशाल प्रोजेक्टच्या माध्यमातून 1,53,9000 एवढया

. . . .4 के-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले . . . .

रकमेची गुंतवणूक अपेक्षित आहे. या गुंतवणुकीच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये 3.31 लाख नवीन नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतील. मला असे वाटते की, महाराष्टातील औद्योगिक धोरण अतिशय चांगले आहे. आज मंदीची लाट असताना सुध्दा नवीन 35 विशाल प्रकल्पांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने मंजूरी देण्यात आलेली आहे आणि मला येथे सांगण्यास आनंद होतो की, या उद्योग विभागाच्या माननीय मंत्री महोदयांचा दृष्टीकोन देखील विशाल स्वरुपाचा आहे. ते तरुण आणि तडफदार आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून संपूर्ण जगाचे लक्ष महाराष्ट्राकडे वेधून घेता येईल आणि त्यातून महाराष्ट्रामध्ये औद्योगिकीकरण होऊन राज्याचा विकास साधला जाईल. त्यामुळे माननीय राज्यपालांनी अतिशय दूरदर्शीपणाने हे भाषण महाराष्ट्रातील जनतेसमोर मांडलेले आहे. त्यामुळे मी जनतेच्यावतीने माननीय राज्यपालांचे अभिनंदन करतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद जय महाराष्ट्र .

----

. . . .4 के-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानण्यासाठी याठिकाणी प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. या चर्चेमध्ये माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये अनेक मुद्यांचा परामर्श घेण्यात आला आहे. त्याबाबत, त्यातील आकडेवारीबाबत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपापली मते व्यक्त केलेली आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ SBT/ प्रथम सौ. रणदिवे... 19:05

श्री. हेमंत टकले.....

त्यामध्ये दि.26 नोव्हेंबरचा हल्ला ते बेळगावचा प्रश्न येथपर्यंतच्या वाटचालीत न जाता मला या अभिभाषणा बद्दल काय वाटते, हे थोडक्यात मांडण्याचा मी आपल्या पुढे प्रयत्न करणार आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण हा एक संसदीय लोकशाहीमधील आवश्यक असलेला प्रोटोकॉल आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण संयुक्त सभागृहासमोर झाल्यानंतर त्या भाषणा विषयी चर्चा करणे आणि त्याबद्दलची आपली मते व्यक्त करणे हा या दोन्ही सभागृहांना संविधानाने दिलेला एक हक्क आहे. या अभिभाषणामध्ये "अजेंडा फॉर गव्हर्नन्स" याच्या मूळ ठिकाणी असलेला उपयोग आपण बघतो आणि त्यादृष्टीने शासनाने केलेली वाटचाल आपल्यासमोर मांडली जाते. नेहमी असे म्हटले जाते की, संकल्प आणि सिध्दी यामध्ये अनेकविध अडचणी वेगवेगळ्या टप्प्यावर नेहमी येत असतात. संकल्प खूप चांगला केला पण सिध्दीचे काय झाले? त्यामधील तफावर भरुन काढण्यासाठी वेळेवेळी योग्या त्या टप्प्यावर त्याचा परामर्श घेऊन त्याच्यामध्ये सुधारणा करावयासाठी आपले राज्य शासन काही करते आहे काय?याचे चित्र या अभिभाषणामध्ये दिसते. खरे म्हणजे माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे एक "Vision Document" असते. राज्य शासनाने आता पर्यंत काय केलेले आहे आणि यानंतर राज्य शासन काय करु इच्छिते हे सांगण्याचा प्रयत्न या अभिभाषणामध्ये केलेला आहे. तो प्रयत्न करीत असताना जे केंद्रस्थानी असायला पाहिजे ते म्हणजे आपल्या राज्यातील मनुष्यबळ चांगल्या प्रकारे विकसित होण्यासाठी जे जे आवयक आहे ते ते सर्व उपलब्ध करुन देण्यात येत आहे काय याचा विचार केला पाहिजे. आपण नेहमी असे म्हणतो की, आपल्या राज्यात औद्योगिक प्रगती होते त्यामुळे अनेक राज्यातून रोजगार मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लोक या ठिकाणी येतात. मुंबईत तर लाकांचे प्रचंड लोंढे येतात. आपल्या येथील मनुष्यबळ अधिक विकसित करण्याच्या दृष्टीने आणि अधिक प्रगल्भ करण्याच्या दृष्टीने या राज्याने आतापर्यंत काय प्रयत्न केले आहेत? आपल्याच राज्यातील काही जिल्हे मनुष्यबळ विकासामध्ये किंवा "Human Dvelopment Index" मध्ये मागे पडलेले का आहेत याचा विचार करुन त्याबाबतची उपाययोजना होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने शासनाने प्रयत्न केलेले आहेत हे या अभिभाषणामधून वारंवार दिसून येते. राज्यकर्त्यांचे किंवा प्रशासन यंत्रणेचे ज्याला व्हिजबल सिम्बॉल्स म्हणता येतील ज्याचा लोकांचा दैनंदिन जीवनाशी संबंध येतो त्यामध्ये गावातील पोलीस, गावातील सरकारी दवाखाना, गावातील शाळा या गोष्टी चांगल्या पध्दतीने

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ SBT/

श्री. हेमंत टकले.....

चालल्या तरच या सगळया यंत्रणेवर जनतेचा निश्चित विश्वास बसेल. त्याला अनुषंगीक सगळी प्रगती किंवा ज्या पध्दतीने आपण हेल्थ एज्युकेशन आणि एम्प्लॉएमेंट या विषयी बोलतो. यामध्ये शासनाला यंत्रणेमार्फत काही करण्याची आवश्यकता आहे असे मात्र निश्चितपणे म्हणावेसे वाटते. आपण अनेक गोष्टींवर बोललो की, एक विरोधाभास तयार होतो. एकीकडे प्रगती आणि ती प्रगती होत असताना एकूणच समाज जीवनाचा होत असलेला ऱ्हास.शालेय शिक्षणाच्या बाबतीत नव्या देणग्यांवर चालणाऱ्या वेगवेगळया राज्याबाहेरच्या किंवा मोठया अशा अभ्यासक्रमांच्या शाळांची वाढती संख्या, त्यामध्ये प्रवेशासाठी लागणारी फी, आणि त्याचबरोबर जिल्हा परिषदा, नगरपालिका, महापालिका यांच्या ओस पडलेल्या शाळा याचा कोठेतरी ताळेबंद माडला ज्यांच्यावर ही जबाबदारी आहे त्या यंत्रणेमधील लोक किती सक्षमतेने काम करतात. केवळ सहावा वेतन आयोग दिला. अधिक पगार दिले म्हणजे चांगले काम होते अशा पध्दतीचा गैरसमज जर या यंत्रणेमध्ये तयार होत असेल तर तो दूर करण्याची शसानकर्त्यांची जबाबदारी आहे. त्यामध्ये फॅक्टर ऑफ अकाऊंन्टेबिलिटी असतो. चांगले काम केले तर अधिक चांगले मिळेल आणि चांगले काम केले नाही तर त्याबाबतीत तुम्हाला शिक्षाही होऊ शकते अशा प्रकारचा धाक या यंत्रणेच्या बाबतीत आपण निश्चितपणे निर्माण करायला हवा.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

अशा पध्दतीची यंत्रणा आपल्याकडे तयार व्हावयास पाहिजे. एखादी गोष्ट आपल्या राज्यात चांगली झालीच नाही का ? अशा पध्दतीने आपण बघावयास लागलो तर सगळ्याच बाबतीत जे निराशाजनक चित्र उभे केले जाते तशी परिस्थिती मात्र नाही. उदाहरण द्यावयाचे झाले तर गेल्या तीन वर्षातील एस.टी. महामंडळाच्या कारभाराचे देता येईल. यामध्ये सगळ्यांनी जिद्दीने प्रयत्न केल्यामुळे तोट्यात चाललेला हा सरकारी उद्योग नफ्यामध्ये आणला आणि चांगल्या प्रकारे चालविला. हे जर घडू शकते तर सगळ्याच बाबतीत का घडू शकणार नाही याचाही विचार करण्याची वेळ आता आलेली आहे. त्यामुळे सरसकटपणे त्यांच्या खाजगीकरणाची आवश्यकता नाही. आपल्या राज्यातील आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांच्या बाबतीत आपण म्हणतो. काल गडचिरोलीच्या अधिकाऱ्याच्या बाबतीत सांगण्यात आले. गडचिरोलीला जी हत्या झाली त्यामध्ये श्री. अय्यर नावाच्या अधिकाऱ्याचा बळी गेला. ते एमबीए झालेले होते. प्रत्येक खात्यामध्ये जे आयएएस झालेले, आयपीएस झालेले, एमपीएससी पास झालेले अधिकारी असतील त्यांची जी शैक्षणिक पात्रता आहे ती एका क्षेत्रापुरती किंवा विषयापुरती मर्यादित झालेली आहे. अनेक इंजिनियर्स, अनेक डॉक्टर्स अशा सेवांमध्ये आहेत. पण त्यांची ज्या पध्दतीची पार्श्वभूमी असेल त्या जागेसाठी त्या अधिकाऱ्यांचा उपयोग करुन घेणे ही शासनाची जबाबदारी आहे. शासनाची इच्छा असेल तर सरकारी यंत्रणेमधील या सगळ्या उपलब्ध असलेल्या ह्युमन रिसोर्सेसचा अधिक व्यापकपणे, अधिक परिणामकारकपणे उपयोग करण्याची गरज आहे. त्यादृष्टीने शासन पावले टाकत आहे परंतु त्यामध्ये निश्चितपणे अधिक सुधारणा करावी. निश्चितपणे चांगल्या मार्गाने चाललेले, देशाचा आणि महाराष्ट्राचा नावलौकिक वाढविणारे महाराष्ट्राचे चित्र आहे. हे चित्र माननीय राज्यपालांनी आपल्या भाषणातून आपल्यासमोर मांडल्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे बोलतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा आता थांबवून उद्या माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तराच्या भाषणाच्या अगोदर राहिलेल्या एक दोन सन्माननीय सदस्यांची भाषणे घ्यावीत.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मी जास्त वेळ घेणार नाही.

श्री. दिवाकर रावते : यामध्ये वेळेचा विषय नाही. उद्या माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तराच्या भाषणाच्या अगोदर दहा मिनिटे सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली तर एक वातावरण तयार होईल. दोनच सन्माननीय सदस्यांची भाषणे व्हावयाची राहिलेली आहेत. यामुळे राहिलेल्या सन्माननीय सदस्यांची भाषणे उद्या सकाळी घ्यावीत

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मी माझे भाषण दोन मिनिटांमध्ये संपविणार आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी केलेल्या भाषणाबद्दल कालपासून या सभागृहामध्ये विस्तृतपणे चर्चा झालेली आहे. त्यामुळे त्याच त्याच मुद्यांची पुनरुक्ती मी करणार नाही. केवळ पाच मुद्यांचा ऊहापोह मी या ठिकाणी करणार आहे. 26/11 ला मुंबईमध्ये जी घटना घडली त्या घटनेने संपूर्ण भारत देश हादरला तसेच आपले राज्यही हादरले. या निमित्ताने राज्य सरकारला सुरक्षेच्या बाबतीत अनेक उपाययोजना कराव्या लागल्या. राष्ट्रीय सुरक्षा रक्षक दलाच्या धर्तीवर राज्य सुरक्षा रक्षक दल स्थापन करण्याचे शासनाने ठरविले आहे. ते करीत असताना बुलेटप्रूफ जॅकेट खरेदीमध्ये भ्रष्टाचार झाला असा मुद्दा पुढे येतो. हा अत्यंत खेदजनक मुद्दा आहे. मढ्याच्या टाळूवरील लोणी खाण्याचा प्रकार शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रामध्ये होणार असेल तर ते निश्चितपणे घातक आहे. त्याबाबतीत मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, वाड्या, वस्त्या, गावांना पाणी पुरवठा झाला पाहिजे यासाठी अनेक योजना राज्य सरकारने आणि केंद्र सरकारने या ठिकाणी आणलेल्या आहेत. परंतु महाराष्ट्र राज्य स्थापनेचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत असताना आजही अनेक गावांना, वाड्यांना पिण्याचे पाणी पुरविण्याची योजना झालेली नाही.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. हेमंत टकले )**

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

अनेक महिलांना कोसभर अंतरावरुन पाणी आणावे लागते. महाराष्ट्र राज्य निर्मितीचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आपण साजरे करीत आहोत. त्यामुळे अशा टंचाईग्रस्त भागांसाठी शासनाने धडक कृती कार्यक्रम हाती घ्यावा, जेणे करुन राज्यातील एकही वाडी वस्ती पाण्याशिवाय राहणार नाही. यासाठी जेवढा निधी लागेल तेवढा द्यावा. गरज पडल्यास एखादी योजना बाजूला ठेवावी. पण जनतेला पाणी मिळाले पाहिजे. यादृष्टीने शासनाने योजना आखावी.

सभापती महोदय, आज राज्यात 50 टक्के महिलांची संख्या आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरचे स्थान मिळाले आहे ही तुमची आमची भावना आहे. त्यादृष्टीने अनेक शासन निर्णय होतात. बचत गटाला 4 टक्के दराने कर्ज देण्याचा सरकारने निर्णय घेतला आणि त्याचा आवर्जून उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आलेला आहे. याबाबत निर्णय झाला परंतु त्याचा जी.आर.निघाला किंवा नाही, ती योजना जनतेपर्यंत पोहोचली किंवा नाही, त्याचा लाभ महिलांना मिळाला किंवा नाही त्याचा आढावा घेतला पाहिजे. आज आम्हाला अनेक ठिकाणी असे पहावयास मिळते की, शासनाचे अनेक चांगले निर्णय होतात परंतु ते जनतेपर्यंत पोहोचत नाहीत. जनता आणि सरकार यामध्ये बसलेले जे शासकीय कर्मचारी आहेत त्यातील सर्व वाईट आहेत असे मी म्हणणार नाही. परंतु झारीतील शुक्राचार्यांना शोधले पाहिजे. जे कर्मचारी चांगले आहेत त्यांना जरुर प्रोत्साहन दिले पाहिजे,पण जे काम करीत नाहीत, शासनाच्या चांगल्या निर्णयाची माहिती जनतेपर्यंत पोहोचवित नाहीत, त्याचा लाभ जनतेला मिळू देत नाहीत अशा लोकांना शोधून काढून त्यांना जरब बसेल अशाप्रकारची कारवाई केली पाहिजे. आज अनेक ठिकाणी पहावयास मिळते की, वरुन आलेल्या आदेशावर पुन्हा मार्गदर्शन मागविले जाते. एखाद्याला लाभ द्यावयाचा किंवा कसे याबाबत मार्गदर्शन मागविले जाते. वरच्या स्तरावरुन आलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्यामध्ये दिरंगाई करण्याचा, जनतेला लाभापासून वंचित ठेवण्याचा हा एक अजब प्रकार आहे. याची शासनाने गंभीरपणे नोंद घेतले पाहिजे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.विक्रम काळे...

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी अल्पसंख्याक समाजाबद्दल व्यथा व्यक्त केल्या आहेत. माननीय पंतप्रधानांनी अल्पसंख्याक समाजासाठी 15 कलम कार्यक्रम जाहीर केला आहे त्याचे मी जाहीर करतो. महाराष्ट्रात किंवा देशातील इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतच्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिक-पूर्व शिष्यवृत्ती घोषित केली आहे. हा निर्णय स्वागतार्ह आहे. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांद्वारे आयोजित केलेले रोजगाराभिमुख पाठ्यक्रम अनुसरण्यासाठी 21,748 इतक्याच अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार आहे. परंतु शासनाला तसे करुन चालणार नाही. आज अल्पसंख्याक समाजाचे जेवढे विद्यार्थी शिक्षण घेऊ इच्छितात, जेवढे विद्यार्थी शाळेत येतात, इयत्ता पहिली ते दहावी आणि दहावीनंतरच्या विद्यार्थ्यांना सुध्दा या शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी या योजनेची व्याप्ती वाढवावी लागणार आहे.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी शिक्षण क्षेत्रात सध्या जे काही सुरु आहे त्याबाबत आपली मते मांडली आहेत. शिक्षणाला विकासाचा पाया म्हटले जाते. डॉ.आंबेडकर यांनी म्हटल्याप्रमाणे शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो पिणार तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे प्रत्येक लेकरु शिक्षित झाले पाहिजे. त्यासाठी प्रत्येक आई-वडिलांची कष्ट उपसण्याची तयार आहे. पण आज शिक्षणाची दशा आणि दिशा काय आहे ? राज्यात विना अनुदानित धोरण सुरु आहे. त्याचा पुनर्विचार करावा लागणार आहे. शाहू महाराज, महात्मा फुले यांच्या राज्यामध्ये कोणत्या पध्दतीचे शिक्षण दिले जात आहे त्याच्यावर विचार करण्याची वेळ आलेली आहे. राज्यामध्ये नेमकी किती शाळांची गरज आहे ते पहाण्याची वेळ आली आहे. अनेक वेळा विनाअनुदानित तत्वावर शाळांना मान्यता देण्याची मागणी केली जाते. परंतु भविष्यामध्ये नवीन शाळांना मान्यता देण्याची गरज आहे काय याचाही विचार करावा लागणार आहे. मी उदाहरण म्हणून सांगू इच्छितो की, दरवर्षी ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात राज्यातील संपूर्ण शाळांमधील विद्यार्थ्यांच्या संख्येचा आढावा घेतला जातो.

यानंतर श्री.शिगम....

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विक्रम काळे...)

आणि त्या आधारे शिक्षकांच्या आणि शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नेमणुका केल्या जातात. त्याप्रमाणे संच गृहीत धरला जातो. या गोष्टींचा विचार केला तर गेल्या वर्षीच्या सन 2008-09 या शैक्षणिक वर्षामध्ये केलेल्या पट पडताळणी वरुन अनेक जिल्ह्यामध्ये विद्यार्थी संख्या नसल्यामुळे अतिरिक्त शिक्षक असल्याचे दिसून येते. एकीकडे विद्यार्थी संख्या नाही म्हणून शिक्षक अतिरिक्त ठरतात आणि दुसरीकडे राज्यामध्ये 33 ते 34 हजार शाळांचे प्रस्ताव शासन दरबारी मान्यतेच्या प्रतिक्षेत आहेत. याचा कोठे तरी गांभीर्याने विचार झाला पाहिजे. आमची पहिली मागणी अशी आहे की, ज्या विना अनुदानित शाळा चालू आहेत त्यांच्या बाबतीत कट ऑफ डेट ठरवून त्यांना अनुदानावर आणले पाहिजे. क्वॉण्टिटी पेक्षा क्वॉलिटी एज्युकेशन देण्यावर आपण भर दिला पाहिजे. शाळातून गुणात्मक आणि दर्जेदार शिक्षण मुलांना मिळाले पाहिजे. अशा प्रकारचे गुणात्मक आणि दर्जेदार शिक्षण ज्या शाळांमधून दिले जाते अशा संस्थांच्या शाळांना मान्यता देता येईल का यादृष्टीनेही विचार करावा आणि त्यादृष्टीने भविष्यात ठोस असा कृती कार्यक्रम शासनाने राबवावा. शासनाने सहावा वेतन आयोग दिल्यानंतर त्याबाबतीत अनेक वर्गातून उलटसुलट चर्चा झाली. शेवटी जे कर्मचारी काम करतात त्यांना मोबदला मिळाला पाहिजे म्हणून वेतन आयोग नेमण्यात आला. शासनाने सहावा वेतन आयोग लिागू केला. परंतु तो उशिरा लागू केला. हा वेतन आयोग लागू करीत असताना शासकीय संवर्गातील मुख्य घटक असलेल्या शिक्षक या संवर्गाच्या वेतनामध्ये त्रुटी ठेवलेल्या आहेत. हकीम समितीने शिक्षकांच्या पेबँडमध्ये 200 ते 300 रुपये कमी केलेले आहेत. शासनाने हकीम समितीला अशा प्रकारे वेतनश्रेणी कमी करण्याचे अधिकार दिलेले होते काय ? माझी अशी मागणी आहे की, केन्द्र सरकारने जे दिले आहे ते सर्वच्या सर्व राज्याने दिले पाहिजे. त्यासाठी शासनाला ठोस अशी पावले उचलावी लागतील. सभापती महोदय, मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे समर्थन करतो आणि माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

--

श्री. दिवाकर रावते : तालिका सभापती महोदय, सायंकाळचे सव्वासात वाजून गेलेले आहेत. तेव्हा आता सभागृहाची बैठक स्थगित करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती (श्री. हेमंत टकले)** : ठीक आहे. सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 4 जून 2009 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन्हा भरेल.

सकाळी 10.00 ते 10.50 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक भरेल व त्यामध्ये माननीय उपमुख्यमंत्री माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देतील. त्यानंतर सकाळी 11.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 23 मिनिटांनी गुरुवार, दिनांक 4 जून 2009 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली. )

------

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही